

# माझे कुटुंब मोठे झाले

ल. मा. पाटील

# माझे कुटुंब मोठे झाले !

(माझी पश्चिमेची सफर)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८३३८ दि:
क्रमांक ३६९ नों. दि. २२.३.६५

ल. मा. पाटील

जगताप-कारले प्रकाशन, पुणे २.

● प्रकाशक :

स. आ. जगताप
जगताप-कारले प्रकाशन
१९२ शुक्रवार, पुणे २.

● प्रथमावृत्ती १९६४

● मूल्य पाच रुपये

● मुद्रक :

मा. र. कारले
जनसेवा मुद्रणालय
१९२ शुक्रवार, पुणे २.

१९६४
म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू-प्रवास
सं. क्र. ३५७

REFBK-0014273
REFBK-0014273

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ वि: ३७.१०.१५
क्रमांक ...3.6.1.......... नों दि ..............


REFBK-0014273

REFBK-0014273

माझे पितृतुल्य चुलते ती. स्व.
रा. रा. आप्पा उर्फ निवृत्तीराव
दादाजी पाटील यांना प्रेमादर-
पूर्वक समर्पण.

—ल. मा. पाटील

— स्टॉरमॉट ( उत्तर आयर्लंड ) येथील एका परिसंवादाच्या वेळी घेतलेले छायाचित्र —



डावीकडून उजवीकडे—

(१) के. एस्. मदन, झांजीबार (२) श्री. सय्यद हसन अब्दूल कादर (सुदान) (३) श्री. स्टानिस्लास ए. पयासमा (सुदान, उभे भापण करीत असलेले) (४) श्री. आर. ए. दोहर्टी (वेस्टर्न नायजेरिया (५) श्री. ल.मा. पाटील (लेखक) (६) श्री. ए. आर. मुखर्जी (कलकत्ता) (७) श्री. गोपिकाविलास सेनगुप्ता (कलकत्ता).

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम
क्रमांक ........ दि: ........

# आभार

मुंबई विधान मंडळाने लंडन येथे भरलेल्या संसदीय कोर्ससाठी आपला प्रतिनिधी म्हणून माझी निवड केली. त्यामुळेच मला ह्या पुस्तकातील पत्रे लिहिणे शक्य झाले. त्याबद्दलत्या विधान मंडळाचे प्रथम आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

पुस्तकातील मजकूर बारकाईने वाचून मला माझे परमस्नेही व एक नामवंत लेखक श्री. श्री. द. कुलकर्णी बी. ए. ( ऑनर्स ), मुंबई यांनी बहुमोल सूचना केल्या व पुस्तकाचे सौन्दर्य वाढविण्यास मदत केली, याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

माझी मुलगी चि. सौ. उषा पोळ हिने छापण्यासाठी माझ्या पुस्तकाचा मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहून हस्तलिखित तयार केले, तिचे आभार मानणे बाप या नात्याने योग्य होणार नाही; परंतु, तिने जे परिश्रम घेतले, त्याबद्दल त्या परिश्रमाचा सप्रेम निर्देश केल्यावाचून मला राहवत नाही.

जनसेवा मुद्रणालयाचे मालक श्री. जगताप व श्री. कारले ह्यांनी या पुस्तकाची छपाई सुबक केली व पुस्तक थोडया अवधीत छापून प्रसिद्ध केले, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

ख्यातनाम साहित्यिक श्री. अनंतराव काणेकर यांनी ह्या पुस्तकास प्रस्तावना देण्याचे मोठया प्रेमाने कबूल केले व त्यांच्या पाठीमागे अनेक कार्यांचा व्याप असताना देखील अगदी अल्पावधीत प्रस्तावना लिहून मला प्रोत्साहन दिले, यावद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

पुस्तक लिहिण्यास अगर प्रसिद्ध करण्यास पिता आपल्या मुलांना उत्तेजन व प्रोत्साहन देतो, पण ह्या पुस्तकातील पत्रे पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यासाठी माझ्या मुलांनी आग्रह धरला व एका अर्थाने मला ते प्रसिद्ध करण्यास प्रोत्साहन दिले, या गोष्टीचा येथे प्रेमाने उल्लेख केला तर ते गैर होणार नाही.

माझे दुसरे एक मित्र श्री. ल. वि. देशपांडे, ॲडव्होकेट, हायकोर्ट, मुंबई यांनीही या पुस्तकातील मजकूर वाचून त्यात दुरुस्त्या सुचविल्या व पुस्तकातील मजकुराचे कोडकौतुक करून तो प्रसिद्ध करण्यास उत्तेजन दिले यावद्दल त्यांचे मी अंतःकरणपूर्वक आभार मानतो.

२२ मस्कती कोर्ट,
क्वीन्स रोड, मुंबई १.
दिनांक २६–१–१९६४

—ल. मा. पाटील

# प्रा स्ता वि क

चांगले प्रवास वर्णन दोन प्रकारचे असू शकते. एकात ज्ञान आणि उद्बोधनाला प्रामुख्य असते तर दुसऱ्यात संवेदना आणि अनुभवांना महत्त्व असते. दुसरा ललित वाङ्मयाचा प्रकार आहे. त्यात पाहिलेल्या दृश्यांचा किंवा आलेल्या अनुभवांचा प्रत्यय देण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. या प्रकारातून ज्ञान किंवा उद्बोधन मिळत नाही, असे नाही, पण प्राधान्य प्रत्ययाला असते. पहिल्या प्रकारातही प्रत्ययकारी वर्णने नसतातच असे नाही, पण मुख्यत्वेकरून ज्ञान देण्याकरिता, उद्बोधन करण्याकरिता परिस्थिती पाहिलेली असते किंवा अनुभव घेतलेले असतात. एके काळी मुंबई राज्याचे मंत्री असलेले आणि आता महाराष्ट्र राज्याच्या पब्लिक सर्व्हिस कमिशनचे सदस्य म्हणून कार्य करणारे माझे मित्र श्री. ल. मा. पाटील यांचे ' माझे कुटुंब मोठे झाले ' असे सुंदर आणि अन्वर्थक नाव दिलेले हे पत्ररूप प्रवासवर्णन प्रांजळपणे उद्बोधनाकरिताच लिहिलेले आहे.

' लेखकाच्या हृद्गता ' त त्यांनी आपला हा ध्येयवादी दृष्टिकोन स्पष्टपणे मांडला आहे. ते म्हणतात, ' . . . माझ्या प्रवासात अनेक देशातील नैसर्गिक शोभा पाहून व त्या त्या देशातील शिल्पकला, चित्रकला, सामाजिक व आर्थिक प्रगती पाहून मला जो आनंद मिळाला, त्यात माझ्या देशबांधवांना मला या पत्रांच्या प्रसिद्धीने वाटेकरी करता येईल, असे मला वाटू लागले. तसेच मला निरनिराळ्या देशात जो अनुभव आला, त्याचा फायदा माझ्या देशबांधवांना द्यावा, मी जी माहिती मिळविली व त्यामुळे माझ्या ज्ञानात जी भर पडली, तशीच भर माझ्या देशबांधवांच्या ज्ञानात पडावी, असे मनास वाटू लागले. आणि विशेष म्हणजे इतर देशांनी आपली प्रगती कशी केली, हेही त्यांना कळावे, त्यांच्यापासून जे शिकण्यासारखे आहे, ते माझ्या देशबांधवांपुढे ठेवावे; इच्छा ही की त्यांच्या चांगल्या गोष्टींचे आपण अनुकरण करून आपणही आपली प्रगती करावी, आपल्या देशाची सुधारणा व उन्नती करावी, अशी उमेद माझ्या देशबांधवांत निर्माण होण्यास या पुस्तकाने मदत होईल, असेही मला वाटू लागले . . . '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...आ.......... वि: ..............
क्रमांक .................. नों. दि.

कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनने मुंबई शाखेचे प्रतिनिधी म्हणून दोन महिन्यांच्या पार्लमेंटरी कोर्सकरिता श्री. ल. मा. पाटील यांना इंग्लंडला बोलावले. या दोन महिन्यांत इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंडमध्ये त्यांना बरेच फिरावे लागलेच, पण जाता येता फरान्स, इटली वगैरे देशही त्यांना सहजासहजी पाहता आले. परदेशभेटीच्या या संधीचा उपयोग श्री. ल. मा. पाटील यांच्यासारख्या अभ्यासू आणि समाजसेवेची पोटतिडीक असलेल्या व्यक्तीने स्वतःच्या चैनीकरिता न करता आपल्या देशाला आणि देशबांधवांना अत्यंत उपयुक्त होईल, असे ज्ञान मिळविण्याकरिता आणि आंतरराष्ट्रीय सलोखा वाढविण्याच्या दृष्टीने नवे नवे मित्र जोडण्याकरिता केला. उत्तर आयर्लंड या चिमुकल्या प्रदेशाची लोकसंख्या अवघी तेरा–चौदा लाख आहे, पण 'आयरिश लिनन' या तिथल्या प्रख्यात कापडाच्या उत्पादनात ६० ते ७० हजार मजूर काम करतात आणि चार कोटी पौंड किंमतीचा माल या प्रदेशातून बाहेर निर्यात होतो. इथल्या गोद्यात मोठमोठी जहाजे बांधली जातात आणि कारखान्यातून कॅनबेरा बॉंबर्ससारखी अजस्त्र विमाने तयार होतात. दीड लक्ष लोक शेतीवर खपतात आणि शेतमजुराचे आठवड्याचे सर्वसाधारण वेतन सहा पौंड म्हणजे ८१ रुपये असते. ही आणि अशा प्रकारची सूक्ष्म निरीक्षणाने मिळविलेली माहिती देऊन लेखक आपल्या मुलीला लिहिलेल्या एका पत्रात म्हणतात, '...मंगल ! ... ह्या पत्रात उत्तर आयर्लंडची इतकी विस्तृत माहिती देण्यात माझा हेतू आहे. आपल्या महाराष्ट्रातील एका जिल्ह्याएवढा हा देश आहे, पण या लहानशा देशाने केवढी औद्योगिक, सामाजिक व आर्थिक प्रगती केली आहे, हे मला तुला दाखवावयाचे होते. ह्या छोट्या देशाला जर इतकी प्रगती करता आली तर मग भारतासारख्या महान देशाला का करता येऊ नये ? भारतातील माझ्या देशबांधवांनी आयरिश लोकांसारखे योग्य दिशेने प्रयत्न केले तर आपली भारतभूमीही संपन्न, समृद्ध व उन्नत झाल्याशिवाय राहणार नाही, अशी माझी खात्री आहे...'

युनायटेड किंगडममध्ये त्यावेळेला निवडणुका चालू होत्या. चि. विठ्ठलला लिहिलेल्या पत्रात तिथल्या निवडणूक प्रचाराच्या वैशिष्ट्याची भरपूर माहिती देऊन लेखक म्हणतात, '...येथे निवडणूक प्रचार घरोघरी जाऊन करण्यावर

व मतदारांच्या भेटी घेण्यावर जास्त भर दिला जातो. सभा थोड्याच होतात. सभांना श्रोतेही फार नसतात. त्या त्या पक्षांच्या पुढाऱ्यांचे दौरेही कमीच असतात, मग कार्यकर्त्यांच्या दौऱ्याबद्दल येथे वानवाच आहे, असे म्हणावयास हरकत नाही. . . .दौऱ्यात भाषणेही मर्यादित होतात. मला वाटते की, या देशातील मतदार सर्वच सुशिक्षित असल्यामुळे व लोकशाही त्यांच्या अंगवळणी पडल्यामुळे तसेच ते वर्तमानपत्र वाचणारे व राजकारणाचे माहीतगार असल्यामुळे येथे निवडणुकीच्या वेळेला खूप सभा घेणे येथील राजकीय पक्षांना अनावश्यक वाटत असावे. येथे वर्तमानपत्रांचा खपही फार मोठा आहे. . . '

स्कॉटलंडमधील ग्लॅसगो नगरपालिकेचा केल्व्हिन हॉल म्हणजे दुभती गाय, असे वर्णन करून तिच्या विविध कार्यांची आणि अनुकरणीय उत्पन्नांच्या बाबींची अशीच उद्बोधक माहिती दिली आहे.

त्या त्या स्थळांची सूक्ष्म ऐतिहासिक आणि भौगोलिक माहिती मिळविणे, औद्योगिक, राजकीय, सामाजिक परिस्थितीचे विवेचक निरीक्षण करणे, याबरोबरच काही सज्जन, परोपकारी, कर्तृत्ववान व्यक्तींचा स्नेह जोडण्यातही श्री. पाटील यांनी यश मिळविले आहे. त्यांच्या या यशाची या पत्ररूप प्रवास वर्णनात ठिकठिकाणी प्रचीती येते. आपला हा प्रवासवर्णनाचा प्रयत्न ' . . .वाचकांना आनंद देईल, त्यांच्या ज्ञानात भर घालील, देशोन्नतीस त्यांना प्रवृत्त करील व ' वसुधैव कुटुंबकम् ' ह्या तत्त्वाचा थोडा तरी अनुभवी बनवील . . . ' अशी आशा श्री. पाटील यांनी आपल्या विनयपूर्ण हृद्गतात व्यक्त केली आहे. त्यांची ही आशा संपूर्णपणे सफल होईल, याबद्दल मला मुळीच शंका वाटत नाही.

' शांति कुंज '
हिंदु कॉलनी, दादर.
मुंबई १४.
१४ जानेवारी, १९६४.

— अनंत काणेकर

• • •

## लेखकाचे हृद्गत

स्टॅम्प (अस्पष्ट)

'वसुधैवकुटुंबकम्' हे भारतीय संस्कृतीचे एक ब्रीदवाक्य आहे. 'सर्व जग आपण आपले कुटुंब मानले पाहिजे,' हा संदेश फार पुरातन काली भारतातील ऋषिमुनींनी सर्व जगाला दिला आहे. तो संदेश हा भारतीय संस्कृतीचा गाभा आहे. जीझस ख्राईस्ट, मोझेस, पैगंबर महमद, झरतुष्ट्र वगैरे धर्मसंस्थापक जन्मास येण्यापूर्वी भारतातील द्रष्टया मुनींनी जग हे एक कुटुंब आहे व जगातील सर्व मानव एक आहेत, त्यांच्यात भेद करणे अधर्म आहे, असे मौलिक तत्त्व सर्व जगाला आर्तस्वराने सांगितले. एवढेच नव्हे तर हिंदुस्थानातील अनेक महाभागांनी, साधुसंतांनी व थोर महात्म्यांनी कित्येक शतके ते तत्त्व आपल्या आचरणात आणिले व आजही भारतातील काही महात्मे ते तत्त्व आचरून दाखवीत आहेत. हे तत्त्व भारतीयांच्या अंत:करणात ठसलेले आहे. सर्व जगाचे व्यवहार नियंत्रित करण्यासाठी आधुनिक काळात लीग ऑफ नेशन्स–राष्ट्रसंघ व युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन–संयुक्त राष्ट्रसंघ, अशासारख्या संस्था स्थापन झाल्या; त्या संस्थांचा हेतू हाच की जगातील निरनिराळी राष्ट्रे व त्यांतील जनता यांनी एकत्र यावे, एकमेकांस आपले मित्र अगर बंधू मानावे, आपसातील झगडे गुण्यागोविंदाने मिटवावेत व सर्व जगात शांतता व बंधुभाव निर्माण करावा; पण हाच हेतू भारतातील ऋषिमुनींनी मनात धरून त्याला त्यांनी धर्माचे अधिष्ठान दिले. त्यांनी हा हेतू केवळ धोरण न मानता त्याला धर्माचा प्राण बनविले. अनेक संस्कृत्या आल्या व नष्ट झाल्या, पण भारतीय संस्कृती आजही जिवंत आहे. याचे मुख्य कारण भारतीय ऋषिमुनींनी 'वसुधैवकुटुंबकम्' या तत्त्वाचा अंगीकार केला व त्याचा प्रसार केला. संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराज यांनी आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथात 'विश्व हेची माझे घर' ह्या शब्दात त्याच पुरातन तत्त्वाचा–'वसुधैवकुटुंबकम्'चा पुन्हा उद्घोष केला व ते तत्त्व जन्मभर आचरून दाखविले. श्री. शंकराचार्यांनी हेच तत्त्व जगाला सांगितले. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, अरविंद घोष, स्वामी रामतीर्थ, रमण महर्षि, इत्यादि लोकनेत्यांनी व धर्मनेत्यांनी आधुनिक काळात त्याच तत्त्वाचा उपदेश

केला. आजही ' जयजगत् ' अशी घोषणा श्री. विनोबाजी भावे करीत आहेत. राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् आपल्या ग्रंथातून व भाषणातून सर्व लोकांना आवर्जून सांगत आहेत की, " जगातील सर्व राष्ट्रांचे एक सरकार असले पाहिजे, जगातील सर्व लोकांनी एका कुटुंबातील आपण घटक आहोत, असे मानून एकमेकांशी वागले पाहिजे, तरच जगात न्याय व शांतता यांचे साम्राज्य नांदेल."

कोणी हिणवून आम्हा भारतीयांना विचारतील की, " हे मोठे तत्त्व तुम्ही सांगता, पण प्रत्यक्ष आचरणात तुम्ही ते आणीत नाही, तुमच्यात अनेक जाती आहेत, उच्चनीच भाव आहेत, मग ' वसुधैवकुटुंबकम् ' याच्या वृथा वल्गना का करता ? " त्याला माझे उत्तर असे आहे की, आमच्यात–म्हणजे भारतीयांत जे भेद दिसतात ते जग-व्यवहारासाठी घालून दिलेले नियम आहेत, ते नियम सनातन नाहीत, त्यांना धर्माचे अधिष्ठान नाही, ते बदलू शकतात, बदललेले आहेत व बदलणार आहेत. दुसरे, जातीचे व पंथांचे जे भेद हिंदुस्थानात दिसतात ते मानव निर्मित आहेत, आपल्या सोयीसाठी व त्या त्या काळाला व परिस्थितीला धरून ते बनविण्यात आले, काळ व परिस्थिती जशी जशी बदलत गेली, तसे तसे ते नियमही बदललेले आहेत व पुढेही बदलतील यात शंका नाही; पण ते नियम आमच्या संस्कृतीचे अंतरंग नाही. ' वसुधैवकुटुंबकम् ' हेच आमच्या संस्कृतीचे खरे अंतरंग आहे, हे आम्हा भारतीयांना माहीत आहे. म्हणून तर अनेक शतके हे जातीपंथांचे नियम असूनही आम्ही सर्व भारतात पूर्वी भावनात्मक ऐक्य निर्माण केले व अनेक वंशांच्या, धर्माच्या व पंथांच्या लोकांना आम्ही सामावून घेतले, सर्वांना आमच्या संस्कृतीत समाविष्ट केले व आमच्या संस्कृतीचे वारसदार बनविले.

कोणी आम्हांला असाही प्रश्न विचारतील की, " वसुधैवकुटुंबकम् ' हे तत्त्व अव्यवहार्य आहे, ते प्रत्यक्ष व्यवहारात आणणे शक्य नाही. कारण जगात पूर्वीपासून वंशांचे, धर्माचे, पंथांचे, भाषांचे वगैरे भेद आहेत; व ते जोपर्यंत नष्ट होत नाहीत, तोपर्यंत तुमचे ते थोर तत्त्व धर्मग्रंथातच राहील, प्रत्यक्ष आचरणात येणार नाही. " ह्याला माझे उत्तर असे आहे की, " धर्मांचे, पंथांचे, भाषांचे, वंशांचे वगैरे भेद हे वरवरचे आहेत, जगातील सर्व मानव एकाच मुशीतून तयार झालेले आहेत, ते एकाच तत्त्वांनी तयार केलेले आहेत." मी माझा अनुभव

सांगतो, " मी एका हिंदु कुटुंबाचा घटक होतो व आहे. या कुटुंबात माझे चुलते-चुलत्या, वहीण, भाऊ अनेक व्यक्ती होत्या व आहेत. त्या सर्व व्यक्तींचे आचार, विचार, राहणी इत्यादि सारखी नव्हती व नाही. तरी त्यामुळे आमच्यामध्ये परस्परांच्या प्रेमभावात कुठलाच प्रत्यवाय येऊ शकला नाही व येत नाही. माझे एक चुलते व माझे वडील पिता–पागोटे घालीत होते, माझे दुसरे दोन चुलते फेटे घालतात, आमच्या घरात काही टोप्या घालतात, तसेच माझ्या चुलत्या व आई नऊवारी लुगडे नेसत होत्या, तर काही तरुण मुली आज सहावारी पातळे नेसतात, तर काही युरोपियन पद्धतीचे फ्रॉक्स घालतात. तसेच आमच्या कुटुंबातील काही लोक मांसाहारी आहेत व काही शाकाहारी आहेत, माझी एक मुलगी तर कांदा-लसूणदेखील खात नाही, तिला आम्ही ब्राह्मण म्हणतो. हे झाले खाण्यापिण्यातील व पोषाखातील फरक; आता शिक्षणातील फरक सांगतो; कोणी आमच्या कुटुंबात खूप शिकलेले होते व आहेत, काही पदवीधर आहेत, तर काही निरक्षर आहेत; बरे धर्माच्या आचारविचारांसंबंधी एकवाक्यता म्हणावी तर तीही नाही; कोणी उपवासादि व्रते करतात, तर कोणी करीत नाहीत; कोणी रामाचे भक्त आहेत, तर कोणी दत्ताचे, कोणी मारुतीचे तर कोणी मूर्तिपूजा मानीत नाहीत, असे धर्मासंबंधीच्या आचारविचारात आमच्या कुटुंबात वैचित्र्य आहे, तरी त्यामुळे आम्ही सर्व एका कुटुंबाचे घटक म्हणून प्रेमाने वागलो व वागत आहोत; वर सांगितलेल्या भेदामुळे आमच्यातील बंधुभाव, प्रेम कमी झाले नाही. " अशा प्रकारची लाखो कुटुंबे आजही हिंदुस्थानात आहेत. आचारविचारातील भेद असूनदेखील ती कुटंबे प्रेमभावाने वागत आलेली आहेत. थोड्याफार फरकाने हिंदुस्थानातील अनेक जातीचे, पंथांचे व धर्मांचे लोकही आपण एका कुटुंबाचे घटक आहोत, अशा थार भावनेने वागत आलेले आहेत. इतर देशांतील लोकांमध्ये आपापसात थोडेफार आचारविचाराचे व इतर भेद असूनही तेही एकत्र नांदत आलेले आहेत. असे जर आहे तर जगातील निरनिराळ्या राष्ट्रातील लोकांमध्ये धर्मांचे, वंशांचे, पंथांचे, भाषांचे, आचारविचारांचे व इतर भेद आहेत म्हणून ते एकत्र नांदू शकणार नाहीत, त्यांच्यामध्ये बंधुभाव निर्माण होणार नाही, ते एका कुटुंबाचे घटक बनू शकणार नाहीत, या म्हणण्यात काही तथ्यांश दिसत नाही. आधुनिक काळात तर सर्व जगातील लोकांनी एका कुटुंबाचे घटक बनणे

आणखीच शक्य झाले आहे. शास्त्रीय शोधामुळे आपण जहाज, विमानादि वाहनांनी जलद प्रवास करू शकतो, दुसऱ्या देशात लीलया जाऊ शकतो, एकमेकांना भेटू शकतो, रेडिओ, वर्तमानपत्रे इत्यादि साधनांनी आपण विचारांची देवाणघेवाण करू शकतो. असे जर आहे, तर निरनिराळ्या राष्ट्रांतील लोकांनी केवळ वरवरचे काही भेद आहेत म्हणून अलग अलग आपली घरे करून राहिलेच पाहिजे या म्हणण्यात मला तरी तथ्य दिसत नाही. जर आंतरिक व भावनात्मक ऐक्य जगात निर्माण झाले तर वर ज्या भेदांचा मी निर्देश केला, ते भेद मानवांना एकमेकांस दूर करावयास अगर ठेवण्यास मुळीच समर्थ होणार नाहीत. असो ! तेव्हा मला येथे इतकेच सांगावयाचे आहे की भारतीयांचे ' वसुधैव कुटुंबकम् ' ते तत्त्व अव्यवहार्य नाही, ते व्यवहार्य आहे, एवढेच नव्हे तर तेच जगास तारक आहे. मानवांना शांततेचे दर्शन घडविणारे आहे. त्यांच्यात मैत्रीचा व बंधुत्वाचा घनिष्टभाव निर्माण करणारे आहे. युद्धांना सर्व जग आज भिते व ही भीती कशी नष्ट करावी, अशा विवंचनेने जगातील थोर थोर विचारवंत ग्रस्त झाले आहेत. अशा वेळी भारतीयांचा ' वसुधैव कुटुंबकम् ' हा महामंत्रच जगाला तारणारा आहे व त्यांना खऱ्या सुखाचा व शांतीचा मार्ग दाखविणारा आहे.

हा थोर विचार घेऊनच मी माझ्या प्रवासास प्रारंभ केला व त्याच विचाराने भारावून मी माझ्या प्रवासात वागण्याचा प्रयत्न केला. त्या प्रवासाचे मी ह्या पुस्तकात वर्णन केले आहे. काही देश मी पाहिले. अनेक देशांतील कितीतरी लोकांशी मी मैत्रीचे नाते जोडले, त्या त्या देशातील लोकांचे मी विचार व भावना समजावून घेतल्या, त्यांच्या आचारात जरी भेद दिसले तरी त्यांचा मी सहानुभूतीने विचार केला. ते भेद माझ्या व त्यांच्या मैत्रीत कधीच आडकाठी उत्पन्न करू शकले नाहीत, खरोखर ते भेद वरवरचे आहेत. अंतःकरणाशी अंतःकरण भिडविले म्हणजे ते भेद सूर्योदय झाला म्हणजे ढग जसे पांगतात, त्याप्रमाणे नष्ट होतात, हे मी अनुभविले आहे. माझा प्रवास संपला, माझ्या देशाला मी परत आलो, किती तरी दिवस उलटून गेले तरी माझा त्या त्या देशातील अनेक मित्रांशी आजही पत्रव्यवहार चालू आहे; ख्रिसमस आदि प्रसंगाने आम्ही एकमेकांना शुभेच्छा संदेश पाठवितो, एकमेकांच्या सुखदुःखाविषयी विचारपूस करतो. अशा रीतीने अनेकांशी मी मित्रत्वाचे नाते जोडले

आहे, ते सर्व मित्र माझ्या कुटुंबाचे घटक झाले आहेत आणि म्हणूनच ज्या प्रवासाने ' वसुधैव कुटुंबकम् ' हे तत्त्व अंशत: का होईना, मला साध्य करता आले, त्या प्रवासाच्या ह्या वर्णनाला–ह्या पुस्तकाला–मी " माझे कुटुंब मोठे झाले " हे नाव दिले आहे. माझ्या वाचकांना हे नाव आवडेल, अशी मी आशा बाळगतो.

हे पुस्तक म्हणजे मी प्रवासात असताना माझ्या मुलांना मी जी वेळोवेळी पत्रे लिहिली त्यांचा समुच्चय आहे. अर्थात प्रत्यक्ष मी जी पत्रे पाठविली ती ह्या पुस्तकात दिली तितकी विस्तृत नव्हती. माझी पत्रे माझ्या मुलांना आवडली व त्यांनी आग्रह धरला की मी ती प्रसिद्ध करावीत, ती पत्रे इतर मुलांनाही खास आवडतील, असे माझ्या मुलांचे मत पडले. इतर मुलांच्या आनंदासाठी मी ही पत्रे प्रसिद्ध करावीत, असा लकडा माझ्यामागे माझ्या मुलांनी लावला नसता तर ही पत्रे खाजगीतच राहिली असती व उजेडात आली नसती, हे मला येथे नमूद केले पाहिजे.

माझ्या मुलांचा आग्रह पाहून मी त्या दृष्टीने विचार करू लागलो. असा विचार करीत असताना मला ही पत्रे प्रसिद्ध करण्यात आणखीही फायदे दिसू लागले. आजकाल हिंदुस्थानातील बरेच लोक मी ज्या देशांना गेलो, त्या देशांत जातात. बोटीने, विमानाने प्रवास करतात. अनेक अनुभव त्यांनाही येतात. तरी पण अशा रीतीने प्रवास करणाऱ्या लोकांची संख्या आपल्या देशातील लोकसंख्येच्या मानाने किती तरी कमी आहे. परदेशात जाऊन प्रवास न करणारे माझे असंख्य देशबांधव आहेत. तेव्हा माझ्या प्रवासात अनेक देशांतील नैसर्गिक शोभा पाहून त्या देशातील शिल्पकला, चित्रकला, सामाजिक व आर्थिक प्रगती पाहून मला जो आनंद मिळाला, त्यात माझ्या देशबांधवांना मला ह्या पत्रांच्या प्रसिद्धीने वाटेकरी करता येईल, असे मला वाटू लागले. तसेच मला निरनिराळ्या देशात जो अनुभव आला, त्याचा फायदा माझ्या देशबांधवांना द्यावा, मी जी माहिती मिळविली व त्यामुळे माझ्या ज्ञानात जी भर पडली तशीच भर माझ्या देशबांधवांच्या ज्ञानात पडावी, असे मनास वाटू लागले आणि विशेष म्हणजे इतर देशांनी आपली प्रगती कशी केली, तेही त्यांना कळावे त्यांच्यापासून जे शिकण्यासारखे आहे, ते माझ्या देशबांधवांपुढे ठेवावे. इच्छा ही की,

" त्यांच्या चांगल्या चांगल्या गोष्टींचे आपण अनुकरण करून आपणही आपली प्रगती करावी, आपल्या देशाची सुधारणा व उन्नती करावी, " अशी उमेद माझ्या देशबांधवांत निर्माण होण्यास या पुस्तकाने मदत होईल, असेही मला वाटू लागले. माझ्या मुलांनी ही पत्रे प्रसिद्ध करावीत, असा मला आग्रह केल्यामुळे व त्या दृष्टीने मी विचार करू लागलो तेव्हा वरील काही फायदेही ही पत्रे प्रसिद्ध केल्याने होतील, असे मला वाटल्यामुळे मी ही पत्रे प्रसिद्ध करण्यास धजत आहे. मी वर निर्दिष्टिलेली उद्दिष्टे काही प्रमाणात तरी सिद्धीस गेली, तरी माझ्या श्रमाचे साफल्य झाले, असे मी समजेन.

माझा हा प्रयत्न माझ्या वाचकांना आनंद देईल, त्यांच्या ज्ञानात भर घालील, देशोन्नतीस त्यांना प्रवृत्त करील व " वसुधैव कुटुंबकम् " ह्या तत्त्वाचा थोडा तरी अनुभवी बनवील, अशी आशा व्यक्त करून मी हे माझे हृद्गत पुरे करतो.

—: ० :—

# प्रवासाची पूर्वतयारी

एक दिवस सकाळीच उठून मी गेट वे ऑफ इंडियाच्या (मुंबई) बाजूला फिरावयास गेलो. सकाळचा निवांत व प्रसन्न समय ! मी ताजमहाल हॉटेलच्या समोरील समुद्राला बांधलेल्या धक्क्याच्या भिंतीला टेकून समुद्राकडे पाहत होतो. समुद्राचे निळसर पाणी शांत होते. सूर्योदय व्हावयाचा होता, उषाचा कोमल तांबूस प्रकाश समुद्राच्या पाण्याला उजळीत होता. मी अर्थातच पूर्वेकडे तोंड करून उभा होतो. समोर उरणचे उंच डोंगर दिसत होते. आस्ते आस्ते सूर्यदेव त्या डोंगरामागून वर वर येऊ लागले. त्यांची किरणे चोहोकडे फाकू लागली. सूर्याने आपल्या प्रकाशाचे जाळे डोंगरावर, समुद्राच्या पाण्यावर, पृथ्वीवर, झाडावर, चहूबाजूला टाकले. त्या प्रकाशाने किमया केली, दाही दिशा प्रकाशित झाल्या, प्रसन्न झाल्या, सूर्याबरोबर हासू–खेळू लागल्या. त्यावेळी समुद्राच्या पाण्यावर लहान मोठ्या होड्या डोलत होत्या, मोठाली काही जहाजे स्थिर उभी होती. काहींनी दूरच्या देशांना जाण्यासाठी आपला प्रवास सुरू केला होता. माझ्या मनात सहज विचार आला, ' मला जर अशा एखाद्या जहाजातून दूर दूर देशपर्यटन करावयास मिळेल, तर किती मजा येईल. ' बराच वेळ मी समुद्राची, त्यावरील जहाजांच्या हालचालींची व सूर्याची शोभा पाहात उभा होतो. परत घरी आलो. त्या दिवशी समुद्रपर्यटनाचा व देश-पर्यटनाचा जो विचार माझ्या मनात आला, तो मी पुढे विसरूनही गेलो, पण योगायोग असा की थोड्याच दिवसांत गेट वे ऑफ इंडियावरून एका जहाजातून दूरदूरच्या देशांचा प्रवास करण्यासाठी मी हिंदुस्थान सोडले. जणू काय त्या दिवशीच्या मंगल प्रभाती सूर्यदेवाने माझ्या मनात आलेला देशपर्यटनाचा विचार ऐकला व त्याने माझ्यावर प्रसन्न होऊन माझ्या मनातील इच्छा पूर्ण केली.

युनायटेड किंग्डममध्ये कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनतर्फे मे १९५५ मध्ये पार्लमेंटरी कोर्स भरणार होता. त्यासाठी मुंबई शाखेतर्फे माझी प्रतिनिधी म्हणून निवड झाली. परदेशी प्रवासास जावयाचे म्हणजे अनेक विधी उरका-वयाचे असतात, अनेक गोष्टी करावयाच्या असतात. पासपोर्ट काढणे, देवी-

प्रतिबंधक व्हॅक्सिनेशन व कॉलरा प्रतिबंधक इनॉक्युलेशन घेऊन सर्टिफिकेटस मिळविणे, पासपोर्टसाठी फोटो काढणे, इन्कमटॅक्स क्लीअरन्स सर्टिफिकेट मिळविणे वगैरे गोष्टी कराव्या लागतात. याशिवाय इंग्लंड आदि देशात थंडी फार, तेव्हा गरम कपडे घेणे, विलायतचा प्रवास करावयाचा तेव्हा चांगल्या बॅग्ज व इतर जरूर त्या वस्तू खरीदणे ह्याही गोष्टी करावयाच्या होत्या. एप्रिलच्या १५ तारखेपर्यंत निघणे जरूर होते. त्यातून पैसा जवळ नाही. पण गंमत अशी की ता. ११ एप्रिलला एका मित्राने हवी असलेली रक्कम मला कर्जाऊ दिली. बोटीमध्ये ता. ११ ला ५ वाजता हजर राहावयाचे होते. पैसे १२ वाजण्याच्या सुमारास मिळाले. 'हिमालया' बोटीत माझ्यासाठी जागा मुक्रर करण्यात आल्याचे समजले. मला फार आनंद झाला. पैसे देऊन बोटीचे तिकीट घेतले. जणू काही आधी ठरविल्याप्रमाणे सर्व काही सुरळीतपणे पार पडले. ता. ११ एप्रिलला मला प्रवासास जावयास मिळेल, ह्या आशेने अगोदरच सामान बॅगांतून घालून बॅगा तयार ठेवल्या होत्या. घरच्या मंडळीसह मोटारीतून मी बॅलॅर्ड पीयरला गेलो. तेथे खूप उंच व भव्य अशी 'हिमालया' बोट धक्क्याला उभी होती. बोटीत चढण्या अगोदर क्यूमध्ये उभे राहून पोर्ट हेल्थ ऑफिसर, इमिग्रेशन ऑफिसर वगैरे अधिकाऱ्यांना भेटणे व त्यांना पासपोर्ट वगैरे दाखविणे नियमाप्रमाणे आवश्यक होते. ते सर्व पार पडल्यावर बोटीवर चढावयाचे होते. त्यासाठी मी लहान मुलाप्रमाणे अधीर झालो होतो. मला निरोप देण्यासाठी सौ. माई (माझी पत्नी) व माझी मुलगी चि. उषा यांना बोटीवर येण्याची परवानगी मिळाली होती. त्यांसह बोटीवर जाण्यापूर्वी आणखी एक विधी उरकावयाचा होता व तो म्हणजे मी बरोबर घेतलेल्या सामानांचे वजन करणे, त्यावर 'पी अँड ओ' कंपनीची लेबले व माझ्या नावाची लेबले लावणे वगैरे. ते सर्व झाले. मी माईसह व उषासह 'हिमालया' बोटीवर चढलो. उंच शिडीवरून बोटीवर चढताना इकडे तिकडे व वर बोटीकडे पाहू लागलो. अंतःकरणात आनंदाच्या पाकळ्या फुलत होत्या. प्रथम त्या बोटीतील माझी जी केबिन होती, त्याकडे आम्ही वळलो. केबिन सुंदर होती. केबिन पाहून झाल्यावर आम्ही तिघे बोटीतील जेवणाचा हॉल, बोटीतील कॉफी वगैरे घेण्यासाठी असलेले दालन, त्यावर खेळण्यासाठी राखून ठेवलेले डेक, पोहण्याचा तलाव वगैरे पाहून तर थक्कच झालो. इतके सर्व होत

आहे तो सायंकाळ झाली. आम्ही माझी केबिन ज्या मजल्यावर होती, त्याच्या डेकवर उभे होतो. समोरच्या बॅलॅर्ड पिअरच्या इमारतीच्या गच्चीवर माझी बाकी मुले व इतर मित्रमंडळी उभी होती. बोटीवरून खाली उतरण्याचा माझ्या पत्नीचा व मुलीचा वेळ जवळ जवळ येत होता. इतका वेळ आम्ही तिघे उत्साहात व आनंदात होतो. पण आता मी दूर दूर जाणार व काही महिने माझी व घरच्या मंडळींची ताटातूट होणार या कल्पनेने आम्हा सर्वांत उदासीनतेची भावना उत्पन्न झाली. दुःखाचा भावना वेग उचंबळून आला. माईच्या डोळ्यांत अश्रू झळकले व तिच्या गालावरून ते निखळू लागले, उषाच्या व माझ्या डोळ्यांनाही पाणी आले. आम्ही सर्वांनी संयमाने तो दुःखाचा आवेग आवरला व एकमेकांचा निरोप घेतला. माई व उषा दुःखी अंतःकरणाने मंद मंद पावले टाकीत बोटीच्या शिडीकडे गेली व फिरून फिरून माझ्याकडे पाहात शिडीच्या पायऱ्या उतरू लागली. गच्चीवरून विठ्ठल, आशा व मंगला—माझी मुले हसतमुखाने 'टाटा' करताना दिसली. त्यांच्या कोमल करपल्लवींची ती हालचाल मनाला मोहून टाकीत होती, क्षणभर आनंद झाला; पण सर्वांना सोडून काही काल मी दूर जाणार या भावनेने माझे मन हुरहुरल्यासारखे झाले. मी जड अंतःकरणाने हलके हलके पावले टाकीत माझ्या केबिनकडे गेलो.

● ● ●

: १ :

# अकल्पित भेट

एस्. एस्. हिमालया,
एडन
ता. १२–४–१९५५

प्रिय विठ्ठल यास, सप्रेम आशीर्वाद—

काल तुम्ही माझा निरोप घेतलात व नंतर मी माझ्या केबिनमध्ये गेलो. माझ्या केबिनमध्ये दोन बेडस्–म्हणजे झोपण्याची बर्थस् आहेत. सुदैवेकरून समुद्राच्या बाजूलाच माझी केबिन आहे व तिला गोल मोठा झरोका किंवा

खिडकी म्हणा हवी तर–आहे. समुद्राच्या बाजूला केबिन असणे ही सुदैवाची गोष्ट आहे. केबिनमध्ये वॉटरबेसीन टॅपसह आहे, फोन आहे, थोडे जरुरीचे फर्निचरदेखील आहे. स्वच्छ व नीटनेटकी आहे माझी केबिन. केबिनमध्ये मी आलो व तेथील सर्व व्यवस्था पाहून खूष झालो. पण एका गोष्टीची फिकीर वाटली व ती ही की ह्या केबिनमध्ये दुसरा प्रवासी कोण आहे याची ! कारण लंडनला जाईपर्यंत म्हणजे सुमारे १५ दिवस ज्याच्याबरोवर ह्या केबिनमध्ये राहावयाचे त्याचा स्वभाव आपल्या स्वभावाशी जमला पाहिजे. असा विचार करीत होतो, तोच जेवणाची वेळ झाली. मी हात तोंड धुतले व ज्या ठिकाणी जेवणाचा हॉल होता, तिकडे गेलो व एका टेबलावर बसलो. जेवणास सुरुवात करतो न करतो तो आश्चर्याचा धक्का बसावा, अशी एक गोष्ट घडली. माझ्याबरोबर डेक्कन कॉलेज–पुणे–येथे शिकत असलेले माझे एक जुने मित्र श्री. राजवाडे एकाएकी मी जेवत होतो तेथे दत्त म्हणून उभे ! त्यांना पाहून मला जसे आश्चर्य वाटले व आनंद झाला, तसे त्यांनाही वाटणे साहजिकच होते. एकतर बऱ्याच वर्षांनी आमची गाठ पडली व तीही अशा नाट्यपूर्ण स्थितीत ! मग सांग का आनंद होऊ नये ? का आश्चर्य वाटू नये ? आम्ही एकमेकांना अक्षरशः कडकडून भेटलो. हस्तांदोलन झाले. हे सर्व झाल्यावर आम्ही भानावर आलो व मग तोंडातून शब्द उमटू लागले व एकमेकांची आम्ही चौकशी केली. गंमत अशी की, बोलता बोलता मला त्यांच्याकडून कळले की त्यांच्या मुलाला माझ्याच केबिनमध्ये बर्थ मिळाली आहे. मग काय विचारता, मला अधिकच आनंद झाला व आपल्याबरोबर केबिनमध्ये प्रवासाचा सोबती कोण असणार ह्याविषयीची विवंचना दूर झाली. तसेच राजवाडे मंडळींची संगत बोटीवर लाभल्यामुळे प्रवासात–त्यातल्या त्यात सुरुवातीस–एकाकीपणाची जी भावना निर्माण झाली असती ती वरीच कमी झाली. पहिल्या दिवशी म्हणजे ता. ११ ला (एप्रिल १९५५) मुंबईस जे प्रवासी बोटीत बसले, त्यांना जेवणाच्या हॉलमधील आपापल्या जागा ठरविण्यासाठी तेथील हेडवेटरने लाऊड स्पीकरमधून सूचना दिली, राजवाड्यांसह मी त्याच्याकडे जाऊन जागा नक्की केल्या. राजवाड्यांबरोबर त्यांची पत्नीही होती. त्यांचा मुलगाही होता. एका टेबलावर जेवणासाठी सहा जणांची सोय करण्यात आली होती. राजवाडे, त्यांची पत्नी, मुलगा व मी असे मिळून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............

आम्ही एकाच टेबलावर जागा ठरविल्या,एकदा जागा ठरविल्या म्हणजे आपला प्रवास संपेपर्यंत त्या जागा प्रवाशांना बदलता येत नाहीत. ही व्यवस्था करण्यात इंग्लिश लोकांची शिस्तप्रियता दिसली व त्याची चुणुक पहिल्याच दिवशी माझ्या प्रत्ययास आली. माझे सामान केबिनमध्ये बरोबर आले की नाही ते मी तपासून पाहिले. बिछाना लावला, पण माझा पाय केबिनमध्ये कुठे ठरतो, मी केबिनमधून बाहेर पडलो. डेकवर आलो, इकडे तिकडे नजर टाकली. चोहोकडे लहानमोठ्या बोटी नजरेस पडल्या. त्यांच्यावर दिवे प्रकाशत होते. समुद्रावरून थंड वारे येत होते. समुद्राच्या पाण्याच्या लाटांचे गोड संगीत चालू होते. आल्हाददायक वातावरण होते. परंतु मनात हुरहूर होती. तुमची व माझी काही महिने ताटातूट होणार यामुळे नकळत मनात उदासीनतेची भावना थैमान घालीत होती. बराच वेळ तसाच मी उभा होतो, पण दिवसभर प्रवासाची तयारी करण्यात बरेच श्रम झाले होते. धावपळ बरीच करावी लागली, त्यामुळे थकवा येणे साहजिक होते. मनावरही ताण पडला होता. त्यामुळे आपोआपच माझे पाय विश्रांतीसाठी केबिनकडे वळले. केबिनमध्ये गेलो, पण झोपण्यापूर्वी केबिनच्या झरोक्यामधून डोकावल्याशिवाय मला कसे चैन पडणार ? झरोक्यातून डोकावले, खालीवर, आजूबाजूला जिथपर्यंत नजर जाईल तिथपर्यंत पाहिले. राजाभाऊबरोबर–राजवाड्यांचा मुलगा–आणखी थोडे बोललो व त्यांना सुरजनी ' गुड नाईट ' पुकारून अंथरुणावर अंग टाकले व थोड्याच वेळात निद्रादेवीच्या पाशात अडकलो. झोप चांगली लागली. त्या दिवशी रात्री बोटीने मुंबई कधी सोडली हे मला कळले देखील नाही.

तुझा

नाना

● ● ●

: २ :

# पाण्यावरील शहर

एस्. एस्. हिमालया,
एडन
ता. १४–४–१९५५

प्रिय आशा हिला सप्रेम आशीर्वाद—

ता. १२–४–१९५५ हा प्रवासाचा दुसरा दिवस. हा दिवस बहुतेक मी झोपेत काढला. गेल्या आठवडाभर प्रवासाची तयारी करण्यात बरीच धावपळ करावी लागली, त्यामुळे थकवा बराच आला होता. सुंदर व निवांत केबिन व त्यातील बर्थवरील सुखद बिछाना ! अशा वातावरणात जर मी सकाळी व दुपारी झोप काढली तर ते अगदी साहजिक होते. शिवाय ह्या दिवशी खाली समुद्राचे पाणी व वर आकाश ह्याशिवाय काही दिसणेही शक्य नव्हते; तेव्हा झोपेत वेळ गेला हे एका अर्थी बरेही झाले. रात्री जेवण झाल्यावर बोटीच्या 'प्रॉमिनाड' डेकवर इंग्लीश पद्धतीचे नृत्य झाले, इंग्लिश पद्धतीचे नृत्य मी पूर्वी पाहिलेले होते, त्यामुळे मला त्यात नाविन्य काहीच नव्हते, पण बोटीवर लोक कसे नाचतात ते पहावे म्हणून मी काही वेळ त्या डेकवर घालविला. नाचामध्ये भाग घेणारे एक गृहस्थ श्री. राजन व त्यांच्या पत्नी होती. त्यांच्या नावाचा निर्देश करण्याचे कारण, त्यांची ओळख श्री. राजवाडे यांच्यामुळे झाली. ते जोडपे डायनिंग हॉलमधील आमचे जे टेबल ठरले होते, त्यावरच जेवण्यासाठी येत असत. श्री. राजन हे मद्रासी गृहस्थ आहेत व सध्या ते इंडियन नेव्ही—भारताच्या नाविक दलात—मध्ये लेफ्टनंट आहेत व इंग्लंडला नाविक दलासंबंधी काही कोर्सचा अभ्यास करण्यासाठी जात आहेत.

नृत्य पाहिल्यानंतर मी माझ्या केबिनमध्ये झोपण्यास गेलो.

'हिमालया' बोट दुरून का होईना तू पाहिली आहेस. ह्या बोटीवर अ, ब, क, ड, ई वगैरे नावे दिलेली डेक्स आहेत. म्हणजे इमारतीला जसे मजले असतात तसे ही डेक्स बोटीवरती एकावर एक मजल्यासारखी आहेत. ह्या डेक्सपैकी बराच भाग प्रवाशांच्या केबिनांनी व्यापला आहे. परंतु इतर भाग

निरनिराळ्या गोष्टींसाठी वापरण्यात आला आहे. उदाहरणार्थ, सगळ्यात वरचे जे डेक आहे, त्याला बोट डेक म्हणतात. ह्या डेकवरती बऱ्याच लहान लहान बोटी टांगून ठेवण्यात आल्या आहेत. जर मोठी बोट म्हणजे 'हिमालया' धोक्यात सापडली तर ह्या लहान बोटींचा उपयोग प्रवाशांचे जीव वाचविण्यासाठी करण्यात येतो. ह्याशिवाय ह्या बोट डेकवर 'रिंग टेनिस,' 'बॅडमिंग्टन,' 'क्वॉईट' (Quait) वगैरे खेळ खेळण्यासाठी सोय करण्यात आली आहे. हे सर्वांत वरचे डेक. ह्यावर फिरण्यासाठीही जागा आहे. येथून सर्व बाजूने दूरवर नजर टाकता येते, रात्री येथे चांदण्या पाहण्यात व चंद्रिकेच्या शीतल प्रकाशात वेळ घालविण्यात फार गंमत आहे. ह्या डेकवरती एका बाजूस बोटीच्या कप्तानाचे ऑफीस आहे. ह्या बोट डेकखालचा जो डेक आहे, त्याला प्रॉमिनाड डेक म्हणतात. हा बोटीतील सर्वांत सुंदर डेक आहे. 'प्रॉमिनाड' ह्या शब्दाचा अर्थ शोकीची सहल किंवा शोकीने फिरणे. ह्या डेकवर मध्यभागी वेगवेगळी दालने आहेत व त्याभोवतालची जागा खुली व ऐसपैस आहे. ह्या खुल्या जागेत चोहोबाजूने फिरता येते. ह्या डेकवरती जी दालने आहेत त्यामध्ये एक दालन फार भव्य व मोठे आहे. ह्यास कॉफी लाउन्ज ( Lounge ) म्हणतात. ह्या ठिकाणी तक्तपोशीवर सुंदर व सुशोभित गालिचे अंथरलेले आहेत व सुरेखशी व मऊमऊ कोचेस व लहानमोठी मेजेही मांडण्यात आली आहेत. सकाळ–संध्याकाळ जेवण झाल्यावर येथे सर्वजण कॉफीपानासाठी जमतात, म्हणून या दालनाला 'कॉफी लाउंज' असे नाव देण्यात आले आहे. परंतु ह्या दालनाचा इतरही गोष्टींसाठी उपयोग करण्यात येतो. येथे प्रवासी येऊन पत्ते खेळतात. काही जण जमून चर्चा करतात. हे दालन फारच मोठे आहे. त्यामुळे एखाद्या कोपऱ्यात बसून काहींना निवांत गप्पागोष्टीही करता येतात. ह्याच दालनास लागून एक वाचनालय आहे व प्रवाशांना येथून वाचनासाठी पुस्तके मिळतात. याखेरीज ह्या दालनाला लागून काही थोड्या खोल्या आहेत. या सर्व ठिकाणी उत्तम व उंची फर्निचर आहे, येथे बसून पत्रे वगैरे लिखाणही प्रवासी करतात. कॉफी लॉउंजच्या बाजूस दुसरे मोठे दालन आहे, ते दोन्ही बाजूस खुले आहे, या दालनात सिनेमा, नृत्य वगैरे कार्यक्रम होत असतात. 'प्रॉमिनाड' डेकखाली जे डेक आहे, ते 'ए' डेक होय.

ह्या डेकवर पोहण्यासाठी लहानसे तळे बांधण्यात आले आहे, सध्या उन्हाळा असल्यामुळे बरेच स्त्री–पुरुष ह्या ठिकाणी पोहण्याचा आनंद लुटीत आहेत. ह्या 'ए' डेकवर एका बाजूस खुली जागा आहे,युरोपियन लोक ह्या ठिकाणी तासन् तास बसतात व उन्हाने आपली कातडी तपकिरी रंगाची करण्याचा प्रयत्न करतात. 'ए' डेकच्या खाली 'बी' डेक आहे, ह्या डेकवर 'पोस्ट ऑफीस' आहे, येथून प्रवाशांना पोस्टाची तिकिटे मिळतात, त्यांना पत्रे, तारा वगैरे पाठविता येतात. त्या खालचे डेक 'सी' ह्या ठिकाणी ओशन ट्रेडिंग कंपनीचे एक दुकान आहे. ह्या दुकानात स्टेशनरी, टॉयलेटस, कापड, खेळणी, सुंदर सुंदर शोभेच्या वस्तू, कन्फेक्शनरी (मेवामिठाई), कॅमेरा, निरनिराळी चित्रे व प्रसिद्ध शहरांची माहिती देणारी फोटोंसह पुस्तके इत्यादि वस्तू विक्रीस ठेवलेल्या आहेत. 'सी' खाली 'डी' डेक आहे. ह्या डेकवरच माझी केबिन आहे. ह्या डेकवर जेवणाचा भव्य हॉल आहे. येथे सुमारे ३००–३५० लोक एकदम जेवण्यास बसतील, इतकी मोठी जागा आहे. युरोपियन पद्धतीचे जेवण–म्हणजे ह्या हॉलमध्ये मेज व खुर्च्या आल्याच. 'अ' वर्गाशिवाय टूरिस्ट हा दुसरा वर्ग बोटीवर आहे. फक्त या दोनच वर्गाचे प्रवाशी ह्या बोटीवर आहेत. बोटीच्या अगदी खालच्या बाजूला बोट चालविणारी व इतर कामे करणारी अजस्त्र यंत्रे आहेत. हे यंत्राचे दालन पाहिले म्हणजे एका मोठ्या कारखान्याची आठवण होते. ह्याच यंत्राच्या साहाय्याने वीज उत्पन्न करण्यात येते व ती बोटीवरती सर्व ठिकाणी खेळविण्यात आली आहे. यंत्राच्या साहाय्याने तोटच्यांतून पाणी-पुरवठा सर्व ठिकाणी करण्यात आला आहे. व टेलिफोनची व्यवस्थाही ह्या यंत्राच्या मदतीने झाली आहे. या बोटीवर प्रवासी नोकरवर्ग व अधिकारी वर्ग मिळून तीन हजार लोक तरी असावेत.येथे पाणी पुरवठा, टेलिफोन, पोस्ट ऑफीस वीज पुरवठा, सॅनिटेशन वगैरेंची शहरासारखी व्यवस्था आहे. बोटीवर डॉक्टर आहे व औषधपाण्याची सोयही करण्यात आली आहे. सलूनही आहे व दाढी करण्यासाठी इलेक्ट्रिक रेझर्सची व्यवस्था करण्यात आली आहे. जेथे स्वत: कपडयांना इस्तरी करता येईल, अशा इलेक्ट्रिक आयर्न्स व मेजे यांनी युक्त अशा खोल्या आहेत. आणखी कोणती सोय राहिली सांग पाहू ? थोडक्यात या बोटीवरील वस्ती म्हणजे आधुनिक सुखसोयींनी युक्त असे एक लहान शहर

आहे. डेकवर जाऊन समुद्राकडे पाहिले व बोटीच्या गतीने उत्पन्न होणारा समुद्राच्या पाण्याचा खळखळाट ऐकिला तरच आपण प्रवासात आहोत, याची आठवण होते, नाही तर आपण एकाद्या सुंदर, टुमदार, आधुनिक शहरात राहत आहोत, असे वाटते. अर्थात हे पाण्यावर चालणारे शहर आहे, एवढाच फरक.

येथे मला दोन गोष्टी फार आवडल्या. एक म्हणजे बोटीवरील स्वच्छता, टापटीप व नीटनेटकेपणा व दुसरी म्हणजे नोकर वर्गातील शिस्त, सभ्यता व काम करीत असताना त्यांची हासरी व आनंदी वृत्ती.

आज म्हणजे ता. १४ ला–दिवसभर समुद्र अगदी शांत आहे. लाटा जवळ-जवळ नाहीतच. त्यामुळे बोटीच्या चोहोबाजूने लांबच लांब निळी सतरंजी टाकली आहे, असा भास होतो.

मुंबई सोडल्यापासून ता. १४–४–१९५५ ला गुरुवारी तिसऱ्या प्रहरापर्यंत जमिनीचे दर्शन झाले नाही. या पहिल्या दोन अडीच दिवसांचा प्रवास अरेबियन समुद्रात झाला. हा प्रवास १६५० मैलांचा झाला. ता. १४ ला तिसऱ्या प्रहरी डोंगर असलेली काही बेटे दिसली. नव्हे हे डोंगर म्हणजेच बेटे, जणू समुद्र आपले अनेक हात वर करून आमचे स्वागत करीत होता. हे डोंगर सुळक्या-सारखे व ओबडधोबड होते. त्यावर एकही झाड नव्हते. अगर दुसरी कसलीही वनस्पती नव्हती.

पत्र फारच लांबले. किती तरी लिहावेसे वाटते, परंतु आता पुरे. बाकी गोष्टी पुढच्या पत्रात.

तुझा

**नाना.**

: ३ :

# एडन–अरब जगाचे प्रवेशद्वार

एस्. एस्. हिमालया,
पोर्ट सय्यद
ता. १६–४–१९५५

प्रिय मंगलास, सप्रेम आशीर्वाद—

आज १५ तारीख. सकाळी उठलो. सकाळचे विधि आटोपले. चहा घेतला. व सहज केबिनच्या खिडकीतून–झरोक्यातून–बाहेर नजर टाकली, तोच पर्वतांच्या रांगा दिसल्या. तीन दिवसांनी जमिनीचे दर्शन घडले. पर्वतांच्या रांगा पाहताना गंमत वाटली. ह्या रांगा एडनच्या बाजूला म्हणजे उत्तरेला होत्या. सकाळची सूर्याची सोनेरी तांबूस रंगाची किरणे पर्वतांच्या रांगावर पसरली होती. एडन शहर जवळ जवळ येत असल्यामुळे या शहराकडे जाणाऱ्या इतर बोटीही नजरेस पडल्या. गेल्या तीन चार दिवसांत आमच्या बोटीशिवाय दुसरी कोणतीही बोट दिसली नाही. या बोटी एकाएकी येथे आल्या कशा याचे आश्चर्य वाटले. तसेच समुद्रपक्ष्यांचे थवेही दिसू लागले. नंतर ११ वाजण्याचे सुमारास एडन शहर दृष्टिपथात आले. 'एडन बंदरात' हळहळू आमची बोट शिरली. ती तेथे सावकाशीने प्रवेश करीत असता समुद्रपक्ष्यांची गडबड चालू होती. काही भुर्रकन उडत, तर काही समुद्राच्या पाण्यावर बसून लाटांवर झोके घेत, काही गिरक्या घेत असा त्यांचा मनोहर खेळ चालला होता. किती तरी वेळ मी त्यांच्याकडे पाहात होतो. एडन बंदरात बोट आत जात असताना माझे लक्ष समुद्रपक्ष्यांकडे गेले. तसेच समुद्राच्या पाण्याकडेही गेले. पाण्याचे विविध रंग सूर्यप्रकाशात सुंदर दिसत होते, कोठे हिरवे, तर कोठे निळे, तर कोठे धुरकट, तर कोठे काळसर असे रंग दिसत होते. बंदरात बोटीने नांगर टाकला व ती तेथे स्थिर झाली. बोटीतील प्रवाशांची गडबड सुरू झाली. कारण त्यांना एडन शहर पाहावयास जावयाचे होते. मी व आणखी नऊजण एका गटाने एडन पाहण्यास जाणार होतो. आमचा गट तिकडे जाण्यासाठी तयार झाला, बोटीला शिड्या लावून खाली उतरण्यासाठी जिना तयार करण्यात आला. त्या जिन्याने

आम्ही खाली उतरून बोटीला लागून ठेवलेल्या लाँचेसमध्ये उतरलो व लाँचेसने पुढे बंदराच्या धक्क्याकडे गेलो व तेथे उतरलो. समुद्राच्या किनाऱ्यावर लांबच लांब पसरलेला व वळण घेत गेलेला डांबरी रस्ता आहे. तो रस्ता पाहून मला मुंबईच्या 'मरिन ड्राईव्ह' रस्त्याची आठवण झाली. अर्थात आपला मरिन ड्राईव्ह त्यापेक्षा जास्त सुंदर आहे. हा रस्ता चंद्राच्या कोरीच्या आकारासारखा आहे. म्हणून इंग्रज लोकांनी याला 'Crescent' असे नाव दिले आहे. क्रेसेंट (Crescent) म्हणजे चंद्रकोर. त्या रस्त्याच्या एका बाजूला विविध वस्तूंनी भरलेली अथवा मनोहर रीतीने मांडणी केल्यामुळे सजवलेली म्हण हवे तर–सुशोभित दुकाने आहेत व दुसऱ्या बाजूला समुद्र आहे. एडन हे एक महत्त्वाचे बंदर. त्यामुळे बहुतेक बोटी येथे थांबतात व बोटीवरील प्रवासी या बंदरात उतरून किनाऱ्यावरील ह्या दुकानांना भेट देतात, ह्या दुकानांतून विक्रीही बरीच होते, याचे कारण मला जे समजले, ते हे की, येथे कस्टम ड्युटी ( जकात कर ) नाही किंवा फार कमी आहे. निरनिराळ्या तऱ्हेचे कापड व तयार कपडे, घड्याळे, खेळणी, बूट, टॉयलेटची प्रसाधने इत्यादि वस्तू ह्या दुकानांतून विकल्या जातात. ठिकठिकाणी हॉटेल्स व रेस्टॉरंटस्ही आहेत. खरेदी करून थकलेल्या प्रवाशांना ती खऱ्या अर्थाने आरामगृहे भासतात, मी व माझे इतर मित्र ह्या दुकानांतून हिंडता हिंडता थकलो की, या हॉटेल्समध्ये जात असू. तेथे बसून समुद्राकडे पाहत खाणेपिणे करण्यात मौज वाटे व श्रमाचे परिहरण होई. त्या रम्य दुकानांतून खरेदीसाठी हिंडणे ही एक और मजा आहे.

आम्ही म्हणजे मी व आमच्या बॅचमधील-गटामधील–इतर मंडळी, एडनच्या किनाऱ्यावर उतरल्यावर आमच्यासाठी पी. अँड ओ. कंपनीने तयार ठेवलेल्या मोटारीत बसलो व प्रथम एडन येथील एक बाग पाहण्यास गेलो. ही बाग एडन बंदरापासून सुमारे अकरा मैल दूर आहे. ही बाग तशी फारशी सुंदर नाही. परंतु ह्या बागेचे महत्त्व म्हणजे ही 'ओएसिस' आहे. 'ओएसिस' म्हणजे सभोवार वाळवंट, पाण्याचा कोठे थेंब नाही व झाडझुडुप तर राहू द्या, पण पानदेखील दिसणार नाही, असा प्रदेश. एडनच्या आजूबाजूला असा प्रदेश आहे व अशा प्रदेशामध्ये एखाद्या ठिकाणी पाण्याचे झरे किंवा विहिरी असतात व त्या पाण्या-मुळे हिरवळ तयार होते, झाडे वाढतात व काही ठिकाणी बागाही तयार होतात.

चोहोबाजूला रखरखीत वाळवंट व मध्येच कोठे पाणी व हिरवळ असते त्याला 'ओएसिस' म्हणतात. हे वर्णन मी भूगोलात वाचले व तूही ते वाचले असशीलच, पण प्रत्यक्ष 'ओएसिस' पाहण्याची माझी ही प्रथम वेळ, त्यामुळे वरील बाग पाहून मजा वाटली. ह्या बागेत काही ठिकाणी उंच व दाटीने उभी असलेली झाडी आहे, त्यांत हिंदुस्थानाप्रमाणे बाभुळ, लिंब, चिंच इत्यादि झाडे दिसली, ह्या झाडांमुळे मला तो बाग काहीसा आकर्षक वाटला. ह्या 'ओएसिस'ला 'शेख ओथमन' ( Sheikh Othman ) ओएसिस म्हणतात. एडन शहरात थोडी झाडे व फुले दिसली, ही झाडे व फुले बहुतेक हिंदुस्थानातल्या-सारखी म्हणजे निंब, चिंच, बाभूळ, कन्हेरी, जास्वंदी वगैरे होती; ह्या झाडांच्या सादृश्यामुळे आपण हिंदुस्थानातच आहो, असे मला वाटले. झाडी व फुलझाडे ह्याप्रमाणे येथील लोकही हिंदी लोकांसारखेच वाटले, पोशाखाचे थोडे वैचित्र्य व वेगळी भाषा सोडली तर हे लोक मला आपल्याजवळचे व आपल्यासारखेच आहेत, असे वाटले. त्यांच्यापैकी काहींना 'हिंदुस्थानी' भाषा येत होती, त्यांना हिंदी लोकांबद्दल आपुलकी आहे, आदर आहे असे त्यांच्यापैकी काहींच्या बोलण्यावरून वाटले. 'हिंदुस्थान' स्वतंत्र झाला याबद्दल त्यांना आनंद वाटत होता व त्यांच्यापैकी एकदोन गृहस्थ आम्हांला म्हणाले की, "जसा तुमचा हिंदुस्थान स्वतंत्र झाला, तसे आम्हीही होऊ, इंग्रजांबरोबर लढू व मुक्त होऊ."

नंतर आम्ही दुसऱ्या एका रस्त्याने एडन येथील तळी पाहाण्यास निघालो. एके ठिकाणी दोन्ही बाजूने डोंगर व वरती कमानीसारखी बांधणी करून खालून रस्ता जातो. खूप उंच डोंगर व वरती दोहोंमधील अंतर कमी होत गेलेले व त्यातून रस्ता काढलेला आहे, त्या रस्त्याने आम्ही वरील कमानीखालून गेलो. त्या कमानीचे दृश्य भव्य व मजेदार दिसत होते. कमानीखालून पुढे गेल्यावर 'क्रेटर' लागले. 'क्रेटर' म्हणजे नवे एडन. जसा मुंबईचा 'फोर्ट'चा भाग तसे हे एडनचे 'क्रेटर'. 'क्रेटर'मध्ये पार्सी, बोहरी, बनिया इत्यादि हिंदी लोकांची बरीच वस्ती आहे, तसेच इंग्लिश व यामन लोकांचीही वस्ती आहे. ह्या भागा-तील बहुतेक लोक अर्थात श्रीमंत व्यापारी आहेत. ह्याच 'क्रेटर' भागात जुन्या जमान्याची प्रसिद्ध तळी आहेत. आम्ही त्या तळ्यांकडे गेलो. किती तरी शतकांपूर्वी हा प्रदेश तुर्की लोकांच्या ताब्यात होता. त्यावेळी तुर्की राजांनी ही

तळी बांधली. तळी म्हटली की बहुतेक सपाट जमिनीवरती असतात. परंतु ही तळी डोंगराच्या दरीमध्ये आहेत. डोंगराच्या माथ्याकडे भिंत बांधलेली, तेथे एक तळे तयार झाले, नंतर त्याच्याखाली दुसरी भिंत बांधून व इतरही बाजूने बांधणी करून दुसरे तळे तयार केलेले आहे व त्याच्या खालच्या बाजूला तिसरे तळे तशाच रीतीने तयार केलेले, नंतर चौथे. अशा रीतीने डोंगराच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत तळ्यांची रांग आहे. असे सांगतात की `काळाच्या ओघात डोंगराची माती पावसापाण्याने वाहून ती या तळ्यात साचली व ती इतकी की ती तळी बुजून गेली, लुप्तप्राय झाली. परंतु सुमारे १८५४ सालात एका इंग्रज अधिकाऱ्याला या तळ्यांचा शोध लागला व नंतर मातीचे आवरण काढून ही तळी उजेडात आली. एडनमध्ये विशेष पाहण्यासारखे म्हणजे मला ही तळी वाटली. ब्रिटिश लोकांचे साम्राज्य नाहीसे झाले, तरी पण 'एडन' शहरावर ब्रिटिशांची आजही हुकमत आहे. येथे ब्रिटिशांचा मोठा विमानतळ आहे, त्यांचे सेक्रेटरीएट व इतर कचेऱ्या आहेत, आधुनिक सुखसोयींनी समृद्ध अशी त्यांची आलिशान घरे आहेत. एडन हा यामन देशाचा भाग आहे. 'एडन' सोडून इतर यामन देश स्वतंत्र आहे. अर्थात एडनमध्ये बहुसंख्य लोक यामन आहेत. हे लोक अरबी भाषा बोलतात. युरोपियन्स, अरब, सोमाली, हिंदी व ज्यू अशा निरनिराळ्या वंशांचे लोक एडन येथे राहतात. या शहराची एकूण लोकसंख्या ८०,००० आहे. येथील सर्वसाधारण लोकांची राहणी साधी आहे. एडनमध्ये एका बाजूस 'क्रेटर' सारखा सुंदर सुंदर इमारतींचा भाग आहे, तसा दुसऱ्या बाजूला झोपडचा असलेला भाग आहे. डोंगरांमध्ये तेल शुद्धीकरणाचे ब्रिटिशांचे मोठमोठाले कारखाने आहेत.

एडन बंदर सोडल्यावर आमच्या बोटीने 'तांबडचा' समुद्रात प्रवेश केला. ह्या समुद्राची रुंदी जास्तीत जास्त १९० मैल आहे व लांबी सुमारे १३१० मैल आहे. तांबडा समुद्र एडनपासून सुएझ सामुद्रधुनीपर्यंत पसरलेला आहे. ह्या समुद्राची खोली हिंदीमहासागर, अॅटलांटिक वगैरे मोठचा समुद्रांच्या मानाने कमी आहे, त्यामुळे समुद्रातील वीडस म्हणजे वेलीसारखे समुद्रात वाढणारे गवताचे थर समुद्राच्या पाण्यावरती येतात व तरंगतात. हे गवत तांबडचा रंगाचे आहे व हे थर ठिकठिकाणी पाण्यावर पसरलेले असतात, त्यामुळे चहूकडे

तांबडा रंग दिसतो, म्हणून या समुद्रास ' तांबडा समुद्र ' म्हणण्यात येत असावे, असा एक अंदाज प्रथम ब्रिटिश प्रवाशांनी केला. अर्थात हा एक अंदाज आहे. आमची बोट ता. १५ च्या रात्रीला तांबडया समुद्रात शिरली, त्यावेळी अर्थातच समुद्रावर गवताच्या वेली आहेत, किंवा नाहीत हे पाहता आले नाही. परंतु ता. १६ ला सकाळी आमची बोट या तांबडया समुद्रातून जात असताना मी डोळे फाडफाडून पाहिले परंतु कोठे वीडस–गवत दिसले नाही, तेव्हा त्यांचा तांबडा रंग कोठून दिसणार ! पण त्या दिवशी–शनिवारी–सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास मी व श्री. राजवाडे, ' ह्या समुद्राला तांबडा समुद्र का म्हणतात ?' ह्याबद्दल तर्क करीत असता राजवाडे यांनी माझे लक्ष समुद्राच्या पाण्याकडे वेधविले; व खरोखरच त्यावेळी समुद्राच्या पाण्याचा रंग तांबूससर दिसत होता. हा तांबुससर रंग का दिसतो सांगता येत नाही, तो तसा रंग काही अंतरावर सकाळी दिसला नंतर मात्र तो तसा रंग तांबडा समुद्र ओलांडून जाईपर्यंत दिसला नाही. कदाचित त्यावेळी आकाशात ढग होते व त्या ढगांवर ती सूर्यकिरणे पडून त्याचे प्रतिबिंब समुद्राच्या पाण्यावर पडल्यामुळे आम्हांला त्यावेळी पाण्याचा रंग तांबूस दिसला असावा.

प्रॉमिनाड डेकवरील कॉफी लॉउंजमध्ये आम्ही मधल्या वेळेस काही वेळा निरनिराळी पेये–दारू नव्हे–घेतो. त्यांत एक पेय असे आहे की, त्यात वेगवेगळया फळांच्या फोडी असतात व एखाद्या फोडीला तांबूस, हिरवा, पिवळा किंवा इतर रंगाचा लहानसा बाण टोचलेला असतो. मोहक दिसतो तो ! राजाभाऊ हे बाण जमा करतात, त्यांचा त्या बाणांचा मोह मी समजू शकतो. कारण ते बाण खरोखरच चित्ताकर्षक आहेत, मलाही ते घ्यावेसे वाटतात, पण राजाभाऊ लहान म्हणून त्यांचा हक्क त्या बाणांवर शाबीत होतो, त्यामुळे माझ्या व इतरांच्या पेयातील ते बाण आम्ही त्यांना देतो. परंतु तो बाण कसा दिसतो, याची तुला माहिती व्हावी म्हणून एके दिवशी सर्वांची नजर चुकवून मी एक बाण खिशात घातला व तो बॅगमध्ये ठेवला आहे. घरी आल्यावर तुला मी तो देईन. सर्वांची नजर चुकवून तो बाण मी घेतला. कारण सर्वांसमक्ष मी घेतला

असता तर 'मी एक लहान मूल आहे,' असे म्हणून इतरांनी माझी टिंगल केली असती.

असो ! पुढे पुढे पत्रातून आणखीही गंमती सांगेन.

तुझा

नाना

• • •

**: ४ :**

# नव्या जगातील रम्य जीवन

एस्. एस्. हिमालया,
पोर्ट सय्यद.
ता. १७–४–१९५५

चि. उषास माझा सप्रेम आशीर्वाद—

ह्या हिमालया बोटीवर पाय ठेवल्यापासून कुठल्या तरी नव्या व रम्य जगात आलो, असे मला वाटते, जणू स्वर्गच आहे हा ! बोटीवर जे प्रवासी आहेत, त्यात युरोपियन, हिंदी, पाकिस्तानी, अरब इत्यादि लोक आहेत. लोक सुसंस्कृत आहेत. त्यांच्यात शिस्त आहे. अर्थात कुठल्याही गोष्टीला अपवाद असतोच त्याप्रमाणे याही बाबतीत अपवाद आहेत. आपसात कोठे एकमेकांबद्दल निंदा नाही, नालस्ती नाही, कुचेष्टा नाही, तक्रार नाही, भांडणतंटा नाही. त्यामुळे चहूंकडे शांततेचे व मैत्रीचे सुखद व मधूर वातावरण आहे. प्रवासी एकमेकांबरोबर बोलावयाचे असल्यास सभ्यतेने व प्रेमाने बोलतात. चोहोबाजूला संयम आहे.

खाण्यापिण्याची तर रेलचेल आहे. येथे दारू व सिगरेटस स्वस्त मिळतात. कारण बोटीवर ह्या वस्तूंवर कस्टमडचूटी–जकात कर–नाही. दारू तर मला वर्ज्य आहे, पण सिगरेटस स्वस्त आहेत, या गोष्टीचा मी पुरेपूर फायदा घेतो;

घरी ओढतो त्यापेक्षा दुपटीने तरी सिगरेटस मी येथे ओढीत असेन. शिवाय 'सिगरेटस कमी ओढीत जा' हा सौ. माईचा ससेमिरा माझ्यामागे येथे नाही. 'मी दारू पीत नाही' व 'मुंबई प्रांताचा मी पूर्वी दारूबंदी मंत्री होतो' ही वार्ता येथे राजवाडे वगैरे मंडळींकडून पसरली आहे. 'मी दारू पीत नाही' ह्या गोष्टीवर येथील बऱ्याच लोकांचा, त्यांतल्या त्यांत युरोपियन्सचा विश्वासच बसत नाही. एकदा मोठी गंमत झाली. सकाळची वेळ, मी प्रॉमिनाड डेकवर सहल करीत होतो, इतरही बरीच मंडळी सहल करीत होती, त्यांपैकी एक युरोपियन जोडपे माझ्याबरोबर चालू लागले, काही तरी निमित्त करून माझ्या-बरोबर ते दोघे, त्यांतल्या त्यांत त्या जोडप्यांतील स्त्री माझ्याबरोबर बोलू लागली, अगदी जवळ येऊन, अगदी माझ्या तोंडाजवळ, त्या स्त्रीने हुंगल्या-सारखे केले, मला कळू नये अशा रीतीने तिने ही कृती करण्याचा प्रयत्न केला, परंतु मला ते कळल्याशिवाय राहिले नाही. प्रथम ह्या जोडप्याचा असे अगदी जवळ येऊन बोलण्यात,अशा रीतीने माझ्याकडे पाहण्यात काय हेतू आहे हे मला कळले नाही. परंतु मग माझ्या लक्षात आले की, माझ्या तोंडाला दारूचा वास येतो का हे त्यांना अजमावयाचे होते, अर्थात त्यांची त्याबाबतीत निराशाच झाली व ते माझ्यापासून झटकून वेगळे फिरावयास लागले.ह्या बाबतीत आणखी एक अनुभव आला. 'मी दारू पीत नाही.' तेव्हा माझी थट्टा करावयाची असा काही मंडळींनी बेत केला; त्यात ऑस्ट्रेलियामधील काही तरुण सामील होते. त्यांनी मला काही पेय घेता का म्हणून सहज प्रेमाने विचारले व मी त्यांना "दारूशिवाय कोणतेही पेय मला चालेल," असे सांगितले. त्यांनी 'पिसीपुट' नावाचे पेय मला दिले. निरनिराळी पेये, सिगरेटस वगैरे वस्तू प्रवाशांना मिळाव्यात म्हणून प्रॉमिनाड डेकवर एक लहानसे दुकान ठेवले होते. तेथून हे पेय मागविण्यात आले. ह्या पेयाचे नाव 'पिसीपुट जॉन्सन' ह्या एका अमेरिकन गृहस्थाच्या नावावरून पडले आहे. पिसीपुट हा दारूबंदीचा अमेरिकेतील मोठा पुरस्कर्ता, त्यांनी दारूबंदीच्या ध्येयासाठी पुष्कळ त्रासही सहन केला, वास्त-विक त्याच्या नावाने प्रसिद्ध असलेले हे 'पिसीपुट' पेय दारू विरहीतच असा-वयाचे व तसे ते होतेही; मी माझ्या मित्रांनी दिलेले ते पेय घेतले, घेतल्यानंतर ते माझे मित्र 'तुम्ही ते पेय घेतले, परंतु त्यात दारू होती व तुम्ही दारू घेतली'

असे म्हणून माझी थट्टा करू लागले. अर्थात त्यांना नुसती माझी थट्टा करावयाची होती, दारू मी प्यावी, असा त्यांचाही हेतू नव्हता. मी म्हणालो, 'मी तुम्ही दिलेले पेय घेतले, त्यात तुम्ही म्हणता की दारू होती. मी आता दारू घेतली आहे, तुमचे समाधान झाले ना ?' हे माझे खेळाडूवृत्तीचे बोल ऐकून त्यांना व त्यांतल्या त्यांत ऑस्ट्रेलियातील तरुणांना फार बरे वाटले व ते मोठ्याने हसले. हे ऑस्ट्रेलियन नेव्हीतील नाविक दलातील–सैनिक आहेत, हे उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला जात आहेत. हे तरुण खेळकर व प्रेमळ वृत्तीचे आहेत. निरनिराळ्या खेळांत व नृत्याच्या कार्यक्रमात हे भाग घेत असतात.

माझ्या केबिनचा वेटर एक इंग्लिश गृहस्थ आहे. तो उंच व शरीराने सडपातळ आहे. सकाळी चहा घेऊन येतो तेव्हा तो शुभ्र रंगाची कोट-पँट घालून येतो. गुळगुळीत दाढी केल्यामुळे त्याचा चेहरा तकतकीत दिसतो. केसांचा भांग पाडलेला असतो, अशा थाटात तो येतो. नेहमी गंभीर चेहरा करून बोलतो व बोलला तर फार कमी बोलतो. कामात चूक करणे जणू त्याला माहीतच नाही, इतक्या व्यवस्थितपणे व काळजीपूर्वक तो आपली कामे करतो व त्याला त्याबद्दल अभिमानही वाटतो. एकदा आमच्या केबिनचे कुलूप लावून आम्ही किल्ली आमच्याजवळ ठेविली व बऱ्याच वेळाने मी व राजाभाऊ राजवाडे परत केबिनमध्ये आलो. अर्थात केबिन स्वच्छ करण्याचे राहून गेले होते. म्हणून आम्ही त्या वेटरला बोलाविले व केबिन स्वच्छ का झाली नाही म्हणून विचारले. त्याने त्रागा करून सांगितले की, 'केबिनला कुलूप होते, त्यामुळे केबिन स्वच्छ कशी करून द्यावयाची ?' आम्ही म्हणालो की "दुसरी किल्ली तुझ्याजवळ नाही का ?" तो उद्गारला की, "अशी दुसरी किल्ली माझ्याकडे देण्यात आली नाही" व चेहऱ्यावर आश्चर्याचा असा भाव व्यक्त केला की जणू त्याला विचारण्यात आमचीच चूक झाली. थोडक्यात या इंग्लिश लोकांना त्यांच्या कामात चूक दाखविण्याचा प्रयत्न केला की तो त्यांना खपत नाही, कारण त्यांना वाटते की, आपण इतके जपून काम करतो की आपल्या हातून चूक होणेच शक्य नाही आणि शिवाय जपून काम करणाऱ्या माणसाला एखादी त्याच्या हातून झालेली चूक दाखविली तरी त्यास ते खपतही नाही.

जेवताना कधी कधी एक मजेशीर दृश्य पाहावयास मिळे. सर्व मंडळी जेवणाच्या हॉलमध्ये जेवण घेण्यात गुंग आहेत, अशा वेळी ज्या बाजूला किचन (स्वयंपाकघर) असे त्या बाजूचे मधले दार उघडले जाई व त्यातून उंच व जाडजूड अशी एक व्यक्ती हॉलमध्ये प्रवेश करी. पांढरा डगला घातलेली, डोक्यावर निमुळती होत गेलेली उंच टोपी परिधान केलेली ती व्यक्ती अशा थाटात उभी राही की जणू एखादा बादशहा आपल्या दरबारात प्रवेश करून दरबारातील सरदारदरकदारांकडे तोऱ्याने पाहत आहे. ही व्यक्ती म्हणजे बोटीवरील मुक्य आचारी. तो अशा पद्धतीने हॉलमध्ये आल्यावर चहूकडे नजर टाकी, किंचित स्मित करी. आपण व आपल्या नेतृत्वाखाली काम करणारे आचारी यांनी केलेली पक्वान्ने व खाद्यपदार्थ कोणत्या आवडीने व लज्जतीने प्रवाशी खात आहेत हे तो बारकाईने पाही व त्यांना आपण तयार केलेले पदार्थ आवडत आहेत हे जणू तो खाणाऱ्यांच्या चेहऱ्यांवर जे भाव व्यक्त होत ते ओळखून आपली खात्री करून घेई व संतुष्ट होई. असे समाधान लाभल्यावर तो पुन्हा ज्या दारातून हॉलमध्ये येत असे त्या दारातून गुप्त होई !

मी मागे एका पत्रात लिहिले आहे की बोटीवर एकावर एक अशी मजल्यासारखी डेक्स् आहेत. एका डेकवरून दुसऱ्या डेकवर जाण्यासाठी बोटीवर लिफ्ट आहे. ह्या लिफ्टवर आळीपाळीने काम करणारे १५–१६ वर्षांची तरुण मुले आहेत. लिफ्टमध्ये आपण गेलो की मोठ्या सभ्यतेने व हसून ती मुले तुम्हांला विचारतील की, "कोणत्या डेकवर जावयाचे आहे ?" आपण सांगितले की, अमूक डेकवर जावयाचे आहे, की ते म्हणतात, "Thank You आभारी आहे." आपणांस ज्या डेकवर जावयाचे असेल तेथे लिफ्ट उभा राहतो व जाताना अर्थात प्रवाशी "Thank You" म्हणतात व ही मुले पुन्हा "Thank You" उद्‌गारतात. चपळता व उत्साह ह्या मुलांत जणू ओतप्रोत भरलेला आहे, सभ्यता यांच्या अंगात मुरलेली आहे. आनंदाने काम करण्याची वृत्ती त्यांच्यात भिनलेली आहे. त्यांचे ते हसरे चेहरे पाहून जणू ही मुले म्हणजे उमललेली फुले आहेत. त्यांचे सभ्यपणाचे व गोड बोल ऐकून जणू मैना गात आहेत असे वाटते.

डायनिंग हॉलमध्ये विशेषप्रसंगी तोरणे वगैरे लावून सजावट करण्यात येते. रात्री मित्रांवरोबर कॉफी-पान झाल्यावर मी बहुधा प्रॉमिनाड डेकवर अगर बोट डेकवर फिरतो, बोटीवर नृत्याचा वगैरे कार्यक्रम असल्यास तो पाहतो व नंतर केबिनमध्ये जाऊन झोपतो. आज झोपण्यापूर्वी हे पत्र लिहिले आहे. बराच वेळ झाला आहे, झोपेने डोळे तारवटलेले आहेत, तेव्हा आता पुरे.

तुझा
**नाना**

● ● ●

: ५ :

# छोटा समुद्र

एस्. एस्. हिमालया
**पोर्ट सय्यद**
ता. १७–४–१९५५

**चि. उषास** सप्रेम आशीर्वाद—

मागच्या पत्रात मी लिहिलेच आहे की, आमच्या बोटीने ता. १५–४–५५ च्या रात्रीला तांबड्या समुद्रात प्रवेश केला. काल व आज आमच्या बोटीचा प्रवास तांबड्या समुद्रातूनच चालला आहे. उद्या म्हणजे ता. १८ ला दुपारच्या सुमारास तांबड्या समुद्रातील आमचा प्रवास संपून आमची बोट 'सुएझ' बंदरास लागणार आहे. तांबड्या समुद्रात बोट शिरण्यापूर्वी आमचा प्रवास पूर्व–पश्चिम असा चालला होता, परंतु तांबड्या समुद्रात शिरल्यावर आमचा प्रवास साधारणपणे दक्षिणोत्तर झाला आहे. तांबड्या समुद्राची रुंदी कमी असल्यामुळे काल व आज दुसऱ्या बऱ्याच बोटी आम्हांला जाता येता दिसल्या. काही काही

ठिकाणी डोंगरांच्या रांगा दिसल्या. काही दीपगृहेही पाहावयास मिळाली. सायं-काळी ह्या दीपगृहात दिवे तेवताना दिसतात. समुद्राच्यामध्ये ह्या लहानशा बेटांवर ह्या दीपगृहांत कोण दिवे लावीत असेल ह्या कल्पनेने मनास आश्चर्य वाटले, पण चौकशी करता कळाले की, तसे दिवे लावण्यासाठी काही लोक नेमलेले आहेत. रस्त्याने मोटारी किंवा इतर वाहने एकमेकांपासून जवळून जाताना जशा दिसतात, तशा बंदर नसताना आगबोटी एकमेकांपासून जवळून जाता येताना दिसल्या. त्यामुळे मोठी मौज वाटली. ह्या बोटींवरील माणसांच्या हालचालीही आम्हांला दिसत होत्या. ह्या बोटीवरील लोक व हिमालया बोटीवरील लोक एकमेकांना आपल्या हाताच्या खुणांनी व इतर संकेतांनी एक-मेकांशी बोलण्याचा प्रयत्न करीत होते किंवा एकमेकांना आपले भाव व्यक्त करीत होते. ह्या बहुतेक बोटी मालवाहू ( Cargo Liners ) किंवा पेट्रोल वाहणाऱ्या होत्या. प्रवासी नेणाऱ्या क्वचितच होत्या. प्रवासी व पेट्रोल नेणाऱ्या बोटी व मालवाहू व पेट्रोल बोटी ओळखण्याची खूण म्हणजे मालवाहू वाहणाऱ्या बोटींमध्ये धुराडी मध्यभागी असतात, तर प्रवासी बोटींची एका टोकाला असतात.

तांबड्या समुद्राच्या पश्चिमेस सोमाली लँड, एथिओपिया (ॲबिसेनिया) सुदान व इजिप्त हे एकापुढे एक देश प्रवास करताना लागतात. व पूर्वेस यामन व सौदी अरेबिया व सिनाई पेनिन्सुला हे देश आहेत. तांबड्या समुद्राची रुंदी जास्त नसल्यामुळे आम्हांला एका बाजूला आशिया व दुसऱ्या बाजूला आफ्रिका ह्या दोन्ही खंडांचा किनारा व जमीन मधून मधून दिसत होती. ह्या दोन प्रचंड खंडांजवळून आपण समुद्रातून प्रवास करीत आहोत, ह्या कल्पनेने मनात साश्चर्य आनंदाच्या लहरी उठत होत्या.

माझा वेळ मजेत जात आहे. माझी प्रकृती चांगली आहे. हे सर्व झाले, पण तुमच्या सर्वांची आठवण वरचेवर होते व मग मनास हुरहूर वाटते. आज हवेत बदल झाला आहे. मुंबईहून निघाल्यापासून आज सकाळपर्यंत मुंबईतल्यासारखी दमट व गरम हवा होती; आज थोडी थंडी भासू लागली आहे. असो ! पत्राचे उत्तर देणे. कळावे.

तुझा
**नाना**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ........ वि: ..........
क्रमांक ........................ नों० दि: ..........



: ६ :

# प्राचीन संस्कृतीचा साक्षी, व आधुनिक आश्चर्य.

एस्. एस्. हिमालया
टिलबरी, लंडन.
ता. २०-४-१९५५

चि. विठ्ठल यास सप्रेम आशीर्वाद—

मागे मी लिहिले आहे की, एडनची सामुद्रधुनी जवळजवळ येत असता काही डोंगर दिसले. ते डोंगर व सुएझकडे जाताना दिसत असलेले डोंगर हे सुळक्यासारखे व ओबडधोबड असे आहेत. ते उघडे म्हणजे झाडाझुडपांविना आहेत. काही डोंगर तर भुसभुशीत मातीचे बनलेले आहेत की काय असे वाटते व काही डोंगर खडकाळ आहेत. हे डोंगर व्हॉलकॅनिक इरप्शनने—ज्वालामुखीच्या स्फोटाने—बनलेले आहेत, असे कळले, पण ह्या डोंगरांचा खडक सह्याद्रि पर्वतासारखा कणखर व कठिण वाटला नाही.

ह्या डोंगरामध्ये इजिप्तच्या विरुद्ध बाजूला सिनाई पेनिन्स्युला (द्वीपकल्प) चा डोंगर होता. सिनाई डोंगर दिसताच माझे अंतःकरण भक्तीभावाने उचंबळून आले व मी मनातल्या मनात त्या डोंगरास शतशः प्रणाम केले; कारण हा डोंगर पवित्र आहे, ह्याच डोंगरावर भगवान मोझेस यांना दिव्य ज्वाला दिसली व ती पाहून त्यांना साक्षात्कार झाला; ही हकीगत तुला माहीत असेलच. मला माझ्या धर्माप्रमाणे इतर धर्मही पवित्र वाटतात. माझ्या धर्मातील व देशातील अवतारी पुरुष व साधुसंत यांच्याबद्दल मला जशी भक्ती व श्रद्धा वाटते, तशीच मला इतर धर्मातील व देशांतील अवतारी व थोर पुरुषांबद्दल वाटते. असो.

काल दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास आमची बोट सुएझ बंदरावर पोहोचली. सुएझ बंदरात आमची बोट रात्री नऊ वाजेपर्यंत होती.

सुएझ बंदरात इतर किती तरी बोटी व जहाजे होती. दूरवरून पण स्पष्टपणे सुएझ बंदर दिसत होते. एडनप्रमाणे ह्या ठिकाणीही इंग्रजांचे तेल शुद्ध करण्याचे कारखाने आहेत. सुएझ शहरातील आधुनिक पद्धतीने बांधलेल्या उंच इमारती दुरूनही दिसत होत्या. रात्री अंधार पसरू लागला व बंदरातील लहान मोठ्या बोटींवर, लाँचेसवर व जहाजांवर दिवे झळकू लागले. काही काही बोटींवर तर दिव्यांची लयलूट होती, काळोख्या रात्री अंधारात त्या दिव्यांचा प्रकाश झगमगत होता. काळ्या व शांत पाण्यातून काही लहान बोटी व लाँचेस इकडून तिकडे धावत असताना त्यांच्या दिव्यांच्या प्रकाशाची प्रतिबिंबे समुद्राच्या पाण्यात उमटत. काही काही बोटी एकमेकींजवळून जाताना जणू एकमेकींना चाटून जात आहेत, असे वाटे. दिव्यांनी प्रकाशित झालेल्या त्या बोटी समुद्राच्या पाण्यावरून सरसर जात, तेव्हा वाटे की निळ्या रंगाच्या मखमलीच्या पायघड्यावरून सोन्याचे व रत्नाचे दागिने घातलेल्या परीच तुरुतुरू चालत आहेत!

आज ता. १९ रोजी मात्र मी सकाळीच उठलो व केबिनच्या झरोक्यातून डोकावले, तोच सुएझ कॅनॉल पाहावयास मिळाला व फार आनंद झाला. सकाळचे कार्यक्रम आटोपून केव्हा डेकवर जातो व दोन्ही बाजूने आणि बोटींच्या पुढे व मागे सुएझ कॅनॉल केव्हा पाहतो, असे मला झाले ! नंतर कॅनॉल बारकाईने पाहिला. ह्या कॅनॉलमधून बोटीचा वेग ताशी सुमारे ७॥ नॉटिकल मैलांपेक्षा (एक नॉटिकल मैल–६०८० फूट) जास्त असू शकत नाही. एरवी बोटीचा वेग सुमारे १९ ते २० नॉटिकल मैल असतो. कॅनॉलची रुंदी सुमारे २०० फूट आहे. व खोली ४२ फूट आहे. त्यामुळे जहाजाचा वेग जास्त झाला तर पाणी कापले जाऊन ज्या लाटा उसळतात, त्या लाटा वेगाने कॅनॉलच्या दोन्ही बाजूने बांधलेल्या भिंतीवर जोराने आदळल्यामुळे त्या भिंती फुटण्याची भीती असते म्हणून अगदी आस्ते आस्ते जहाजे ह्या कॅनॉलमधून आपला प्रवास करतात. सुमारे आठ जहाजे जमावाने एका पाठीमागे एक अशी कॉन्व्हॉय म्हणजे संरक्षणाखाली जातात. ह्या कॅनॉलची लांबी सुमारे १०० मैल आहे, व हे अंतर चालून जाण्यास आमच्या बोटीला सुमारे बारा तास लागले. मी झोपेत असताना निम्म्या रात्रीनंतर सकाळ होईपर्यंत–कारण आमची बोट सुएझ कॅनॉलमध्ये रात्री बऱ्याच वेळाने शिरली–आमच्या बोटीने कॅनॉलचे निम्मे म्हणजे सुमारे ५० अंतर मैलांचे अंतर कापले.

आज ता. १९ मंगळवार रोजी सकाळपासून मी हा कॅनॉल पाहत आहे. सुमारे आठ वाजता 'इस्माइलिया' ( Ismailia ) शहर लागले, हे शहर ह्या कॅनॉलच्या तिमसाह सरोवर म्हणून जो भाग आहे, त्या सरोवराच्या काठी वसलेले आहे. तिमसाह सरोवर फार सुंदर आहे, ह्या सरोवराच्या काठावर सुरूची झाडे आहेत, किंवा सुरूच्या झाडांचे एक वनच आहे, असे म्हणणे जास्त योग्य होईल व शेजारीच इस्माइलिया नगर. हे नगर आधुनिक दिसते. ह्यात आधुनिक पद्धतीने बांधलेल्या इमारती दिसल्या, रस्त्यांच्या दुतर्फा सुरूंची झाडे ( कमानी ) करून उभी आहेत. सरोवराच्या काठी ती सुरूची दाट झाडे पाहून कारवारच्या सुरूच्या वनाची मला आठवण झाली. सकाळची प्रशांत वेळ, मनोहर तिमसाह सरोवर, सुरूंच्या व इतर झाडांची व वेलींची दाटी, इस्माइलियाचे सुशोभित शहर. ही सर्व दृश्ये जणू मी स्वप्नात पाहत आहे की काय असे मला वाटले. कारण ती इतकी अद्‌भुतरम्य मला वाटली. ह्या सर्व दृश्यांचा आल्हाददायक परिणाम माझ्या मनावर झाला व मला फारच ताजेतवाने वाटले.

सुएझ कॅनॉल बनविण्यासाठी 'बिटर' नावाची दोन तळी एक लिटल बिटर-लेक व दुसरे ग्रेट बिटर लेक–तिमसाह (Timsah) सरोवर व बल्लाह तळी ( Ballah lakes ) अशा लहानमोठ्या तळ्यांचा उपयोग करून घेण्यात आला आहे, त्यामुळे कॅनॉल वनविण्याचा खर्च कमी झाला आहे. अर्थात कॅनॉल तयार केला गेला तेव्हा ही तळी उकरून त्यांतील साचलेला गाळ काढावा लागला व जहाजे जाण्यासाठी हवी ती पाण्याची खोली तयार करण्यात आली. ही तळी सोडली तर कॅनॉलचा बाकी भाग नव्याने खणूनच तयार करावा लागला. १०० मैलांची लांबी असलेला हा कॅनॉल म्हणजे इंजिनियरिंग–वास्तु-विद्या–कौशल्याची कमाल आहे. हा कॅनॉल बनविण्याची ज्याने करामत केली त्या इंजिनियरचे–वास्तुविद्या विशारदाचे–नाव फर्डिनंड डी लेस्सेप्स असे आहे. हा कॅनॉल सन १८६९ मध्ये पुरा झाला व तो तयार करण्यास सुमारे तीन कोटी पौंडांचा त्या काळात खर्च आला. पनामा कॅनॉल उत्तर व दक्षिण अमेरिकामधून जातो. व अटलांटिक व पॅसिफिक महासागरांना जोडतो; तो कॅनॉल बांधण्यास साडेसात कोटी पौंडांचा खर्च आला. सुएझ कॅनॉल हा तांबडा समुद्र व मेडिटरेनिअन (भूमध्य) समुद्र यांना जोडतो; हा कॅनॉल बनविण्यास

सुमारे १० वर्षे लागली व त्याचे औपचारिक उद्घाटन ता. १७–११–१८६९ रोजी झाले. सुएझ कॅनॉल कंपनीचे भव्य ऑफीस पोर्ट सय्यद शहरात आहे.

कॅनॉलचे दक्षिणेचे टोक म्हणजे सुएझ बंदर व उत्तरेचे टोक म्हणजे पोर्ट-सय्यद. सुमारे ११ वाजता सकाळी ता. १९–४–१९५५ रोजी आम्ही पोर्ट सय्यदला पोहोचलो. पोर्ट सय्यदच्या विरुद्ध बाजूला पोर्ट फौद आहे. पोर्ट फौद गेल्या महायुद्धापासून वसविण्यात आले व पोर्ट सय्यदची वाढ सुएझ कॅनॉल सुरू झाल्यापासून झाली. पोर्ट सय्यदमध्ये सहा ते सात मजली इमारती बऱ्याच आहेत, पण जास्त इमारती ४ ते ५ मजली आहेत. मी वरती कॅनॉल कंपनीच्या कचेरीचा उल्लेख केला आहे, ह्या कचेरीची इमारत इजिप्शियन शिल्पकलेचा एक नामी नमुना आहे, इमारत भव्य व आकर्षक आहे. पोर्ट सय्यद शहरातील इतर इमारतींच्या रंगात व बांधणीत विविधता दिसली व कलात्मकरीतीने तयार केलेले वेगवेगळे शिल्पप्रकारही ह्या इमारतीमध्ये दिसून आले. पोर्ट सय्यद येथे बाजार करीत असता रस्त्याने एक हॉकर दिसला, त्याच्याजवळ उंटाच्या कातड्याच्या मनिबॅग्ज होत्या. मी त्याच्याकडून एक मनिबॅग घेतली व त्याने सांगितलेली किंमत दिली. परंतु त्याशिवाय तो माझ्याकडे सिगरेटस मागू लागला व त्यासाठी त्याने बऱ्याच अंतरावर पाठलाग केला, कारण बोटी-पेक्षा बंदरात सिगरेटस महाग असतात व अशा महाग वस्तूसाठी त्याचा हा पाठलाग होता.

पोर्ट सय्यदचे एक टोक भूमध्य समुद्रात जाते. त्या टोकावर मी वरती ज्या इंजिनियर फर्डिनंड डी लेस्सेप्सचा उल्लेख केला, त्याचा सुंदर व भव्य पुतळा बसविला आहे व तो जणू आपल्या कर्तबगारीने बनविलेल्या सुएझ कॅनॉलच्या दरवाजावर उभा राहून त्याचे संरक्षण करीत आहे, असे त्या पुतळ्याकडे पाहून वाटले.

ह्या बंदरात असताना लहान लहान व्यापारी आपल्या रंगीबेरंगी बोटी घेऊन आपला माल आणतात. त्यात बॅगा, बसण्याची गोल लहान कोचेस, क्युरिओज, कापड इत्यादि वस्तू असतात. बोटीवरील प्रवाशांना ह्या वस्तू ते व्यापारी विकत असतात. जहाजांची उंची जास्त असल्याने हे व्यापारी आपल्या हातातील दोर वर फेकतात. जहाजातील प्रवासी ह्या दोराचे एक टोक झेलतात व मग ज्या वस्तूंचा सौदा होतो, त्या वस्तू एका टोपलीत घालून

ती टोपली व्यापारी आपल्या हातातील दोराच्या दुसऱ्या टोकाला बांधतात. बोटीवरील प्रवासी ती टोपली वर ओढून घेतात. हा बाजाराचा व खरेदी-विक्रीचा प्रकार गमतीदार आहे की नाही ? दोन उत्साही व्यापाऱ्यांनी तर आपल्या होडच्या आमच्या बोटीच्या एका डेकवरच चढविल्या होत्या ! ता. १९ रोजी तिसऱ्या प्रहरी चार वाजता आमच्या बोटीने पोर्ट सय्यद सोडले व तिने भूमध्य समुद्रात–मेडिटरेनिअन सीमध्ये–प्रवेश केला. दोन्ही बाजूच्या जमिनीच्यामध्ये म्हणजे युरोप व आफ्रिका खंडांमध्ये हा समुद्र आहे म्हणून याला भूमध्य समुद्र असे संबोधतात. ह्या समुद्राची लांबी २२०० मैल आहे व रुंदी सर्वसाधारण ४०० ते ५०० मैल आहे, पण सर्वांत जास्त रुंदी ॲड्रिॲटिक ( Adriatic ) समुद्रापासून ते आफ्रिका खंडातील सिद्राच्या ( Gulf of Sidra ) आखातापर्यंत –( खाडीपर्यंत )–ची आहे व ती ११०० मैल आहे; ह्याची सर्वात कमी रुंदी आफ्रिकेतील केप बोना (Cape Bona) (Cape-भूशिर, भूमीचे टोक) ते सिसिली ह्यामध्ये आहे व ती फक्त १०० मैल आहे. भूमध्य समुद्राच्या दक्षिणेस पूर्व–पश्चिम इजिप्त, लिबिया, टुनिस, अल्जेरिया व मोरोक्को हे आफ्रिका खंडातील देश आहेत व दुसऱ्या बाजूस उत्तरेस सिरिया, तुर्कस्थान, ग्रीस, इटली, फ्रान्स व स्पेन हे युरोप खंडातील देश आहेत. भूमध्य समुद्राचे स्वरूप काही आगळेच दिसले. बोट ह्या समुद्रात शिरताच त्याच्या उग्र रूपाची चुणूक पाहावयास मिळाली. ह्या समुद्राचे पाणी गडद निळ्या रंगाचे आहे, पाण्याच्या लाटा सारख्या उसळत असतात. ह्या समुद्राच्या मानाने अरबी समुद्र मवाळ वाटला व त्याहून मवाळ वाटला तांबडा समुद्र. ह्याच समुद्रात मोठमोठाले मासे पाण्यातून वर उसळ्या मारताना दिसले. मोठ्या संख्येने हे मासे जेव्हा पाण्याबाहेर उड्या मारीत, व पाण्यात गडप होत आणि पाण्याच्या लाटांबरोबर पुन्हा वरती उसळी घेत तेव्हा तो देखावा अद्‌भुत दिसे. ह्या समुद्राच्या पाण्याकडे व पाण्याच्या लाटांकडे सारखे पाहावेसे वाटते; पाण्यात चैतन्य जणू थयथय नाचत आहे, पाण्यातील जिवंतपणाची साक्ष क्षणाक्षणाला भासत असे.

त्या समुद्राकडे पाहत असताना माझे मन त्याच्याशी जणू एकरूप झाले व त्याच्याशी बोलू लागले, " हे भूमध्य सागरा ! तू अनेक शतकांचा इतिहास पाहिला आहेस ! अनेक घडामोडी अवलोकिल्या आहेस. किती तरी सांस्कृतिक

सामाजिक, आर्थिक व राजकीय घटनांचा तू साक्षी आहेस ! इजिप्शियन साम्राज्याचे वैभव तू अनुभविलेस ! हिट्टाईट ( Hittite ) साम्राज्याचा काळ तुझ्या नजरेस पडला. सुमेरिअन ( Sumerian ) साम्राज्याची भरभराट तुला ठाऊक आहे. ॲसिरिअन साम्राज्याचा उत्कर्ष तुला परिचित आहे. दर्यावर्दी कॅर्थेजिअन लोकांच्या साम्राज्याचा इतिहास तुझ्या दृष्टीपुढे घडला. त्यांचे साम्राज्य आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर न्यूमिडिया ( Numidia ) पासून जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीपर्यंत विस्तारलेले तू अवलोकिले आहेस ! त्यांचे संपत्तिमान व बलवान साम्राज्य पाहून तू खचित दिपला असशील ! प्राचीन बॅबिलोनिअन राज्याच्या अभ्युदयाची तुला ओळख आहे. इस्राएलच्या व जुडांच्या (Judah) राज्यांची चढती कमान तुझ्या दृष्टीतून खचित सुटली नसेल ! ॲसिरियन (Assyrian) साम्राज्याचा व खाल्डिअन (Chaldean ) साम्राज्याचा उत्कर्ष पाहून तू आश्चर्यचकित झाला असशील. पर्सिअन ( Persian ) साम्राज्याचा दिमाख पाहून तू विस्मयाने थक्क झाला असशील. ग्रीक लोकांच्या साम्राज्याचा विस्तार कसा कसा झाला, हा सारा इतिहास तू जाणून घेतला आहेस ! रोमन लोकांच्या अफाट साम्राज्याचा उर्जित काळ तुझ्या दृष्टीपुढे घडला ! अलिकडच्या काळातील ब्रिटिश, फ्रेंच, बेल्जियम, इटालियन व स्पॅनिश लोकांची साम्राज्यांची वाढ कशी झाली व ती पुढे नष्ट कशी झाली हा इतिहासही तू जाणून घेतला आहेस. साम्राज्ये व राजवटी उदयाला आल्या व विलयास गेल्या, पण! तू मात्र आहे तसाच आहेस.

जशा अनेक राजवटी तू पाहिल्या आहेस, तशा अनेक लढाया व युद्धे तुझ्यापुढे घडलेली तू स्थितप्रज्ञासारखी अवलोकिलीस. इजिप्शियन व हिक्सोस अथवा धनगर राजे ( Shepherd kings ) यांची लढाई तुझ्या समक्ष झाली. तसेच इजिप्शियन लोक एका बाजूला व फोएनिसिअन ( Phonicians ), कॅनाराईट ( Canarites , हिट्टाईट ( Hittites ) आणि ॲसिरिअन ( Assyrians ) लोक दुसऱ्या बाजूला, अशा पद्धतीने त्यांच्यामध्ये जी घनघोर युद्धे झाली, ती पाहून तुझ्यावर काहीच का परिणाम झाला नाही ? शेवटी ह्या युद्धात इजिप्शियन लोकांचा विजय झाला व बाकीच्या लोकांनी इजिप्शियनांचे प्रभुत्व मान्य केले.सुमेरिअन व एलानाईट (Elanites) यांच्यात युद्ध होऊन सुमेरिअन लोकांचे साम्राज्य एलानाईटांनी पादाक्रांत केले,

पुढे अमोराईट ( Amorites )–ज्यांना बॅबिलोनियनही म्हणतात–यांनी एलानाईट लोकांचा पराभव केला व ते सुमेरिअन साम्राज्य हस्तगत केले, त्यानंतर कॅसाईट ( kassites ) व बॅबिलोअिनन यांच्यात लढाई झाली व कॅसाईट लोकांनी बॉबिलोनिअन लोकांना जिंकले व त्यांच्या साम्राज्याचा ताबा घेतला. हा सर्व इतिहास तुला अवगत आहे. पुढे कॅसाईटांचा पाडाव ॲसिरिअनांनी केला; एवढेच नव्हे तर ॲसिरियनांनी सिरिया ( Syria ), फोएनेसिआ, (Phoenicia) इस्राईल व इजिप्शियन यांना युद्धात हरविले व त्यांची साम्राज्ये धुळीला मिळविली. हा इतिहास तू खास विसरलेला नाहीस. नंतर ॲसिरिअनांना काल्डी (kaldi) किंवा खाल्डिअन (Chaldeans) लोकांनी लढाईत पराभूत केले व ॲसिरिअन साम्राज्याचा बळी घेतला; खाल्डिअनांच्या लष्करी सामर्थ्यापुढे ज्युडांनी ( Judah ) लोळण घेतली व ज्युडांचे राज्य हा हा म्हणता खाल्डिअनांनी हस्तगत केले. जेरुसलेमचे प्रसिद्ध देवालय खाल्डिअनांनी लुटले व त्यांनी झेडेकिअह (Zedekiah) राजाचे डोळे फोडले व त्याला व त्याच्या हजारो अनुयायांना बंदी करून ते बॉबिलॉनमध्ये घेऊन गेले. ह्या सर्व रोमांचकारी घटनांचे तुला विस्मरण होणे कसे शक्य आहे ? नंतर पर्सिअन राजा सायरस दी ग्रेट ( Syrus ) यांनी खाल्डिअन लोकांना लढाईत खडे चारले व त्यांचे साम्राज्य जिंकिले; त्यानंतर सायरस दी ग्रेटचा मुलगा कॅम्बीसेस (Cambyses) यांनी इजिप्तवर स्वारी केली व त्यांनी इजिप्शियनांना लढाईत नमविले. नंतर पर्सिअन बादशहा डेरिअस ( Darius ) याचा ग्रीक लोकांनी पराभव केला; हा सर्व इतिहास घडत असता तू मात्र अविचलित राहिलास ! रोमन व कार्थेजिअन यांची सुमारे २३ वर्षे चाललेली चित्तथरारक युद्धे पाहून तू अचंबित झालास का रे ? शेवटी कार्थेजिअनाना रोमन योद्धयांपुढे हार खावी लागली, हा इतिहास पाहूनही तुझ्या मनाची शांती ढळली नाही. ग्रीक व पर्सिअन यांच्यांतील चौदा वर्षे मधून मधून होणाऱ्या लढाया झाल्या. रोमन लोकांनी इजिप्तवर आपले अधिराज्य स्थापिले; बिझेंटाईन व पर्सिया, तसेच बिझेंटाईन व टर्क यांच्या लढाया आणि बिझेंटाईन व अरब यांच्यांतील युद्धे घडली; अरब हे सिरिया, पर्सिया, पॅलेस्टाईन व इजिप्त ह्या देशांचे मालक बनले; ह्याही दिङ्मूढ करणाऱ्या घडामोडी तुला

अवगत आहेत. ह्या जुन्या लढाया जशा तू पाहिल्यास, तशी आधुनिक जागतिक पहिले व दुसरे ही युद्धेही तू पाहिली आहेस. गेल्या दोन महायुद्धांत विमानातून बाँबफेक, पाणबुडयांतून टार्पेडोंचा मारा, युद्धनौकांतून तोफांचा धुमधडाका व इतर आधुनिक हत्यारांचा वापर पाहून व त्यांच्याशी तुलना करता कार्थेजिअन व रोमन यांच्यांतील लढाया व इतर जुन्या काळातील युद्धे तुला लुटपुटीच्या लढाया वाटल्या असतील.

इतकी साम्राज्ये उदयास आली व नष्ट झाली, इतक्या घनघोर लढाया झाल्या व त्या तू एखाद्या स्थितप्रज्ञासारख्या पाहिल्यास, तुझ्यावर यांचा काहीच का परिणाम झाला नाही ?

तुझ्या आवतीभोवती अनेक संस्कृत्या आल्या व काळाच्या उदरात गडप झाल्या, इजिप्शियन संस्कृती, फोएनिसिअन संस्कृती, मेसोपोटॅनिअन संस्कृती, पर्सिअन संस्कृती, हिब्रू संस्कृती, आएजिअन (Aegean) संस्कृती, ग्रीक व रोमन संस्कृती, बिझेंटाईन व सार्सेनिक किंवा अरब संस्कृती इत्यादि संस्कृती तुझ्या डोळ्यांपुढे उत्कर्षास पोहोचल्या व अंतर्धान पावल्या.

ज्युलिअस सिझर, अलेक्झांडर दी ग्रेट इत्यादि योद्धे तू जसे पाहिलेस तसे मोझेस, येशू ख्राईस्ट व पैगंबर महंमद ह्या प्रेषित पुरुषांनाही पाहण्याचे भाग्य तुला लाभले. हिब्रू, इस्राईल, ख्रिस्ती व इस्लाम ह्या धर्मांची स्थापना झाली. ती हकिकतही तुला विदित आहे.

इतक्या विविध घटना तू पाहिल्यास, मात्र तुझ्यावर काळाचा काहीच परिणाम झालेला दिसत नाही. तू सदा हसत आहेस. आनंदाने बेहोष होऊन नाचतो आहेस ! तारुण्याच्या मदाने तू मुसमुसलेला आहेस, तू चिर तरुण आहेस ! तू सात चिरंजीवांसारखा चिरंजीव मला भासतोस.

वास्तविक इतर अनेक समुद्र–अटलांटिक, पॅसिफिक, अरबी, हिंदीमहासागर–तुझ्यापेक्षा अनेक पटीने मोठे आहेत, पण तुला जो अनुभव आहे, तो त्यांना नाही. तसे म्हटले तर तू समुद्र ह्या नावाला पात्र देखील नाहीस, कारण तू एक मोठे सरोवर आहेस–तुझ्या सर्व बाजूने जमीन आहे. पश्चिम बाजूला जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीने तुला अटलांटिक महासागरास जोडले आहे, तर पूर्व बाजूस एका लहानशा कालव्याची–सुएझ कालव्याची–मदत घेऊन तू तांबड्या समुद्राशी हस्तांदोलन करत आहेस. बाकी सर्व बाजूंनी तुला जमिनीने जखडून टाकले

आहे. असे असूनही काय तुझे ते खळखळणे, काय सिंहासारख्या तुझ्या त्या गर्जना ! तरुणासही लाजवील असा तो तुझ्यातील उत्साह व चैतन्य ! तुझ्या चारू निळसर रंगाने तर जणू तू आकाशासही लाजवीत आहेस ! ”

कालपासून थंडी सुरू झाली. आज तर चांगलीच थंडी आहे. येथे केबिनमध्ये हे पत्र लिहीत असताना पायांना थंडी चांगलीच झोंबत आहे, बरोबर आणलेल्या गरम कपड्यांना देखील ही थंडी जुमानत नाही. आमच्या केबिनच्या आढ्याला—छताला—एक झरोका आहे. त्यातून बाहेरचे थंड वारे आत येऊन थंडीत आणखी भर घालतात. जोपर्यंत उष्मा होता,तोपर्यंत ह्या झरोक्याची व आमची ओळख झाली नाही आणि आता थंडी आली तरी त्या झरोक्याचा केबिनमधील आम्हा दोघांना पत्ता नव्हता. अशा रीतीने त्या झरोक्याची मांडणी होती की वरवर पाहणाऱ्यास त्याचा पत्ता लागणे कठीण. झरोका वरवर पाहता बंद दिसावयाचा. परंतु बाजूंना असावयाचा उघडा ! त्याची आमची जानपहचान आज झाली. आमचा केबिन वेटर चहा वगैरे घेऊन आला. तेव्हा थंडीसंबंधी सहज बोलणे झाले, थंडी खूपच आहे, असे आम्ही म्हणालो. इतक्यात तो वेटर म्हणाला, “ तुम्ही वरचा झरोका बंद केला का ? ” आम्ही म्हणालो, “ कुठे आहे तो झरोका ? ” नंतर त्याने आम्हांला त्या झरोक्याची ओळख करून दिली. त्या झरोक्यात गोल असे टोपण—आच्छादन—आहे, ते काठीने फिरविता येते व त्याने झरोका उघडा किंवा बंद करता येतो, त्यासाठी केबिनच्या एका कोपऱ्यात एक काठीही ठेवलेली आहे. इतक्या दिवस आम्हांला आश्चर्य वाटायचे की ही काठी येथे कशाला ठेविली आहे. मला वाटे की “तसाच प्रसंग आला तर ह्या काठीचा उपयोग प्रवाशांनी दोन हात करण्यासाठी करावयाचा असेल. ” पण आज आमच्या वेटरने त्या काठीने ते वरचे धारे कसे उघडावयाचे व बंद करावयाचे हे सप्रयोग दाखविले व नंतर त्या काठीचा सदुपयोग आम्हांला कळला. झरोका बंद केला. त्यातून वारे यावयाचे बंद झाले. पण तेवढ्याने थंडीचा कडाका थोडाच बंद होणार ? अर्थात थोडा फरक पडला. नाही असे नाही.

तुझा
**नाना**

● ● ●

: ७ :

# " बोटीवरील गोड स्मृती "

ग्रोव्हनर हॉटेल,
व्हिक्टोरिया
एस्. डब्ल्यू. लंडन,
ता. २६–४–१९५५

प्रिय चि. आशास सप्रेम आशीर्वाद—

परवा येथे म्हणजे हिमालया बोटीवर सकाळी लहान मुलांचे खेळांचे सामने झाले. सर्व मुले १२ वर्षे किंवा १२ वर्षांच्या आतील वयांची होती. जवळजवळ ५० मुलांनी ह्या शर्यतीत भाग घेतला, ह्याशिवाय इतरही मुले होती. एकंदर बोटीवर ७५–८० मुले आहेत. इतकी मुले बोटीवर पाहून मला आश्चर्य वाटले. कारण ही मुले एरवी पहावयास मिळावयाची नाहीत. त्यांचे आईबाप त्यांना आपापल्या केबिनमध्ये ठेवीत. त्यांच्यासाठी जेवणाच्या, मधल्या खाण्यापिण्याच्या वेळा वेगवेगळ्या आहेत, त्यामुळे ती मुले मला आतापर्यंत दिसली नाहीत. आईबापांनी देखील इतर प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून त्यांना केबिनमध्ये ठेविले असावे यांत आश्चर्य कसले ? बोटीवर 'अ' वर्गात बहुतेक युरोपियन प्रवाशी आहेत. युरोपियन्स म्हणजे बहुधा इंग्रज व इंग्लिश भाषा बोलणारे, ऑस्ट्रेलियन, न्यूझिलंडर असे लोक आहेत, हिंदी, पाकिस्तानी व इतर लोक थोडे आहेत. युरोपियन लोक प्रवासास निघाले की बहुतकरून आपली बायकामुले बरोबर घेतात. त्यामुळे त्यांची बरीच मुले 'अ' वर्गात आहेत. काही हिंदी लोकांची मुलेदेखील आहेत. शर्यतीमध्ये थोड्या हिंदी मुलांनीही भाग घेतला होता. या शर्यती चालू असताना मुलांचे आईबाप हजर होते. माझ्यासारखे प्रेक्षकही होते, असा मोठा जमाव बोट-डेकवर त्या दिवशी हजर होता. वेगवेगळ्या वयांच्या मुलांचे वेग-वेगळे वर्ग करून त्यांच्या वेगवेगळ्या शर्यती ठेवण्यात आल्या होत्या. फ्लॅट रेस,

सॅकरेस, स्पून रेस, "ड्रेसिंग अप रेस" अशा मुलांच्या शर्यती होत्या. मुलांना त्यांच्या आईबापांनी निरनिराळ्या रंगाचे कपडे घालून त्या ठिकाणी आणले होते. ती मुले चमच्यातून लिंबू ठेवून तोंडात तो चमचा घेऊन पळत किंवा सॅक–पोते–यात गळ्यापर्यंतचा भाग अडकवून धावत,तेव्हा खूप मजा पाहावयास मिळे. ३ वर्षे वयांच्या खालील मुलांसाठी 'टॉडलर्स रेस' होती. त्यामध्ये रांगणारी मुले जोराने रांगत, ती शर्यत पाहताना तर प्रेक्षकांमध्ये हास्याच्या लहरी उमटत. काही मुले ठरलेल्या दिशेने रांगत जात, तर काही मुले ती दिशा सोडून भलत्याच दिशेला रांगत जावयाची, तेव्हा मोठी गंमत पहावयास मिळे. मुलांच्या आईबापांसाठीही एक शर्यत ठेवण्यात आली होती. शर्यतीनंतर बक्षीस समारंभ थाटाने झाला. शर्यतीत पहिले-दुसरे आलेल्या मुलांना नानात्ऱ्हेची बक्षिसे वाटण्यात आली व हा गोड समारंभ समाप्त झाला.

तसेच ता. २०–४–१९५५ बुधवारी रात्री बोटीवर मुलांची फॅन्सीड्रेस परेड–चित्रविचित्र पोशाखांची व वेगवेगळ्या भूमिका रंगविण्याची चढाओढ झाली. २ वर्षापासून १२ वर्षे वयांच्या मुलांनी तीत भाग घेतला होता. ५० ते ६० मुलांची ती परेड पाहून खूपच मनोरंजन झाले. ह्या चढाओढीत सायमीज ट्विन्स–सयामी जुळी मुले–एका आचाऱ्याची भूमिका, अरबी सरदाराची भूमिका इत्यादि भूमिका मुलांनी हुबेहूब वठविल्या. मुलांच्या ह्या चढाओढी पाहून तुझी, चि. विठ्ठल, चि. मंगला व चि. उषा यांची मला खूप खूप आठवण झाली. १८ तारखेस मुलांचे खेळांचे सामने झाले. त्यावेळीही तुमची आठवण झाली.

सध्या मोठ्या माणसांचे खेळांचे–रिंग टेनिस, टेबल टेनिस, ब्रिज वगैरे सामने चालू आहेत.

ता. २०–४–५५ रोजी मी टुरिस्त क्लास पाहिला तेथे बऱ्याच हिंदी माणसांची ओळख झाली. 'अ' वर्गात माझी कॅबिन असल्यामुळे तेथेही बऱ्याच लोकांच्या ओळखी झाल्या आहेत. मि. जी. पी. मॉर्फी ह्या आयरिश गृहस्थांची ओळख झाली, ते दक्षिण आयरलंडमधील डब्लीनचे राहणारे आहेत. गोष्टी करता करता त्यांच्या बोलण्यात आले की, "आयर्लंड इंग्लंडपासून वेगळे झाले ही काही चांगली गोष्ट झाली नाही, ह्यामुळे आयर्लंडचे नुकसानच झाले आहे. अलग झाल्यामुळे आयर्लंडची प्रगती तितकीशी झपाट्याने होणार नाही." अशा रीतीचे नैराश्याचे उद्गार त्यांनी काढले. ते एक व्यापारी गृहस्थ आहेत;

ते उंच व धिप्पाड आहेत. दुसरी एक ध्यानात राहण्यासारखी ओळख झाली, ती श्री. आणि श्रीमती बोअस ई. एस. यांची. ते दक्षिण ऑस्ट्रेलियातील राहणारे. त्यांची बहाई पंथाबद्दल फारच भक्ती व श्रद्धा दिसली. त्यांनी त्या पंथाबद्दल मला बरीच माहिती सांगितली व त्या पंथाची माहिती देणारी काही पुस्तके मला वाचावयास दिली. वरचेवर ह्या पतिपत्नीची गाठ पडते; श्री. बोअस हे मुखदुर्बल आहेत तर श्रीमती बोअस फारच बोलक्या आहेत; श्रीमती बोअसचे डोळे पाणीदार व खेळकर आहेत. त्यांचे नाक सरळ व गोंडस आहे. त्या बोलू लागल्या की जणू पंजाब मेल सुटली असे वाटते, बरे माझ्याही बोलण्याची रीत तुला माहीत आहे, मीही झपाट्याने बोलणारा आणि माझ्याबरोबर कोणी जलद बोलणारा असला की माझ्या बोलण्याची गती जास्तच वाढते. श्रीमती बोअस यांचेही तसेच होते; शिवाय त्या भावनाप्रधान आहेत व मीही भावना-वश होणारा, त्या सिन्सिअर म्हणजे कोणत्या एखाद्या विषयाबद्दल प्रामाणिक आत्मीयता बाळगणाऱ्या तर माझ्याही स्वभावात त्याच गुणाची छटा! मग काय, आमची चर्चा सुरू झाली की चर्चेत मोठा रंग भरतो, आम्ही दोघे पटपट बोलत असतो व श्री. बोअस आमच्याकडे पाहून स्मित करतात व चर्चेची मजा लुटतात; आमची चर्चा जोरात चालली की, आजूबाजूचे लोकही गमतीने आमच्याकडे पाहत असतात. ' बहाई ' पंथाबद्दल प्रचार करण्यास सर्व प्रवाशां-मध्ये मीच एक योग्य माणूस श्रीमती बोअस यांना कसा दिसला कळत नाही, कदाचित थोड्या परिचयानंतर माझ्यात धर्माबद्दल श्रद्धा त्यांना दिसली असेल. किंवा माझ्या ठिकाणची वैचारिक प्रामाणिकता त्यांच्या प्रत्ययास आली असेल. काही का असेना इतरांबरोबर बहाई पंथाबद्दल त्या फारशा बोलत नसत, माझ्याबरोबर मात्र तासन्तास त्या चर्चा करीत; बोअस पतिपत्नींची व माझी चांगलीच गट्टी जमली आहे.

( १ ) सर्व मानव जात एक आहे. ( २ ) सर्व धर्म एक आहेत. ( ३ ) सत्याचा शोध प्रत्येकाने स्वतंत्रपणे आपल्या बुद्धीने करावा. ( ४ ) सर्व राष्ट्रांचे एक Common wealth संघराज्य ( लोकसत्ताक राज्य ) असावे. ( ५ ) जगात शांतता नांदावी वगैरे बहाई पंथाची तत्त्वे–जी मला बोअस-बाईंच्या बरोबर झालेल्या चर्चेतून कळाली–मला फार पसंत पडली.

पोर्ट सय्यद आम्ही ता. १९ ला तिसऱ्या प्रहरी सोडले; त्यानंतर ता. २१–४–५५ गुरुवारी १० वाजेपर्यंत आम्हांला जमीन दिसली नाही. ता. १२ ला सकाळी ९ वाजता काही विमाने दिसली व एक हेलिकॉप्टर आमच्या बोटी-पासून फारच जवळून गेले, त्यामुळे त्या हेलिकॉप्टरमधील माणसे दिसली. ही विमाने माल्टा बेटावरून आली होती. जणू काय आमच्या 'हिमालया' बोटीचे स्वागत करण्यासाठीच ती आली होती. 'जणू काय' हा शब्दप्रयोग तरी कशासाठी? खरोखरच ती 'हिमालया' बोटीच्या स्वागतासाठी आली होती. 'हिमालया' ही बोट इंग्रजांची व ही विमाने ही इंग्रजांचीच. तेव्हा 'हिमालया' पाहून त्यांना आनंदाची उर्मी जशी आली तशी उर्मी हिमालया बोटीलाही आली असल्यास नवल नाही. आमच्या बोटीवरील इंग्रज, न्यू-झीलंडर्स, ऑस्ट्रेलियन वगैरे लोकांना तर ही विमाने पाहून व पुढे माल्टा बेट पाहून आनंदाची भरती आली. अभिमानाने ते फुलून गेले आणि खरोखर त्यांना आनंद का वाटू नये? अभिमान का वाटू नये? माल्टा हे बेट आम्हांला ता २१ ला सकाळी दहा वाजता दिसू लागले. ते एक तास म्हणजे १० ते ११ वाजेपर्यंत दिसत होते. आमच्या बोटीचा वेग ताशी १९ ते २० मैल आहे. हे मी मागे कळविलेच आहे, म्हणजे माल्टा बेटाचा सुमारे २० ते २१ मैल लांबीचा भाग आम्हांला पहावयास मिळाला. माल्टा बेटावरील मोठमोठाल्या भव्य इमारती, कचेऱ्या, गॅरिसन्स ( सैन्याची राहण्याची ठिकाणे ) आम्हाला दिसत होती. त्या इमारती म्हणजे मोठमोठाले मजबूत किल्लेच जणू होते. अतिशय भव्य इमारती, जणू पहाडच. ब्रिटिशांचे माल्टा हे भूमध्य समुद्रातील नाविक दलाचे मुख्य ठिकाण आहे, येथे त्यांचे वैमानिक दलही आहे. माल्टा बेट हे इंग्रजांच्या कर्तृत्वाची, धैर्याची व बहादुरीची जणू निशाणीच आहे. जाणाऱ्या–येणाऱ्या प्रवाशांना जणू हे बेट हात उभारून इंग्रजांच्या कर्तब-गारीची, कल्पकतेची व शौर्याची ग्वाही देत आहे. त्या इमारती व त्या बेटाचे ऐश्वर्य म्हणजे ब्रिटिशांच्या बुद्धिमत्तेच्या, शौर्याच्या व कार्यक्षमतेच्या पताकाच आहेत. ते माल्टा बेट पाहून माझ्या मनात ह्या कल्पना आल्या व ब्रिटिशांच्या बहादुरीबद्दल मला अचंबा वाटला तर हिमालया बोटीवरील इंग्रजांना ते माल्टा बेट पाहून अभिमान वाटला व आनंदाने त्यांची अंतःकरणे नाचू लागली तर त्यात आश्चर्य काय?

सायंकाळी केपबॉन हे आफ्रिकेमधील ट्युनिस देशातील उत्तरेकडचे शेवटचे टोक आम्हांला दिसले. पुन्हा ता. २२ ला आम्हांला जमीन दिसली नाही.

ता. २३ शनिवारी सकाळी जिब्राल्टर दिसणार असे मला अगोदरच कळाले होते. त्यामुळे मी ता. २३ ला सकाळी लवकरच उठलो. ६ वाजण्याच्या सुमारास केबिनच्या खिडकीतून डोकावले तो जिब्राल्टरचे दिवे दिसू लागले; माझ्या केबिनमधील जोडीदार श्री. महंमद अली यांना जिब्राल्टरच्या आगमनाची खबर दिली. तेही खिडकीतून डोकावू लागले. मी नंतर वरच्या डेकवर जाऊन जिब्राल्टर न्याहाळून पाहिले. जिब्राल्टर भूमध्य समुद्राचे पश्चिमेकडील टोक आहे व पोर्टसय्यद हे पूर्वेकडील टोक आहे. पोर्ट सय्यद व माल्टा बेट ह्यामधील अंतर ९३६ मैलांचे आहे व माल्टा ते जिब्राल्टर यांतील अंतर ९९१ मैलांचे आहे. म्हणजे भूमध्य समुद्राची एकूण लांबी सुमारे १९२७ मैलांची आहे. जिब्राल्टर ज्या डोंगरावर वसलेले आहे, तो डोंगर सुळक्यासारखा आकाशात वर गेलेला आहे. जिब्राल्टर जणू त्या डोंगराच्या रूपाने आपले डोके वर करून समुद्राकडे पाहातो आहे, असे वाटते किंवा सेंट्री–चौकीवरचा सैनिक–सारखा पहारा करतो आहे, असे वाटते. लष्करी दृष्टीने जिब्राल्टर हे फार महत्त्वाचे ठिकाण आहे, तेही ब्रिटिशांच्या ताब्यात आहे. जिब्राल्टरचा डोंगर व त्या शेजारचे डोंगर हिरवे आहेत; म्हणजे त्यावर दाट झाडी आहे. एडनपासून सुएजपर्यंत जे डोंगर लागले, त्यासारखे उघडे, रखरखीत व झाडाझुडपांशिवाय नाहीत. जिब्राल्टरचा डोंगर व इतर डोंगर खूप उंच आहेत, तेव्हा त्यांना पर्वत म्हणणे शोभेल. हे डोंगर पाहिल्यानंतर मला महाबळेश्वराच्या सह्याद्रि पर्वताची आठवण झाली. ह्या डोंगरांपैकी काही डोंगरांवर सपाट भाग आहे; तेथे व डोंगरामधील सपाट भागावर द्राक्षाचे मळे व इतर काही पिके असावीत, असे मला वाटते. जिब्राल्टरच्या समोर व जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीच्या दक्षिणेकडे आफ्रिका खंडातील सियुटा व टांजिएर ही बंदरे अगर शहरे आहेत, त्यांपैकी एका शहरातील दिवे दिसत होते व त्यातील पुष्कळसे डोंगरही दिसले. जिब्राल्टरची सामुद्रधुनी म्हणजे अटलांटिक समुद्राचे प्रवेशद्वार आहे. कारण ह्याच सामुद्रधुनीतून आमच्या बोटीने अॅटलांटिक समुद्रात प्रवेश केला.

ता. २४ ला–रविवारी–बे ऑफ बिस्के लागले. दर रविवारी बोटीवर ख्रिश्चन लोकांची प्रार्थना होते; त्यात मी भाग घेत असे, त्यामुळे त्या लोकांना माझ्याबद्दल आपुलकी वाटत आहे. जसा जसा आमचा प्रवास पुढे पुढे चालला तसे तसे आमच्या घड्याळाचे काटे मागे फिरले जात आहेत. रोज 'हिमालया' बोटीवर जे मोठे घड्याळ आहे, त्यावर योग्य ती वेळ दाखविली जाते. त्याबर-हुकूम आम्ही आमची घड्याळे लावून घेतो. साडेचार वाजता आमची तिसऱ्या प्रहरी चहाची वेळ पण त्यावेळी जणू सायंकाळ झाली असे वाटते. ता. २३ ला मुंबईच्या वेळेपेक्षा येथील वेळ सुमारे साडेचार तास मागे आहे.

ता. २५ ला इंग्लंडच्या किनाऱ्याचे प्रथम दर्शन झाले. सकाळी ८॥–९ वाजण्याच्या सुमारास इंग्लंडातील पहिले ठिकाण 'बिझ्म' हे शहर पहावयास मिळाले. हे शहर टेकड्यांवर वसलेले आहे. टेकड्या हिरव्या हिरव्यागार आहेत, मधून मधून पिके लावलेली शेते दिसत आहेत, झाडी खूप दाट आहे. झाडीतून इंग्लिश पद्धतीची सुरेख घरे दिसत आहेत. हे शहर पाहून 'हिमालया'-वरील न्यूझीलंडर्स व ऑस्ट्रेलियन्स ह्या लोकांना फारच आनंद झाला, त्यांच्या चेहऱ्यांवर आनंद लहरी नाचू लागल्या, डोळ्यांत समाधानाचे नादमाधुर्य सुरू झाले ! त्यांच्या मुखावर भक्तिभावाची फुले फुलली ! अभिमानाची सरिता वाहू लागली ! भक्तिभाव हा शब्द मी मुद्दामच वापरला आहे; जणू आपण आपल्या मक्केत किंवा काशीत आलो, असा आनंद त्यांना झाला. ह्या लोकांना इंग्लंडबद्दल किती प्रेम आहे, हे मला येथे दिसले. मलाही ते शहर पाहून फारच आनंद झाला. एक तर हे शहर सुंदर व दुसरे आता आपण इंग्लंडच्या राजधानीत लंडनला–उद्या पोहोचणार, ह्यामुळे माझा आनंद द्विगुणित झाला. मला इतका आनंद झाला तर त्या लोकांना म्हणजे ऑस्ट्रेलियन इत्यादि लोकांना आनंद होणे साहजिकच होते. त्यांनी आपापली बायनाक्यूलर्स –दुर्बिणी–काढल्या व ते त्यातून इंग्लंडचे ते बिझ्म शहर पाहू लागले. माझाही आनंद पाहून एकाने मला आपली दुर्बीण पाहण्यासाठी दिली. त्यांतील एकदोन लोक त्या बिझ्म शहराचे वर्णन करून मला माहिती देऊ लागले. त्यांनी दिलेली माहिती ही अशी आहे. बिझ्म हे समुद्रकाठचे हवा खाण्याचे ठिकाण आहे, येथे सुसज्ज व आधुनिक

सायंकाळी केपबॉन हे आफ्रिकेमधील टयुनिस देशातील उत्तरेकडचे शेवटचे टोक आम्हांला दिसले. पुन्हा ता. २२ ला आम्हांला जमीन दिसली नाही.

ता. २३ शनिवारी सकाळी जिब्राल्टर दिसणार असे मला अगोदरच कळाले होते. त्यामुळे मी ता. २३ ला सकाळी लवकरच उठलो. ६ वाजण्याच्या सुमारास केबिनच्या खिडकीतून डोकावले तो जिब्राल्टरचे दिवे दिसू लागले; माझ्या केबिनमधील जोडीदार श्री. महंमद अली यांना जिब्राल्टरच्या आगमनाची खबर दिली. तेही खिडकीतून डोकावू लागले. मी नंतर वरच्या डेकवर जाऊन जिब्राल्टर न्याहाळून पाहिले. जिब्राल्टर भूमध्य समुद्राचे पश्चिमेकडील टोक आहे व पोर्टसय्यद हे पूर्वेकडील टोक आहे. पोर्ट सय्यद व माल्टा बेट ह्यामधील अंतर ९३६ मैलांचे आहे व माल्टा ते जिब्राल्टर यांतील अंतर ९९१ मैलांचे आहे. म्हणजे भूमध्य समुद्राची एकूण लांबी सुमारे १९२७ मैलांची आहे. जिब्राल्टर ज्या डोंगरावर वसलेले आहे, तो डोंगर सुळक्यासारखा आकाशात वर गेलेला आहे. जिब्राल्टर जणू त्या डोंगराच्या रूपाने आपले डोके वर करून समुद्राकडे पाहातो आहे, असे वाटते किंवा सेंट्री–चौकीवरचा सैनिक–सारखा पहारा करतो आहे, असे वाटते. लष्करी दृष्टीने जिब्राल्टर हे फार महत्त्वाचे ठिकाण आहे, तेही ब्रिटिशांच्या ताब्यात आहे. जिब्राल्टरचा डोंगर व त्या शेजारचे डोंगर हिरवे आहेत; म्हणजे त्यावर दाट झाडी आहे. एडनपासून सुएजपर्यंत जे डोंगर लागले, त्यासारखे उघडे, रखरखीत व झाडाझुडपांशिवाय नाहीत. जिब्राल्टरचा डोंगर व इतर डोंगर खूप उंच आहेत, तेव्हा त्यांना पर्वत म्हणणे शोभेल. हे डोंगर पाहिल्यानंतर मला महाबळेश्वराच्या सह्याद्रि पर्वताची आठवण झाली. ह्या डोंगरांपैकी काही डोंगरांवर सपाट भाग आहे; तेथे व डोंगरामधील सपाट भागावर द्राक्षाचे मळे व इतर काही पिके असावीत, असे मला वाटते. जिब्राल्टरच्या समोर व जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीच्या दक्षिणेकडे आफ्रिका खंडातील सियुटा व टांजिएर ही बंदरे अगर शहरे आहेत, त्यांपैकी एका शहरातील दिवे दिसत होते व त्यातील पुष्कळसे डोंगरही दिसले. जिब्राल्टरची सामुद्रधुनी म्हणजे अटलांटिक समुद्राचे प्रवेशद्वार आहे. कारण ह्याच सामुद्रधुनीतून आमच्या बोटीने अॅटलांटिक समुद्रात प्रवेश केला.

ता. २४ ला–रविवारी–बे ऑफ बिस्के लागले. दर रविवारी बोटीवर ख्रिश्चन लोकांची प्रार्थना होते; त्यात मी भाग घेत असे; त्यामुळे त्या लोकांना माझ्याबद्दल आपुलकी वाटत आहे. जसा जसा आमचा प्रवास पुढे पुढे चालला तसे तसे आमच्या घड्याळाचे काटे मागे फिरले जात आहेत. रोज 'हिमालया' बोटीवर जे मोठे घड्याळ आहे, त्यावर योग्य ती वेळ दाखविली जाते. त्यावर-कूम आम्ही आमची घड्याळे लावून घेतो. साडेचार वाजता आमची तिसऱ्या प्रहरी चहाची वेळ पण त्यावेळी जणू सायंकाळ झाली असे वाटते. ता. २३ ला मुंबईच्या वेळेपेक्षा येथील वेळ सुमारे साडेचार तास मागे आहे.

ता. २५ ला इंग्लंडच्या किनाऱ्याचे प्रथम दर्शन झाले. सकाळी ८।।–९ वाजण्याच्या सुमारास इंग्लंडातील पहिले ठिकाण 'बिझ्म' हे शहर पहावयास मिळाले. हे शहर टेकड्यांवर वसलेले आहे. टेकड्या हिरव्या हिरव्यागार आहेत, मधून मधून पिके लावलेली शेते दिसत आहेत, झाडी खूप दाट आहे. झाडीतून इंग्लिश पद्धतीची सुरेख घरे दिसत आहेत. हे शहर पाहून 'हिमालया'-वरील न्यूझीलंडर्स व ऑस्ट्रेलियन्स ह्या लोकांना फारच आनंद झाला, त्यांच्या चेहऱ्यांवर आनंद लहरी नाचू लागल्या, डोळ्यांत समाधानाचे नादमाधुर्य सुरू झाले! त्यांच्या मुखावर भक्तिभावाची फुले फुलली! अभिमानाची सरिता वाहू लागली! भक्तिभाव हा शब्द मी मुद्दामच वापरला आहे, जणू आपण आपल्या मक्केत किंवा काशीत आलो, असा आनंद त्यांना झाला. ह्या लोकांना इंग्लंडबद्दल किती प्रेम आहे, हे मला येथे दिसले. मलाही ते शहर पाहून फारच आनंद झाला. एक तर हे शहर सुंदर व दुसरे आता आपण इंग्लंडच्या राजधानीत लंडनला–उद्या पोहोचणार, ह्यामुळे माझा आनंद द्विगुणित झाला. मला इतका आनंद झाला तर त्या लोकांना म्हणजे ऑस्ट्रेलियन इत्यादि लोकांना आनंद होणे साहजिकच होते. त्यांनी आपापली बायनाक्यूलर्स –दुर्बिणी–काढल्या व ते त्यातून इंग्लंडचे ते बिझ्म शहर पाहू लागले. माझाही आनंद पाहून एकाने मला आपली दुर्बीण पाहण्यासाठी दिली. त्यांतील एकदोन लोक त्या बिझ्म शहराचे वर्णन करून मला माहिती देऊ लागले. त्यांनी दिलेली माहिती ही अशी आहे. बिझ्म हे समुद्रकाठचे हवा खाण्याचे ठिकाण आहे, येथे सुसज्ज व आधुनिक

साधनांनी युक्त अशी हॉटेल्स आहेत, सॅनेटोरियम्स आहेत, पोहण्याची तळी व इतरही मनोरंजनाची भरपूर साधने आहेत.

विझ्मनंतर ‘ आइल ऑफ व्हाईट ’ हे बेट लागले, हेही हवा खाण्याचे एक ठिकाण आहे.

ता. २३ ला मी येथून म्हणजे जहाजावरून श्री. लॉकहार्ट, कॉमनवेल्थ पार्लेमेंटरी असोसिएशनचे लंडन शाखेचे सेक्रेटरी, यांना विनतारी तारायंत्राने निरोप पाठविला की, मी ता. २६ लंडनला सकाळी येत आहे.

ता. २५ ची रात्र ही बोटीवरील शेवटची रात्र म्हणजे जणू कत्तलची रात्र ! तेव्हा बोटीवरील अधिकाऱ्यांनी आज नृत्याचा खास कार्यक्रम ठेवून त्यांत करमणुकीचे कार्यक्रमही घातले होते व त्या स्थळी तोरणे वगैरे लावून विशेष रोषणाई केली होती. नृत्याचा कार्यक्रम पाहण्यास मीही गेलो. परंतु येथे एक गोष्ट घडली त्याचा निर्देश केल्यावाचून मला राहवत नाही. ते नृत्य पाहण्यासाठी एका खुर्चीवर जाऊन बसलो तोच एक हिंदी गृहस्थ तेथे येऊन मला म्हणाला की, ही खुर्ची मी रिझर्व्ह–राखून ठेवली–केली आहे. वास्तविक तेथे रिझर्व्हेशन नव्हते. मी उठणार इतक्यात एका इंग्रज गृहस्थाने आपली खुर्ची मोकळी करून मला दिली, याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला, त्या हिंदी गृहस्थाबद्दल मला तिटकारा वाटला नाही. परंतु कीव आली व त्या इंग्रज गृहस्थाबद्दल आपुलकी निर्माण झाली. युरोपियन स्त्री–पुरुष नृत्य स्थळी जमा होऊ लागले. पुरुषांनी झकपक पोशाख केले होते, स्त्रियांनी उंची उंची झगे घातले होते, ससाच्या कातडीच्या व इतर निरनिराळ्या कातड्यांच्या छोटयाशा ओढण्या गळ्याभोवती लपेटल्या होत्या, नाना प्रकारच्या मोत्यांच्या व रत्नांच्या माळा घातल्या होत्या; प्रत्येकीने वेशभूषा चमत्कृतिपूर्वक केली होती. सेंट्स–सुवासिक तेले–लावून आल्यामुळे चहूकडे सुगंध दरवळला होता. इंग्लिश पद्धतीच्या वाद्यांचे सूर हलके हलके निघू लागले. नृत्य सुरू झाले. एकंदर वातावरण माणसाला धुंद करणारे होते. रात्री बराच वेळ ते नृत्य चालू होते.

जे प्रवासी माझे विशेष ओळखीचे व मित्र झाले होते, त्यांची आपली उद्या ताटातूट होणार म्हणून मी त्यांना ता. २५ ला भेटलो व त्यांचा निरोप घेऊ लागलो. त्यांतल्या त्यांत मिसेस बोअस व मि. बोअस यांच्याबरोबर बराच वेळ

बोलत बसलो. ता. २६ ला सकाळी सामानाची आवराआवर केली. टिलबरी येथे मला घेण्यासाठी कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन अधिकारी येणार आहेत व ते मला माझ्या केबिनमध्ये ता. २६ ला सकाळी १०॥ वाजता भेटतील, असा त्या असोसिएशनचा मार्कोनिग्राम ( Marconigram ) —म्हणजे बिनतारी संदेश—ता. २५ लाच आला होता.

ता. २६ ला सकाळी ६॥ वाजता हिमालया बोट टिलबरी बंदरात आली. टिलबरी हे लंडन शहराचे एक टोक आहे. ज्या उतारूंना घेण्यासाठी लोक येत ते बोटीच्या अधिकाऱ्यांना निरोप पाठवीत व तो निरोप अधिकारी लाऊड स्पीकरवरून जाहीर करीत. मला घ्यावयास कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनचे दोन अधिकारी आले आहेत असे लाऊडस्पीकरवरून सांगण्यात आले. थोड्याच प्रवाशांना असे रिसिव्ह करण्यास लोक आले होते व त्यांत मी एक होतो, त्यामुळे मी कोणी महत्त्वाचा माणूस म्हणून बरेच प्रवासी कुतूहलाने माझ्याकडे पाहू लागले व आपापसांत कुजबुजू लागले.

हे पत्र पुरे करण्यापूर्वी आणखी एका गोष्टीबद्दल मी लिहिणार आहे. आमचा हा १४ दिवसांचा प्रवास अतिशय सुखकर व आरामशीर झाला, याचे कारण म्हणजे बोटीवरील अधिकारी व नोकरवर्ग यांची कार्यक्षमता, शिस्तप्रियता व सभ्यता हे होय. बोटीवर चहूकडे शिस्त होती, टापटीप होती, कोठेही गडबड नाही की गोंधळ नाही की धांदल नाही. हे गुण आपणांस शिकता येण्यासारखे आहेत नाही ?

तुझा

**नाना**

● ● ●

: ८ :

# " लंडनचे अलंकार : थिएटर्स व बागा "

ग्रोव्हनर हॉटेल,
व्हिक्टोरिया,

एस्. डब्ल्यू. लंडन,
ता. २९-४-१९५५

प्रिय मंगलास सप्रेम आशीर्वाद—

माझ्या मागच्या पत्रात मी लिहिले की, टिलबरी लंडन–येथे आमची बोट ता. २६ एप्रिल रोजी सकाळी ६।। वाजता पोहोचली, पण बोटीतून उतरण्याअगोदर अनेक गोष्टी करावयाच्या असतात. ते सर्व विधी होता होता सुमारे १०।। वाजले. नंतर कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या ब्रिटिश शाखेतर्फे श्री. हॉजिन्स ( Mr. Hodgins ) आणि त्या असोसिएशनतर्फे श्री. फाउलर ( Mr. Fowler ) हे 'हिमालया' बोटीवर आले व त्यांनी माझी भेट घेऊन माझे स्वागत केले. अर्थात हारतुरे आणले नव्हते. कारण हिंदुस्थानात हारतुऱ्याची जी पद्धत आहे, ती येथे विशेष नाही. बोटीतून आम्ही तिघे नंतर उतरलो. माझ्या दोन मोठ्या बॅगा होत्या. टिलबरी येथे हमालांची टंचाई होती व याची कल्पना बोटीवर आम्हांला अगोदरच देण्यात आली होती. हमाल होते, पण थोडे होते व सामान नेण्यासाठी देखील त्यांना वेळ ठरवून दिलेली होती. ती वेळ होण्यास अवकाश होता; तेव्हा तोपर्यंत वाट पाहण्यापेक्षा सामान आपणच घेऊन जावे, असे श्री. हॉजिन्स व श्री. फाउलर यांनी ठरविले व दोघांनी दोन बॅगा उचलल्यादेखील. मी संकोच करू लागलो. पण माझ्या संकोचाकडे लक्ष न देता त्यांनी ज्या ठिकाणी त्यांची मोटार होती, तेथे त्या बॅगा घेऊन ते गेले. मोटारीने आम्ही लंडन शहराकडे जावयास निघालो. रस्ता सुंदर होता. आमची मोटार भरधाव जात होती.

संग्रहालय, ठाणे.

प्रथम हरिततृणांनी आच्छादिलेली मैदाने लागली; नंतर इंग्लिश पद्धतीची घरे रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दिमू लागली, ह्या सुंदर घरांभोवती मनोहर बागा होत्या. त्या बागांत फुलांचे ताटवे हसत होते; विविध रंगांची फुले उमललेली होती. ही घरे लंडनच्या उपनगरातील होती. त्यानंतर प्रत्यक्ष लंडन शहर लागले. शहरातील रस्ते रूंद व विस्तृत होते. लंडन शहरात पोहोचल्यावर प्रथम आम्ही कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनचे सेक्रेटरी जनरल सर हॉवर्ड डीएग्व्हिले यांच्या कचेरीत गेलो. त्यांची भेट झाली. त्यांनी प्रेमाने माझें स्वागत केले. त्यांच्या कचेरीत असोसिएशनतर्फे जे पाहुणे येतात त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी एक पुस्तक होते. त्यावर मला सही करण्यास श्री. हावर्ड यांनी मोठ्या गंभीरपणे सांगितले. ही अशी सही करणे म्हणजे एक मोठा पवित्र व गंभीर धार्मिक विधी आहे, असे त्यांच्या बोलण्याने व एकंदर त्यांच्या हावभावांनी त्यांनी मला सूचित केले व मीही तितकाच गंभीर होऊन त्या पुस्तकात सही केली. नंतर हॉजिन्स व फाउलर हे मला ग्रोव्हनर हॉटेल-मध्ये घेऊन गेले. तेथे माझी उतरण्याची सोय करण्यात आली होती. आजपासून मी हिज मॅजेस्टीचा ( नव्हे हर मॅजेस्टी, कारण सध्या एलिझाबेथ २ री ही इंग्लंडच्या गादीवर आहे )—पाहुणा म्हणून येथे राहणार आहे. पूर्वीही मी ' हिज मॅजेस्टी ' चा पाहुणचार अनेकवेळा घेतला आहे. तू विचारशील की, ' केव्हा तुम्ही हिज मॅजेस्टीचा पाहुणा होता ? " अग, स्वातंत्र्याच्या चळवळीत तुरुंगात राजकीय कैदी असताना ! त्यावेळी आम्हा राजकीय कैद्यांना ' हिज मॅजेस्टीज ' (राजाचे) गेस्टस (पाहुणे) संबोधण्यात येई. असो ! ग्रोव्हनर हॉटेल हे लंडनच्या ' व्हिक्टोरिया, एस. डब्ल्यू. १ ' ह्या विभागात आहे. हॉटेल आलिशान आहे. मला स्वतंत्र खोली, नव्हे मोठा हॉल देण्यात आला आहे. त्याला जोडून ऐसपैस बाथरुम आहे. चोवीस तास थंड व गरम पाण्याचीही सोय आहे. बाकी ह्या येथील थंडीत चोवीस तास गरम पाणी हवेच.

इंग्लिश लोक व इतरही युरोपियन लोक सुशिक्षित, चाणाक्ष व धोरणी आहेत, इतर देशांच्या राजकारणाबद्दल त्यांना बरीच माहिती असते. दुसऱ्या देशाचा एखादा माणूस त्यांना भेटला तर मिश्किलपणाने त्यास असे प्रश्न ते करतात की त्यांनी आपल्या देशाच्या बाबत व आपल्या देशाच्या थोर पुढाऱ्यांच्या संबंधी काही विपरीत उत्तरे द्यावीत व मग त्यांनी त्या माणसाची किंमत

करावी व त्याची पातळी काय आहे, हे अजमावे. तेव्हा ह्यासंबंधी परदेशी माणसांनी व त्यांतल्या त्यांत आशिया खंडातील हिंदुस्थानासारख्या मागासलेल्या देशातील माणसाने फारच सावधगिरीने बोलावयास पाहिजे व धोरणाने वागावयास पाहिजे हे मी मनाशी जाणून होतो. एका लंचच्या वेळी गॉर्डन नावाचे एक साहेब म्हणाले, 'श्री. एस. के. पाटील येथे (लंडन) आले होते. त्यांची माझी ओळख आहे, त्यांची भाषणे मी ऐकली आहेत. ते हुशार दिसले. परंतु काय बोलत असत, हे मला समजत नसे." हे सर्व माझ्यासमोर बोलण्याचा त्यांचा हेतू हा की, मीही पाटलांविषयी कुत्सित काही बोलावे, पण मी मौन धरले, इतकेच नव्हे तर मी त्याबद्दल नापसंती व्यक्त केली. सर हॉवर्ड यांनी ताडले की, मला गार्डनसाहेबांचे बोलणे आवडले नाही व त्यांनी खुणेने गार्डनला तसे सूचित केले, तेव्हा गार्डनसाहेबांनी जणू काहीच घडले नाही, असे दाखवून दुसऱ्या विषयासंबंधी बोलण्यास सुरुवात केली. पाटलांविषयी आपण काही तरी मुद्दाम कुत्सित बोलावे, त्यांचा व पर्यायाने हिंदुस्थानचा उपमर्द करावा, हा गार्डनचा हेतू खास नव्हता, तर माझी त्याबद्दल प्रतिक्रिया काय आहे, हे पहावे व मी काही विपरित बोललो तर माझी किंमत ठरवावी, हाच त्यांचा हेतू होता, हे मी ओळखले.

ता. २ मेला पार्लमेंटरी कोर्स सुरू होणार. तोपर्यंत म्हणजे ता. २६ एप्रिलपासून ता. १ मेपर्यंत मला माझा वेळ कसा घालवावा, याचे पूर्ण स्वातंत्र्य होते व त्याचा मी लंडन शहर पाहण्यासाठी पुरेपूर उपयोग केला. मी येथे आल्यावर पहिली खरेदी कोणती केली असेल तर गरम (लोकरीच्या) ओव्हरकोटची; मी ह्या खरेदीसाठी ग्रोव्हनर हॉटेलातून बाहेर पडलो. जवळच कापडाची दुकाने असलेला रस्ता लागला. एका दुकानात शिरलो. दुकान लहान होते व तेथे एकच माणूस होता. तोच त्या दुकानाचा मालक असावा. त्यांनी मला अनेक ओव्हरकोटस् दाखविले व त्यांतला एक माझ्या अंगावर चढविला व मला त्यांनी एका मोठ्या आरशासमोर उभे केले. तो कोट माझ्या अंगावर पाहून तो दुकानदार म्हणाला, 'हा कोट तुम्हांला फारच शोभतो. तुमच्या अंगालाही असा फिट बसला आहे की जणू ऑर्डर देऊनच तुम्ही तो बनवून घेतला आहे.' आणि खरोखरच मला तो कोट बरोबर बसला. कोटही फार चांगला होता व त्याही-

पेक्षा त्या दुकानदाराचे बोलणे व वागणे मिठ्ठास होते. मी तो कोट खरेदी केला व त्यास "वूलन अंडरवेअर्स वगैरे कपडे आहेत का" म्हणून विचारले. त्याने "ते कपडे माझ्याकडे नाहीत, परंतु जवळच माझ्या एक ओळखीचा दुकानदार आहे, त्याच्याकडे हे कपडे तुम्हांला मिळतील," असे म्हणून तो थांबला नाही तर आपले दुकान तसेच सोडून तो त्या दुसऱ्या दुकानदाराकडे मला घेऊन गेला व त्यास म्हणाला, "हे माझे मित्र आहेत, यांना हवे असलेले कपडे दाखव व मनपसंत कपडे यांना दे." असे म्हणून तो आपल्या दुकानात परत गेला. मला त्याच्या वागण्याचे कौतुक वाटले. काही वेळात खरोखरच त्याने मला आपला मित्र बनवून टाकले होते. इतक्या प्रेमळपणे तो बोलला व माझ्याशी वागला. एक दोन दिवसांनी मला फेल्ट हॅटही घ्यावी लागली. येथे वरचेवर पाऊस पडतो. धो धो पाऊस पडत नाही. जोराच्या धाराही नाहीत; पण रिमझिम पाऊस वरचेवर पडत असतो. त्यामुळे फिरताना माझे डोके भिजून जाई व दुखू लागे, म्हणून मला हॅट खरेदी करणे प्राप्त होते व पुढे एकदोन दिवसांत हॅंड ग्लोव्हज (वुलनचे हातमोजे) ही घ्यावे लागले. कारण थंडीच्या या देशात त्यांचीही आवश्यकता होती; ओव्हरकोट, हॅंडग्लोव्हज हे कपडे येथील हवेला जरुरीचे आहेत; पण युरोपियनांचा हा पोशाख व कपडे जेव्हा आपल्या देशासारख्या उष्ण देशात युरोपियनांचे अनुकरण करून काही लोक घालतात, तेव्हा त्यांचे मला हसू येते व त्यांच्या मूर्खपणाची कीवही येते.

लंडनमधील 'वेस्ट एंड' ह्या भागातील 'पिक्कॅडिली सर्कस' ह्या पेठेत गेलो. येथे मोटमोठाली दुकाने आहेत. नानातऱ्हेच्या वस्तू विकण्यासाठी मांडलेल्या आहेत. ह्याच भागात अनेक सिनेमा हाऊसेस व इतर करमणुकीच्या कार्यक्रमांसाठी थिएटर्स आहेत, थिएटर्स व सिनेमा हाऊसेस सदा चिक्कार गर्दीने भरलेली असतात. गिलवर्ड ह्या शिल्पकाराने बनविलेला एरॉसचा अतिसुंदर पुतळा ह्या 'पिक्कॅडिली' भागाचे भूषण आहे. ह्या भागात मी तासन तास फिरलो आहे.

येथे आल्यापासून मी (Intimacy) इंटिमसी हा रेव्ह्यू (Revue) चा करमणुकीचा कार्यक्रम पाहिला, चुटचुटीत व विनोदी संवाद हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे. चालू राजकीय व सामाजिक घटनांवर उपहासात्मक व चुणचुणीत टीकाही संवादातून विखुरलेली असते. 'एडनसाहेब मुख्यमंत्री

झाले, ते वेकार होते त्यांना नोकरी मिळाली. ' अशा प्रकारचा विनोदही ह्या संवादातून ऐकावयास मिळतो. ह्यावरून इंग्लंडसारख्या लोकशाही देशात माणूस कितीही उच्च पदावर असला तरी त्याच्यावर देखील करमणुकीसारख्या कार्यक्रमात विनोदी टीका होते व अशी टीका केल्याबद्दल कलावंतांना शिक्षा न होता त्यांचे कौतुक होते, ही गोष्ट पाहून इंग्लिश लोकांचे कौतुक करावेसे वाटते.

या रेव्ह्यूच्या कार्यक्रमात ' ओपनिंग दी अल्बम् ' ' दी ब्लेसेड प्लॉट ' ' विझिनेम इन् ग्रेट वार्टर्स ' ' दी टेडी गर्ल्स पिकनिक ' ' लेडी वुईथ दी लँप ', " गुड बुक अँड लिरिक्स, " " देअर इज अँन् ऑफुल लॉट ऑफ कॉफी इन् हे (Hay) हिल, " ' पीटर पॅटर, ' ' गैशा, गैशा, ऑल फॉल डाऊन ' इत्यादि २७ आयटेम्स होते. ह्या कार्यक्रमात संगीत व नृत्यही होते. पिक्कॅडिली सर्कस ह्या लंडन शहरातील भागामध्ये ' Ctiterion क्रायटिरिऑन ' थिएटरमध्ये हा कार्यक्रम मी पाहिला. हा कार्यक्रम पाहण्यासाठी एक भारतीय गृहस्थ श्री. रसिकलाल व्ही. देसाई, बी. कॉम्., माझ्याबरोबर होते. ते येथे अकाउन्टसीच्या कोर्ससाठी आलेले आहेत. त्यांनी मला ट्यूब ट्रेन्समध्ये कसा प्रवास करावा, कोणती महत्त्वाची ठिकाणे पहावीत वगैरे माहिती दिली. ' कॉन्क्वेस्ट ऑफ स्पेस ' (Conquest of Space) हा सिनेमा पाहिला. ह्यात एक जपानी, एक इंडियन व एक जर्मन असे चंद्रावर स्वारी करण्यासाठी रॉकेटमधून प्रवास करतात, चंद्रावर कसे जातात, चंद्रावरून परत येताना वातावरणातील विमानतळावर ( Space airport ) कसे उतरतात, तेथे पेट्रोल घेऊन व विश्रांती घेऊन ताजेतवाने कसे होतात व पृथ्वीवर परत कसे येतात, याचे अद्‌भुत चित्र पाहावयास मिळाले. येथे रोज सिनेमाचे दोन, तीन अगर चार शोज असले तर ते एकामागून एक होत असतात. प्रेक्षकाने कुठल्या तरी शोच्या सुरुवातीस येऊन मग तो सिनेमा शेवटपर्यंत पहावयास पाहिजे असे नाही; प्रेक्षक कुठल्याही शोमध्ये येऊन व दुसऱ्या शोमध्ये बसून पुरा सिनेमा पाहू शकतो. सिनेमा चालू असताना चॉकलेट, टॉफी, बिस्किटे इत्यादि खाद्यपदार्थ व कॉफी इत्यादि ड्रिंक्स विकणारे लोक सिटस्मधील वाटांतून हिंडत असतात. त्यांत स्त्रियाच प्रामुख्याने असतात व त्या अशा रीतीने आपल्या हालचाली करतात की, कोणालाही त्रास होत नाही.

गळ्यात अडकविलेल्या ट्रेवर ( तबक अगर ताट ) ते खाद्यपदार्थ ठेवतात व त्या ट्रेवर मंद तेवणारे लहानसे दिवे असतात. सिनेमा चालू असताना जो अंधार असतो, त्यामध्ये ह्या दिव्यांच्या मंद प्रकाशात ते आपल्या हालचाली करतात.

'क्रेझी गँग' ( Crazy gang ) हा बॅले कार्यक्रम मी पाहिला. त्यात ६० ते ७० कलावंतांनी भाग घेतला होता. त्यात एक नाचाचा कार्यक्रम होता. त्यामध्ये स्टेजवर गाढ अंधार होता व नाच करणाऱ्यांवर अशारीतीने प्रकाशझोत टाकण्यात येई की एक पुरुष कलावंत एका स्त्री कलावंतास उचलून फेकीत असे व दुसऱ्या बाजूस असलेला दुसरा पुरुष कलावंत स्त्री कलावंतास झेलीत असे व पुन्हा तो त्या स्त्रीस दुसऱ्या कलावंताकडे फेकीत असे. अशा फेकाफेकीमध्ये पाहणाऱ्यांना असे वाटे की, ती स्त्री–कलावंत एखाद्या परीसारखी अंतराळात वावरत आहे, कारण ते दोन्ही पुरुष कलावंत अंधारात दिसत नसत, फक्त ती स्त्री कलावंत तिच्यावर पडणाऱ्या प्रकाश झोतामुळे इकडून तिकडे व तिकडून इकडे अधांतरी फिरत आहे, असे दिसे. दुसऱ्या एका दृश्यात अंधारात दोन्ही बाजूला दोन कलावंत उभे राहून एक सांझरी एकमेकांकडे फेकीत, त्या सांझरीवर फक्त प्रकाशझोत टाकला जाई, त्यामुळे ती सांझरी अंधातरी फिरत आहे, असा भास होई. दुसरे म्हणजे काही वेळा स्टेजचा फार मोठा भाग दाखवीत. स्टेजवर मग राजवाडा, सरोवर, कारंजी, रस्ते, बागबगीचे, अरण्य वगैरे देखावे दाखविले जात व त्या देखाव्याच्या पार्श्वभूमीवर कलावंत नाच करीत. तसेच स्टेशनसह आगगाडी स्टेजवर दाखविणे इत्यादि देखावेही दाखवीत. स्टेजचा आकार फारच मोठा असल्याने ते शक्य होई. आहे की नाही नवलपूर्ण गंमत व अजब करमणुकीचा कार्यक्रम !

श्री. फिलीप किंग ( Philip king ) यांनी लिहिलेले 'सिरिअस चार्ज' 'Serious charge' हे नाटकही मी पाहिले. त्या नाटकात लोखंडाची जाळी करून त्यात विजेचा प्रकाश अशा रीतीने सोडलेला होता की त्याचे एकंदर परिवर्तन एखाद्या हर्थ ( Hearth ) युरोपियन पद्धतीच्या शेगडीमध्ये झाले होते ! हे नाटक पाहण्यासाठी मी थिएटरमध्ये गेल्यावर तेथे ज्या स्त्रिया सीटस् ( प्रेक्षकांच्या जागा ) दाखविण्यासाठी व इतर व्यवस्थेसाठी होत्या, त्यांपैकी

एकीनें येऊन माझा ओव्हरकोट स्वत: माझ्या अंगावरून काढून घेतला व कोट ठेवण्यासाठी बाजूला जे. हँगर्ससह कपाट ठेवण्यात आले होते, त्यात तो नेऊन ठेवला. नाटक संपल्यावर तो कोट परत ती घेऊन आली व तिने स्वत: तो कोट माझ्या अंगावर चढविला. आपल्या आश्रयदात्यांची इतक्या सौजन्याने काळजी वाहणाऱ्या त्या स्त्रिया पाहून कोणाला आनंद होणार नाही ? हे नाटक मी चॅरिंग क्रॉस रोडवरील गॅरिक थिएटरमध्ये पाहिले.

ता. २ ला ज्या पार्लमेंटरी कोर्ससाठी मी आलो होतो, तो सुरू झाला, पण तो बहुतेक सकाळी असे व इतर वेळ आम्हांला म्हणजे जे या कोर्ससाठी निरनिराळ्या कॉमनवेल्थ देशांचे प्रतिनिधी आले होते त्यांना मोकळाच असे. ह्या वेळेत कधी आम्ही हाऊस ऑफ लार्डस् व कधी हाऊस ऑफ कॉमन्सच्या बैठकींना हजर राहत असू. ह्या बैठकीस हजर राहूनही जो वेळ राही, तो मी लंडन शहरातील प्रेक्षणीय स्थळे व ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाची ठिकाणे पाहण्यात खर्च करी. त्या स्थळांचे वर्णन मी थोडक्यात करणार आहे. पण ही स्थळे पाहण्यासाठी मी प्रवास कसा व कोठल्या वाहनांनी करी, याची हकिकत तुला सांगितली पाहिजे. येथे मुंबईप्रमाणे टॅक्सीज आहेत, पण ह्या टॅक्सीज चौकोनी व डौलदार आकाराच्या आहेत. पूर्वीच्या काळी युरोपियन राजेरजवाडे किंवा सरदार ज्या प्रकारची कोचेस वापरीत ती तू काही इंग्रजी सिनेमातून पाहिली आहेस–त्या कोचेसच्या आकाराच्या भारदस्त दिसणाऱ्या टॅक्सीज येथे आहेत, बसेस आहेत. शिवाय टच्यूबट्रेन्स, (सबवेज) किंवा भुयारी रेल आहे, लंडन शहराच्या भूगर्भातून ह्या रेल्वेचे जाळे आहे. जमीन खोदून सुमारे एक शतकापूर्वी ही रेल्वे बनविण्यात आली आहे. जमिनीखाली बोगदे खणून हे रेल्वेंचे मार्ग तयार करण्यात आले आहेत. ह्या रेल्वे मार्गासाठी जमिनी-खालींच स्टेशन्स आहेत. गंमत अशी की एका बोगद्याखाली दुसरा बोगदा व जमिनीखाली एका स्टेशनखाली दुसरे स्टेशन अशी आश्चर्यकारक व्यवस्था आहे. बोगद्यामधील स्टेशनवर आपल्याकडील भूभागावरील स्टेशनाप्रमाणे तिकीट विकण्याची ऑफिसेस, इतर रेल्वेच्या कामासाठी लागणारी ऑफिसेस, तसेंच संडास, स्नानगृहे वगैरे आहेत. ह्या रेल्वेचा उपयोग कसा करावा, याची माहिती देणारे नकाशे व पुस्तिका येथे विकत मिळतात. ते नकाशे व पुस्तिका

मी खरीदल्या. त्यातील माहितीवरून व रस्त्याने भेटणाऱ्या माणसांकडून मी जी आणखी माहिती मिळवी, त्यावरून ह्या स्टेशनमध्ये कसे जावे, तेथे तिकीट कोठे घ्यावे, इष्ट स्थळी कोणत्या दिशेने जावे, कोणत्या स्टेनशवर उतरावे, हे सर्व मला एक दोन दिवसांत चांगल्यारीतीने माहीत झाले होते. तू म्हणशील की, भूगर्भातील स्टेशनवर कसे जावे हे जाणण्याची काय आवश्यकता ? पण तेच मी तुला सांगणार आहे. भूगर्भातील ह्या स्टेशनमध्ये जाण्यासाठी विजेने चालणारे जिने आहेत. त्यांना इंग्रजीत ( Escalators ) स्कॅलेटर्स म्हणतात. त्या जिन्यावर उभे कसे राहावे व ते जिने जेथे संपतात, तेथून पुढे कसे जावे, याचीही माहिती घेतली पाहिजे. नाही तर पाय घसरून पडून फजित होण्याची पाळी यावयाची. ह्या जिन्यावर उभे राहून तुम्हांला हव्या असलेल्या भूगर्भातील पहिल्या मजल्यावरील स्टेशनवर, अगर त्याच्या खालच्या दुसऱ्या मजल्यावरील स्टेशनवर जाता येते. जिना संपला की हळूच पाय उचलून जमिनीवर ठेवावा लागतो. त्याचप्रमाणे भूगर्भातील स्टेशनवर उतरल्यावर वर चढून जमिनीवर येण्यासाठी त्या जिन्यांचा उपयोग करावा लागतो व त्या जिन्याने माणसास वर जमिनीवर येता येते. बाकी, जिने चढण्याची व उतरण्याची मेहनत यात नाही. जिन्यांच्या पायऱ्यांवर प्रवाशी स्वस्थ उभे असतात व ते जिने विजेने वरती व खाली गोल गोल फिरतात व प्रवासी एकाच पायरीवर उभा राहून त्याला पाहिजे असेल त्या स्थळी तो स्वत: काहीही हालचाल न करता वर किंवा खाली जाऊ शकतो. ह्या स्टेशनवर तिकिटे विकण्यासाठी काउन्टर्स आहेत, पण ह्याशिवाय तिकिटे विकणारी यंत्रेही आहेत. तू मुंबईत स्टेशनवर व थिएटर्समध्ये वजन करणारी यंत्रे पाहिलीच आहेत. त्या यंत्रावर उभे राहून व एक आणेली त्या यंत्रात टाकल्यावर वजन दाखविणारे तिकिट बाहेर येते, हे तू पाहिलेच आहे. तशाच थोड्या फार प्रकाराची ही यंत्रे आहेत. ह्या यंत्रावर तुम्ही ज्या स्टेशनवर उभे आहात तेथून निरनिराळ्या स्टेशनकडे जाण्यासाठी लागणारी भाडी किती आहेत, यांचे आकडे दिले आहेत. तुम्हांला ज्या दुसऱ्या कुठल्या स्टेशनकडे जावयाचे त्याला भाडे किती हे त्या यंत्रावरील आकड्यावरून पहावे व तेवढ्या किंमतीचे नाणे यंत्रात टाकावे की यंत्रामधून तुम्हांला हवे असलेले तिकीट मिळते. या

यंत्रांमुळे क्यूमध्ये उभे राहून तिकिट मिळविण्याचा त्रास वाचविता येतो व वेळेचीही बचत होते. आपल्याकडील मोठमोठ्या स्टेशन्सवरती जर ह्या यंत्रांचा उपयोग करता आला तर लोकांचा किती तरी त्रास वाचेल व वेळही वाचेल ! ह्या यंत्रांची सुरुवात आपल्या देशात होईल तो मी सुदिन समजेन.

लंडन शहरात अतिशय मोठाले पार्कस्–उपवने व गार्डन्स-बागा आहेत. माझ्या दृष्टीने ही उपवने व बागा हे लंडन शहराचे एक वैशिष्टच आहे. ह्या उपवनांपैकी व बागांपैकी मी तीन चार उपवने व बागा पाहिल्या.

प्रथम मी हाईड पार्क पाहिला. हा लंडनमधील सर्वांत मोठा पार्क आहे. याचे क्षेत्र ३६१ एकरांचे आहे. ह्या पार्कच्या दक्षिण बाजूस सुमारे दीड मैलाचा रस्ता आहे. घोड्यावर बसून सहल करण्यासाठी हा रस्ता तयार करण्यात आला आहे व म्हणून ह्या रस्त्यावर भुसभुशीत माती टाकण्यात आली आहे. ह्या पार्कच्या ईशान्य दिशेला ' मार्वल आर्च '–संगमरवरी कमान–हा ऐतिहासिक ( पुराणवस्तू ) मान्युमेंट आहे. तो अति भव्य व कलापूर्ण आहे. ह्या मान्युमेंटच्या पाठीमागे " Orators' corner " हे प्रसिद्ध स्थळ आहे. ओरेटर्स कॉर्नर म्हणजे ' वक्त्यांचा कोपरा. ' ह्या जागेत कोणीही यावे व भाषण अगर व्याख्यान ठोकावे. बागेत येणाऱ्याजाणाऱ्यांपैकी ज्यांना त्या भाषणात रस आहे, ते त्या वक्त्यांचे श्रोते बनतात. येथे वक्ता पाहिजे त्या विषयावर पाहिजे तितका वेळ व्याख्यान देऊ शकतो. बोलताना तो निर्धास्तपणे व मोकळेपणाने कोणावरही टीका करू शकतो–मग तो इंग्लंडचा मुख्य मंत्री असो अगर पार्लमेंटसारखी संस्था असो. जसे मी मागे सांगितले की नाटकात, बॅलेत अगर रेव्ह्यू इत्यादि मनोरंजनाच्या कार्यक्रमात पाहिजे ती टीका होऊ शकते, तशीच टीका ह्या ओरेटर्स कॉर्नरमध्ये केली जाते. ह्या दुसऱ्या एका गोष्टीवरून इंग्लंडमधील लोकशाहीतील स्वतंत्र वातावरणाचे प्रत्यंतर आपणांस येते. ओरेटर्स कॉर्नर ही एक नाविन्यपूर्ण संस्था आहे. काही वक्ते एखादे उंच स्टूल अगर उभे राहण्यासाठी एखादे टेबल स्वत: घेऊन येतात. त्यांचा ते प्लॅटफॉर्म–व्यासपीठ–बनवितात व त्यावर उभे राहून व्याख्यान देतात. श्रोत्यांमध्ये मी इंग्रज लोकांशिवाय निग्रोज, हिंदी इत्यादि परदेशचे लोकही पाहिले; एवढेच नव्हे तर इंग्रजांशिवाय इतर लोक वक्ते म्हणून भाषण करतानाही मी पाहिले. भाषा

मात्र एकच होती व ती म्हणजे इंग्रजी. दुसरे असे की वक्त्याला हेकल करणे म्हणजे त्याला प्रश्न विचारून अडविणे हे ह्या व्याख्यानाच्या कार्यक्रमातील विशेष आकर्षण मला दिसून आले. मी लंडनमध्ये गेलो, त्यावेळी घरांची टंचाई होती, त्यामुळे एक वक्ता 'कान्झर्व्हेटिव्ह मंत्रिमंडळा' वर तोंडसुख घेताना मी ऐकिले; दुसरा वक्ता अमेरिकन फौजा लंडनमध्ये ठेवण्यात आल्या म्हणून सरकारास दोष देत होता, एक ना दोन अनेक विषय ! निःशस्त्रीकरण, लोकशाही, कॉम्युनिझम, जगातील शांतता, वसाहती, महागाई आदि विषय अनेक वक्त्यांकडून हाताळले जातात. माझ्या लंडनमधील वास्तव्यात मी अनेकवेळा येथे आलो व त्या व्याख्यानांची व वक्त्यांना प्रश्न विचारून त्यांना भंडाविणाऱ्या श्रोत्यांची गंमत मी पाहिली आहे.

दुसरी एक बाग मी पाहिली. ती म्हणजे केन्‌सिंगटन गार्डन्स. याचे क्षेत्र २६० एकरांचे आहे. ह्या बागेत एक गोल आकाराचे तळे आहे. मी गेलो तेव्हा ह्या तळ्याभोवती अनेक लहान मुले व मुली जमली होती, त्यांच्याबरोबर वडीलधारी मंडळीही होती. यंत्राने चालणाऱ्या सुंदरशा लहान बोटी ही मुले त्या सरोवराच्या पाण्यात सोडीत व त्या बोटी तळ्याच्या एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्याकडे धावत जात. त्या मुलांना फारच मौज वाटे. मला जर ते दृश्य पाहून गंमत वाटली, तर त्या मुलांना का वाटणार नाही ? ह्या बागेतच 'केन्सिगटन राजवाडा' आहे. तो मी पाहिला. हा रेन नावाच्या शिल्पकाराने बांधला आहे. रेन हा इंग्लंडमध्ये एक मोठा इंजिनियर होऊन गेला. त्याने अनेक प्रसिद्ध राजवाडे व मान्युमेंटस् बांधले. हा केन्सिगटन राजवाडा रेनने इंग्लंडचा राजा तिसरा विल्यम याच्यासाठी बांधला. व्हिक्टोरिया राणी हिचा जन्म ह्याच राजवाड्यात झाला. तसेच राणी मेरी हिचाही जन्म येथे झाला. ह्या राजवाड्याच्या निरनिराळ्या दालनांत बऱ्याच पुरातन वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. त्यात राण्यांचे जुने गाउन्स, ( झगे ) जुने फर्निचर, क्रोकरी, सुंदर चित्रे वगैरे वस्तू आहेत. केन्सिंग्टन बागेत आल्बर्ट मेमोरियल आहे, तेही मी पाहिले. आल्बर्टचा पुतळा मोठा भव्य आहे. त्या पुतळ्याच्या आजूबाजूला दगडावरील नक्षीकाम पाहण्यासारखे आहे.

मी पाहिलेल्या तिसऱ्या बागेचे नाव आहे ग्रीन विच पार्क. याचे क्षेत्र १८५ एकरांचे आहे. चौथा एक बाग मी पाहिला याचे नाव सेंट जेम्सेस पार्क हे आहे.

ह्या बागांमध्ये लांबच लांब रस्ते आहेत, रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना झाडी आहे. काही ठिकाणी तर झाडी खूप मोठी, उंच व दाट आहे. त्यामुळे रस्त्यावर कमानी उभारल्या आहेत, असे वाटते. ह्या झाडांची पाने फक्त हिरव्याच रंगांची नाहीत, काही झाडांची पानें तपकिरी रंगांची, तर कांहींची गर्द तांबूस रंगाची, तर काहींची फिकट गुलाबी रंगाची, अशा निरनिराळ्या रंगांची पाने आहेत, त्यामुळे ही पाने नसून फुलेच आहेत, असा भास होतो, इतकी ती सुंदर आहेत, नाजूक आहेत. मला ती पाने व ती झाडी फार आवडली. ह्या बागेत ठिकठिकाणी गुंफा आहेत व त्यांत निरनिराळ्या प्रकारांची फुल-झाडी आहेत. ह्या फुलांचे रंगही विविध आहेत. ह्या बागा किती तरी स्वच्छ आहेत म्हणून सांगू ? अनेक लोक येथे येतात, पण कोणीही येथे कचरा टाकीत नाही की घाण करीत नाही. तासन् तास मी ह्या बागांतून फिरलो आहे; ना थकवा ना कंटाळा ! उलट येथे फिरल्यामुळे मला ताजेतवाने वाटे व जास्त उत्साह माझ्यात निर्माण होई.

एकदा बसमधून प्रवास करीत होतो. मला एका विविक्षित स्टॉपवर उतरावयाचे होते, पण चुकीने मी त्या स्टॉपवर उतरावयास विसरलो, व बस चालू व्हावयास लागली, व मी घाईने बसमधून उतरू लागलो. इतक्यात त्या बसमधील स्त्री-कंडक्टर माझ्याकडे धावत आली व हळूच माझा हात धरून मला उतरण्यास मनाई करीत म्हणाली, " तुम्ही असे उतरू नका, त्यात धोका आहे. तुम्ही आता दुसऱ्या स्टॉपवर उतरा. " तिची ही प्रेमळ वागणूक व बोलणे ऐकून मी तिचे आभार मानले व पुढच्या स्टॉपवर उतरलो. एकच कंडक्टर व पुष्कळ वेळा स्त्रीकंडक्टर बसमधील दोन्ही डेकस् म्हणजे खालचा व वरचा डेक सांभाळते. हे तिला शक्य होते, कारण कोणीही प्रवासी तिकिटाशिवाय प्रवास करणार नाही व तिकिट घेतल्याशिवाय बसखाली उतरणार नाही, ही तिची खात्री असते. नागरिक प्रामाणिक असले म्हणजे राष्ट्राचा किती फायदा होतो, हे यावरून ध्यानात येते. कारण एका बससाठी समाजाला दोन ऐवजी एकाच कंडक्टरच्या पगाराचा भार सोसावा लागतो. नागरिकांचा प्रामाणिकपणा तर

आहेच, पण त्याशिवाय येथील कंडक्टर्स—मग स्त्री असो अगर पुरुष—फारच कार्यक्षम आहेत. वरच्या डेकवरून खालच्या डेकवर भरभर खाली येणे व तसेच खालच्या डेकवरून वरच्या डेकवर जाणे असे सारखे कंडक्टरचे चाललेले असते. ती त्यांची—विशेषत: स्त्री कंडक्टरची चपलता पाहून मला आश्चर्य वाटत असे. आपल्याकडे मुंबईस एका बसमध्ये दोन कंडक्टर्स दोन डेकस्‌करिता असतात. हे तुला माहीत आहे. ह्यावरून आपल्याकडच्या लोकांनी जो काय बोध घ्याव-याचा तो घ्यावा !

मी पाहिलेल्या बागा व उपवने ह्याशिवाय लंडन शहरात 'रीजंटस् पार्क,' 'फेस्टिव्हल प्लेझर गार्डन्स,' 'झूलॉजिकल गार्डन्स' वगैरे इतरही बागा आहेत. ह्यावरून इंग्रज लोकांना बागांचे, उपवनांचे व फुले व झाडी यांचे किती वेड आहे, हे दिसून येते. मोठाल्या बागांशिवाय रस्त्यांच्या अनेक चौकांतून आयलंड्स आहेत व ह्या आयलंड्सवर लहान लहान बगीचे आहेत. ह्या बगीच्यात विविध प्रकारांची फुलझाडी लावलेली आहेत. त्या फुलझाडांवर उमललेली टपोरी व ताजीतवानी फुले पाहून माझे मन मोहून जाई व ती फुले पाहत पाहत रस्त्याने फिरण्यास मला फार मौज वाटे. ह्या आयलंड्सशिवाय येथील अनेक इमारतींच्या भिंतींना क्रेव्हिसेस (Crevices) म्हणजे फुलझाडी व शोभेची इतर झाडी—क्रोटीन्स वगैरे—लावण्यासाठी जागा तयार करण्यात आलेल्या आहेत. तेथेही फुलांची गर्दी झालेली दिसून येते. लंडन शहरात ठिकठिकाणी फुलांची दुकाने आहेत. त्या दुकानांत फुलांची मांडणी अतिशय आकर्षक रीतीने करण्यात येते व ती बहुधा काचेच्या शोकेसेसमध्ये केलेली असते. ही फुलांची केलेली रचना सारखी पहात राहावी, असे मला वाटते.

फुलांच्या सौंदर्याची लज्जत जी मी येथे चाखली, तिचा थोडा तरी आस्वाद तुला देऊन मी हे पत्र संपवितो.

तुझा

**नाना**

● ● ●

: ९ :

# " टॉवर ऑफ लंडन "

ग्रोव्हनर हॉटेल,
व्हिक्टोरिया, एस्. डब्ल्यू
लंडन १

ता. ३०-४-१९५५

प्रिय उषास सप्रेम आशीर्वाद—

चि. मंगलास मी मागचे पत्र पाठविले. त्यात मी जे बॅले, नाटक वगैरे पाहिले त्यांचे व बागांचे वर्णन केले. आज ह्या पत्रात लंडन शहरात मी जी धार्मिक स्थळे, ऐतिहासिक मान्युमेंटस् व इतर इमारती पाहिल्या, त्यासंबंधी थोडक्यात वर्णन करणार आहे.

सेंट पॉल्स कॅथड्रल हे एक मोठे चर्च मी पाहिले. हे ख्रिश्चन लोकांचे जगातील दुसऱ्या नंबरचे मोठे चर्च आहे. ह्याच्या पेक्षाही एक मोठे चर्च आहे, त्याचे नाव सेंट पीटर्स चर्च आहे व ते रोम शहरात आहे. सन १६६६ मध्ये लंडन शहर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले, त्यानंतर सर ख्रिस्टॉपर रेन यांनी सेंट पॉल्स कॅथेड्रल बांधले. गेल्या महायुद्धात बाँब वर्षावामध्ये आजूबाजूच्या बऱ्याच इमारती जमीनदोस्त झाल्या व काही इमारतींची पडझड झाली, ती अद्यापही दिसत आहे. ह्या कॅथेड्रलचे मात्र फारच थोडे नुकसान झाले. ह्या कॅथेड्रलचा वरचा घुमट खूपच भव्य व मोठा आहे. ह्या कॅथेड्रलच्या इमारतीत मोठाली दालने आहेत. ठिकठिकाणी प्रार्थना करण्याची स्थाने आहेत. ह्या कॅथेड्रलच्या क्रिप्टमध्ये—भुयारामध्ये नेल्सन, वेलिंग्टन, रेन व इतर इंग्रज इतिहासातील प्रसिद्ध व्यक्तींच्या कबरी आहेत. तसेच नेल्सन युद्धात पडल्यानंतर ज्या आर्मर्ड कार—(गाडी)—मधून त्याला लंडनमध्ये आणले ती गाडी व इतर थोर पुरुषांशी संलग्न असलेल्या बऱ्याच वस्तू येथे ठेवण्यात आलेल्या आहेत. कॅथेड्रलमधील

निरनिराळ्या दालनांत प्रसिद्ध कवी, ग्रंथकार, स्थापत्यज्ञ, लढवय्ये, शूर वीर, राजकारण धुरंदर इत्यादींचे पुतळे अगर फोटो आहेत. येथे उंच असा जिना आहे. ह्या जिन्याने वरच्या घुमटाच्या मजल्यावर गेल्यानंतर ह्या मजल्याच्या ज्या भिंती आहेत, त्यात व्हिस्परिंग गॅलरीज आहेत. ह्या भिंतीला तोंड लावून एका ठिकाणी बोलले तर ते बोल दुसऱ्या ठिकाणी ऐकू येतात, ह्या व्हिस्परिंग गॅलरीज पाहून मला विजापूरच्या गोलघुमटाची आठवण झाली. कारण तेथेही हा चमत्कार पाहावयास मिळतो. ह्या गॅलरीच्या बाहेर गेल्यावर येथील गच्चीवरून लंडन शहराचा भव्य व सुंदर देखावा दिसतो.

लंडन शहर हे टेम्स नदीच्या तीरावर वसलेले आहे, हे तुला माहीत आहे. ह्या नदीवर टॉवर ब्रिज नावाचा मोठा पूल आहे. ह्या पुलावरून हजारो मोटारी व इतर वाहने व पादचारी सारखी जणू वाहत असतात; पण ह्या पुलाचे खरे वैशिष्टय हे आहे की याचे दोन भाग मध्ये जोडलेले आहेत. नदीवरून बोटी-जेव्हा येथून जातात, तेव्हा हे पुलाचे दोन्ही भाग वर यंत्राच्या साहाय्याने उचलले जातात व मग पुलाचा संपूर्ण भाग खुला होऊन मोठ्या बोटी तेथून इकडून तिकडे व तिकडून इकडे जाऊ शकतात. बोटी येथून जावयाची वेळ झाली की घंटा वाजते व मग पुलाचे दोन्ही भाग वर उचलले जातात व नंतर बोटी येथून निर्धास्तपणे जातात. बोटी गेल्यावर पुन्हा घंटा वाजविली जाते व पुलाचे दोन्ही भाग यंत्राने पुन्हा खाली उतरले जातात व जोडले जातात. हे सर्व होण्यास सुमारे तीन मिनिटे लागतात. पुलाचे दोन्ही भाग जोडले गेल्या-वर पुलावरील वाहनांचा व पादचाऱ्यांचा प्रवास पुन्हा पूर्ववत चालू होतो. आहे की नाही नवलाची गोष्ट !

पुलाचे दोन्ही भाग वरखाली जाण्याच्या व तेथून जहाजे जाण्याच्या वेळा ठरलेल्या आहेत. मी गेलो त्यावेळी तिसऱ्या प्रहरचे सुमारे चार वाजले होते व तास दीड तासानंतर पुलाचे दोन्ही भाग विभक्त होऊन तेथून जहाजे जाणार होती, मला ती गंमत पाहावयाची होती, म्हणून मला तेथे थांबणे भाग होते. त्या वेळात काय करावे, अशा विचारात मी होतो. इतक्यात पुलाच्या एका टोकाला छोटेसे पॉवर हाऊस होते, तेथे श्री. लिने (Lyne) नावाचे एक गृहस्थ भेटले; इलेक्ट्रिक फीटर म्हणून ते तेथे काम करीत असतात. त्यांच्या-

बरोबर गप्पागोष्टी करण्यात मी तो तास दीड तास घालविला. त्यांनी दिलेल्या माहितीवरून इंग्लंडमधील मध्यम वर्गाच्या व मजूर वर्गाच्या जीवनाची थोडी कल्पना मला आली. श्री. लिने यांनी सांगितले की, " आमचे–म्हणजे इंग्लिश लोकांचे–कौटुंबिक जीवन सुखाचे असते. काडीमोड थोडेच होतात. इंग्लिश स्त्रिया आपला संसार काटकसरीने करतात. घरात लागणाऱ्या वस्तूंची खरेदी बहुधा स्त्रियाच करतात. एक दोन पेन्स वाचविण्यासाठी आमच्या स्त्रिया अनेक दुकाने धुंडतात व भावाची चौकशी करतात व मैल मैल चालतात. घराची व्यवस्था त्या चांगली ठेवतात. मुलांचे संगोपन उत्तमरीतीने करतात. ह्याशिवाय बऱ्याच स्त्रिया नोकऱ्या करतात व आपल्या नवऱ्यांच्या उत्पन्नात भर घालतात, त्या आपल्या नवऱ्यांशी एकनिष्ठ राहतात व त्या शीलाने चांगल्या असतात. ज्या स्त्रियांचे पाऊल वाकडे पडते, त्यांना समाजात मान राहत नाही व आजूबाजूला राहणाऱ्या लोकांकडून त्यांची निर्भत्सना होते. सुट्टीच्या दिवशी व फुरसतीच्या वेळी स्त्रिया आपल्या घरांची साफसफाई करतात आणि घराच्या भोवती कंपाऊंड ( आवार ) असल्यास तेथे लहानग्या बगीचामधील फुलझाडांची व इतर झाडांची निगा राखतात.

आमचा ( पुरुषांचा ) आमच्या स्त्रियांवर पूर्ण विश्वास असतो म्हणून आम्ही आमच्या स्त्रियांवर कृत्रिम बंधने घालीत नाही. त्यांना स्वातंत्र्य देतो. आम्ही इंग्लिश लोक नैतिक मूल्यांची उगीच फालतू चर्चा करीत नाही. ह्याचा अर्थ आम्ही ती पाळीत नाही, असा होत नाही. आम्ही ती मूल्ये गाजावाजा न करता पाळतो. " श्री. लिने यांनी पुढे सांगितले की, " माझा पगार आठवड्यास दहा पौंड आहे. " येथे ( इंग्लंडमध्ये ) मजुरांचा पगार बहुधा आठवड्यावर ठरविला जातो, रोजावर किंवा महिन्यावर ठरविला जात नाही. मजुरास साधारणत: आठवड्यास ५ ते ६ पौंड ( म्हणजे सुमारे रु. ६५ ते ७८ रुपये ) पगार मिळतो व स्किल्ड लेबरला म्हणजे कारागिराला सुमारे ८ ते १० पौंड पगार मिळतो. स्त्रियांच्या व पुरुषांच्या पगारात फारसा फरक नसतो. स्त्रिया ह्या वेगवेगळ्या व्यवसायांत कामे करतात. रेल्वेमध्ये तिकीट कलेक्टर्स, तिकिटे विकणाऱ्या व मार्गदर्शक म्हणून काम करणाऱ्या मी बऱ्याच स्त्रिया पाहिल्या. हॉटेल्स, रेस्टारॉंज आणि इतर दुकाने ह्यांमध्ये वेट्रेसेस, कारकून, विक्रेत्या आणि व्यवस्थापक ( Manager ) म्हणूनही स्त्रिया काम करतात. सरकारी व

खाजगी कचेऱ्यांतही स्त्रिया कारकून, टायपिस्ट, स्टेनोग्राफर्स, खाजगी चिटणीस ( Private Secretaries ) सुपरिंटेंन्डटस वगैरे जागांवर कामे करतात. सिनेमा व थिएटर्समध्ये डोअर कीपर्स ( दरवाजा रक्षक, द्वार-पाल ) व गाईड ( प्रेक्षकांच्या जागा ( Seats ) दाखविणे ) म्हणूनही स्त्रिया कामे करतात. नाटके, नृत्ये ( Ballat ) व इतर करमणुकीच्या कार्यक्रमांमध्येही स्त्रिया प्रामुख्याने कामे करतात. काही हॉटेल्स, रेस्टारॉंज व दुकाने तर केवळ स्त्रियाच चालवितात. फॅक्टरीजमध्ये—कारखान्यांमध्ये—स्त्रिया काम करतात. शिक्षिका, प्रोफेसर्स ( प्राध्यापक ), डॉक्टर्स, वकील म्हणूनही स्त्रिया काम करतात. राजकारणातही स्त्रिया हिरीरीने भाग घेतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत असतात. आपले घर म्हणजेच जग व चूल आणि मूल म्हणजेच इतिकर्तव्यता त्या मानीत नाहीत. त्या पुरुषाइतक्याच सुशिक्षित, स्वतंत्र, सुसंस्कृत व कार्यक्षम आहेत. त्यामुळेच इंग्लिश लोकांचे जीवन मुख्यत्वे सुखी, सुसंस्कृत व समृद्ध झाले आहे, असे येथील सामाजिक परिस्थिती पाहिल्यानंतर माझे मत झाले आहे.

लंडनमधील सर्वांत महत्त्वाची ऐतिहासिक इमारत म्हणजे टॉवर ऑफ लंडन. येथे एक इमारत नसून अनेक इमारती आहेत. ह्या इमारतीचे शिल्प-प्रकारही अनेक प्रकारचे आहेत. ह्या पौराणिक इमारतीस जरी टॉवर ऑफ लंडन संबोधण्यात येते तरी येथे एक टॉवर ( तट व बुरूज असलेली इमारत म्हणजे टॉवर ) नाही तर अनेक टॉवर्स आहेत. लायन टॉवर, मिड्ल् टॉवर, बेल टॉवर, वायवर्ड ( Bywerd ) टॉवर, मार्टिन टॉवर, सॉल्ट टॉवर वेकफील्ड टॉवर, इत्यादि त्या टॉवर्सची नावे आहेत. मध्यभागी जो मुख्य टॉवर आहे, त्याचे नाव आहे व्हाईट टॉवर—ही व्हाईट टॉवरची इमारत सर्वांत जुनी व महत्त्वाची आहे. ह्या व्हाईट टॉवरभोवती एक आतल्या तटाची भिंत आहे व त्याच्यानंतर दुसरा एक तट आहे. ह्या बाहेरच्या तटा-भोवती खंदक आहे, पण आता तो शुष्क आहे. ह्या लंडन टॉवरचा उपयोग किल्ला, राजवाडा, तुरुंग व लष्करी पागा ह्यांच्यासाठी वेळोवेळी करण्यात आला आहे. व्हाईट टॉवर हा बालेकिल्ल्यासारखा ह्या टॉवर्समध्ये आहे.

ह्या व्हाईट टॉवर मजबूत व भव्य आहे, तो साधारणत: चौकोनी आहे. त्याच्या चार कोपऱ्यांवर चार बुरूज आहेत. ब्लडी टॉवर ( रक्तांकीत टॉवर ) ट्रेटर्स गेट–राजद्रोहींचा दरवाजा–अशी जी नावे येथे आढळतात याचे कारण ह्या टॉवर्समध्ये अनेक राजबंदी बंदिस्त केले जात होते. एवढेच नव्हे अनेक राज-कैद्यांना येथे फाशी देण्यात आले, व कित्येकांना हालहाल करून मारिले. ह्या सर्व क्रूर कृत्यांच्या निशाण्या ह्या टॉवर्समध्ये आजही पाहावयास मिळतात. गंमत अशी की इंग्रज ह्या सर्व निशाण्या व खुणा एखादा खजिना समजून जपून ठेवीत आहेत. ह्यात अर्थात त्यांची ऐतिहासिक दृष्टी दिसून येते. ज्या ऐतिहासिक घटना–मग त्या वाईट असोत अगर चांगल्या असोत–घडल्या तशाच त्या ताज्या व जिवंत राहाव्यात म्हणून खास प्रयत्न इंग्रज लोक करतात. याचा प्रत्यय येथेच नव्हे तर वेस्ट मिन्स्टर हॉल, वेस्ट मिन्स्टर ॲबे, सेंट पॉल्स कॅथेड्रल इत्यादि पौराणिक इमारतीतही येतो.

ट्रेटर्स गेट–राजद्रोह्यांचा दरवाजा–मधून ड्यूक ऑफ बकिंगहॅम, सर थॉमस मूर (More), राणी ॲनी बोलेयन (Anne Boleyn) क्रॉमवेल, अर्ल ऑफ एसेक्स, राणी कॅथरीन हॉवर्ड, ( Katharine Howard ) ड्यूक ऑफ सोमरसेट (Somerset), लेडी जेन ग्रे ( Jane Gray ), प्रिन्सेस एलिझाबेथ–जी पुढे एलिझाबेथ पहिली म्हणून इंग्लंडची प्रसिद्ध राणी झाली– इत्यादि अनेक राण्या, सरदार, लॉर्ड्स यांना या लंडन टॉवरमध्ये राजबंदी म्हणून आणण्यात आले, व म्हणून या दरवाजाला ‘ राजद्रोह्यांचा दरवाजा असे नाव पडले. ह्या दरवाजातून जे राजबंदी आणण्यात आले, त्यांपैकी काहींना ह्या टॉवरमध्ये फाशी देण्यात आले व काहींना कित्येक वर्षे बंदीवासात रखडत राहावे लागले. लॉर्ड हेस्टिंग्ज, राणी कॅथरीन, राजा हेन्री आठवा याची पाचवी बायको, लेडी जेन ग्रे, अर्ल ऑफ एसेक्स वगैरेंची डोकी कुऱ्हाडीने उडविण्यात आली. राणी ॲनी बोलेयन (Boleyn) हिच्यावर मेहरबानी म्हणून तिचे डोके तलवारीने उडविले गेले, ॲनीला फाशी देण्यासाठी सेंट ओमर–( St. Omer ) हून खास मांग किंवा फाशी देणारा आणण्यात आला होता. सर वाल्टर रॅले (Walter Raleigh) व हाऊस ऑफ कॉमन्सची इमारत नष्ट करणारे गन पावडर-फेम गाय फॉक्स (Gay Fawkes) आणि त्याचे

साथीदार यांना येथेच बंदीत ठेवले होते. फाशी देण्यासाठी ब्लडी टॉवरमध्ये एक पूर्वीचे मेकॅनिझम–यंत्र–आहे. ( Portcullis Mechanism ) ह्या यंत्रात मोठाल्या तुळया आहेत, त्यांना जाड दोरखंड गुंडाळलेली आहेत व ती दोरखंडे ( पुली ) करण्यावर चढविलेली आहेत. जाड लाकडांच्या फळ्यांचा एक जाळीदार ओंडका बनविलेला आहे व त्या चाक्या किंवा कप्या त्या ओंडक्याला बांधलेल्या आहेत. फाशी देण्यासाठी ह्या यंत्राचा उपयोग करण्यात येई. हे यंत्र भीषण व भयानक वाटते. ह्या सर्व इमारती व इतर वस्तू दाखविण्याचे काम ह्या टॉवरमध्ये खास वार्डर्स करतात.त्यांचा पोशाखही विविक्षत पद्धतीचा व विक्षित रंगाचा आहे. हा पोशाख जेव्हा ही वार्डर्सची संस्था प्रथम स्थापन झाली, तेव्हा त्यांना देण्यात आला. तो आजही कायम आहे. जग कितीही बदलले तरी काही गोष्टी इंग्रज कशा कायम ठेवतात, याचे हे एक ढळढळीत उदाहरण आहे. हे वार्डर्स किंवा गार्डस एक लोकरीचा डगला घालतात, तो गळ्यापासून गुडघ्यापर्यंत असतो. त्याचा रंग तांबडा आहे. मोजे गुडघ्यापर्यंत घालतात, तेही तांबड्या रंगाचे असतात, बूट काळ्या रंगाचे घालतात व ते जी गोल टोपी घालतात, तीही काळ्या रंगाची असते. हातात विविक्षित रीतीने बनविलेला दंडा असतो. हे गार्डस ह्या पोशाखात मोठे मजेदार व और दिसतात. येथे जे प्रेक्षक येतात, त्यांच्या निरनिराळ्या टोळ्या बनवितात व प्रत्येक टोळीबरोबर एक गार्ड फिरतो व त्या टोळीतील लोकांना टॉवरची हकिकत सांगतो. मी ज्या टोळीत होतो, त्यासाठी जो गार्ड देण्यात आला, तो फार हुशार, चलाख व माहितगार होता. वर मी जी माहिती दिली व पुढे जी देणार आहे, ती ह्या गार्डनेच मला दिली. तो मोठा विनोदीही होता. हेन्री आठवा, हा कशा बायका बदलावयाचा, आपल्या बायकांवर इतराजी झाली म्हणजे तो काही तरी निमित्त काढून फारकती कशा घ्यावयाचा, याचा गंमतीदार इतिहास हा गार्ड आम्हांला सांगत होता. 'चॅपल ऑफ सेंट जॉन' म्हणून जे प्रार्थना मंदीर किंवा देऊळ–चर्च– आहे, ते तो गार्ड आम्हांला दाखवीत होता व इंग्रजी इतिहासात प्रसिद्ध असलेल्या ज्या व्यक्तींना ह्या टॉवरमध्ये ठेवले होते, त्या ह्या मंदीरात येऊन प्रार्थना करीत व देवाची करुणा भाकीत याची हकिकत तो गार्ड सांगत होता. तो ही हकिकत सांगत असता गंभीर झाला होता. तो विनोदी

होता, पण गंभीर गोष्टी गंभीर भाषेत कशा सांगाव्या, हेही तो जाणत होता, त्याच्यामध्ये वक्तृत्वही होते. तो म्हणाला, " ह्या टॉवरमध्ये जे राजकारणी पुरुष अगर स्त्रिया फासावर गेले व ज्यांना अनेक हालअपेष्टा तुरुंगात सोसाव्या लागल्या, त्यांच्या त्यागामुळे, धैर्यामुळे व कणखर वृत्तीमुळेच आमची लोकशाही उदयास आली व पुढे ती फोफावली, वहरली. आज आमचा लोकशाही कार-भार जगाला एक आदर्श झाला आहे, याचे कारण लंडन टॉवरमध्ये अनेक राजांनी, राण्यांनी व इतर थोर पुरुषांनी बलिदान केले हेच आहे. " तोच गार्ड नंतर पुढे अशाच गोष्टी निघाल्या असता माझ्याकडे पाहून म्हणाला, " कोहीनूर हिरा तुम्हांला येथे ( लंडन टॉवरमध्ये ) पाहावयास मिळेल. तो आम्ही हिंदु-स्थानातून आणला, हिंदुस्थान स्वतंत्र झाला, पण त्या देशाने तो हिरा आमच्या-पासून घेतला नाही, याचे कारण हिंदुस्थानचे पुढारी महात्मा गांधी होते व त्यांनी हिंदुस्थानच्या लोकांना योग्य ती शिकवण दिली, त्यामुळे कोहीनूर हिरा परत करण्याची पाळी आमच्यावर आली नाही. " मी हिंदी माणूस आहे, हे त्याने ओळखले होते व म्हणून माझ्याकडे पाहून तो हे सर्व सांगत होता.

लंडन टॉवरच्या निरनिराळ्या खोल्यांमधून जे राजबंदी ठेविले होते, त्यांच्यापैकी कित्येकांनी भिंतींवर, खिडक्यांवर व इतर ठिकाणी आपली नावे कोरली आहेत, तर काहीनी बोधवाक्ये लिहिली आहेत, तर कोणी इतर निर-निराळा मजकूर लिहून ठेवला आहे.

व्हाईट टॉवरच्या वेगवेगळ्या खोल्यांमधून युद्धाची नानात-हेची पुरातन आयुधे ठेवण्यात आली आहेत त्यांमध्ये लढाईत पूर्वीच्या काळी वापरण्यात येणारे दंडे, कुन्हाडी, भाले, तलवारी, बंदुका, लोखंडी व तांब्याच्या तोफा आहेत. प्रत्येक तोफेवर पितळेची पट्टी किंवा पत्रा बसविला आहे व त्या पट्टीवर तोफ केव्हा तयार झाली, ती कोणत्या लढाईत वापरली गेली वगैरे इतिहास थोडक्यात दिला आहे. ह्या हत्यारांशिवाय माणसांची चिलखते, घोड्यांची चिलखते, नानात-हेची युद्धात वापरली गेलेली शिरस्त्राणे ( Helmets ) घोड्यांवरची जिन व इतर सरंजाम ह्या खोल्यांतून पहावयास मिळते. एका ठिकाणी तर पायापासून डोक्यापर्यंत चिलखते घालून एक माणसाचा पुतळा उभा केलेला आहे. एका शिरस्त्राणास ( Helmets ) मेंढ्याची शिंगे लावलेली आहेत. एका ठिकाणी पहिला चार्ल्स राजाचे मुलामा दिलेले चिलखत

आहे, राजा चार्ल्स दुसरा व जेम्स दुसरा यांची चिलखतेही व्हाईट टॉवरमध्ये आहेत. कोणत्या राजांनी कोणती बंदूक अगर तलवार वापरली, कोणते चिलखत घातले वगैरे इतिहासही येथे पहावयास सापडतो.

ह्या लंडन टॉवरचे दुसरे सध्याचे आकर्षण म्हणजे इंग्लंडच्या राजघराण्याचे जडजवाहीर. वेकफील्ड (Wakefield) टॉवर–जो लंडन टॉवरचा एक भाग आहे–मध्ये हे जडजवाहीर ठेविले आहे. वेकफील्ड टॉवरची निरनिराळी सुंदर दालने आहेत. त्या दालनांमध्ये काचेची तावदाने असलेल्या निरनिराळ्या आकाराच्या पेट्यांमधून ( शोकेसेसमधून ) हे जडजवाहीर ठेवले आहे. वेगवेगळ्या राजांच्या राज्यारोहणाच्या वेळी जे राजमुकुट तयार करण्यात आले ते येथे आहेत. त्यात राजांचे तसेच राण्यांचे राजमुकुट आहेत. दुसऱ्या चार्ल्सचा मुकुट आहे. दुसऱ्या जेम्सची राणी मेरी हिचा मुकुट आहे. चार कमानी असलेला राणी व्हिक्टोरियाचा मुकुट आहे, ह्या मुकुटात एक अगदी जुने लाल माणिक आहे व ३००० हिरे आहेत व इतर ३०० मौल्यवान रत्ने आहेत. प्रिन्स ऑफ वेल्सचा एक मुकुट आहे. जॉर्ज पाचवा व त्याची राणी मेरी यांचा फोटो तू पाहिला आहेस. त्या राजाच्या व राणीच्या डोक्यावर जे मुकुट आहेत, त्यावरून येथील राजमुकुटांची थोडीशी कल्पना तुला येईल. त्या फोटोमध्ये राजाच्या हातात एक गोल दिलेला आहे, त्याला इंग्रजीत ओर्ब (Orb) म्हणतात. असे गोलही ह्या ठिकाणी ठेवले आहेत. एक मोठा ओर्ब आहे, तो दुसरा चार्ल्स राजाकरिता बनविण्यात आला होता. राणी मेरी दुसरी व विलिअम तिसरा यांचेही गोल येथे आहेत. वर ज्या फोटोचा निर्देश केला, त्या चित्रात जॉर्ज राजाच्या हातात राजदंडही तू पाहिला आहेस. अशा प्रकारचे अनेक राजदंड येथे आहेत. इंग्लंडच्या राजाच्या–अगर राणीच्या राज्यारोहणप्रसंगी जो राजदंड उपयोगात आणला जातो, तो येथे आहे. ह्या राजदंडात एक मोठा हिरा आहे, तो म्हणे जगातील पैलू पाडून बनविलेल्या हिऱ्यांमध्ये सर्वांत मोठा हिरा आहे व तो जगप्रसिद्ध Cullian कुलिअन हिऱ्यांमधून कापून बनविलेला आहे. राजांचे तसेच राणीचेही राजदंड येथे आहेत. राजाने घालावयाची सोन्याची कडे आहेत. ह्याशिवाय तलवारी-ज्यांच्या मुठी व म्याना हिरे-माणकांनी मढलेल्या आहेत–गदा, (Maces) तुतारी वगैरे वस्तू येथे पाहावयास मिळतात. त्याही मौल्यवान व कलाकुसरीने बनविलेल्या आहेत. ही मेसेस व तुताऱ्या

राज्याभिषेकाच्या वेळी उपयोगात आणली जातात. ह्याशिवाय व्हिक्टोरिया क्रॉस, जॉर्ज क्रॉस व इतर स्टार्स, बॅजेस इत्यादि येथे ठेवली आहेत. ती ऑर्डर्स ऑफ नाईटहुडची चिन्हे आहेत. ही सोने, चांदी, रत्ने, माणिकमोती, हिरे व पाचू यांनी बनविलेली राजचिन्हे व राजाराणींनी वापरावयाचे दागदागिने पाहून मी तर थक्क झालो! दुसऱ्या कोठल्या तरी जगात मी आहे, असे मला काही वेळ वाटले. ह्या जडजवाहीरांतही इंग्लंडचा इतिहास भरलेला आहे. थोडक्यात म्हणजे जडजवाहीर असो, चर्चेस असोत, इमारती असोत, तुरुंग असो, हाऊसेस ऑफ पार्लमेंट असोत, रस्ते असोत, जेथे जावे तेथे इंग्रजांच्या इतिहासाच्या खुणा व इतिहासाचे टप्पे पाहावयास मिळतात व ह्या खुणा व ही चिन्हे इंग्रज लोक मोठ्या काळजीने जपून ठेवतात. जगातील बहुतेक राजे विलयास गेले, राज-घराणी नष्ट झाली, त्यांचे वैभव नामशेष झाले, पण इंग्लंडचे राजघराणे जिवंत आहे, नव्हे ठसठशीत रीतीने वावरत आहे, राजेराण्यांचा डामडौल कायम आहे, त्यांचे वैभव आजही झळकत आहे, राजवाडे, जडजवाहिर इत्यादि ऐश्वर्य ते उपभोगीत आहे व इतके असून इंग्लंडइतका अस्सल लोकशाही पद्धतीचा राज्यकारभार जगात इतरत्र क्वचितच पाहावयास सापडतो. सांग तू, आहे का नाही परस्पर विरोधी गोष्टींचा सुंदर संगम! व हा संगम घडवून आणणारे इंग्रज लोकांचे बुद्धिकौशल्य, समंजसपणा, व्यवहारी दृष्टी, परस्पर विरोधी गोष्टीत मेळ घडवून आणण्याची हातोटी व तत्त्व न सोडता मिळते घेण्याचा चाणाक्षपणा, ह्या गुणांचे कौतुकच करावयास पाहिजे; गंमत अशी की आपल्या राजांचा, त्यांच्या राजघराण्याचा, वैभव व ऐश्वर्य यांचाही उपयोग इंग्रज लोकांनी आपल्या राष्ट्राचे साम्राज्य, वैभव व प्रतिष्ठा वाढविण्यासाठी केला आहे, इतकेच नव्हे तर मला वाटते आपल्या लोकशाहीची आब व दरारा कायम ठेवण्यासाठी देखील इंग्रजांनी राजघराण्याचा उपयोग केला आहे; पण आता जास्त विस्तार नको.

शेवटी लंडन टॉवरसंबंधी एक गोष्ट सांगावयाची की हे टॉवर टेम्स नदी-काठी आहे व नदीच्या बाजूचा ह्या टॉवरचा जो तट आहे, त्यावर मोठमोठ्या तोफा ठेवण्यात आल्या आहेत. हे टॉवर पाहात असता नाना प्रकारच्या भावनांनी व विचारांनी मी भारावून गेलो. तरीपण एक काही तरी भव्य, नाविन्यपूर्ण व

इतिहासाच्या प्रसंगांनी नटलेले असे स्थळ आपण पाहिले, ही भावना ह्या सर्व भावनांत जबरदस्त होती, ती भावना मनात घोळत असताना मी ह्या टॉवरच्या एका दरवाजातून बाहेर पडलो.

तुझा

नाना

• • •

## : १० :

# इंग्लंडच्या रोमन सम्राटाची राजधानी

हॉटेल रूबेन्स
बकिंगहॅम पॅलेस रोड
एस्. डब्ल्यू. लंडन १
ता. ६–५–१९५५.

चि. विठ्ठल यास सप्रेम आशीर्वाद—

येथे घेण्यात आलेल्या पार्लमेंटरी कोर्समध्ये केवळ संसदीय राज्यकारभाराबद्दल व्याख्याने दिली जातात असे नव्हे, तर व्याख्यानाशिवाय इतरही बराच कार्यक्रम असतो. त्यामध्ये निरनिराळ्या संस्थांना व शहरांना भेटी, टी पार्टीज, डिनर पार्टीज ( चहा व जेवणांचे कार्यक्रम ), हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्डस यांच्या बैठकींना हजर राहणे इत्यादि कार्यक्रमही असतात. चहा व भोजन यांच्या कार्यक्रमांचा हेतू केवळ खाण्यापिण्याचा नसतो तर त्यावेळी अनेक क्षेत्रांतील लोकांचा परिचय पाहुण्यांना घडावा हा हेतू प्रमुख असतो. इंग्लिश लोकांच्या सामाजिक व राजकीय जीवनात चहापान व भोजन यांच्या

कार्यक्रमांना फारच महत्त्व आहे. अशाच एका भोजनाच्या कार्यक्रमास मजूर पक्षाचे इंग्लंडचे माजी मुख्यमंत्री मेजर ( आता लॉर्ड ) ॲटली व श्री. पेथिक लॉरेन्स हजर होते. मी ज्या टेबलावर भोजन करीत होतो, तेथे ॲटलीही होते. जवळजवळ ७५ वर्षे वयाचे ॲटली आहेत, पण त्यांची प्रकृती खणखणीत आहे, त्यांच्या तोंडावर गुलाबी रंग झळकत होता. त्यांच्या बोलण्यात जोश होता व सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांच्यात विनोदी वृत्ती मला भरपूर दिसली. काही दिवसांमागे ते व त्यांच्या मजूर पक्षातील काही प्रमुख व्यक्ती रशियाला गेल्या होत्या; तेथील अनुभव ॲटली आम्हांला वर्णन करून सांगत होते. ते म्हणाले की, ‘ स्टॅलिनला आम्ही सोशॅलिस्ट आहोत हे खरेच वाटत नाही. ’ स्टालिनला हे समजत नसे की आम्ही मजूर पक्षाचे लोक पार्लमेंटमध्ये हुजूर पक्षांच्या लोकांबरोबर बसतो कसे व तेथे चर्चा कशी होऊ शकते, एकमेकांची डोकी कशी फुटली जात नाहीत. तसेच स्टॅलिन व रशियन कम्युनिस्ट पुढाऱ्यांना कितीही समजावून सांगितले तरी कळत नसे की निरनिराळ्या भोजनादि सामाजिक कार्यक्रमांत व इतर समारंभांमध्ये इंग्लंडमधील मजूर व हुजूर पक्षांचे पुढारी एकत्र कसे येऊ शकतात. इंग्लंडने गेल्या महायुद्धानंतर कशी प्रगती केली, ह्याबद्दल माहिती देताना ॲटली म्हणाले, “ गेल्या युद्धात बाँबहल्ल्यांनी नष्ट झालेली अनेक घरे व इमारती आम्ही पुन्हा बांधून तयार केल्या आहेत; नष्ट झालेले अनेक उद्योगधंदे पुन्हा उभे करीत आहोत. अनेक देशांशी आमचा व्यापार पूर्ववत सुरू झाला आहे. आज इंग्लंडमध्ये घराआड एक रेडिओसेट आहे व चार घरांआड एक टेलिव्हिजन सेट आहे. ह्यावरून आम्ही महायुद्धानंतर गेल्या आठ-नऊ वर्षांत किती प्रगती केली, ह्याची कल्पना येईल. ” ही माहिती देत असताना ॲटलींच्या चेहऱ्यावर इंग्रज लोकांच्या कर्तृत्वाविषयी व उद्योगशीलतेविषयी सार्थ अभिमानाचा भाव व्यक्त होत होता. अशा तऱ्हेची माहिती ॲटलींनी आम्हांस दिली व ती इतक्या विनोदी भाषेत की हसून हसून आमची पुरेवाट झाली. जवळ भोजन करीत असलेल्या इतर टेबलांवरील लोकांना त्यामुळे आमचा हेवा वाटू लागला. भोजन संपल्यावर एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर जाऊन बसण्याची व निरनिराळ्या लोकांचा परिचय करून घेण्याची येथे पद्धत आहे व ती आपल्याकडेही काही काही ठिकाणी पाळण्यात येते. मी दुसऱ्या टेबलाकडे गेलो, तेथे श्री. पेथिक लॉरेन्स होते. ते हल्ली हाऊस

ऑफ लॉर्डस्चे मेंबर आहेत. ते म्हातारे झाले आहेत, पण त्यांचीही प्रकृती चांगली आहे. तेही खणखणीत आवाजात बोलत होते. पण ते गंभीर वृत्तीचे वाटले.

मेजर ॲटली व श्री. पेथिक लॉरेन्स ह्यांची भेट झाली व त्यांच्याशी बोलावयास मिळाले, याबद्दल मला फार आनंद झाला. कारण हे दोघे हिंदुस्थानबद्दल सहानुभूती बाळगणारे गृहस्थ आहेत. ॲटली इंग्लंडचे मुख्यमंत्री असताना पेथिक लॉरेन्स हे सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया म्हणून मंत्री होते. १९४६-४७ साली ॲटली मुख्यमंत्री असताना भारत स्वतंत्र झाला. या गोष्टीमुळे मलाच काय, हिंदुस्थानातील सर्व लोकांना ॲटली व पेथिक लॉरेन्स यांच्याबद्दल प्रेम असणे स्वाभाविक आहे.

येथे असताना कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या यु. के. शाखेचे सेक्रेटरी मेजर श्री. लॉकहार्ट यांनी आपल्या घरी पार्लमेंटरी कोर्सला आलेल्या प्रतिनिधींना चहापार्टी दिली. त्यांचे घर लंडनमधील एका इमारतीच्या सुंदरशा व मोठ्या फ्लॅटमध्ये आहे. ह्या पार्टीला पार्लमेंटरी कोर्सच्या प्रतिनिधींशिवाय लंडनमधील इतर काही प्रमुख व्यक्ती होत्या. ह्या पार्टीच्या वेळी एका गृहस्थाने मला विचारले की, " भारतात अस्पृश्यांची सुधारणा कशी काय झाली आहे, त्यांना इतरांप्रमाणे वागविले जाते का ? " मी म्हणालो, " भारताच्या घटना कायद्याप्रमाणे स्पृश्य असो की अस्पृश्य असो, सर्वांना समान हक्क आहेत; भेदाभेद केला जात नाही, " त्यावर तो गृहस्थ म्हणाला की, " हिंदुस्थानाच्या घटना कायद्याचा मी अभ्यास केलेला आहे व तुम्ही सांगता ते खरेही आहे. पण प्रत्यक्ष आचरणात तो कायदा आणला जातो का व अस्पृश्यांना समान वागणूक मिळते का ? " त्यांच्या बोलण्याच्या रोखावरून मी ओळखले की त्यांना हिंदुस्थानच्या सामाजिक परिस्थितीची बरीच माहिती असावी. मी म्हणालो, " आमचा देश स्वतंत्र होऊन थोडीच वर्षे झाली आहेत. अस्पृश्यता नष्ट करण्याचे आमचे प्रयत्न जारीने चालू आहेत. एवढे खरे की आमच्या सामाजिक जीवनातून अस्पृश्यता संपूर्णपणे नष्ट झाली आहे, असा मला दावा करता येणार नाही, पण झपाट्याने तो सामाजिक दोष नष्ट करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. "

एक दिवस कोर्सच्या प्रतिनिधींना लंडनपासून ५० मैलांच्या अंतरावर असलेल्या कॉल्चेस्टर शहरी नेण्यात आले. कॉल्चेस्टर ( Colchester )

हे रोमन शहर म्हणून प्रसिद्ध आहे आणि ते ब्रिटनमधील एक फार जुने शहर आहे. तेथे रोमन लोकांनी आपली पहिली वसाहत स्थापली होती. सिबेलीन ( Cybeline ) नावाचा ब्रिटिश राजा तेथे इ. स. १० ते ४३ पर्यंत राज्य करीत होता. रोमन बादशहा कॉन्स्टनटाईन दी ग्रेट याचा जन्मही याच शहरात सन २७२ मध्ये झाला आणि त्याच्या आईचा–सेंट हेलेनाचा–( St. Helena ) पुतळा आजही उंच टाऊन हॉल टॉवरवरून नॉर्मन्सनी बांधलेल्या अतिविशाल किल्ल्याकडे दृष्टिक्षेप करीत आहे. कॉन्स्टनटाईन दी ग्रेट व सेंट हेलेना हे ख्रिश्चन होते, आणि रोमन साम्राज्यात ख्रिस्ती धर्म त्यांनी प्रस्थापित केला. म्हणून त्यांच्याबद्दल व त्यातल्या त्यात सेंट हेलेनाबद्दल ख्रिश्चन लोकांत मोठा आदरभाव आहे. अतिप्राचीन काळापासून सेंट हेलेना ही कॉल्चेस्टर शहराची देवता–Patron Saint–मानण्यात येते. सेंट हेलेनास समर्पित केलेले एक अतिप्राचीन मंदीर सेंट हेलेना रस्त्यावर कॉल्चेस्टर शहरात आहे.

रोमन बादशहा क्लॉडिअस (Claudius) याने हे शहर इ. स. ४३ . . . ह्या साली काबीज केले. येथे एक जुना किल्ला आहे. तो किल्ला आम्ही पाहिला. त्या किल्ल्यात एक वस्तुसंग्रहालय (Museum) आहे. येथे पुरातन वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत. रोमन व ब्रिटिश यांच्या प्राचीन इतिहासाचा थोडा फार परिचय ह्या वस्तूंमुळे होतो. ह्या वस्तूंचा समुदाय उत्तर युरोपमधील प्राचीन वस्तूंच्या समुदायातील उत्तम समुदायांपैकी समजला जातो. ह्या वस्तू-संग्रहालयाच्या तळमजल्यावर रोमन लोकांची जाळीदार फरशी, टयूडर राजांच्या वेळच्या चुली (Fire Places) आणि इतर पुरातन वस्तूचे अवशेष पाहावयास मिळाले. वस्तुसंग्रहालयाच्या पहिल्या मजल्यावर रोमन लोकांची मातीची भांडी, स्फिक्स ( Sphinx ), काचेच्या व ब्राँझच्या वस्तू, जड-जवाहिर इत्यादि वस्तू व रोमन लोकांच्या थडग्यातून मिळालेल्या वस्तू ठेव-लेल्या आहेत. थडग्यातून ज्या वस्तू मिळाल्या व ज्या ह्या वस्तुसंग्रहालयात ठेवल्या आहेत, त्यात धान्य, दारूचे चंबू इत्यादि वस्तू आहेत. रोमन लोक मृतांच्या शवाबरोबर ह्या वस्तू पुरीत असत; याचे कारण मृताने दुसऱ्या जगात–स्वर्गात–प्रवास करताना त्यांच्याबरोबर त्यांना लागणारे धान्य, दारू वगैरे

जरुरीच्या वस्तू असाव्यात, अशी रोमन लोकांची समजूत होती; ही कल्पना रोमन लोकांनी इजिप्शियन लोकांकडून घेतली असावी. ह्या वस्तुसंग्रहालयात 'Colchester Vace' म्हणजे कॉल्चेस्टर चंबू ही एक फार महत्त्वाची प्राचीन वस्तू आहे. ह्या चंबूवर ग्लॅडिएटर्सची (Gladiator–तरवारीने खेळ करणारा) व निरनिराळ्या प्राण्यांची चित्रे रंगविलेली आहेत. इ. स. १५० ह्या साली तयार करण्यात आलेला मर्क्युरीचा (Mercury) ब्रॉंझचा पुतळा येथे पाहावयास मिळाला. तो अतिशय सुंदर आहे. ह्याशिवाय अनेक नाणी, खांबासारख्या दिसणाऱ्या चबुतऱ्यांवर ठेवलेली भांडी व निर-निराळ्या धातूंच्या विविध वस्तू येथे ठेवलेल्या आहेत, त्या अतिप्राचीन आहेत, असे आम्हांला सांगण्यात आले. हा वस्तुसंग्रहालय ज्या किल्ल्यात आहे, त्या किल्ल्याभोवती एक फार सुंदर उपवन (Park) आहे. हे उपवन कोलने नदीच्या तीरापर्यंत पसरले आहे. आणि ह्या उपवनात रोमन लोकांनी बांधलेली भिंत (Roman Wall) व एक दरवाजा (Roman Gateway) आहेत, तसेच रोमन लोकांच्या घरांचे अवशेष आहेत. ह्या सर्व वस्तू इंग्लिश लोकांनी जपून ठेवल्या आहेत, एवढेच नव्हे तर त्या नष्ट होऊ नयेत म्हणून शक्य तेवढी त्यांची डागडूजही त्यांनी केली आहे. ऐतिहासिक व पुराण वस्तूंची जपणूक इंग्लिश लोक किती चांगल्या रीतीने करतात, हे ह्यावरून कळून येते. मी एका इंग्लिश गृहस्थास म्हणालो की, "रोमन लोकांच्या ह्या इमारती व इतर जुन्या वस्तू तुम्ही का जपून ठेवल्या आहेत ? त्यांनी तर तुमचा देश गुलाम केला होता, ते मालक म्हणून तुमच्यावर राज्य करीत होते!" त्या गृहस्थाने उत्तर दिले की, "एक तर ऐतिहासिक वस्तू नष्ट करणे आम्ही गैर समजतो, ऐतिहासिक वस्तू ह्या सांस्कृतिक वाढ (प्रगती) दाखविणाऱ्या खुणा आहेत. शिवाय ज्या काळी रोमन लोकांनी आम्हाला जिंकले त्याकाळी ते इतर लोकांपेक्षा जास्त सुसंस्कृत व पुढारलेले होते. त्यांचे आमच्याशी संबंध आले हे आम्ही आमचे भाग्य समजतो. कारण आम्ही त्यांच्यापासून बऱ्याच गोष्टी शिकलो. आमचा त्यांचा संबंध आला नसता तर पुढे आणखी कित्येक शतके आम्ही रानटी अवस्थेत राहिलो असतो," हे त्या गृहस्थाचे विचार ऐकून मी थक्क झालो व इंग्लिश लोक किती निरपेक्ष बुद्धीने एखाद्या विषयाचा

विचार करू शकतात हे पाहून मला त्यांचे कौतुक वाटले. कॉल्चेस्टरवर रोमन लोकांचा अंमल सुमारे इ. स. ४०७ सालापर्यंत होता.

कॉल्चेस्टर शहराची लोकसंख्या सुमारे ६०,००० आहे. कोलने नदी व रोमन नदी यांच्या पात्रांनी बनलेल्या द्वीपकल्पावर हे शहर वसलेले आहे. येथील रस्त्यावर दोन्ही बाजूने दुकाने थाटलेली आहेत. ह्या बाजारपेठेत आजूबाजूच्या खेडे विभागांतून शेकडो बसेसमधून हजारो शेतकरी रोज बाजार करण्यासाठी येत असतात. ह्या शहराची हवाही समशीतोष्ण व उत्तम आहे. येथे सैनिकी शिक्षणाचे मोठे केंद्र आहे. जवळच कोलने नदीवर बंदर आहे. अनेक उद्योगधंदे ह्या शहरात चालतात. ऑइस्टर (Oyster) म्हणजे कालव माशाबद्दल हे शहर अतिप्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. हे कालव माशे कोलने नदीत सापडतात. ह्या शहरात प्रत्येक वर्षी ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्याच्या सुमारास सर्व जगात प्रसिद्ध असलेली कॉल्चेस्टर ऑईस्टर फीस्ट—कालव माशांची मेजवानी होत असते. ती मेजवानी कॉल्चेस्टरच्या मेयर—नगरपालिकेच्या अध्यक्षाकडून दिली जाते व सुमारे ४०० बडे बडे पाहुणे या मेजवानीस हजर असतात. त्यांत प्रख्यात लेखक, कलावंत व शास्त्रज्ञ Scientists, उमराव वगैरे असतात. आतापर्यंत राजा जॉर्ज पाचवा, राजा एडवर्ड आठवा आणि इतर इंग्लंडच्या राजघराण्यातील लोकांनी ह्या मेजवानीत भाग घेतला होता.

येथे गोल्फ, पोहणे व इतर अनेक खेळ खेळण्यासाठी साधने आहेत व त्यासाठी अनेक क्लब्ज आहेत. शहर फारच स्वच्छ आहे. रस्ते रुंद फरसबंदी आहेत. येथे मोठमोठाल्या इमारती व अनेक जुनी चर्चेस—प्रार्थना मंदिरे आहेत. ह्या सर्व सुधारणांचे मूळ आहे येथील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात.

जेवण झाल्यानंतर पार्लमेंटरी कोर्ससाठी आलेल्या प्रतिनिधींतर्फे मलाया फेडरेशनमधील पेराक स्टेटचे (प्रदेशचे) मुख्यमंत्री श्री. डाटो पंगलिमा बुकित गंटांग ( Hon. Doto panglima Bukit Gantang ) ( फारच लांबलचक नाव आहे नाही ? ) यांनी कॉल्चेस्टर नगरपालिकेच्या अध्यक्षांचे व सभासदांचे आभार मानले. असे जे ॲट होम व जेवणांचे कार्यक्रम ह्या कोर्समध्ये होत, त्यावेळी आळीपाळीने कोर्ससाठी आलेले प्रतिनिधी आभाराची भाषणे करीत असत. श्री. डाटो यांचे भाषण चांगले झाले. त्यांचे इंग्रजी

चांगले होते. ते म्हणाले, " नगरपालिकेच्या सभासदांनी व अध्यक्षांनी आम्हांला चांगली मेजवानी दिली, आमचे स्वागतही प्रेमाने केले. कॉल्चेस्टरसारखे सुंदर शहर आम्हांला पाहावयास मिळाले,पण एका गोष्टीची कमतरता आम्हांला म्हणजे उष्ण प्रदेशांतील लोकांना भासली. ती म्हणजे सूर्यप्रकाश व सूर्य जी उब देतो ती. ती उब व तो छानदार प्रकाश येथे नाही. परंतु ही उणीव आपल्या आदरातिथ्याने व आत्मीयतेने आपण भरून काढलीत." ह्या मार्मिक उद्‌गाराने हास्याची लकेर जेवण्यास हजर असलेल्या लोकांमध्ये उमटली, ती जे इंग्रज लोक हजर होते त्यांच्यामध्येही पाहावयास मिळाली. त्या मार्मिक उद्‌गाराचे इंग्रज लोकांनीही कौतुक केले. जेवणानंतर आम्ही कॉल्चेस्टर नगरपालिकेच्या सभेस हजर राहिलो. सभेचा कार्यक्रम छापलेला होता. त्याच्या प्रती व कार्यक्रमातील विषयासंबंधी माहिती देणारी छापील पत्रकेही आम्हांला देण्यात आली होती व आम्हांला सांगण्यात आले की, " आजच्या दिवसापुरते तुम्ही काल्चेस्टरमधील लोकांनी निवडलेले प्रतिनिधी आहात व ह्या नगरपालिकेचे तुम्ही सभासद आहात, असे समजून आमच्या सभेमध्ये भाग घ्यावा." आम्ही कोर्सच्या प्रतिनिधींनी भराभर ती कागदपत्रे वाचली. सभा सुरू झाली. नगरपालिकेच्या अध्यक्षांनी कार्यक्रमातील विषय एका पाठीमागून एक चर्चेस घेतले. नगरपालिकेचे खरे सभासद त्या त्या विषयावर चर्चा करू लागले, आम्ही बनावट सभासदही त्या त्या विषयावर आमची मते व्यक्त करू लागलो. कधी कधी खरे सभासद व आम्ही बनावट सभासद यांच्यामध्ये चर्चेत खटकेही उडू लागले. कॉल्चेस्टरचे आम्ही जणू खरेच सभासद आहोत, असे समजून कॉल्चेस्टरच्या लोकांच्या गरजा काय आहेत, ह्याबद्दल आमचे विचार आम्ही मांडू लागलो. कॉल्चेस्टर नगरपालिकेच्या खऱ्या सभासदांनी काही गोष्टी सांगितल्या तर "त्यांचे म्हणणे हे कॉल्चेस्टरच्या हिताच्या दृष्टीने बरोबर नाही, त्या खऱ्या सभासदांचे म्हणणे ग्राह्य केले तर कॉस्चेस्टराच्या लोकांचे मोठे नुकसान होणार आहे," असे आमच्यापैकी काही (बनावट) सभासद म्हणू लागले, त्यावेळी सर्व सभागृहात हास्याची लाट पसरली. त्या चर्चेत मोठी मजा आली. कॉल्चेस्टर शहराच्या भेटीचा हा गोड व नेहमी स्मरणात राहणारा कार्यक्रम संपला. कॉल्चेस्टर नगरपालिकेच्या अध्यक्षांचा व सभासदांचा आम्ही निरोप घेतला व आम्ही लंडनला परतलो. ह्या प्रवासात बसमध्ये जाता येताना माझ्या

शेजारी केनियातील लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे क्लार्क असिस्टंट ( आपल्याकडचे डेप्युटी सेक्रेटरी ) श्री. एच. थॉमस बसले होते. ते फार प्रेमळ गृहस्थ आहेत. त्यांच्याबरोबर अनेक विषयांवर चर्चा करीत असता प्रवास कधी संपला हे मला कळलेदेखील नाही.

तुझा

नाना

• • •

: ११ :

## वेस्ट मिन्स्टर पॅलेस–राष्ट्रीय जीवनाचा ग्रंथ

हॉटेल रूबेन्स
बकिंगहॅम पॅलेस रोड,
एस्. डब्ल्यू. लंडन–१
ता. ७–५–१९५५

चि. आशाला सप्रेम आशीर्वाद––

आम्हाला आज पॅलेस ऑफ वेस्ट मिन्स्टर दाखविण्यात आले. तसे म्हटले तर ही भव्य व अवाढव्य इमारत बाहेरून मी येथे आल्यापासून रोजच पाहत आहे. तसेच हाऊस ऑफ कॉमन्स व हाऊस ऑफ लॉर्डस् ज्या दालनात भरतात, तीही मी अनेकदा पाहिली आहेत. ग्रेट हॉल–मोठा दिवाणखाना किंवा दालनही मी रोज पाहत आहे. कारण ह्या दालनाजवळील दुसऱ्या एका दालनातच पार्लमेंटरी कोर्सच्या सभा येथे रोज होतात व त्या सभांना हजर राहण्यासाठी ह्या मोठ्या दिवाणखान्यातूनच जावे लागते, पण ही दालने ह्या पॅलेस ऑफ वेस्ट मिन्स्टरचे त्या मानाने लहान भागच समजले पाहिजेत. वेस्ट मिन्स्टर

पॅलेस हा इंग्लंडच्या इतिहासाचा खजिनाच आहे; ही इमारत इंग्लंडच्या राष्ट्रीय जीवनाचा ग्रंथ आहे. सुमारे सहाव्या शतकात ह्या इमारतीचा इतिहास सुरू होतो. टेम्स नदीच्या काठी प्रथम थोर्ने (Thorney) नावाचे बेट होते, त्या बेटावर एक इमारत बांधण्यात आली, तीच पुढे मोठी होत गेली, तिलाच ' वेस्ट मिन्स्टर पॅलेस ' हे नाव पडले. राजा कॅन्यूटने ही इमारत आपला राजवाडा म्हणून पसंत केली. ह्याच ठिकाणी कॅन्यूट राजाने पाण्याची लाट परत फिरावी असा हुकूम देण्यास नकार दिला, असे म्हणतात.

वेस्ट मिन्स्टर पॅलेसला अनेक वेळा आगी लागल्या. गेल्या महायुद्धात ह्या इमारतीवर अनेक वेळा बाँबचे हल्ले झाले. हाऊस ऑफ कॉमन्सचा भाग तर ह्या बाँब हल्ल्यांत संपूर्ण नष्ट झाला, पण प्रत्येक वेळेला इंग्लिशांनी वेस्ट मिन्स्टर इमारत पुन्हा बांधून काढली. एवढेच नव्हे तर तीत प्रत्येक वेळी सुधारणा केली व पूर्वीच्या इमारतीस जोडून निरनिराळे भाग बांधून तीत भर घातली. वेस्ट मिन्स्टरचा अनेकांना माहीत असलेला भाग म्हणजे क्लॉक टॉवर—घड्याळाचा मनोरा. ह्या मनोऱ्यावर जे घड्याळ आहे, ते जगातील सगळ्या घड्याळांत मोठे आहे. ह्या घड्याळाच्या प्रत्येक तबकड्याचा व्यास २३ फूट आहे. ह्या घड्याळातील पाच घंटांमध्ये जी सर्वांत मोठी घंटा आहे, तिला बिग बेन असे नाव आहे. हे नाव पडण्याचा इतिहासही मनोरंजक आहे. सर बेंज्यामिन हॉल नावाचे फर्स्ट कमिशनर ऑफ वर्क्स म्हणून एक अधिकारी होते. त्यांचे शरीर मजबूत बांध्याचे व जाडजूड होते. म्हणून लोक त्यांना ' बिगबेन ' म्हणत असत. हॉलसाहेबांनी एकदा भाषण करताना सूचना केली की " ह्या मोठ्या घंटेला सेंट स्टेफेन ( St. Stephen ) असे नाव द्यावे. " भाषण संपवून ते खाली बसले व कोणी एक गृहस्थ ओरडून म्हणाले की " ह्या घंटेस 'बिगबेन' हे नाव का देऊ नये ?" आणि तेव्हापासून ह्या घंटेचे नाव 'बिगबेन' असे पडले. क्लॉक टॉवरच्या पहिल्या मजल्यावर एक खोली आहे. हाऊस ऑफ कॉमन्सच्या स्पीकरची—सभापतीची पार्लमेंटच्या एखाद्या सभासदाने अवज्ञा केली तर त्या सभासदास ह्या खोलीत कैद करून बंदिस्त करण्यात येते. १८८० सालात चार्लस् ब्रॅडलॉग ( Charles Bradlaugh ) हा पार्लमेंटचा सभासद होता. तेव्हा त्याला येथे कैदेत ठेवण्यात आले होते. त्यानंतर मात्र पार्लमेंटचे सभासद शहाणे व समजदार झालेले दिसतात, कारण १८८० सालापासून

ह्या खोलीत कोणीही सभासद डांबला गेला नाही. वेस्ट मिन्स्टरच्या आवारात क्रॉमवेल आदि प्रसिद्ध व्यक्तींचे पुतळे आहेत. वेस्ट मिन्स्टर पॅलेसच्या मुख्य दरवाजातून प्रवेश केला म्हणजे एक गॅलरी लागते. ह्या गॅलरीत एका बाजूला पार्लमेंटच्या इतिहासात नावाजलेले विरोधी पक्षाचे नेते, फ्रॉक्स, बर्क यांचे पुतळे आहेत, तर दुसऱ्या बाजूस ग्लॅडस्टन इत्यादि इंग्लंडच्या पंतप्रधानांचे व सरकारी पक्षाच्या प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे आहेत. तसेच इंग्लंडच्या पूर्वीच्या राजांचे व राण्यांचे पुतळेही आहेत. ह्यावरून पार्लमेंटच्या इतिहासात सरकारी व विरोधी पक्षांना कसा मान आहे व त्यांचे महत्त्व किती आहे, हे कळून येते. ह्या गॅलरीच्या भिंतीत तावदाने आहेत व त्या तावदानात इंग्लंडच्या घटना–कायद्याच्या इतिहासातील संस्मरणीय प्रसंग चित्रित केलेले आहेत. ह्या गॅलरीतून पुढे गेल्यावर सेंट्रल हॉल–मध्य दिवाणखाना–लागतो. तो अष्टकोनी व विस्तृत आहे. पार्लमेंट पाहण्यास व पार्लमेंटमधील चर्चा ऐकण्यास जे लोक येतात, ते ह्या दिवाणखान्यात प्रथम जमा होतात आणि येथे पाहुणे व पार्लमेंटचे सभासद यांच्या मुलाखती होतात. स्पीकरची मिरवणूक येथूनच हाऊस ऑफ कॉमन्समध्ये जाते. गेल्या महायुद्धानंतर ही मिरवणुकीची प्रथा येथे सुरू झाली. ह्या सेंट्रल हॉलपासून एक गॅलरी (Corridor) हाऊस ऑफ कॉमन्सच्या लॉबीकडे जाते व ह्या लॉबीच्या उत्तरेस हाऊस ऑफ कॉमन्स आहे. हाऊस ऑफ कॉमन्सची इमारत रेक्टँग्यूलर–काटकोनी–आहे. बहुतेक देशांच्या पार्लमेंटच्या इमारती अर्धवर्तुळाकार असतात, पण हाऊस ऑफ कॉमन्सची इमारत ह्या नियमास अपवाद म्हटली पाहिजे. सेंट्रल हॉलच्या दक्षिणेस पीअर्स लॉबी व पीअर्स गॅलरी आहे. ह्या लॉबीमधून हाऊस ऑफ लॉर्डस्‌ला जाणारा मार्ग आहे. हाऊस ऑफ कॉमन्सच्या चर्चेस मी येथे असताना अनेक वेळा हजर राहिलो.

हाऊस ऑफ लॉर्डस्‌च्या दालनाजवळ प्रिन्सेस चेंबर आहे, व ह्या चेंबरजवळ रॉयल गॅलरी आहे. ह्या गॅलरीचा उपयोग अनेक प्रकाराने केला जातो. उमरावांच्या गुन्ह्यांची चौकशी ( Trials ), सरकारी मेजवान्या, व महत्त्वाच्या सभा ह्या गॅलरीत होतात. ही गॅलरी म्हणजे दालन फारच मोठी व विस्तृत आहे. गॅलरीच्या दोन्ही बाजूच्या भिंतीवर वाटर्लू व ट्राफल्गारच्या युद्धातील घटनांची चित्रे काढलेली आहेत. ती फारच मोठी आहेत. ह्याशिवाय येथे अनेक तसबिरी

व ( मुलायम ) मूर्ती ( Gilded Statutes ) आहेत. सर्व दालनभर उंची गालिचे टाकलेले आहेत. हे दालन मला फार आवडले. रॉयल गॅलरीला लागून राजाची पोशाख करण्याचे ( King's Robing Room ) दालन आहे. ह्या दालनात राजा आर्थरच्या आख्यायिका ओक पॅनलिंगवर ( Panelling ) चित्रित केलेल्या आहेत.

वेस्ट मिन्स्टर पॅलेसमध्ये चार दालनात हाऊस ऑफ लॉर्डस्चे वाचनालय सामावलेले आहे आणि हाऊस ऑफ कॉमन्सचे वाचनालय पाच दालनात सामावलेले आहे. हाऊस ऑफ लॉर्डस्चे वाचनालय वेस्ट मिन्स्टर पॅलेसच्या दक्षिणेच्या टोकास आहे व हाऊस ऑफ कॉमन्सचे वाचनालय उत्तरेच्या टोकास आहे. ह्या दोन वाचनालयांमध्ये पार्लमेंटच्या सभासदांसाठी भोजनाची दालने, धूम्रपानासाठी एक दालन व बुद्धिबळ खेळण्यासाठी एक दालन आहे. ह्या पॅलेसमध्ये १६ कमिट्यांची विविध आकारांची दालने आहेत; आणि हाऊस ऑफ कॉमन्सचे सभापती, लॉर्ड चॅन्सेलर, सार्जंट ॲट आर्म्स इत्यादि पार्लमेंटच्या अधिकाऱ्यांची निवासस्थाने आहेत. ह्या निवासस्थानांची अंगणे (Courls) व पीअर्स कोर्ट, कॉमन्स कोर्ट, रॉयल कोर्ट इत्यादि अंगणे ह्या वेस्ट मिन्स्टर पॅलेसमध्ये आहेत.

वेस्ट मिन्स्टर पॅलेसमध्ये इंग्लंडच्या पार्लमेंटची अधिवेशने भरणे व आता ह्या पॅलेसचा उपयोग पार्लमेंटच्या कामकाजासाठीच होणे हे त्या पार्लमेंटच्या कारकीर्दीस व सत्तेस साजेसेच आहे. पॅलेस म्हणजे राजवाडा. वेस्ट मिन्स्टर पॅलेस पूर्वी खरोखरच राजाचा राजवाडा म्हणजे राजाचे निवासस्थान होते. परंतु ते आता तसे राहिलेले नाही, तरी वेस्ट मिन्स्टरचे पॅलेस (राजवाडा) हे नाव शिल्लक राहिलेले आहे, पण ते नाव सार्थ आहे. कारण इंग्लंडच्या घटना कायद्याप्रमाणे पार्लमेंट हेच सुप्रीम–अत्युच्च–सत्तेचे स्थान आहे.

वेस्ट मिन्स्टर पॅलेसजवळ दुसरी एक ब्रिटिश इतिहासाच्या घटनांनी भरलेली इमारत आहे. तिचे नाव वेस्ट मिन्स्टर ॲबे. ही इमारत एडवर्ड डी कन्फेमर ह्या राजाने बांधली. तो १०६५ सालात वारला. त्याचे प्रेत ह्या इमारतीत पुरले गेले. राजा चार्लस् दुसरा व त्याच्या आधीचे इंग्लंडचे राजे यांची थडगी

ह्याच इमारतीत आहेत. ह्याशिवाय इंग्लंडच्या अनेक थोर व्यक्तींची थडगीही येथेच आहेत. ह्या इमारतीत एक नेव्ह ( Nave ) देवळाचा मधला भाग— आहे, तीत १९१४–१८ सालात जे महायुद्ध झाले, त्यातील अज्ञात योद्धयाची कबर आहे, तसेच काचेच्या तावदानात एक ग्रंथ आहे, त्या ग्रंथात १९३९–४५ सालच्या दुसऱ्या महायुद्धात जे नागरिक बॉंब हल्ल्यात मारले गेले, त्यांची नावे व पत्ते दिलेली आहेत. वेस्ट मिन्स्टर अॅबे ही इमारत फार जुनी तर आहेच, पण शिल्पशास्त्राच्या दृष्टीनेही सुरेख व प्रेक्षणीय आहे.

वेस्ट मिन्स्टर हे शब्द ज्या नावात आहे, अशी दुसरी एक इमारत मी पाहिली तिचे संपूर्ण नाव वेस्ट मिन्स्टर कॅथेड्रल. हे रोमन कॅथॉलिक लोकांचे इंग्लंड देशातील सर्वात मोठे चर्च आहे. ह्या इमारतीने माझे मन आकर्षून घेतले, इतकी ती सुंदर आहे. ही इमारत भव्य आहे, पण साधी आहे, तिच्यातील विविध भागांची चित्ताकर्षक रचना पाहून चित्त दिपून जाते. ह्या कॅथेड्रलच्या टॉवर-वरून लंडन शहराचे मनोवेधक दृश्य दिसते.

वर मी लंडनमधील अशा तीन इमारतींचे विस्तृत वर्णन केले आहे, उद्देश हा की कल्पनेने तरी तुला ह्या इमारतींच्या सौंदर्याची व ऐतिहासिक महत्त्वाची ओळख व्हावी. पण खरे सांगू, कितीही वर्णन केले तरी त्या सौंदर्याची पूर्ण कल्पना देणे कठीण आहे. तू त्या इमारती प्रत्यक्ष पाहावयासच हव्यात.

गेल्या आठ नऊ दिवसांत माझे मित्र श्री. मोती लालवानी, श्री. आफळे व न्यू सिटिझन बँकेचे मॅनेजर श्री. भाऊसाहेब देशपांडे यांची पत्रे मला मिळाली व त्यांच्या पत्रांतून तुमची खुशालीही कळाली. त्यामुळे मनाला समाधान वाटले. माझी प्रकृती चांगली आहे व दिवस येथे मजेत जात आहेत. तुम्ही माझ्याविषयी काळजी करू नये. पत्र वरचेवर पाठवीत जाणे. कळावे.

तुझा

**नाना**

● ● ●

: १२ :

# शिस्त व परंपराभिमानी नागरिक

हॉटेल रूबेन्स
बकिंगहॅम पॅलेस रोड
एस्. डब्ल्यू. लंडन–१
ता. ८–५–१९५५

प्रिय चि. **मंगलास** सप्रेम आशीर्वाद—

ट्राफलगार स्क्वेअर हे लंडन शहराचे एक भूषण आहे. येथे नेल्सनचा पुतळा आहे. ट्राफलगार युद्धात नेल्सनने जो विजय मिळविला, त्याची ( यादगार ) आठवण चिरंतन राहावी म्हणून ह्या स्क्वेअरला ट्राफलगार स्क्वेअर असे नाव देण्यात आले आहे. ह्या स्क्वेअरमध्ये कारंजी आहेत व फुलांचे वाफे–ताटवे–आहेत. येथे कबुतरांची फौज नेहमीच हजर असते. कबुतरे इकडून तिकडे उडत असतात. त्यांचे दृश्य मोहक आहे. या स्क्वेअरमध्ये मी अनेकदा आलो आहे.

इंग्लंडमध्ये उन्हाळ्यामध्ये दिवस मोठे होत जातात व रात्र लहान होत जाते. आपल्या देशातही–भारतात–असेच घडते. पण हे लहानमोठे दिवसरात्र होण्याचे प्रमाण आपल्याकडे इतके मोठे नसते. त्यामुळे आपणांस ते तितकेसे जाणवत नाही, पण येथे ते प्रमाण फार मोठे आहे. मी जेव्हा येथे आलो, तेव्हा प्रथम माझ्या लक्षात हे आले नाही. येथे पहिला मुक्काम झाला व दुसऱ्या दिवशी मी उठलो व पाहतो तर माझ्या बेडरूममध्ये झोपण्याच्या खोलीत–सर्वत्र लख्ख उन्हे पसरली होती. मला वाटले, मी फारच उशीरा उठलो आहे, म्हणून मी घाईने तोंड धुतले व स्नान केले व हॉटेलमधील भोजनगृहात न्याहरीसाठी–ब्रेक-फास्टसाठी–गेलो. पहातो तर तेथे कोणी नव्हते. एकदोन वेटर्स होते. ते माझ्या-बरोबर काही बोलले नाहीत, पण त्यांनी तेथे असलेल्या घड्याळाकडे नजर

टाकली व माझ्याशी न बोलता ब्रेकफास्टसाठी अजून बराच अवकाश आहे, याची जणू मला नम्रतेने जाणीव करून दिली व मीही मग घड्याळाकडे पाहिले तर सकाळचे सहा वाजले होते. ब्रेकफास्टला अजूनही दोन तास अवकाश आहे, हे माझ्या लक्षात आले व माझी फजिती त्या वेटर्सच्या लक्षात येऊ नये म्हणून मी चटकन तेथून पाय काढला व माझ्या खोलीत मी परत आलो. अशी येथील लहान रात्रींनी माझी गंमत केली.

काही दिवस मी ग्रोव्हेनर हॉटेलमध्ये होतो व काही दिवस रूबेन्स हॉटेलात होतो. रूबेन्स हॉटेलात असताना एक प्रसंग घडला, त्याबद्दल उल्लेख केल्याशिवाय मला राहवत नाही. एक दिवस ह्या हॉटेलात दुपारी जेवण केले व घाईने मी जावयास निघालो. मी येथे एक लहान बॅग बरोबर बाळगीत असे. त्यामध्ये मी ट्राव्हलर्स चेक बुक, येथील स्थळांची माहिती देणारी लहान पुस्तके व पैसे ठेवीत असे. ती बॅग मी ज्या टेबलावर जेवण केले, तेथेच विसरलो. काही वेळाने ती बॅग वेटरनी हॉटेलच्या काऊन्टरवर आणून दिली व लगेच काऊन्टरवर काम करणाऱ्या नोकराने ती बॅग मला आणून दिली. बॅगवर माझे नाव होते म्हणून माझा तपास करणे त्याला सोपे गेले. बॅग उघडून पाहिले तर सर्व वस्तू जशाच्या तशा होत्या, पैसेही जितके मी ठेविले होते ते तसेच होते. येथील लोकांचे प्रामाणिक वर्तनाचे उदाहरण म्हणून मी ह्या घटनेबद्दल लिहिले आहे.

सेंट जेम्सेस पार्कजवळ बकिंगहॅम राजवाडा आहे. व्हिक्टोरिया राणीने प्रथम हा राजवाडा आपले राहण्याचे ठिकाण केले, तेव्हापासून इंग्लंडचे राजे हा राजवाडा आपले राहण्याचे ठिकाण म्हणून वापरतात. हल्ली एलिझाबेथ दुसरी ही इंग्लंडच्या गादीवर आहे. तिचा मुक्काम जेव्हा ह्या राजवाड्यात असतो, त्यावेळी तिचे निशाण ह्या राजवाड्यावर फडकत असते आणि चेंजिंग ऑफ गार्ड म्हणजे पहारेकरी बदलणे हा समारंभही घडून येतो. तो सकाळी १०–३० वाजता होतो. तो समारंभ पाहण्यासाठी मी एक दिवस बकिंगहॅम पॅलेसवर गेलो होतो. या राजवाड्यात कोणाला जाऊ देण्यात येत नाही. राजवाड्याचे मोठे आवार आहे, तेथे व राजवाड्याच्या पुढच्या रस्त्यावर पहारेकरी बदलण्याचा समारंभ होतो. आवारात मात्र लोकांना जाता येते. त्यामुळे आम जनतेस हा पहारेकरी बदलण्याचा समारंभ पहाता येतो. तो समारंभ बराच

वेळ चालतो. उंच व सुंदर घोड्यांवर स्वार होऊन नवीन पहारेकरी मोठ्या झोकात येतात. त्यांचा पोशाख झकपक असतो. त्यांची व राजवाड्यात आधीच पहारा करीत असलेल्या सैनिकांची पहारा बदलण्याची कवाईत असते. ती ठराविक रीतीने व मोठ्या शिस्तीने होते. हा सर्वच देखावा मोठा प्रेक्षणीय असतो. माझ्याप्रमाणे तेथे तो देखावा पाहण्यासाठी आणखी शेकडो लोक आले होते. ते बहुधा व्हिजीटर्स म्हणजे दुसऱ्या देशातून लंडनला आलेले पाहुणे होते. त्यात बहुसंख्य लोक न्यू झीलंड, ऑस्ट्रेलिया आदि कॉमनवेल्थ कंट्रीज–राष्ट्रकुल देशातील–होते व बहुतेक गोरे लोक होते. ही कवाईत खरोखरच अतिशय थाटामाटाची असते. घड्याळाच्या काट्याप्रमाणे पहारेकऱ्यांच्या व घोड्यांच्या हालचाली वक्तशीर होतात. त्यातील शिस्त वाखाणण्यासारखी असते.

'१० डाउनिंग स्ट्रीट' हे इंग्लंडच्या पंतप्रधानांचे सरकारी राहण्याचे ठिकाण आहे. त्याच्याजवळच इंग्लंड सरकारच्या निरनिराळ्या कचेऱ्या आहेत. त्या इमारती मी पाहिल्या. याशिवाय ज्या ठिकाणी बँका व इतर व्यापारी पेठा आहेत, तेथे मी गेलो व तेथील इमारतीही मी पाहिल्या. ह्या इमारती बहुधा दगडांच्या आहेत. दगड घडवून गुळगुळीत केलेले आहेत. त्या इमारती (मॅसिव्ह) भव्य व (सॉलिड) भक्कम आहेत. गेल्या महायुद्धानंतर ज्या इमारती येथे बांधल्या गेल्या, त्या बहुधा सिमेंट कॉंक्रीटच्या आहेत व मुंबईत मरीन ड्राईव्हवर ज्या कॉंक्रीटच्या इमारती आहेत, त्या धर्तीवरच ह्या नव्या इमारती बांधलेल्या आहेत.

लंडनचे रस्ते फार रुंद आहेत. रस्त्यांना जोडून जे फूटपाथ–पादचाऱ्यांसाठी रस्ते–आहेत तेही रुंद आहेत. अनेक रस्त्यांवर दोन्ही बाजूने हारीने झाडे लावलेली आहेत. त्यामुळे ह्या रस्त्यांनी चालण्यातही मोठी मौज आहे. मात्र रस्ता ओलांडण्याचे वगैरे जे नियम आहेत, ते काटेकोर रीतीने पाळले पाहिजेत, ते नियम येथील लोक मोठ्या कशोशीने पाळतात; जणू तो आपला धर्मच समजतात. एकदा काय झाले मी व सर हॉवर्ड चाललो होतो. आम्हांला रस्ता ओलांडावयाचा होता; पण ज्या ठिकाणी रस्ता ओलांडण्यासाठी खुणा केलेल्या होत्या, त्या ठिकाणापासून थोड्या अंतरावर मी चुकून रस्ता ओलांडू लागलो, मी एक दोन पाऊलेच पुढे गेलो असेन, लगेच सर हॉवर्डनी माझा हात धरला व प्रेमाने पण मोठ्या गंभीरपणे मला दटावले की, 'तुम्ही हे काय करीत आहात,

रस्ता ओलांडण्याचे हे ठिकाण नाही." त्यांनी अशा रीतीने हे शब्द उच्चारले की जणू मी मोठा गुन्हा करण्याच्या बेतात होतो. या एका लहान प्रसंगावरून तुझ्या लक्षात येईल की इंग्लिश लोकांत आपले नियम व कायदा पाळण्याची वृत्ती किती जबरदस्त आहे. लंडन शहरात अनेक ठिकाणी मी फिरलो, पण कोठे मला घाण, कचरा की दुर्गंधी आढळली नाही. जिकडे तिकडे स्वच्छता पहावयास मिळाली. जणू स्वच्छतेचे हे माहेरघर ! कोणी थुंकताना देखील दिसला नाही, मग इतर घाण करताना तर राहोच ! येथे भुयारी रेल्वेची ठिकठिकाणी जी स्टेशने आहेत, त्या स्टेशनांमध्ये मुताऱ्या व संडास आहेत, मुताऱ्या व संडास प्रत्येक स्टेशनवर मोठ्या संख्येने असतात. मुताऱ्या व संडास साफ करण्यासाठी पुरेसा नोकरवर्ग सतत तेथे हजर असतो, तेथेच हात-तोंड धुण्यासाठी बसीन्स व पाण्याचे नळ असतात. लोकांना या सर्व सोयींचा उपयोग करता येतो. या सोयीमुळे व इंग्रज लोकांमध्ये सिव्हिक सेन्स—नागरिकांच्या कर्तव्याची जाणीव—सदैव जागृत असल्यामुळे लंडन शहर कसे निर्मळ व स्वच्छ आहे म्हणून सांगू ! बरे येथे आपल्याकडच्या शहरांप्रमाणे रस्त्या-रस्त्यांनी भिकारी नाहीत. एवढे कशाला मला एकही भिकारी येथे पहावयास मिळाला नाही.

ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकी जाहीर झालेल्या आहेत, त्यामुळे निवडणुकीचा प्रचार सुरू झालेला आहे. मी एका ठिकाणी हा प्रचार कसा चालतो तो पाहिला. कॉन्झर्व्हेटिव्ह—हुजूर—पक्षाचे एक उमेदवार एका उघड्या मोटारीतून हिंडत होते, त्यांच्याबरोबर त्यांचे इतर सहकारी होते. ते ठिकठिकाणी आपली मोटार थांबवीत व तेथे ते उमेदवार व्याख्याने देत होते व त्यांच्याबरोबरचे सहकारी निवडणुकीसाठी तयार केलेले आपल्या पक्षाचे छापील वाङमय पत्रके, पुस्तिका वगैरे वाटीत होते. मोटार एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी आस्ते आस्ते जात होती. ज्याला कॉर्नर मिटिंग्ज म्हणतात तशा स्वरूपाच्या ह्या सभा होत्या. सभांना लोक मात्र थोडेच असत. घोषणा फारच कमी होत्या.

रविवार ता. ८ मे हा दिवस जवळजवळ येत आहे. त्या दिवशी आम्ही—पार्लमेंटरी कोर्सचे प्रतिनिधी लंडनहून उत्तर आयर्लंडला जाणार आहोत. लंडन सोडण्याच्या अगोदर तुझ्यासाठी व चि. आशासाठी काही तरी नाविन्यपूर्ण

खरेदिण्याचे मी ठरविले व त्याप्रमाणे बाजारात गेलो. तेथे काही सुंदर बाहुल्या मी खरेदिल्या. त्यांत स्कॉटलंड गार्ड–पोलीस, लंडन टॉवरचा एक गार्ड, बकिंग-हॅम पॅलेसवर पाहिलेल्या पहारेकऱ्यातील एक पहारेकरी इत्यादि मंडळी आहेत. मी घरी आल्यावर तुम्हांला ही सर्व मंडळी भेटतील व येथील गमती जमती सांगतील. त्या ऐकून व त्यांचे दर्शन होऊन तुमचे खूप मनोरंजन होईल,अशी माझी खात्री आहे. ही खरेदी करीत असता एक विशेष गोष्ट पहावयास मिळाली. एका ठिकाणी बऱ्याच वस्तू काचेच्या तावदानातून–शोकेसेसमधून–ठेवण्यात आलेल्या होत्या, तेथे दुकानदार कोणी नव्हता. तरी पण त्या वस्तू खरेदिता येत होत्या. त्या शोकेसमधून त्या वस्तूंच्या किंमती कळत होत्या. कारण कागदावर त्या किंमती लिहून ते कागद त्या वस्तूंना डकविलेले होते. त्या शोकेसेसना एक यंत्र लावलेले होते. आपणास जी वस्तू हवी तिची किंमत पाहून तितके पैसे त्या यंत्रात टाकले की ती वस्तू त्या यंत्रातून बाहेर येते. वस्तू बाहेर येण्यासाठी तसे दार त्या यंत्रात आहे. मला चॉकलेट्स, सिगरेट्स व काड्यांची पेटी घ्यावे, असे वाटले. त्यांच्या किंमती काचेतून मी पाहिल्या व त्या किंमतीइतके पैसे त्या यंत्रात टाकले–वर उल्लेखिलेल्या दारांतून त्या वस्तू बाहेर आल्या. त्या मी घेतल्या. कसे आहे विक्रेत्याशिवाय अगर दुकानदाराशिवाय चालणारे हे दुकान !

पार्लमेंटरी कोर्सचा लंडन येथील कार्यक्रम संपला. ह्या कार्यक्रमातील कोर्सच्या शेवटच्या सभेत मी प्रतिनिधींच्यावतीने भाषण केले व यु. के. शाखेच्या अधिकाऱ्यांनी आम्हा प्रतिनिधींचे जे हार्दिक आतिथ्य केले व आम्हांला जे साहाय्य दिले, त्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच एर्ल ऑफ मन्स्टर (Munster), ब्रिटिश मंत्रिमंडळातील एक मंत्री, श्री. मॅकेन्झी, सर एडवर्ड फेलोज, श्री. लिड्डरडेल, श्री. गॉर्डन वगैरे ब्रिटिश पार्लमेंटच्या अधिकाऱ्यांनी आपला वेळ खर्च करून व श्रम घेऊन कोर्समध्ये जी विद्वत्ताप्रचूर भाषणे दिली व आमच्या ज्ञानात भर टाकली त्याबद्दल त्यांचेही आभार मानले. पार्लमेंटरी–संसदीय–लोकशाहीचे कायदे काय आहेत, हे मी थोडक्यात सांगितले व संसदीय लोकशाही कारभारातील उद्भवणारी दिरंगाई व अकार्यक्षमता दूर करण्यासाठी इंग्रजांनी यशस्वीरीतीने कसे प्रयत्न केले व अद्यापही ते प्रयत्न

कसे चालू आहेत, याची ओळख वरील व्याख्यात्यांनी आम्हांला करून दिली. त्याचाही निर्देश मी माझ्या भाषणात केला.

लंडन शहर सोडण्याचा दिवस जसजसा जवळ जवळ येत आहे, तसतसे मला हुरहुरल्यासारखे होत आहे. ता. २६ एप्रिल ते ता. ८ मे सायंकाळपर्यंत मी ह्या शहरात राहिलो, म्हणजे तसे पाहिले तर जेमतेम १२–१३ दिवस. पण किती ठिकाणे मी ह्या दरम्यान पाहिली. किती गोष्टी मी येथे शिकलो, किती तरी लोकांच्या ओळखी झाल्या. नवे मित्र बनले, माझे कुटुंब मोठे झाले. ह्या १२–१३ दिवसांत लंडनमध्ये जे मी पाहिले, ऐकिले व अनुभवले, त्याचे खोल ठसे माझ्या मनावर उमटले. या शहराबद्दल आपुलकी निर्माण झाली. येथील लोकांबद्दल जिव्हाळा निर्माण झाला, तेव्हा हे शहर आता सोडावे लागणार ह्यामुळे हुरहूर वाटली तर नवल काय ?

तुझा

**नाना**

• • •

**: १३ :**

# " आयरिश लोकांचा पाहुणचार "

**रॉयल हॉटेल, बँगोर**

**उत्तर आयर्लंड**

ता. ९–५–१९५५.

प्रिय चि. **उषास** सप्रेम आशीर्वाद—

लंडन सोडले. आता मला इंग्लंडचा ग्रामीण भाग आगगाडीने केलेल्या प्रवासात पहावयास मिळाला. ठिकठिकाणी शेते होती. पण फारच थोड्या ठिकाणी पिके दिसली, मात्र मेंढ्यांचे, गाईवासरांचे व डुकरांचे कळप ठिक-ठिकाणी दिसले, कोंबड्यांचे थवेही बरेच दिसले; जमिनीत चढउतार अनेक

ठिकाणी दिसला, कोठे कोठे लहान लहान टेकड्याही दिसल्या, पण सर्व भूभाग हरित तृणांनी सुशोभित झालेला होता. नद्यानाल्यांचे झुळझुळणारे पाणी डोळ्यांना तोषवीत होते. ही दृश्ये पाहत असता दोन तास कधी संपले ते मला कळलेदेखील नाही.

दुसऱ्या दिवशी म्हणजे ता. ९ मेला सकाळी आमची ट्रेन स्ट्रॅनराएर (Stranraer) स्टेशनवर थांबली. स्ट्रॅनराएर हे इंग्लंडचे आयर्लंडच्या बाजूचे शेवटचे शहर. स्ट्रॅनराएरहून आम्ही बोटीने लार्ने ह्या उत्तर आयर्लंडच्या बंदराकडे निघालो. स्ट्रॅनराएर बंदरावर आम्ही बोटीत बसलो, त्यावेळी सकाळची प्रशांत वेळ होती. बोटीवरच आमची न्याहरी झाली. बोट सुंदर होती. ठिकठिकाणी बसण्यासाठी कोचेस होते. डेकही ऐसपैस होता. डेकवर उभा राहून मी आयरिश समुद्राचा देखावा बराच वेळ पहात होतो. मधूनमधून समुद्र खवळलेला होता, मोठाल्या लाटा एकमेकांवर आदळत होत्या, त्यामुळे बोट हेलकावे खात होती. जणू आपण पाळण्यात बसलो आहोत व कोणी आपणास झोके देत आहे, असे मला त्यावेळी वाटले. लार्नेला आम्ही पोहोचलो त्यावेळी दिवस बराच वर आला होता. लार्नेहून पुन्हा आमचा प्रवास आगगाडीने सुरू झाला. लार्नेहून आम्ही उत्तर आयर्लंडची राजधानी बेलफास्ट येथे आलो व बेलफास्टहून मोटारने बँगोर ह्या शहरी आलो. आम्ही बँगोर येथील ' रॉयल ' हॉटेलमध्ये उतरलो आहोत. हे हॉटेल एका खाडीच्या किनाऱ्याशी आहे. ' रॉयल ' ह्या नावाला शोभेल असे हे हॉटेल सुखसोयींनी युक्त व सुंदर आहे. मला ह्या हॉटेलात जी खोली चवथ्या मजल्यावर मिळाली आहे, त्या खोलीतून दोन खाड्या दिसत आहेत. आपापल्या खोल्यात आम्ही आमचे सामानसुमान ठेवले. ह्या सुमारास दुपारची वेळ होती आली. बसमधून आम्ही स्टॉरमाँटकडे गेलो. (Stormont), स्टॉरमाँट म्हणजे उत्तर आयर्लंडच्या पार्लमेंटची इमारत. ह्या इमारतीचे बांधकाम १९२८ ते १९३२ ह्या कालावधीत झाले. ह्या इमारतीभोवती जे आवार आहे, ते ३०० एकरांचे आहे. ही इमारत बेलफास्टपासून सुमारे पाच मैलांच्या अंतरावर आहे. ती एका उंचवट्यावर बांधलेली आहे. इमारतीच्या आवारात प्रवेश करण्यासाठी एक दरवाजा आहे. ह्या दरवाजातून आत शिरल्यावर स्टॉरमाँटकडे जाणारा रस्ता आहे. ह्या रस्त्याच्या दोन्ही बाजूस लाईम ( Lime ) झाडांच्या रांगा आहेत, त्यांचा

जो अव्हेन्यू–झाडींचा प्रवेश मार्ग–तयार झाला आहे, त्याला ‘ प्रिन्स ऑफ वेल्स ’ अव्हेन्यू असे नाव ब्रिटनचे राजे जॉर्ज पाचवे यांनी दयावंत होऊन परवानगी दिल्यावरून ठेवण्यात आले, असे आम्हांला सांगण्यात आले. हा अव्हेन्यूचा रस्ता संपला म्हणजे पुढे ग्रॅनिट दगडांनी बांधलेल्या पायऱ्या लागतात, त्यांची रुंदी ९० फूट आहे. ह्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूस गवतांनी आच्छादिलेला टेरेस ( Terrace ) आहे. पायऱ्या संपल्या म्हणजे पोर्टलॅंड–दगडांनी बांधलेला कठडा लागतो. हा कठडा स्टॉरमॉंट इमारतीच्या दर्शनी भागाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आहे. ह्या इमारतीची लांबी ३६५ फूट व रुंदी १६४ फूट व उंची ७० फूट आहे. मध्यभागी जो टॉवर आहे, तेथे हिची उंची ९० फूट आहे. ह्या इमारतीच्या दर्शनी भागात मध्यभागी उंच व भव्य खांबावर बांधलेला पोर्चसारखा भाग आहे. ह्या पोर्चच्या माथ्यावर काही मूर्ती बसविलेल्या आहेत व एक मूर्ती ग्रेट ब्रिटन व ब्रिटिश साम्राज्य यांच्याकडे राजनिष्ठेची ज्योत घेऊन जात आहे, असा भाव एका शिल्पाकृतीत व्यक्त करण्यात आला आहे. पोर्चला लागून इमारतीच्या मध्यभागी चौकोनी टॉवर आहे व त्या टॉवरवरती मध्यभागी ‘ब्रिटानिया’ची एक मूर्ती व तिच्या शेजारी दोन्ही बाजूस दोन सिंहांच्या मूर्ती आहेत. स्टॉरमॉंट ही इमारत ग्रीक क्लासिकल पद्धतीने बांधलेली आहे. इमारत साधी आहे, पण सर्व बाजूस उभ्या असलेल्या खांबांची व इतर शिल्पाची प्रमाणबद्धता व भव्यता यामुळे इमारत प्रेक्षणीय झाली आहे. ह्या इमारतीत आयरिश पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांचा समावेश झालेला आहे. ह्याशिवाय ह्या इमारतीच्या तळमजल्यावर व पहिल्या मजल्यावर कॉन्फरन्स रूम्स–सभांसाठी दालने, भोजनासाठी दालने, गव्हर्नर, मंत्री पार्लमेंटचे सभासद व संसदीय अधिकारी, यांच्यासाठी दालने इत्यादि दालनांचा समावेश झालेला आहे. उत्तर आयर्लंडच्या सरकारच्या निरनिराळ्या खात्यांच्या कचेऱ्या ह्या इमारतीच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या मजल्याच्या काही भागात आहेत. चवथ्या मजल्यावर भोजनासाठी दालने–स्वयंपाकगृहे इत्यादींचा अंतर्भाव झालेला आहे.

आम्हांला बॅंगोर शहर दाखविण्यात आले. बॅंगोर हे शहर ‘ डाऊन ’, (Down) काउन्टीमध्ये आहे. बॅंगोर शहराची लोकसंख्या २३,००० आहे. हे शहर आयर्लंडमधील सर्वांत मोठे समुद्रकाठचे हवा खाण्याचे ठिकाण–

( Seaside resort ) आहे. ह्या शहराला चार मैलांचा समुद्र किनारा असून तीन सुंदर खाड्या ( Bays )आहेत. शहरासभोवतील समुद्र किनाऱ्या-वरील शोभा विविध प्रकारची आहे. येथे ट्रॉली बस सर्व्हिस आहे. ट्रॉली म्हणजे बसेसना वरच्या बाजूंना ज्या विजेच्या तारा आहेत, तेथून वीज पुरविली जाते. मुंबईला ट्रामगाड्यांच्या वरती विजेच्या तारांना जोडणारे रॉड्स आहेत.' तसेच येथील बसेसना दोन रॉड्स आहेत. मात्र आपल्याकडे ट्राम्स ह्या ( रेल्स ) रूळावरूनच चालतात, परंतु येथील बसेसना रूळ नाहीत, तर आपल्याकडे बसेस जशा रस्त्याने धावतात, तशाच ह्या बसेस रस्त्यावरून जातात. वळणे घेण्यासाठी बसेसच्या वरच्या बाजूस पुलीजची व्यवस्था केलेली आहे. ह्या बसेस वळणे घेतात, तेव्हा मोठ्या गमतीदार दिसतात.

बँगोरमध्ये अनेक सार्वजनिक उपवने ( Public Parks ) आहेत. त्यामधील 'वार्ड पार्क' फारच सुंदर आहे. ह्या पार्कमध्ये बागा आहेत; विविध प्रकारची झाडी व झुडपे (Shrubberics) आहेत. लहान मोठी तळी (Lakes) आहेत व तृणाच्छादित भूभाग ( Lawns ) आहेत. समुद्रकाठीही लांबच्या लांब बागा (Marine gardens) आहेत. ह्या शहरात बाथ्स–स्नानगृहे, गरम पाण्याचे स्नानगृहे, गोल्फ ग्राऊन्डस, टेनिस कोर्टस, आर्चरी–बाणांनी खेळण्याची जागा, यॅट ( Yacht ) क्लब्ज व बोट क्लब्ज आहेत. समुद्रातील मासे पकडण्यासाठी साहित्य पुरविण्याची व्यवस्थाही ठिकठिकाणी आहे. नाटकगृहे व सिनेमागृहेही आहेत. अनेक चर्चेस आहेत. काही ठिकाणी राहण्याच्या घरांचे बांधकाम होत होते, तेही आम्ही पाहिले व तयार झालेली राहण्याची घरेही पाहिली. जरी हे शहर जुने असले तरी त्याची वाढ अलिकडेच झाली आहे. त्यामुळे या शहरात सर्व आधुनिक सुखसोयी आहेत व शहराची रचनाही सुरेख करण्यात आली आहे. मुख्य गोष्ट म्हणजे येथे स्लम्स ( Slums ) घाणेरड्या वस्त्या–मुळीच नाहीत. मोठाली हरित तृणाच्छादित मैदाने या शहराची शोभा वाढवतात. शहर पाहिल्यानंतर आम्ही परत रॉयल हॉटेलात आलो. तेथे रात्रीचे जेवण–डिनर पार्टी–बँगोर बरो काऊन्सिलचे मेयर व सभासद यांनी आम्हांला दिले. ह्या जेवणाच्या शेवटी प्रतिनिधींतर्फे भाषण करण्याचे काम माझ्याकडे होते. मी जे भाषण केले, त्याचा गोषवारा असा, "बँगोर नगरपालिकेचे मेयर, सभासद व मित्रहो,

आयरिश लोक पाहुण्यांचे आतिथ्य करण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. त्याचा अनुभव आम्हांला एका दिवसात आला आहे. तेव्हा तुमच्या आतिथ्याचा स्वीकार कर-ताना आम्हांला जपूनच राहिले पाहिजे. नाही तर जेवणाखाण्यातील अनियमाने अजीर्ण व्हावयाचे. आयरिश हाऊस ऑफ कॉमन्सचे स्पीकर–सभापती–यांनी ह्यापूर्वी आम्हांला बजाविले आहे की, 'आयर्लंड येथील पार्लमेंटरी कोर्स-मध्ये अनेक कार्यक्रम आहेत, बरीच भाषणे महत्त्वाच्या विषयावर होणार आहेत. तेव्हा या कोर्सचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी तुम्हांला परिश्रम करावे लागणार आहेत." तुमच्या आतिथ्याचा हा थाटमाट एकीकडे व दुसरीकडे स्पीकरची सूचना ह्यामुळे मला मोठी अडचण निर्माण झाली आहे. आम्ही जणू जावई आहोत, असे समजून तुम्ही आम्हांला मोठमोठ्या मेजवान्या देत आहात व मेजवान्यांनंतर आम्हांला कामाला जुंपविणार हे जरा चमत्कारिकच वाटते. माझ्या देशात–भारतात–जावयाला जेऊ घातल्यानंतर पलंगावर गाद्यागिरद्या घालून त्याची झोपण्याची व्यवस्था करण्यात येते, पण येथे खमखमीत जेवण झाल्यानंतर आम्हांला काम करावे लागणार आहे. ह्यामुळे थोडे वाईट वाटते. ( ह्या माझ्या विनोदानें खूप हशा पिकला. ) असो ! आम्ही येथे काम करण्या-साठी म्हणजे अनेक गोष्टी शिकण्यासाठी आलो आहोत, तेव्हा ह्या कोर्समध्ये त्या दृष्टीने आयरिश पार्लमेंटच्या कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशनच्या शाखेने जो कार्यक्रम ठेवला आहे, तो यशस्वी करण्याच्या दृष्टीने आम्ही सर्व प्रकारे तुम्हांला साहाय्य करू असे मी आपणांस प्रतिनिधींतर्फे आश्वासन देतो. माझी खात्री आहे की येथील कार्यक्रमाने आमचा सर्वांचा फायदा होणार आहे. आम्ही जसे येथे तुमच्यापासून काही शिकण्यासाठी आलो, तसे आम्हीही तुम्हांला काही देण्यासाठी आलो आहोत. आम्ही निरनिराळ्या देशांचे प्रति-निधी आहोत, तेव्हा आम्ही आमच्या देशांची काही वैशिष्टये बरोबर घेऊन येथे आलो आहोत. त्याची देवाण घेवाण तुमच्याबरोबर ह्या कोर्सच्या निमित्ताने आम्हांला करावयाची आहे. हे कामही आम्ही उत्तम प्रकारे करू अशी माझी खात्री आहे. उदाहरणार्थ, माझा देश भारत हा सहिष्णुता, सदिच्छा, मैत्री व सर्व मानवजातीबद्दल प्रेम ह्याबद्दल विख्यात आहे. ह्या उदात्त भावनांचे थोडे जरी प्रत्यंतर मला माझ्या वागणुकीने तुम्हांला देता आले तर मी स्वतःला धन्य समजेन !

बँगोर वरो काउन्सिलच्या मेयरना—महापौरांना—व सभासदांना धन्यवाद देतो. मेयर व सभासदांनी आम्हांला जे आज जेवण—डिनर पार्टी—दिले व आमचे स्वागत केले, यावद्दल प्रतिनिधींतर्फे त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो."

एकंदरीत माझे भाषण सर्वांनाच फार आवडले. ह्या पार्टीला आयरिश हाऊस ऑफ कॉमन्सचे स्पीकरही हजर होते. त्यांनी व मेयर आणि सभासदांनी माझ्याजवळ येऊन माझ्या भाषणाबद्दल माझे अभिनंदन केले. तसेच यु. के. ब्रँचचे श्री. वँडर फेल्ट व कोर्सकरिता आलेल्या प्रतिनिधींनीही माझे अभिनंदन केले.

जेवणानंतर मी ह्या हॉटेलातील माझ्या खोलीत गेलो. येथे इंग्लंडपेक्षाही जास्त थंडी आहे. माझ्या खोलीत इलेक्ट्रिक हीटर—विजेची शेगडी—ठेवली आहे. त्यामुळे थंडीचा त्रास होत नाही. रात्रीच्या वेळी ह्या खोलीच्या खिडक्यांतून हॉटेलच्या समोरील खाडीची शोभा पाहून मन हरखून जाते. खाडीत अनेक बोटी इकडून तिकडे धावत असतात. त्यांच्यावरील दिव्यांच्या प्रकाशाने प्रकाशित झालेला खाडीतील पाण्याचा भाग रमणीय दिसतो. खाडीच्या बाजूने डोंगरांच्या रांगा आहेत व ह्या डोंगरांच्या उतारावर घरे बांधलेली आहेत. त्या घरांभोवती खूप झाडी आहेत. घराघरांतून विजेच्या दिव्यांचा झगमगाट मला माझ्या खोलीच्या खिडकीतून दिसतो. झाडीझाडींतून झळकणारे ते दिवे पाहून मन मोहित होते. असो ! रात्र बरीच झाली आहे. आता मला झोपले पाहिजे. गुडनाईट !

तुझा

नाना

• • •

: १४ :

# " मनास लागलेली हुरहुर "

रॉयर हॉटेल, बेंगोर
उत्तर आयर्लंड
ता. ९-५-१९५५

चि. **आशास** सप्रेम आशीर्वाद—

येथे आमचा आखलेला कार्यक्रम वेळापत्रकाप्रमाणे व्यवस्थित पार पडत आहे. आयर्लंडची हवा थंड असली तरी उत्साहवर्धक व आरोग्यकारक आहे. भूक सपाटून लागते व दिवसभर काम केल्यामुळे झोपही चांगली येते.

आमच्या या कोर्सच्या कार्यक्रमात नेहमीच आमच्या बरोबर असलेले आयर्लंड पार्लमेंटचे सचीव मेजर जॉर्ज थॉमसन हे मोठे दिलदार, समंजस, शिस्तप्रिय, मेहनती व मनमिळाऊ गृहस्थ आहेत व आयर्लंडच्या पार्लमेंट कचेरीत काम करीत असलेल्या मिस मेकॉले ह्याही श्री. थॉमसनबरोबर आमच्या ह्या कोर्सची व्यवस्था पाहात असतात; त्या सर्व सभासदांच्या सुखसोयींसाठी नेहमीच झटत असतात. त्या शांत व प्रेमळ आहेत.

कोर्ससाठी आलेल्या सर्व सभासदांचे नेहमीचे पत्ते मी त्यांच्याकडून घेतलेले आहेत व त्यांनीही माझा नेहमीचा पत्ता घेतला आहे.

कोर्सचा कार्यक्रम पार पाडीत असता एका गोष्टीने मात्र मी मधून मधून बेचैन होतो व ती म्हणजे तुमच्याकडून मला एकही पत्र अद्याप मिळाले नाही. इतर सभासदांना घरची पत्रे येतात, ते आपली पत्रे मोठ्या आनंदाने व कुतुहलाने वाचतात, ते पत्रे वाचताना त्यांच्या चेहऱ्यांवरील भाव पाहून तर माझा खेद आणखीनच वाढतो. ह्यांना पत्रे येतात व मग माझ्याच पत्रांचे काय होते? आपल्या जिव्हाळ्याच्या मंडळींपासून हजारो मैल दूर अशा आयर्लंडमध्ये

असल्यामुळे अगोदरच मनात नकळत हुरहुर निर्माण होते व त्याशिवाय आपल्या नातलगांचे एकही पत्र नाही, त्यामुळे तर ही हुरहुर फारच वृद्धिगत होते. अशा परिस्थितीत माझ्या मनाची कालवाकालव मी कशी वर्णन करू ? जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे ; असो !

तुझा

नाना

• • •

: १५ :

# " बेलफास्ट : आयर्लंडची शोभिवंत राजधानी "

रॉयर हॉटेल, बँगोर
उत्तर आयर्लंड
ता. १३-५-१९५५

चि. मंगलास सप्रेम आशीर्वाद--

ता. ९ मे ते ता. १३ मेपर्यंत आमचा मुक्काम बँगोरच्या रॉयल हॉटेलमध्ये होता.

ता. १२ मे रोजी तिसऱ्या प्रहरी आम्ही बेलफास्ट शहरात गेलो व ते शहर पाहिले. बेलफास्ट हे उत्तर आयर्लंडचे राजधानीचे ठिकाण आहे. बेलफास्ट हे युनायटेड किंगडममधील प्रमुख बंदरांपैकी एक बंदर आहे. तसेच सर्व जगामध्ये एक महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. हे शहर उत्तर आयर्लंडच्या पूर्व बाजूस वसलेले आहे. आयरिश समुद्रातून ह्या शहराकडे येणारी वाट बेल-फास्ट लॉक मधून ( खाडीतून ) आहे, ही वाट मनोवेधक आहे. कारण बेल-

फास्ट लॉकच्या दोन्ही बाजूला डोंगरांच्या रांगा आहेत. ह्या खाडीच्या किंवा सरोवराच्या जमिनीकडच्या टोकावर ज्या ठिकाणी लॅगान ( Lagan ) नदी बेलफास्ट लॉकमधून समुद्रास मिळते, त्या ठिकाणी हे शहर वसलेले आहे.

हे शहर पाहत असताना प्रथम आम्ही बेलफास्ट सिटी हॉलला भेट दिली. सिटी हॉलची ही इमारत बेलफास्ट शहराच्या मध्यभागी आहे व ती ह्या शतकाच्या प्रारंभी बांधण्यात आली. क्लासिकल रेनासांस–( Classical Renaissance )–शिल्पकला पद्धतीने ती बांधण्यात आली आहे व तिच्या बांधकामासाठी पोर्टलॅंड ( Portland ) नावाचा दगड वापरण्यात आला आहे. तिचा दर्शनी भाग ३०० फूट लांब आहे व त्याच्या मध्यभागी जी त्रिकोणी घडण (Pediment) आहे, तीत हिबेर्निया, मिनर्व्हा (Menerva ) मरक्युरी ( Mercury ), लिबर्टी (स्वतंत्रता), इंडस्ट्री–उद्योग, लेबर–मजूर इत्यादिसंबंधी सांकेतिक ( Symbolical ) आकृत्या बसविलेल्या आहेत, ही इमारत दोन मजली आहे. दुसऱ्या मजल्यावर दर्शनी भागात दोन खांब जोडलेले अशा खांबांच्या रांगा आहेत. ते खांब गोलाकृती व बरेच उंच आहेत. ह्या इमारतीच्या चार बाजूस चार मीनार ( Tower ) आहेत, त्यांची उंची ११५ फूट आहे व इमारतींच्या मध्यभागी एक भव्य घुमट (Dome) आहे. त्याची उंची १७३ फूट आहे. ह्या इमारतीच्या देवडीतून ( Vestibule ) आत प्रवेश केल्यावर एक दिवाणखाना ( Entrance Hall ) लागतो. त्याची लांबी ७० फूट व रुंदी ४० फूट आहे आणि उंची १००फूट आहे. ह्या दिवाणखान्यावर जो मुख्य घुमट आहे, त्या घुमटाचा व्यास ४२ फूट आहे. ह्या घुमटामध्ये कलात्मक ( कौशल्यपूर्ण ) रीतीने तयार केलेला अतिशय मोठा झुंबर आहे. ह्या घुमटामध्ये व्हिस्परिंग गॅलरीज आहेत. या दिवाणखान्याच्या भिंती पॅव्होनॅझो (Pavonazzo) व ब्रेसीया (Brescia) नावाच्या शुभ्र संगमरवरी दगडाच्या आहेत व त्या भिंतींचा पायथा (Plinth) काळ्या संगमरवरी दगडाचा बनविलेला आहे. ह्या दिवाणखान्याची फरसबंदी ( Paving ) काळ्या व शुभ्र संगमरवरी दगडाची आहे. ह्या दिवाणखान्याच्या मागच्या बाजूस मध्यभागी मोठा जिना आहे, तोही शुभ्र संगमरवरी दगडांनी बनविलेला आहे. ह्या दगडात काळ्या रंगाच्या छटा आहेत. त्यामुळे

तर या संगमरवरी दगडात एक नैसर्गिक रेखाचित्र ( Design ) निर्माण झाले आहे. ते मला फारच मोहक वाटले. प्रवेशी दिवाणखान्याशिवाय ( Entrance Hall) ह्या इमारतीत बँक्वेट (Banquet) हॉल, ग्रेट हॉल–मोठा दिवाणखाना, काउन्सिल चेंबरचा दिवाणखाना इत्यादि अनेक दिवाणखाने आहेत व तेही संगमरवरी दगडात बांधलेले आहेत. ग्रेट हॉलची लांबी १२० फूट व रुंदी ५७ फूट आहे; ह्या दिवाणखान्यात जो स्मिर्ना ( Smyrna ) गालिचा टाकलेला आहे, तो किरमिजी रंगाचा असून अपूर्व कलाकुसरीचा नमुना आहे. त्याची किनार अनेक रंगांच्या चित्रविचित्र आकृतीने नटलेली आहे. हा गालिचा १९५३ मध्ये येथे राणी एलिझाबेथ दुसरी आली तिच्या स्वागतार्थ प्रथम टाकण्यात आला. त्यापूर्वीचा येथील गालिचा १९४१ मध्ये दुसऱ्या महायुद्धात बाँब हल्ल्यांनी नष्ट झाला.

सिटी हॉलशिवाय इतरही अनेक इमारती ह्या शहरात आहेत. त्यांपैकी प्रमुख म्हणजे रॉयल कोर्टस ऑफ जस्टिस, म्युझियम अँड आर्ट गॅलरी, सेंट अॅनीज कॅथेड्रल, क्वीन्स युनिव्हर्सिटी व कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी ह्या होत. ह्या शहरात अकरा सार्वजनिक पार्कस–उपवने आहेत व त्यांचे क्षेत्रफळ चार एकरांपासून १३७ एकरांपर्यंत आहे. अनेक पार्कमध्ये क्रिकेट, टेनिस, फूटबॉल, पिच अँड पट ( Pitch & Putt ) इत्यादि खेळ खेळण्यासाठी सोयी केलेल्या आहेत. ह्या पार्कसमध्ये बोटॅनिक गार्डन्स हेही एक उपवन आहे. मुंबईत जसे राजाभाई टॉवर आहे, तसे एक क्लॉक टॉवरही येथे आहे. त्याला अल्बर्ट मेमोरियल टॉवर म्हणतात.

बेलफास्ट शहर पाहिल्यानंतर आम्ही बेलफास्ट येथील शिपयार्डस म्हणजे ज्या ठिकाणी गलबते बांधण्याचे काम होते, ते ठिकाण पहावयास गेलो. लहान मोठी जहाजे व गलबते तयार करण्याविषयी बेलफास्ट सर्व जगात प्रसिद्ध आहे, हे तुला माहीत आहेच. आम्ही शिपयार्डला गेलो त्यावेळी मोठमोठी जहाजे बांधली जात होती, काही जवळजवळ तयार होत आलेली दिसली. तयार झालेले एक जहाज डॉकमधून समुद्रात कसे सोडले जाते, याचे प्रात्यक्षिकही आम्ही पाहिले. शेकडो मजूर व तज्ज्ञ ती जहाजे तयार करण्यात मग्न होते.

बेलफास्ट शिपयार्ड पाहिल्यानंतर महापौर सर पर्सिव्हल ब्राऊन यांनी आम्हांला बेलफास्ट किल्ल्याकडे नेले. हा किल्ला उंच डोंगरावर बांधलेला

आहे. आम्ही मोटारीने या किल्ल्यागडे गेलो. रस्ता वळणे घेत घेत किल्ल्याकडे गेलेला आहे. या रस्त्याने जाताना बेलफास्ट शहर व शहराजवळील खाडी, यांची तसेच समोवारच्या निसर्गाची अवर्णनीय शोभा दिसत होती. किल्ल्यावर गेल्यानंतर तो किल्ला आम्हांला दाखविण्यात आला. हा किल्ला मजबूत असून, याची बांधणी जुनी आहे. येथे महापौर सर ब्राऊन यांनी आम्हांला जेवण ( Supper ) दिले. जेवण संपल्यावर आम्ही परत बँगोर येथील रॉयल हॉटेलात आलो.

आज माझे चुलतबंधू चि. ज्ञानदेव यांचे पत्र मला मिळाले. त्यांनी ते पत्र बेलापूर, जि. अहमदनगर येथून पाठविले आहे. त्याच्यावरून गुहा—आपले मूळचे गाव व बेलापूर येथील मंडळींची खुशाली कळली. त्यामुळे मनास बरे वाटले. तुमचीही पत्रे वरचेवर येत जावीत.

तुझा

**नाना**

● ● ●

: १६ :

## " सुंदर लंडनडेरीच्या सुंदर ललना "

**स्ट्रँड हॉटेल, पोर्ट स्टुवर्ट**

**उत्तर आयर्लंड**

ता. १४–५–१९५५

चि. **उषास** माझा सप्रेम आशीर्वाद—

ता. १३ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजता आम्ही अहोगिलहून पोर्ट-स्टुवर्टकडे प्रयाण केले. पोर्ट स्टुवर्टकडे ज्या रस्त्याने आम्ही गेलो, तो टाररोड

आहे. कोठेही खाचखळगे नाहीत, त्यामुळे प्रवासात त्रास होणे शक्यच नव्हते. रस्ता वळणे घेत घेत गेलेला आहे, रस्त्यात कधी नद्या, तर कधी डोंगरांच्या रांगा, तर कधी सुंदर शहरे व गावे, तर कधी दाट वने, तर कधी समुद्रकिनारा लागत. त्यामुळे प्रवास फार मजेत झाला. रस्त्यात कलीबॅके ( Cully-backay ), बॅलीमनी (Ballymoney) व कॉलरैन (Coleraine) ही मोठी शहरे लागली. यांपैकी कॉलेरैन हे एक महत्त्वाचे शहर आहे. ते बॉन ( Bann ) नदीच्या काठी वसलेले आहे, हे लहानसे बंदर–(Port) ही आहे. हे शहर फारच सुंदर आहे. हे शहर सॉलमॉन मासे, व्हिस्की, लिनन, व मिनरल वाटर्ससाठी प्रसिद्ध आहे. तसेच उत्तर आयर्लंडच्या एका प्रसिद्ध गाण्याला ' Kitti of Coleraine ' ह्या शहराने स्फूर्ती दिली आहे.

A beautiful kitty one
Morning was tripping
With a pitcher of milk from
The fair at coleraine "

ह्या त्या गाण्यातील ओळी अनेक आयरिश लोक गुणगुणतांना तुम्हांला दिसतील.

हिंदुस्थानात प्रसिद्धीस आलेले लॉरेन्स घराण्यातील पुरुष हे कॉलेरैन शहराचे रहिवासी होते.

पोर्ट स्टुवर्ट येथे आम्ही सायंकाळी सुमारे सात वाजता पोहोचलो. ह्या शहराच्या स्ट्रॅंड हॉटेलात आम्ही उतरलो. हे हॉटेल अगदी समुद्राच्या किनाऱ्यावर उंच टेकडीवर आहे. येथे आमचा मुक्काम दोन दिवस झाला. स्ट्रॅंड हॉटेलात मी ज्या खोलीत उतरलो होतो तेथून समुद्राचा व समुद्राच्या बीचचा सुंदर देखावा दिसत होता. तो पाहून माझे मन मोहून जाई.

पोर्ट स्टुवर्ट हे समुद्रकाठचे हवा खाण्याचे प्रसिद्ध ठिकाण आहे. मुंबईला जसा मरिन ड्राईव्ह ( आता नेताजी सुभाषचंद्र रोड ) आहे, तसा ह्या शहराच्या समुद्राच्या बाजूला एक रस्ता आहे. बरेच लोक करमणुकीने सहल करण्यासाठी येथे येतात. ह्या रस्त्याच्या एका बाजूस टेकड्या आहेत. ह्या रस्त्याने चालत, समुद्रांच्या लाटांचे मधूर संगीत ऐकत व टेकड्यांची व समुद्राची अवर्णनीय शोभा पाहत तासन तास घालवावेत, असे वाटते. येथे आल्यापासून थंडीने मात्र फारच जोर केला आहे. आजूबाजूला

डोंगरावर बर्फ पडला आहे, त्यामुळे थंडी तर आणखीनच वाढली आहे, पण मला येथील बीच–समुद्रकाठचे वालुकामय मैदान–इतके आवडले की मी एक दिवस सकाळीच उठून तेथे फिरावयास गेलो, थंडी खूप होती, पण पर्वा केली नाही, ह्या बीचच्या एका बाजूस समुद्र व दुसऱ्या बाजूस टेकड्या आहेत. टेकड्या व समुद्र ह्यांच्यामधून ह्या बीचवर हिंडत असता मी देहभान विसरलो, तर मग थंडीचा मला विसर पडला, तर नवल काय ? मी जेव्हा परत स्ट्रँड हॉटेलात परतलो, तेव्हा हॉटेलाच्या कॉरिडॉरमध्ये मला श्री. डोहर्टी भेटले. त्यांनी मला विचारले, "इतक्या सकाळी कोठे गेला होता ?" मी जेव्हा त्यांना सांगितले की "बीचवर फिरावयास" तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले व व ते म्हणाले, "शाबास बहादूर ! एवढ्या थंडीत तुम्हीच सकाळी बीचवर फिरावयास जाऊ शकलात !" पण त्यांना काय माहीत की बीचच्या सौंदर्य मंदिरेने मला कोणती धुंदी चढविली होती, पण ह्या थंडीला भीक न घालणारी मी एक बाई पाहिली. ती इंग्लंडहून येथे आली होती, व स्ट्रँड हॉटेलात उतरली होती. त्यावेळी पोर्टस्टुवर्ट येथे गोल्फच्या मॅचेस चालल्या होत्या. त्या मॅचेसमध्ये (शर्यतीमध्ये) भाग घेण्यासाठी ती येथे आली होती. सकाळीच उठून ती मॅचेस खेळावयास जावयाची. अर्थात तिला धुंदी होती गोल्फ खेळाची ! ह्या शहरात दोन चांगले गोल्फ कोर्सेस आहेत.

ता. १४ मे रोजी सकाळी आम्ही पोर्टस्टुवर्टहून लंडनडेरी ह्या शहरास गेलो. लंडनडेरी हे शहर लंडनडेरी काउन्टीचे प्रमुख ठिकाण आहे. तेथे गेल्यावर पार्लमेंटरी कोर्सच्या प्रतिनिधींचे लंडनडेरीचे महापौर श्री. एस. एस. डॉउडस (Dowds) यांनी व टाऊन क्लार्क श्री. आर. एच. हेंडरसन यांनी स्वागत केले. नंतर त्यांनी आम्हांला लंडनडेरी शहर दाखविले व लंडनडेरी शहराची ऐतिहासिक, सामाजिक व इतर माहिती सांगितली.

'लंडनडेरी' हे शहर उत्तर आयर्लंडमधील दुसऱ्या नंबरचे मोठे शहर आहे. ते बेलफास्ट शहराच्या खालोखाल आहे. ते फॉईल (Foyle) नदीच्या दोन्ही तीरावर वसलेले आहे. नदीच्या दोन्ही बाजूचे शहराचे भाग क्रैगॉव्हॉन (Craigavon) ह्या नावाच्या पुलाने जोडलेले आहेत. ही नदी "फॉईल लॉक्" ला (खाडीला) मिळते. ही खाडी अरुंद पण २१ मैल लांबीचीआहे. ह्या खाडीमुळे लंडनडेरी हे पोर्ट बनलेले आहे व त्या पोर्टवर १०,००० टन पर्यंतची

जहाजे येऊ शकतात. सेंट कोलम्बा (St. columba) यांनी इ. स. ५४६ मध्ये येथे आपला पहिला मठ ( Monastery ) स्थापिला. तेव्हापासून लंडनडेरी प्रसिद्धीस आले. हा मठ सेंट कोलंबा यांनी ओक झाडांच्या कुंजामध्ये (Grove) स्थापिला. सेंट कोलंबास ओक झाडांची फार आवड होती. लंडनडेरीचे पहिले नाव डेरी होते. ' डेरी ' ह्या शब्दाचा अर्थ ' ओक झाडांचे कुंज ' ( Oak grove ) असा आहे. तेव्हा सेंट कोलंबाच्या ओक कुंजावरून हे नाव ह्या शहरास पडले हे स्पष्ट होते.

स्कँडिनेव्हिअन व अँग्लो नॉर्मन ह्या लोकांनी ह्या शहरावर अनेक स्वाऱ्या केल्या व सेंट कोलंबाच्या मठाची व शहराची लूटमार व जाळपोळ केली.

आम्हांला लंडनडेरीचे जे लोक भेटले ते व त्यातल्या त्यात स्त्रिया मोठ्या अभिमानाने आम्हांला डेरीचा चिकाटीचा, सहनशक्तीचा, तीव्र प्रतिकाराचा, शौर्याचा व बहादुरीचा इतिहास सांगत. ते मोठ्या प्रौढीने आम्हांला सांगत की, " आजही पूर्वीप्रमाणेच लंडनडेरीचे ' नो सरंडर '–शरणागती नाही, त्रिवार नाही, ' हे ब्रीद वाक्य आहे. लंडनडेरी भोवती जी भिंत आहे, ती भिंत १६१७ मध्ये बांधण्यात आली. आजही ती भिंत चांगल्या स्थितीत आहे. ह्या भिंतीचा घेर एक मैलाचा आहे. तिची रुंदी १४ फुटापासून ३७ फुटापर्यंत आहे आणि उंची २० फूटांपासून २५ फुटांपर्यंत आहे. हल्ली सहल करण्यासाठी भिंतीचा उपयोग करण्यात येतो. पूर्वी ह्या भिंतीला चार दरवाजे होते; पुढे रहदारीच्या सोयीसाठी आणखी तीन दरवाजे पाडण्यात आले, ह्या दरवाजांखेरीज मात्र ह्या भिंतीत कुठलाही फरक डेरीच्या लोकांनी केला नाही व त्या भिंतीची वेळोवेळी डागडूजी करून ती पूर्वीच्या स्थितीत होती तशी ठेवण्याचा त्यांनी कसोशीने प्रयत्न केला आहे. ऐतिहासिक मान्यूमेंटस्ना–इमारतींना व वास्तूंना–हे लोक किती जपतात, हे यावरून कळून येते. लंडनडेरीची वस्ती वाढत वाढत गेली आहे व ती आता ५०,००० च्या आतबाहेर आहे. जुन्या डेरीच्या भिंतीबाहेरही आता वस्ती वाढलेली आहे. आम्ही जेव्हा ह्या शहराची भिंत पाहिली तेव्हा आम्हांला ह्या भिंतीच्या बुरजांवर तोफा मांडलेल्या दिसल्या. त्या तोफांमध्ये ' रोअरिंग मेग ' ( Roaring Meg ) गरजणारी तोफ–या नावाची एक तोफ आहे.

१९१४–१९१७ ह्या पहिल्या महायुद्धात व १९३९–१९४५ च्या दुसऱ्या महायुद्धात जे उत्तर आयर्लंडचे लोक कामास आले व ज्यांनी देशाची सेवा केली,

त्यांच्या स्मरणार्थ बांधलेले स्मारकही आम्ही पाहिले, ते मनुष्याचे चित्त वेधणारे आहे.

आयरिश लोक पडदा ठेवून बोलत नाहीत की वागत नाहीत. त्यांच्या ठिकाणी मला मनमोकळेपणा दिसला. लंडनडेरीच्या स्त्रिया यांच्या रूपाबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांच्या सौन्दर्यावर एका कवीने कविता केली आहे. मला एका गृहस्थाकडून तेथे त्या कवितेतील एक कपलेट–एक चरण–ऐकावयास मिळाला, तो असा––

" The sweet girls of Derry are
comely and merry
They have lips like cherry
and teeth like the snow "

ह्या ओळींचा भावार्थ असा की, ' डेरीच्या मुली सुंदर, सुबक बांध्याच्या व आनंदी आहेत. त्यांचे ओठ चेरी फळासारखे लालबुंद आहेत व दात बर्फासारखे शुभ्र आहेत. " लंडनडेरीच्या तरुणी पाहून मला त्या कवितेतील वर्णनाचे प्रत्यंतर आले.

जेवण आटोपल्यावर आम्ही पोर्टस्टुवर्ट येथे जाण्यास परतलो. वाटेत आम्हांला रो ( Roe ) नदीच्या किनाऱ्यावर असलेले लिमावडी ( Limavady ) शहर लागले. ते शहर लहान आहे, पण संपन्न आहे. रो नदीचे खोरे शोभिवंत आहे. लिमावडी याचा अर्थ ' कुत्र्याची उडी ' (Dogs Leap) असा होतो; ह्या शहरात " पेग ऑफ लिमावडी " ह्या नावाची खाणावळ आहे. इंग्लिश लेखक श्री. थॅकरी (Thackery) हे जेव्हा १८४२ साली येथे आले, तेव्हा त्यांना ह्या खाणावळीनेच " पेग ऑफ लिमावडी " ह्या नावाचीच कविता लिहिण्यास स्फूर्ती दिली.

सायंकाळी ६। वाजता आम्ही पोर्टस्टुवर्ट येथील स्ट्रँड हॉटेलात आलो व रात्रीचे जेवण तेथे घेतले.

आजचा मुक्कामही येथेच झाला. रात्र झाली आहे. झोपले पाहिजे. अच्छा, गुडनाईट––शुभ रजनी.

तुझा

**नाना**

● ● ●

: १७ :

# जगातील आठवे आश्चर्य

रॉयल हॉटेल, बँगोर
उत्तर आयर्लंड
ता. १९–५–१९५५

चि. विठ्ठल यास सप्रेम आशीर्वाद—

आज ता. १५ मे. आज सकाळी कोर्सचा काही कार्यक्रम नव्हता. त्यामुळे फुरसतीचा वेळ होता. मला तो हवा होता. कारण पोर्टस्टेवर्ट येथील बीचवर समुद्राचा वालुकामय किनारा–व त्याचप्रमाणे समुद्र किनाऱ्याला लागून असलेल्या येथील प्रॉमिनॉडवर–सहलीसाठी रस्ता–फिरावयास जावयाचे होते. मागच्या माझ्या पत्रात ह्या बीचचे व प्रॉमिनाडचे वर्णन केलेले आहे. ही दोन्ही मला आवडली. आज मी येथे मनसोक्त हिंडलो व ह्या स्थळांच्या आजूबाजूच्या निसर्ग सौंदर्याची मजा लुटली.

स्ट्रॅंड हॉटेलात दुपारचे जेवण–लंच झाल्यावर आम्ही उत्तर आयर्लंडमधील 'जायंट्स कॉजवे–( Gaints Causeway )–हे जगप्रसिद्ध स्थळ पाहावयास निघालो. रस्त्यात पोर्टरश शहर ( Port-Rush ) व रश नदी ( Rush River ) पाहिली.

पोर्टरश हे गोल्फ खेळणाऱ्यांचे व समुद्रात स्नान करणाऱ्यांचे नंदनवन समजले जाते. पोर्टरशच्या तिन्ही बाजूंनी अॅटलांटिक समुद्र आहे. पोहण्यासाठी सोयीची व सुंदर ठिकाणे येथे निसर्गानेच तयार केलेली आहेत. समुद्र किनाऱ्यावर अनेक ठिकाणी बीचेस–वालुकामय किनारा–आहेत व येथील वाळू सोन्यासारखी पिवळी आहे. रश नदीत उत्तम मासे मिळतात, त्याबद्दल ती प्रसिद्ध आहे. पुढे बुशमिल्स ( Bush mills ) हे शहर लागले.

येथे जगातील नामांकित व उत्तम व्हिस्की तयार होते. हे शहर ' बुश ' नदीवर वसलेले आहे. तेही ' साल्मॉन ' मासे याकरिता प्रसिद्ध आहे. इतरही शहरे व गावे लागली. किती तरी नद्या, ओढे आम्ही ह्या रस्त्याने ओलांडिले. आमच्या-बरोबर मेजर थॉमसन नेहमी असत. ते आम्हांला प्रवासात रस्त्याने लागणाऱ्या शहरांची, नद्यांची व इतर स्थळांची माहिती देत होते. दुपारी २॥।–३ वाजण्याच्या सुमारास आम्ही जायंट्स कॉजवेला पोहोचलो. हे स्थळ समुद्रकाठी आहे. खरोखर हे स्थळ हे एक मोठे आश्चर्य आहे. आणि जायंट्स कॉजवेला जगातील आठवे आश्चर्य मानण्यातही येते. जायंट्स कॉजवे अँट्रीम कॉउन्ट्रीत आहे. जायंट्स कॉजवे याचा मराठीत शब्दशः अर्थ ' राक्षसाचा पूल ' असा आहे. ह्या स्थळाच्या एका बाजूस डोंगर आहे व दुसऱ्या बाजूस समुद्र आहे. त्या डोंगरात अनेक दऱ्या आहेत व तो अतिशय ओबडधोबड व दुर्गम आहे. हा डोंगर व समुद्र यांच्यामध्ये जी जागा आहे, तेथे चित्रविचित्र आकारांचे असंख्य खडक आहेत, एवढेच नव्हे तर त्या चमत्कारिक आकारांच्या खडकांच्या अनेक प्रकारांच्या विलक्षण रचना आहेत. काही पायऱ्या पायऱ्या सारख्या रचना आहेत,तर काही निमुळत्या होत गेलेल्या आहेत. ह्या रचनांचा पसाराही फार विस्तृत व मोठा आहे, जणू कोणी दगड घडून एकांवर एक मांडले आहेत व त्यांतून ह्या आश्चर्यकारक रचना तयार केल्या आहेत. अशी एक आख्यायिका आहे की फिन मॅकौल ( Finn Macoul ) नावाच्या प्रसिद्ध आयरिश राक्षसाने ही रचना केलेली आहे व त्याचा हेतू उत्तर आयर्लंड व स्कॉटलंड यांच्यामध्ये जो समुद्र आहे, त्यावर पूल बांधण्याचा होता. त्या पुलावरून त्याला सहज स्कॉटलंडमध्ये जाता यावे व तसेच आयर्लंडमध्ये परत येता यावे. कोणी म्हणतात की ह्या आयरिश राक्षसाचा स्कॉटलंडमधील प्रतिस्पर्धी दुसरा राक्षस होता व त्यांनी ह्या रचना करून पूल बांधण्याचा प्रयत्न केला. हेतू हा की त्याला आयर्लंडमध्ये येता यावे. अर्थात दुसरा एक तर्क किंवा उपपत्ती ह्या अद्भुत रचनांविषयी आहे. ती म्हणजे अशी की भूगर्भाच्या शास्त्राच्या नियमाने या रचना झालेल्या आहेत. ज्वालामुखीचा अवाढव्य स्फोट होऊन त्यातून जो रस बाहेर पडला, त्यातून ह्या रचना झाल्या असल्या पाहिजेत, असे भूगर्भशास्त्रज्ञांचे मत आहे. हा दुसरा सिद्धांत बुद्धीला पटण्यासारखा आहे व माझ्या मते तोच

...वी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम
क्रमांक ........ दि: ........


बरोबर आहे. ह्या कॉजवेने कवींनाही स्फूर्ती दिली आहे. एका कवीची खालील कविता मोठी मार्मिक आहे—

"With skill so like, yet so
surpassing art,
With such design so just in
every part;
That reason pauses doubtful
if it stand
The work of mortal or
immortal hand."

ह्या 'जायंट्स कॉजवे' वरील कवितेचा अर्थ असा:—"ह्या कॉजवेच्या रचना कौशल्यपूर्ण आहेत व कुठल्याही कलेपेक्षा वरचढ आहेत, ह्या रचनांना असे आकार दिले आहेत की त्यांच्या प्रत्येक अंगात प्रमाणबद्धता आलेली आहे, ह्या रचना पाहून मनुष्याची बुद्धी गुंग होऊन जाते व ह्या रचना मानवाने तयार केल्या आहेत की हे कोणा अमर देवदूताचे काम आहे, असा भ्रम निर्माण होतो ( किंवा अशी शंका उत्पन्न होते. )

ह्या रचना ज्या खडकाच्या बनलेल्या आहेत, तो काळा बासाल्ट ( Basalt ) नावाचा खडक आहे.

जायंट्स कॉजवे हे त्याच्या चित्रविचित्र आकारांमुळे प्रवाशांचे एक मोठे आकर्षण बनावे, ह्यात काही नवल नाही.

ह्या जायंट्स कॉजवेवर आमचा एक फोटोही घेण्यात आला. जायंट्स कॉजवे पाहिल्यानंतर आम्ही तेथून मैल दोन मैल अंतरावर असलेला डनल्यूस (Dunluce) नावाचा किल्ला पाहिला. तो अतिशय पुरातन आहे. तो पाहत असताना आपण जुन्या काळात वावरत आहोत, असा मला भास झाला.

कॉजवे पाहून आम्ही परत फिरलो. रस्त्यात पोर्ट बालिंट्री (Port Ballintrae ) ह्या शहरातील 'बेहचू' हॉटेलात आम्ही थांबलो. ह्या 'बेहचू' हॉटेलातून पोर्ट बॉलिंट्री शहराजवळील समुद्र किनाऱ्याचे जे दृश्य दिसते,ते फारच रम्य आहे, नेहमीच लक्षात राहणारे आहे.तेथे उत्तर आयर्लंडच्या

पार्लमेंटचे सभासद सर वुलियम मॅक्लीरी (Mc-cleery) यांनी आमचे स्वागत केले व त्या हॉटेलात आम्हांला चहा दिला. तेथून आम्ही पोर्टस्टेवर्ट येथील आमच्या मुक्कामी म्हणजे स्ट्रँड हॉटेलात परतलो. रात्रीचे जेवण तेथेच झाले. जेवणाच्या वेळी उत्तर आयर्लंडच्या सरकारतर्फे गृहमंत्री श्री. जी. बी. हन्ना हे हजर होते. त्यांच्या पत्नी श्रीमती हन्ना ह्याही उपस्थित होत्या. जेवणानंतर कोर्सच्या प्रतिनिधींतर्फे केनियाचे प्रतिनिधी श्री. मॅथू यांनी भाषण केले. श्री. मॅथू यांचे भाषण फारच परिणामकारक झाले. ते म्हणाले, "मी एका गुलाम राष्ट्राचा प्रतिनिधी म्हणून येथे आलो आहे. माझा देश 'केनिया' हा ब्रिटिश साम्राज्यातील एक वसाहत आहे. केनिया स्वातंत्र्यासाठी झगडतो आहे; ब्रिटिश लोक आम्हांला स्वातंत्र्याच्या नावाखाली बेगडी सुधारणांची राज्यघटना देत आहेत, पण आम्हांला अशी सुधारणा नको आहे, त्याने आमचे समाधान होणार नाही. कुठल्या एका जाहिरातीत जे चित्र मी पाहिले, त्या चित्रात चुलता आपल्या पुतण्यास काही कपडे घेऊन देत आहे व तो पुतण्या त्या कपड्यांवर नाराज आहे. तो आपल्या चुलत्याचा पोषाखाकडे बोट दाखवून म्हणतो की 'काका ! मला तुम्ही देत आहात तसले कपडे नको आहेत, तुम्ही तुमच्या अंगात जो सूट, नेक्टॉय, हॅट वगैरे कपडे घातले आहेत, तसे कपडे व तसा पोषाख मला हवा आहे.' ह्या चित्रातील पुतण्याच्या भाषेत मला इंग्रज राज्यकर्त्यांना सांगावयाचे आहे की, "तुम्ही केनियास जी बेगडी व मामुली लोकशाही राज्यघटना देत आहात, ती आम्हांला नको आहे. तुमच्या देशात—ग्रेट ब्रिटनमध्ये—जशी लोकशाहीची राज्यघटना आहे, तशी राज्यघटना केनियातील लोकांना हवी आहे. त्याशिवाय आमचे समाधान होणार नाही." मॅथूचे सडेतोड व मार्मिक भाषण मला फार आवडले. त्यांचे भाषण संपल्यावर मी त्यांचे अभिनंदन केले, इतरही प्रतिनिधींनी त्यांना धन्यवाद दिले. जे आयरिश व इंग्रज लोक त्यावेळी जेवणास हजर होते, त्यांनीही मॅथूचे भाषण शांतपणे ऐकले. त्यांचे भाषण ऐकून त्या इंग्रज व आयरिश लोकांना राग आला नाही, निदान त्यांनी तो शब्दांनी अगर चर्येवरील भावांनी व्यक्त केला नाही. 'मॅथू आपले पाहुणे आहेत, तेव्हा त्यांचा अनादर करता कामा नये' हा भाव त्यांच्या ठिकाणी होता. शिवाय इंग्रज व आयरिश लोकांना प्रामाणिक, सडेतोड व निर्भीड विचार आवडतात, मग ते त्यांच्या विरोधी असलेल्या लोकांकडून

ग्रं. क्र.

व्यक्त झाले तरी त्यांना त्याबद्दल राग येत नाही. त्यांचा हा सुसंस्कृतपणा व संयम पाहून मी त्यांनाही मनातल्या मनात धन्यवाद दिले.

स्ट्रँड हॉटेलात आमचे तीन मुक्काम झाले. ता. १६ मे रोजी सकाळी आम्ही येथून वेलफास्टकडे जावयास निघालो. ज्या रस्त्याने आम्ही हा प्रवास केला, तो समुद्र किनाऱ्याने जातो म्हणून त्याला 'कोस्ट रोड' असे म्हणतात. हा रस्ता सुमारे ४० मैलांचा आहे. ह्या रस्त्याच्या एका बाजूला समुद्राचे निळे पाणी, दुसऱ्या बाजूला ठिकठिकाणी उभ्या चढाचे (Steep) पहाड आहेत. समुद्रास वळणे घेत घेत हा रस्ता जातो. अनेक उपसागर (Bays) ह्या रस्त्याने पाहावयास मिळतात. किती तरी ठिकाणी जमिनीची भूशिरे (Head Lands) समुद्रात जाऊन समुद्राचे चुंबन घेत आहेत, असे वाटते, अशी एका पाठीमागून एक बदलणारी सुरेख दृश्ये ह्या रस्त्याने जाताना लागतात. समुद्र किनाऱ्यांची ती दृश्ये मनास आल्हादित करीत होती. निसर्ग सौन्दर्याने नटलेला हा रस्ता पाहून माणसाचे मन आनंदाच्या हिंदोळ्यावर झोके घ्यावयास लागते. ह्या रस्त्याने जाताना आम्हांला कुशेल्डुन (Cushendun) हेही गाव लागले. ह्या गावाजवळ अनेक दऱ्या ( Glens ) आहेत. त्या ठिकाणी गर्द झाडी आहे. ह्या दऱ्यांतून वाहणारे पाणी ज्या ठिकाणी समुद्रास मिळते, ती ठिकाणे मोठी रम्य आहेत. अँट्रिम काउन्टीत हे एक लहानसे पण छानदार गाव आहे. ह्या गावाला कवी व कलावंत यांचे घर म्हणतात. ह्या ठिकाणी आयर्लंडचे व्यापारी खात्याचे मंत्री कर्नल लॉर्ड ग्वेंट टोरन यांनी आमचे स्वागत केले. कुशन्डुन गावातील 'बे' ( Bay ) हॉटेलात आम्ही दुपारचे जेवण घेतले. येथील रमणीय वातावरणात जेवण घेत असताना आपण स्वर्गसुख अनुभवीत आहोत, असे मला वाटले.

आम्हांला या रस्त्याने जे ( Bays ) उपसागर लागले त्यात ग्लेनार्म ( Glenarm ) हा उपसागर फारच मनोवेधक आहे. ह्या उपसागरावर ग्लेनार्म हे एक गावही आहे; येथे अर्ल ऑफ अँट्रिमचे राहण्याचे मुख्य ठिकाण ( Seat ) आहे. त्यानंतर आम्हांला 'मॅडमन्स वुइन्डो' (Madman's window) ही एक विस्मयकारक चीज पाहावयास मिळाली. पहाडावरून अनेक शिळा (खडक) घसरून घसरून एक खिडकीसारखी रचना येथे तयार

झाली आहे. ती दिसण्यास मोठी चमत्कारिक दिसते म्हणूनच तिला आयरिश लोकांनी ' मॅडमन्स वुइंन्डो ' म्हणजे ' वेडयाची खिडकी ' हे सार्थ नाव दिलेले दिसते. तसेच पुढे आम्ही या कोस्टरोडने–समुद्र किनाऱ्याच्या रस्त्याने–जात असता दुसरी एक और चीज आम्हांला पाहावयास मिळाली, ती म्हणजे "दी व्हाईट लेडी" म्हणजे " शुभ्र कुलीन स्त्री." एका शुभ्र खडकात निसर्गशक्तीने एक आकार तयार झालेला आहे व तो स्त्रीसारखा दिसतो म्हणून त्याला ' शुभ्र स्त्री ' असे नाव पडले आहे.

कुशेन्डुनहून निघून आम्ही बेलफास्ट येथील बंदराचा कारभार पाहणाऱ्या हार्बर कमिशनर्सच्या कचेरीत आलो. ह्या बंदराची व्यवस्था व कारभार कसा असावा, हे ठरविणारा ' बेलफास्ट हारबर अॅक्ट ' नावाचा कायदा आहे. ह्या कायद्यान्वये ' हार्बर कमिशनर्स ' ही संस्था निर्माण करण्यात आली आहे व ही संस्थाच बेलफास्ट बंदराचा कारभार पाहते. ह्या कारभाराची माहिती चेअरमन श्री. केन्नेथ यांनी आम्हांला दिली. आम्ही ज्या बोटीत बंदरांतील प्रवास केला, त्या बोटीत बेलफास्ट हार्बर कमिशनर्सनी आम्हांला चहा दिला. त्या बोटीतील एका मोठ्या दालनात खुर्च्या–टेबल्स मांडून चहापार्टीची व्यवस्था करण्यात आली होती. चहूकडे बंदराचा सुंदर देखावा व त्या पार्श्वभूमीवर बोटीतील तो चहापार्टीचा कार्यक्रम झाला; त्या ठिकाणी चहा घेताना आपण वेगळ्याच वातावरणात आहोत, असे मला वाटले. हा चहापार्टीचा कार्यक्रम होत असताना बोटीवर काम करणारे एक अधिकारी मला भेटले. त्यांना दोन मुलगे आहेत. मी त्यांना विचारले की ते आता काय करतात, तेव्हा ते म्हणाले, " दोन्ही मुलगे मोठे झाले आहेत. एक आफ्रिकेत आहे. तेथे त्याची शेती आहे, ती शेती तो पाहतो ! व दुसरा ऑस्ट्रेलियात गेला आहे. " उसासा टाकून पुढे ते म्हणाले, " Birds when grown fly away " म्हणजे " पक्षी मोठे झाले म्हणजे ते उडून जातात. " त्यांच्या त्या शब्दांत मूर्तिमंत कारुण्य भरलेले होते. संसाराचे असारत्व व क्षणभंगूरत्व जणू त्यांच्या त्या शब्दांतून बाहेर पडत होते. अजूनही ते त्यांचे शब्द माझ्या कानांत कधी कधी गुणगुणतात.

तुझा
**नाना**

● ● ●

: १८ :

# शांत दरी

स्टीव्ह डोनार्ड हॉटेल,
न्यू कॅसल
उत्तर आयर्लंड
ता. २०–५–१९५५

चि. आशाला सप्रेम आशीर्वाद—

ता. १७ मे रोजी उत्तर आयर्लंडचे गव्हर्नर लॉर्ड वेकहर्स्ट यांनी कोर्सच्या प्रतिनिधींना दाखविण्यासाठी काही फिल्म्स ( Films ) पाठविल्या. त्या फिल्म्स दाखविण्याची व्यवस्था 'स्टॉरमाँट' येथील एका मोठ्या दालनातच केली होती. त्या फिल्म्स उत्तर आयर्लंडच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक जीवनासंबंधी होत्या, त्या पाहून आम्हांला उत्तर आयर्लंडची ओळख होण्यास जास्तच मदत झाली.

ता. २० मे रोजी आम्ही 'माऊन्टन्स ऑफ मोर्न' ( Mountains of Morne ) म्हणजे 'मोर्न पर्वत' व 'सायलेंट व्हली' ( Silent Valley) म्हणजे 'शांत दरी' पाहावयास गेलो. मोर्न पर्वत व सायलंट व्हॅली ही दोन्ही डाऊन काऊन्टीमध्ये आहेत. मोर्न पर्वताच्या जवळ गेल्यावर रस्ता त्या पर्वताला वळसे घालून जातो. ह्या रस्त्याच्या एका बाजूला त्या पर्वताच्या रांगा व दुसऱ्या बाजूला समुद्र आहे. ह्या रस्त्याने जाताना आम्हांला त्या पर्वताची व समुद्राची जी दृश्ये पाहावयास मिळाली, ती मनास मोहिनी घालणारी होती. ह्या पर्वताच्या उतरणीवर ठिकठिकाणी गवताची राने आहेत, तेथे मेंढ्यांची कळपे चरत असलेली दिसली.

'सायलेंट व्हॅलीच्या–शांत दरीच्या–बाजूने ज्या पर्वताच्या रांगा आहेत, त्या हेदर (Heather) नावाच्या झुडुपांनी आच्छादिलेल्या आहेत. ह्या दरीची व तिच्या बाजूंच्या पर्वतांची रचनाच अशी झालेली आहे की, त्यामुळे शांतीचे वातावरण किंवा शांतीचे साम्राज्य म्हणा ना ! येथे निर्माण झालेले आहे आणि त्यामुळेच येथील ह्या दरीला 'सायलेंट व्हली' असे नाव पडले असावे. आम्ही येथे होतो तेव्हा आम्हांला त्या शांतीचा प्रत्यय आला. वेलफास्ट सिटी व डिस्ट्रिक्ट वॉटर कमिशनर्स ह्या संस्थेने ह्या दरीत एका ठिकाणी मोठा बांध बांधून (घालून) पाण्याचा साठा केला आहे. अशा रीतीने तयार झालेल्या ह्या सरोवराला 'सायलेंट व्हली रिझरव्हायर' हे नाव देण्यात आलेले आहे. ह्या सरोवरातून बेलफास्ट शहरास व इतर आजूबाजूच्या गावांना पाणी पुरविण्यात येते. ह्या सरोवरात ३००० दश लक्ष गॅलन पाण्याचा साठा होऊ शकतो. सायलेंट व्हॅलीच्या भोवती जे डोंगर आहेत, त्या पलीकडे 'अॅन्नॅलाँग व्हॅली–अॅन्नॅलाँग नावाची दरी–आहे. अॅन्नॅलाँग नदीवरून ह्या दरीला–अॅन्नॅलाँग असे नाव पडले आहे. तेथेही दुसरे सरोवर आहे. ह्या सरोवराचे पाणी 'स्लीव बिग्निअन' ( Sleave Bignian ) नावाच्या डोंगरातून बोगदा (Tunnel) खणून त्यातून 'सायलेंट व्हॅली' सरोवरात आणून सोडले आहे. हा बोगदाही आम्ही पाहिला आहे. आम्हांला तो बोगदा आत जाऊन पाहता यावा म्हणून त्या दिवशी बोगद्यात पाणी सोडलेले नव्हते.

तुझा

**नाना**

● ● ●

: १९ :

# उत्तर आयर्लंडची वैशिष्टे

स्लीव्ह डोनार्ड हॉटेल,
न्यू कॅसल
उत्तर आयर्लंड
ता. २१–५–१९५५

चि. **मंगला** हिला सप्रेम आशीर्वाद––

ता. २१ मे हा आमचा उत्तर आयर्लंडमधील पार्लमेंटरी कोर्सचा शेवटचा दिवस, आज सकाळी 'टिनॅन ॲबे' (Tynan Abbey) येथे गेलो. तेथे उत्तर आयर्लंडच्या पार्लमेंटच्या हाऊस ऑफ कॉमन्सचे सभापती सर नॉर्मन स्ट्रॉंग (Sir Norman Stronge) यांची इस्टेट आहे. त्या इस्टेटीवर आम्ही गेलो. तेथे सर नॉर्मन व लेडी स्ट्रॉंग यांनी आमचे स्वागत केले व आम्हांला त्यांनी आपली इस्टेट दाखविली. ही इस्टेट अनेक एकरांची आहे.

त्यानंतर अमार्घ हे जुने शहर पाहण्यास गेलो. अल्स्टरच्या एका मोठया राजवटीचे ते एकेकाळी राजधानीचे शहर होते. ख्रिस्ती शक सुरू झाले, त्या सुमारास येथे चांगलीच भरभराट होती. अमार्घ व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. येथून दोन मैलांवर असलेल्या नॅव्हन फोर्ट येथे जुन्या काळी कॉनॉर मॅकॅनेसा (Coner Macnessa) ह्या राजाची राजधानी होती. तिचे अवशेष आजही पाहावयास मिळतात. कॉनॉर, त्याचे नातलग व मित्र यांनी रेड ब्रँच नाईट्स–म्हणजे लाल शाखा सरदार–नावाची लष्करी संघटना (Order) स्थापिली होती. ह्यावरून राजकारणात 'लाल' (Red) हा शब्द कम्युनिस्टांनीच प्रथम प्रचारात आणला असे नाही. त्यांच्यापूर्वी कित्येक शतके अगोदर कॉनॉरादि आयरिश

लोकांनी हा शब्द–'लाल'–उपयोगांत आणलेला दिसतो. उत्तर आयर्लंडमधील सर्वांत मोठा शूर योद्धा कुचुलाईन (Cuchulaim) ह्याच भागात झाला. त्याचा बाप लुघ (Lugh) ह्याला 'सूर्यदेव' (Sungod) म्हणून लोक मानीत होते. कुचुलाईन याने अनेक युद्धे केली. तो अजिंक्य योद्धा म्हणून गणला जात असे.

आज अमार्घ येथे राजे नाहीत, पण येथे आता आर्चबिशप्स व कार्डिनल्स हे ख्रिश्चन धर्माचे मोठे अधिकारी राहत असतात. १५ शतकापासून अमार्घ हे ख्रिस्ती धर्माचे एक प्रमुख केंद्र म्हणून नावाजलेले आहे. सेंट पॅट्रिक यांनी येथे मेट्रोपॉलिटन ( प्रमुख ) चर्च बांधले. प्रॉटेस्टंट कॅथेड्रल, रोमन कॅथॉलिक आदि अनेक ख्रिस्ती प्रार्थना मंदिरे अमार्घ शहरात आहेत. ती शिल्पकलेचे अप्रतिम नमुने आहेत. येथे एक भव्य वाचनालय आहे. ते आर्चबिशप रॉबिन्सन यांनी १७६५ च्या सुमारास स्थापन केले. ह्या वाचनालयाच्या इमारतीच्या दरवाजा-वर एक लेख आहे. तो ग्रीक लिपीत आहे. त्याचा अर्थ असा, "आत्म्याच्या औषधाचे दुकान." (The Medicine shop of the soul) वाचना-लयास दिलेले इतके अर्थपूर्ण नाव इतरत्र क्वचितच पाहण्यास सापडेल. ह्या वाचनालयातील वातावरण प्रशांत व प्राचीन काळाची आठवण करून देणारे आहे. येथे अनेक दुर्मिळ जुने ग्रंथ आहेत. स्विफ्ट ह्या इंग्रजी लेखकाने आपल्या हस्ताक्षरात लिहिलेली 'गलिव्हर्स ट्रॅव्हल्स' ह्या जगप्रसिद्ध पुस्तकाची प्रत येथे पाहावयास मिळते. आर्चबिशप रॉबिन्सन यांनी सुरू केलेली वेधशाळा येथे आहे. ह्या वेधशाळेने खगोल शास्त्रासंबंधी बरेच मार्गदर्शक असे काम केलेले आहे. येथे एक वस्तुसंग्रहालयही आहे.

अमार्घ शहर पाहिल्यानंतर अमार्घ नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. लेवर्न यांनी आम्हांला नगरपालिकेच्या टाऊन हॉलमध्ये नेले. टाऊन हॉलची इमारत ऐसपैस आहे. ती फार जुनी आहे. ह्या इमारतीत नगरपालिकेतर्फे आम्हांला जेवण देण्यात आले. ह्या कार्यक्रमाला उत्तर आयर्लंडचे ॲटर्नी जनरल श्री. एडमॉंड वॉरनॉक (Mr. Edmond Wornock) व मिसेस वॉरनॉक हेही हजर होते. जेवणाच्या कार्यक्रमाच्या वेळी नगरपालिकेच्या सभासदांच्या व अमार्घ येथील प्रमुख व्यक्तींच्या ओळखी झाल्या. नगरपालिकेच्या सभा-सदांच्या गळ्यात माळा होत्या–फुलांच्या नव्हे तर कुठल्या तरी धातूपासून

वनविलेल्या बिल्ल्यांच्या. त्या बिल्ल्यांमध्ये सुबक नक्षीकाम केलेले होते व ते बिल्ले धातूच्या तारेत ओवलेले होते. सभासदांसाठी लहान बिल्ल्यांच्या माळा होत्या, तर अध्यक्षासाठी मोठ्या बिल्ल्यांची माळ होती. उत्तर आयर्लंडच्या ज्या ज्या नगरपालिकांचे आम्ही पाहुणे म्हणून गेलो, त्या त्या नगरपालिकांच्या अध्यक्षांच्या व सभासदांच्या गळयांत ह्या नवलपूर्ण माळा मी पाहिल्या. इंग्लंड व आयर्लंडमध्ये ह्या माळा म्हणजे नगरपालिकांच्या अध्यक्षांच्या व सभासदांच्या अधिकाराची व हुद्याची निशाणी आहे. अर्थात निरनिराळ्या नगरपालिकांच्या माळांची घडण व तऱ्हा निरनिराळी असते. ह्या माळांशिवाय नगरपालिकांच्या सभासदांचा ऑफिशिअल ड्रेस म्हणजे त्यांचा हुद्दा दर्शविणारा अधिकृत पोशाखही मजेदार असतो. त्यात दोन्ही बाजूने चपटी व पुढच्या बाजूला टोक असलेली टोपीही आहे. नगरपालिकेचा काही अधिकृत ( Offiicial ) कार्यक्रम असला म्हणजे अध्यक्ष व सभासद ह्या माळा व पोशाख परिधान करतात. त्यांना त्याबद्दल फार अभिमानही वाटतो, असे मला ठिकठिकाणी दिसून आले.

अमार्घ नगरपालिकेचे अध्यक्ष व सभासद यांचे हार्दिक आभार मानून आम्ही न्यू कॅसलकडे परतलो.

ता. २१ मे रोजी पार्लमेंटरी कोर्ससाठी आलेल्या आम्हा प्रतिनिधींचे दोन गट पडले. एका गटाचे प्रतिनिधी ग्लासगोला जाणार होते, तर दुसऱ्या गटाचे प्रतिनिधी लंडनला जाणार होते. त्या दोन्ही गटांसाठी ता. २२ मे ते २६ मेपर्यंत वेगवेगळा दौऱ्याचा कार्यक्रम आखलेला होता. प्रतिनिधींनी आपापला गट पसंत केला. ग्लासगोला जाणाऱ्या गटात मी माझे नाव दिले. ता. २१ मे रोजी सायंकाळी हे दोन्ही गट उत्तर आयर्लंड सोडणार आहेत, अर्थात मीही उत्तर आयर्लंडचा निरोप घेणार आहे.

ता. ९ मे रोजी आम्ही उत्तर आयर्लंडमध्ये प्रवेश केला व ता. २१ मे रोजी सायंकाळी आम्ही हा सुंदर देश सोडला. म्हणजे १३ दिवस आमचे वास्तव्य ह्या देशात होते. ह्या तेरा दिवसांत उत्तर आयर्लंडमधील अनेक शहरे व गावे आम्ही पाहिली. अनेक महत्त्वाच्या संस्थांना भेट दिली. उत्तर आयर्लंडच्या सहा काउन्टीजपैकी चार काउन्टीजमध्ये म्हणजे अँट्रिम, लंडनडेरी, डाऊन व अमार्घ यांमध्ये शेकडो मैलांच्या आम्ही प्रवास केला. हा देश पाहिल्यानंतर

ह्या देशातील लोकांविषयी व त्यांच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगिक प्रगतीविषयी माझ्या मनावर खोल ठसे उमटलेले आहेत.

आयर्लंड देश हा आपल्या आतिथ्यशीलतेबद्दल सर्व जगात प्रसिद्ध आहे. उत्तर आयर्लंडचे लोकही आतिथ्याबद्दल तत्पर आहेत, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. आम्ही जेथे जेथे गेलो, तेथे तेथे आयरिश लोकांनी आम्हांला आदर सत्कारांनी व आतिथ्यांनी भारावून टाकले. ह्यात अतिशयोक्तीचा मुळीच भाग नाही.

दुसरे म्हणजे आयरिश लोक आपल्याविषयी व आपल्या देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक संस्थांविषयी आम्हांला हवी असलेली माहिती तत्परतेने व संपूर्णपणे देत होते. ही माहिती देण्यात त्यांना फार आनंद वाटत होता. ह्या लोकांना आपल्या देशाविषयी, इतिहासाविषयी व संस्कृतीविषयी फार अभिमान आहे. आपल्या देशाची महती सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाच्या उर्मी उसळताना दिसत असत. ' मी माझ्या देशाविषयी हे सांगू का ते सांगू ' असे प्रत्येकास वाटत असे. ह्या त्यांच्या स्वभावामुळे व त्यांच्या सहकार्यामुळेच मी ह्या देशाविषयी बरीच माहिती मिळवू शकलो. ती मी तुम्हांला पाठविलेल्या पत्रातून दिली आहे. माहिती देताना ह्या देशातील लोक कुठलाही आडपडदा ठेवीत नव्हते. उलट ती माहिती आमच्या मनावर बिंबविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. आपल्या देशाविषयी आलेल्या पाहुण्यांचे चांगले मत व्हावे, आपल्या देशातील लोकांबद्दल त्यांच्या मनात बंधुभाव व प्रेमभाव निर्माण व्हावा, यासाठी त्यांची सारखी धडपड असे.

हे लोक व्यक्तीस्वातंत्र्याचे भोक्ते आहेत. आपण हाती घेतलेले काम, त्यात आपली सारी शक्ती ओतून ' करावे, असा त्यांचा कटाक्ष आहे. हाती घेतलेले काम ते चिकाटीने, नेटाने व मनतिडकीने करीत असतात. ह्या देशातील दौऱ्यात नेहमी आमच्या बरोबर असलेले मेजर जार्ज थॉमस व मिस मेकॉले यांच्या कामाच्या पद्धतीवरून व इतरही ज्या अधिकाऱ्यांशी आमचा संबंध आला त्यांच्याही कार्यावरून आम्हांला वरील गुणांची प्रचीती आली. ह्या त्यांच्या गुणांची छाप ते ज्या ज्या देशात गेले, व स्थायिक झाले,–उदाहरणार्थ अमेरिका, ऑस्ट्रेलिया वगैरे देश–तेथे तेथे त्यांनी पाडली आहे व आपल्या कार्यामुळे त्या त्या देशातील राजकीय, सामाजिक व धार्मिक, औद्योगिक व

सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. ह्या देशातून बाहेरच्या देशात जो माल जातो, त्यात स्त्री–पुरुषांची 'निर्यात' याचा फार वरचा नंबर लागतो.

उत्तर आयर्लंडचे लोक सर्वसाधारण उंच बांध्याचे व मजबूत शरीरयष्टीचे असतात. यांच्यांत औपचारिकपणाचा भाग फार कमी आहे. ह्या गुणामुळे येथील लोक मला इंग्लिश लोकांपेक्षा वेगळे वाटले. लंडनमध्ये असताना तेथील लोकही माझ्याबरोबर कसे प्रेमाने वागले, याचे वर्णन मी मागच्या पत्रातून केले आहे, पण इंग्लिश लोक हे मला सॉफिस्टिकेटेड वाटले म्हणजे त्यांच्या बोलण्या चालण्यात शहरी कृत्रिमतेचा भाग माझ्या पाहण्यात आला, तशी कृत्रिमता मला आयरिश लोकांत दिसली नाही. इंग्लिश लोक रिझर्व्ह–म्हणजे स्वतःहून न बोलणारे, दुसऱ्याशी मनमोकळेपणे न बोलणारे–आहेत. पण आयरिश लोकांत ती वृत्ती मला तितकीशी दिसली नाही.

थोडक्यात त्यांच्या प्रेमळ आतिथ्यामुळे व मोकळ्या स्वभावामुळे मला आयरिश लोक फार आवडले. उत्तर आयर्लंडच्या दुसऱ्या एका गोष्टीने माझ्या मनावर ठसा उमटविला ती गोष्ट म्हणजे ह्या देशाचे नैसर्गिक सौंदर्य–नैसर्गिक सौंदर्याचे जणू वरदानच परमेश्वराने ह्या देशाला बहाल केले आहे. ह्या देशाचे सृष्टिसौंदर्य विपुल आहे, तसे ते विविधही आहे. ह्या देशाचा बराच भाग डोंगराळ आहे. येथील काही डोंगर अथवा पर्वत २००० फुटांपेक्षा जास्त उंच आहेत. ह्या डोंगरांचे देखावे फारच मनोहर आहेत. अनेक दऱ्या आहेत; नद्या आहेत. त्यांची दृश्येही चित्ताकर्षक आहेत. सर्वांत मला आवडली ती सरोवरांची दृश्ये. अनेक सरोवरे ह्या देशात आहेत. त्यात लॉक्नीघ ( Lough Neagh ) ह्या नावाचे सरोवर सर्वांत मोठे आहे. त्याच्याभोवती डोंगरांच्या रांगा आहेत; ह्या सरोवरामधून बान (Bann) नदी जाते, तिचा उगम मोर्ने पर्वतात–ज्याचा उल्लेख मागे केलाच आहे–होतो व ती ९० मैल वहात वहात ॲटलांटिक समुद्रास मिळते. ह्या देशाच्या सरकारच्या जंगल खात्याने–फॉरेस्ट डिपार्टमेंटने–अनेक उपयुक्त झाडांची लागवड केलेली आहे. ह्या जंगलाशिवाय निसर्ग निर्मित जंगलेही आहेत. सरोवरांकाठी, समुद्र किनाऱ्यावर, डोंगरावर, नदी तिरावर, दऱ्यांमध्ये व रस्त्याच्या दुतर्फा झाडांची दाटी पाहून माझे मन मोहून जाई. अमार्घ काउन्टी–ही ॲपेल–( सफरचंद ) फळबागा-

बद्दल प्रसिद्ध आहे. ही काउन्टी उत्तर आयर्लंडचा बाग समजली जाते. ह्या देशाच्या समुद्र किनाऱ्यावर हवा खाण्याची किती तरी ठिकाणे आहेत. ती सृष्टीसौंदर्याने नटलेली आहेत, विशेष म्हणजे या ठिकाणी शहरी सुखसोयी असूनही ती ग्रामीण वातावरणाने भारावलेली आहेत.

आणखी एक गोष्ट या देशाची मला आवडली, ती म्हणजे येथील उत्तम रस्ते. किती तरी रस्ते (Roads) ह्या देशात आहेत. ते अस्फाल्ट केलेले किंवा टारचे आहेत. थोड्या ठिकाणी खडीचेही रस्ते आहेत. येथील प्रदेश डोंगराळ असल्यामुळे व अनेक नद्या, सरोवरे व दऱ्या असल्यामुळे हे रस्ते वळणे घेत घेत गेलेले आहेत. रस्त्यांच्या आजूबाजूंना सृष्टिसौंदर्याचे नंदनवन फुललेले आहे. ह्या रस्त्याने प्रवास केल्याने एका अपूर्व सुखाचा लाभ अनुभवण्यास मिळतो.

ह्या देशाची हवाही चांगली व आरोग्यदायक आहे.

चौथ्या एका गोष्टीचा मला निर्देश करावासा वाटतो ती म्हणजे दोन किंवा जास्त स्थानिक स्वराज्य संस्था एकत्र येऊन आपले पिण्याच्या पाण्यासारखे प्रश्न सामाईकपणे सोडवतात. स्थानिक स्वराज्य संस्थांचे काही प्रश्न फार खर्चाचे असतात. ते एकेकट्या संस्थेला सोडविणे कठीण असते. अशा वेळी दोन किंवा जास्त स्थानिक स्वराज्य संस्था आपला पैसा व साधनसामुग्री एकत्र करून ते प्रश्न सोडवतील तर खर्चाची बचत होते व तातडीने जनतेचे प्रश्न सोडविले जातात व लोकांची सोय होते. ही कार्यपद्धती उत्तर आयर्लंडच्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी अंगिकारिली आहे, त्यामुळे त्यांचा फार फायदा झाला आहे व लोकांचीही सोय झाली आहे. मागे मी बेलफास्ट शहर व जिल्हा पाणी समिती ( Belfast city and District water commissioners ) ह्या समितीचा उल्लेख केला आहे. ती समिती बेलफास्ट नगरपालिका व या शहराच्या आसपासच्या इतर स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलेली आहे व त्या समितीतर्फे ह्या स्थानिक स्वराज्य संस्थानी आपला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कमी खर्चात फार चांगल्या रीतीने सोडविला आहे. अशा आणखीही संस्था किंवा समित्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्थापून अनेक निकडीचे प्रश्न हाताळण्याचे काम त्यांच्याकडे सोपविले आहे ह्या देशातील आणखी एका गोष्टीने माझे मन आकर्षून घेतले, ती गोष्ट म्हणजें येथील औद्योगिक

प्रगती. फार पूर्वीपासून उत्तर आर्यलंडात लिननचा—तागाचा किंवा सणाचा—कपडा बनविण्याचा धंदा अस्तित्वात आहे. ' आयरिश लिनन ' हा शब्द १२७२ सालापासून जगाला माहीत आहे. तो ह्या देशाचा मुख्य स्थिरावलेला धंदा आहे. ह्या धंद्याच्या निरनिराळ्या शाखांमध्ये सुमारे ६० ते ७० हजार मजूर काम करतात. लिननचे कापड निर्यात करून ह्या देशाला डॉलर्स मिळवता येतात. सुमारे ३,८०,००,००० ते ४,००,००,००० पौंडांच्या किंमतीचा लिननचा कपडा प्रतिवर्षी ह्या देशातून निर्यात होतो, येथून परदेशात जो अनेक प्रकारचा माल निर्यात होतो, त्या सर्व मालाच्या किंमतीची एक षष्ठांश किंमत केवळ लिननच्या कपड्याची असते. लिननच्या धंद्यामध्ये फ्लॅक्स (Flax) नावाचा जो कच्चा माल वापरला जातो, त्या फ्लॅक्सची लागवड व पैदास या देशातच केली जाते. उत्तर आयर्लंडचा दुसरा प्रमुख धंदा म्हणजे जहाजे तयार करण्याचा! ह्या धंद्यासंबंधी मी मागच्या एका पत्रात विस्ताराने माहिती दिलेली आहेच. लिनन व जहाजे तयार करणे ह्या दोन धंद्यानेच केवळ आपल्या देशाच्या आर्थिक प्रगतीचा पाया मजबूत होणार नाही, आधुनिक काळात इतर धंदे सुरू करणे जरुरीचे आहे, हे येथील सरकारने ओळखले व नवे नवे उद्योग सुरू करण्यासाठी त्या सरकाराने नवे औद्योगिक धोरण आखले. उत्तर आयर्लंडचे सरकार नव्या नव्या उद्योगधंद्यांना नाना प्रकारची मदत देत असते. कर्जाच्या रूपाने अगर देणगीच्या रूपाने पैशाची मदत हे सरकार नवे धंदे काढणाऱ्यांना देते. तसेच अगोदरच अस्तित्वात असणाऱ्या धंद्यांचा विस्तार करण्यासही हे सरकार साहाय्य करते. हे सरकार कारखाने बांधते व ते कारखाने उद्योगधंदे काढू इच्छिणाऱ्या लोकांना सवलतीच्या भाड्याने देते. ज्या लोकांना धंद्यासाठी सरकार आर्थिक मदत देते, त्या लोकांना जास्तीत जास्त १० वर्षांपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्था करमाफी देऊ शकतात. या निरनिराळ्या मदती देण्यासाठी उत्तर आयर्लंडमध्ये ' इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट ॲक्ट ' म्हणजे ' उद्योगधंद्यांच्या प्रगतीचा कायदाही ' जारी आहे. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी काही मूलभूत सोयींची ( Basic Services ) गरज असते. अशा तऱ्हेच्या सर्व्हिसेस किंवा सोयी ह्या सदरात खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो—

( १ ) मजुरांसाठी घरे, ( २ ) रस्ते, रेल्वे व जहाजे ह्यांसारखी दळणवळणाची साधने, ( ३ ) पॉवर—विद्युत्शक्ती, ( ४ ) पाणी पुरवठा, ( ५ )

सांडपाण्यासाठी गटारे. या सर्व सोयी वर उल्लेखिलेल्या कायद्यान्वये हे सरकार धंदेवाल्यांना उपलब्ध करून देते.

उत्तर आयर्लंडच्या सरकारचे सायन्टिफिक डिपार्टमेंट-शास्त्रीय खाते–म्हणून एक खाते आहे. ह्या खात्यातर्फे उद्योग सुरू करणाऱ्यांना किंवा ज्यांनी अगोदरच उद्योगधंदे सुरू केले आहेत, त्यांना शास्त्रीय विषयासंबंधी माहिती पुरविली जाते; शास्त्रीय अभ्यास व संशोधन करण्याची व्यवस्थाही ह्या खात्यातर्फे करण्यात आली आहे.

ह्या नाना प्रकारच्या मदतीमुळे त्या देशात अनेक नवे नवे उद्योग सुरू झाले आहेत. गेल्या काही वर्षात येथे विमानेही तयार होऊ लागली आहेत. कॅनबेरा ' ( Canbera ) जेट बाँबर्ससारखी लढाऊ विमानेही येथे तयार होतात. वाहतुकीची व लढाऊ विमाने या देशात मोठ्या प्रमाणावर तयार करण्यात येतात. एवढेच नव्हे तर अतिशय महत्त्वाचे व प्रसिद्ध असे विमानांच्या नव्या साचांचे शोधही ह्या देशातील लोकांनी लावलेले आहेत. धातू ओतण्याचे व विविध यंत्रे व त्या यंत्रांना लागणारे साहित्य तयार करण्याचे अनेक कारखाने येथे आहेत. त्यातल्या त्यात कापड व चहा या धंद्यांना जी मशिनरी–यंत्रसामुग्री–लागते ती येथे तयार केली जाते. हिंदुस्थानात चहाच्या धंद्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री येथूनच आयात केली जाते.

मिनरल वाटर्स, व्हिस्की व तंबाखू यांची पैदास करणारा धंदाही येथे मोठ्या प्रमाणावर चालतो. कापड धंद्याच्या विविध शाखांचेही काम येथे चालते.

ह्या देशात टुरिस्ट इंडस्ट्री–पर्यटन धंदा–हाही एक प्रमुख धंदा आहे. ह्या धंद्यासाठी ' टुरिस्ट बोर्ड ' पर्यटन मंडळ येथे स्थापण्यात आले आहे. ह्या धंद्याच्या विकासासाठी रेल्वे कंपनीकडून व अल्स्टर ट्रान्स्पोर्ट ॲथॉरिटीकडून पर्यटन-मंडळास हरप्रकारचे साहाय्य होत असते. टुरिस्ट ट्रॅफिक ॲक्टस हे कायदे पर्यटन धंद्याच्या विकासाकरिता करण्यात आलेले आहेत. मुख्य मुख्य शहरात व हवा खाण्याच्या ठिकाणी जी हॉटेल्स, खाणावळी, बोर्डिंग हाऊसेस व रेस्टॉरॉं आहेत, त्यांचे नियंत्रण वरील कायद्यान्वये केले जाते.

ह्या देशात अनेक खाणी आहेत. ह्या खाणींतून कोळसा, आयर्न ओअर ( लोखंड ), बॉक्साईट, रॉक साल्ट, जिप्सम्, लाईमस्टोन, ग्रॅनाईट, चॉक, बासाल्ट ( Basalt ) इत्यादि पदार्थ मिळतात.

मासेमारीचा धंदा ह्या देशातील एक प्रसिद्ध धंदा आहे. अनेक सरोवरे व नद्या यांतून ह्या देशातील लोकांना मासे मिळतात. ह्या देशाचा समुद्रकिनाराही फार मोठा असल्यामुळे हे लोक समुद्रातूनही विपुल मासे मिळवितात.

वर मी अनेक उद्योगधंद्यांचा उल्लेख केला आहे, पण ह्या सर्व धंद्यांशिवाय 'शेतकी' हा धंदा ह्याही देशात सर्वांत मोठा धंदा आहे. उत्तर आयर्लंडच्या एकूण १३,८०,००० लोकसंख्येपैकी सुमारे १,४५,००० लोक शेतीच्या धंद्यात गुंतलेले आहे. 'लिनन' वा 'जहाजे' ह्या उत्तर आयर्लंडच्या दोन मोठ्या धंद्यांतदेखील शेतकी धंद्याइतके लोक गुंतलेले नाहीत.

येथील शेतीचे मुख्य उत्पन्न ओट हे धान्य आहे. येथील जमीन व हवापाणी गहू व बार्ली ह्या धान्यांच्या पिकांना अनुकूल नाही. तरीपण थोडा फार गहू व बार्ली येथे पिकली जाते. दुसरे महत्त्वाचे पीक बटाट्यांचे आहे. येथे बटाट्याचे जे बियाणे तयार होते, ते सुमारे वीस देशांत निर्यात होते.

फ्लॅक्सचे पीकही काही शेतकरी काढतात, ज्याचा उपयोग लिननचा कपडा तयार करण्याकडे होतो. येथील शेतीच्या धंद्यात उत्तरोत्तर यंत्रांचा उपयोग वाढत आहे. १९३९ साली शेतीला उपयुक्त असे ५५० ट्रॅक्टर्स होते, तर ती संख्या १९५२ साली १९,६२० वर गेली व त्यानंतर ही संख्या वाढत आहे.

शेतातील ॲसिडिटी कमी करण्यासाठी येथे चुन्यापासून तयार केलेले खत वापरण्यात येते, असे मला कळाले.

शेतमजुरांचे वेतन सर्वसाधारण आठवड्याला ६ पौंड म्हणजे रु. ८१ असते. याशिवाय शेतमालकांकडून त्याला भाजीपाला, घर वगैरे पुरविले जाते.

येथील शेतीची कल्पना मात्र आपल्या देशातील शेतीच्या कल्पनेहून अगदी वेगळी आहे. आपल्याकडे शेती म्हटली म्हणजे गहू, हरभरा, ज्वारी, बाजरी, भुईमूग इत्यादि धान्याची किंवा ऊस, मोसंबी, संत्री, द्राक्षे, तंबाखू, कपाशी इत्यादींची ( कॅश क्रॉप्सची—पैसे मिळवून देणाऱ्या पिकांची )—पैदास इतका बहुधा शेतीचा अर्थ समजला जातो. उत्तर आयर्लंडमध्ये मात्र गुरे, डुकरे, कोंबड्या व मेंढ्या पाळणे व त्यांची पैदास वाढविणे हाच शेती धंद्याचा मुख्य गाभा समजला जातो. येथील शेतकरी आपल्या जनावरांची निगाही फार चांगल्या प्रकारे राखतात. येथे ओट व बटाटे यांचे जे पीक येते, त्यांचा मुख्य उपयोग गुरे,

डुकरे, कोंवडचा इत्यादि जनावरांना खाद्य (Food) म्हणून होतो. गाईंच्या दुधापासून अनेक पदार्थ तयार करून आयरिश लोक इंग्लंडला पाठवितात. एकदा काय झाले, मी एका येथील बंदरावर उभा होतो. शेकडो तरणे सांड बंदराकडे येत होते, किती सुंदर ती जनावरे होती म्हणून सांगू. दृष्ट लागेल अशी ती गुबगुबीत, ताजीतवानी, जोमदार व तरणीबांड जनावरे पाहून मला फार आनंद झाला, पण माझा तो आनंद फार वेळ टिकला नाही. मी तेथे चौकशी केली की, "ही जनावरे कोठे जात आहेत ?" मला उत्तर मिळाले की 'इंग्लंडच्या कत्तलखान्यात जात आहेत.' त्या जनावरांचे मांस हे इंग्लंडच्या लोकांचे मुख्य खाद्य आहे. हे कळल्यावर मात्र माझ्या हिंदी अथवा हिंदू म्हण हवं तर—मनाला कसेसे वाटले. ह्या गुरांप्रमाणे डुकरेही इंग्लंडला पाठविली जातात. त्यांच्या मांसाचा उपयोग अर्थात येथील व इंग्लंडचे लोक खाण्यासाठी करतात. कोंवडचा व अंडी यांचीही निर्यात इंग्लंड देशामध्ये होते. मेंढयांची लोकर कपडा वनविण्यासाठी उपयोगात आणली जाते. गुरे, डुकरे, कोंबडचा व अंडी व दुधाचे पदार्थ विकून येथील शेतकऱ्यांना जे उत्पन्न येते ते शेतीतील एकूण उत्पन्नाच्या ऐंशी टक्के असते. आहे की नाही येथील शेतीची ही न्यारी तऱ्हा ! वटाटे व ॲपल—सफरचंद—निर्यात करूनही येथील शेतकऱ्यांना काही उत्पन्न मिळते.

ह्या एवढचाशा देशात सुमारे ६० वाचनालये आहेत. ती शहरात व ग्रामीण भागात विखुरलेली आहेत.

मंगल ! माझे हे पत्र फारच लांबले आहे. पण ह्या पत्रात उत्तर आयर्लंडची इतकी विस्तृत माहिती देण्यात माझा हेतू आहे. आपल्या महाराष्ट्रातील एका जिल्ह्याएवढा हा देश आहे, पण ह्या लहानशा देशाने केवढी औद्योगिक, सामाजिक व आर्थिक प्रगती केली आहे, हे मला तुला दाखवावयाचे होते. ह्या छोटचा देशाला जर इतकी प्रगती करता आली तर मग भारतासारख्या महान देशाला का करता येऊ नये ? भारतातील माझ्या देशबांधवांनी आयरिश लोकांसारखे योग्य दिशेने प्रयत्न केले तर आपलीही भारतभूमी संपन्न, समृद्ध व उन्नत झाल्याशिवाय राहणार नाही, अशी माझी खात्री आहे.

तुझा

नाना

● ● ●

: २० :

# सुंदर सरोवरांचा देश

रॉयल हॉटेल
१०६ सॉची हॉल स्ट्रीट
ग्लासगो, स्कॉटलंड.
ता. २३-५-१९५५

चि. उषास सप्रेम आशीर्वाद—

ता. २१ मे रोजी सायंकाळी बरोबर सात वाजता आम्ही उत्तर आयर्लंडचा निरोप घेतला. हा सुंदर देश सोडताना मनास वाईट वाटले. आमचा निरोप घेण्यासाठी मेजर जॉर्ज थॉमसन व मिस मेकॉले आले होते. त्यांचा निरोप घेताना आम्हांला दु:ख होत होते. त्यांच्याबरोबर आम्ही उत्तर आयर्लंडात १३ दिवस होतो. त्यांनी जिवापाड मेहनत घेऊन ह्या देशातील पार्लमेंटरी कोर्सचा भाग पूर्ण करण्यास आम्हांला खूप साहाय्य केले. आमची कुठलीही गैरसोय त्यांनी होऊ दिली नाही. त्यांची केवळ ओळखच झाली असे नव्हे तर ओळखीचे मैत्रीत रूपांतर झाले होते. तेव्हा त्यांचा निरोप घेताना आपल्या घरच्या माणसांचाच आपण निरोप घेत आहोत, असे वाटण्याइतका जिव्हाळा त्यांच्यात व आमच्यात निर्माण झालेला होता. निरोप घेताना आमच्यापैकी काहींच्या नेत्रांना अश्रू आले व त्या दोघांचेही डोळे पाणावले.

ग्लासगो बोटीने मी व माझे सहकारी ता. २२ मे रोजी सकाळी ७॥ वाजता ग्लासगो बंदरावर पोहोचलो.

ग्लासगो हे स्कॉटलंडमधील महत्त्वाचे बंदर आहे. येथून स्कॉटलंडमधील अनेक शहरांना दिवसातून किती तरी बसेस व आगगाड्या जातात व त्या ठिकाणांवरून तशाच अनेक बसेस व आगगाड्या येथे येतात; त्यामुळे स्कॉटलंड-मधील कुठल्याही महत्त्वाच्या शहरास ग्लासगोहून जाणे सोपे आहे. ग्लासगोची लोकसंख्या २० लाखांवर आहे. स्कॉटलंड हा देश मनोवेधक सरोवरांचा देश

म्हणून सर्व जगात प्रसिद्ध आहे. ग्लासगो शहरापासून थोडचा अंतरावर अनेक सरोवरे आहेत. सरोवराला स्कॉटलंडचे लोक लॉक् हा शब्द वापरतात. उत्तर आयर्लंडमध्येही लॉक् हा शब्द सरोवराला वापरतात. दोन्ही शब्दांच्या उच्चारात सारखेपणा आहे, पण स्पेलिंगमध्ये फरक आहे. आयरिश शब्द लॉक् याचे इंग्रजीत स्पेलिंग Lough असे आहे, तर स्कॉटिश शब्द लॉक् याचे स्पेलिंग Lock असे आहे.

ग्लासगो येथील पहिला आमचा कार्यक्रम ह्या सरोवरांपैकी काही सरोवरे पाहणे हा होता.

क्लाईड (Clyde), फिने (Fyne), लॉ मॉंड (Lomand) व कॅट्रिन (Katrine) ह्या नावांची सरोवरे पाहून मन खरोखर मोहित झाले. ह्या सरोवरांच्या काठावर काही ठिकाणी उंच उंच पर्वत आहेत. ते पर्वत गर्द झाडींनी आच्छादिलेले आहेत. हिरव्या रंगाचे शेले आपल्या अंगावर घेऊन ते येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागतास उभे आहेत. ह्या सरोवरांच्या काठी जेथे पर्वत नाहीत, तेथे निरनिराळ्या प्रकारांच्या झाडांची वने आहेत. काही सरोवरांत बेटे आहेत, तीही दाट झाडांनी जणू गच्च भरलेली आहेत. डोंगरांच्या कपारीने व झाडांच्या बनातून वळसे घेत घेत ही सरोवरे पसरलेली आहेत, कधी ती पर्वतांना आलिंगन देताना दिसतात तर कधी झाडांवरून खाली लव-लेल्या लतांची चुंबने घेताना दिसतात. एका सरोवरामध्ये बोटीत बसून आम्ही विहार केला. ती सरोवरे पाहिल्यानंतर आम्ही परत रॉयल हॉटेलात आलो.

ता. २३ मे रोजी तिसरा प्रहरी आम्ही मेरी हिल भागातील मजूर पक्षाच्या काही कमिटी रूम्सना–निवडणूक प्रचार कचेऱ्यांना–भेट दिली. ह्या कचेऱ्यांचे निवडणूक कार्य आम्ही पाहिले. आपल्या देशात निवडणूक कार्यासाठी जशा तात्पुरत्या कचेऱ्या निरनिराळ्या पक्षांतर्फे सुरू करण्यात येतात, तशा प्रकारच्या मजूर पक्षाच्या ह्या निवडणूक कचेऱ्या होत्या. अर्थात येथे प्रचाराची बरीच साधने–जी आपल्याकडे फारच थोडचा निवडणूक कचेऱ्यांत आढळतात–टेलिफोन, टाईप-रायटर इत्यादि–निवडणूक कचेऱ्यांत पाहावयास मिळाली. टेबल,खुर्च्या इत्यादि साहित्य होतेच. तसेच त्या कचेऱ्यांत पक्षातर्फे कचेरी प्रमुख, टाईपिस्ट, कारकून इत्यादि काम करणारा नोकर वर्ग होता. आम्ही गेलो त्या-वेळी ह्या कचेऱ्यांत त्या त्या उमेदवारांचे बरेच कार्यकर्ते जमलेले होते. स्त्रिया

होत्या, तसे पुरुषही होते. सर्वच कार्यकर्ते सुशिक्षित, राजकारणातले जाणते, हुशार, उत्साही व चाणाक्ष दिसले. आपापल्या निवडणूक कार्याचा अहवाल ते कचेरी प्रमुखाला देत होते. ह्या कार्यकर्त्यांना पक्षातर्फे व उमेदवारातर्फे प्रसिद्ध झालेली पत्रके, पुस्तिका, पोस्टर्स–भितिपत्रिका–हँडबिल्स–लहान पत्रिका वगैरे निवडणूक वाङ्मय तर देण्यात येतेच, पण त्यांना छापलेली मतदारांची यादी–त्यांच्या कामापुरती–पुठ्ठ्यांवर चिकटवून देण्यात येते. ज्या विभागात एखादा कार्यकर्ता निवडणूक कार्य करीत असतो, त्या विभागातील मतदारांच्या याद्या अशा रीतीने पुठ्ठ्यावर चिकटवून त्याला देण्यात येतात. त्या यादीमध्ये तीन सदरे मतदारांच्या नावापुढे असतात. त्यांचे मथळे असे : मजूर, हुजूर, न्यूट्रल म्हणजे तटस्थ. म्हणजे कार्यकर्त्याने मतदारांकडे जावयाचे. त्यांची मते अजमावयाची व मग त्या याद्यांमध्ये ते मतदार मजूर पक्षाला मते देणार असतील तर यादीतील 'मजूर' ह्या मथळ्याखाली त्या मतदारांच्या नावापुढे टिक करावयाची, म्हणजे खूण करावयाची; ते मतदार हुजूर पक्षाला मते देणार असतील अगर त्यावेळेपर्यंत तटस्थ असतील तर त्या त्या मथळ्याखाली मतदारांच्या नावापुढे त्या अर्थाची खूण करावयाची. अशा रीतीने टिक केलेल्या याद्या कार्यकर्ते निवडणूक कचेऱ्यांत आणून देतात. ह्या याद्यांवर वरीलप्रमाणे टिक करीत असताना ते कार्यकर्ते पक्षातर्फे व आपल्या उमेदवारातर्फे प्रचारही करतात हे सांगावयास नकोच. निवडणुकी अगोदर आपापल्या मतदार संघातील वर दिल्याप्रमाणे टिक केलेल्या याद्या कार्यकर्ते आपापल्या निवडणूक कचेऱ्यांत आणून देतात. त्यावरून निवडणूक कचेऱ्यातील प्रमुखांना कोणत्या भागात आपला पक्ष बळकट आहे व कोणत्या भागात तो कच्चा आहे, हे कळते व मग ते व त्यांची संघटना ज्या भागात पक्षाची बाजू पडली आहे, तेथे जोराने प्रचार करतात व आपली शक्ती केंद्रित करतात.

ह्या निवडणूक कचेऱ्यांत बऱ्याच कार्यकर्त्यांबरोबर आमची ओळख करून देण्यात आली. त्यांच्याबरोबर एका निवडणूक कचेरीत चहाही घेतला. त्यांच्याबरोबर तेथील निवडणूक तंत्राबद्दल बरीच चर्चाही केली. नंतर आम्ही काही कार्यकर्त्यांबरोबर मतदार संघात फिरलो. ते कार्यकर्ते त्यावेळी मतदारांना भेटून कसा प्रचार करतात हेही आम्ही प्रत्यक्ष अवलोकन केले. घरोघरी जाऊन प्रत्येक मतदारांची गाठ घेऊन प्रचार करण्यावर येथे जोर देण्यात येतो, असे आम्हांस दिसून आले.

त्याच दिवशी आम्ही ब्रिटिश कॉन्सिल–सेंटरला भेट दिली तेथे ब्रिटिश सरकारतर्फे स्कॉटलंडच्या कारभारावर नजर ठेवणारा किंवा देखरेख करणारा मुख्य अधिकारी व त्याचा नौकरवर्ग यांच्या कचेऱ्या पाहिल्या.

स्कॉटलंडमधील ब्रिटिश कॉन्सिलच्या अनुषंगाने माझ्या लक्षात एक गोष्ट आली, त्या गोष्टीशी हिंदुस्थानातील राजकीय व सामाजिक पद्धतीचाही संबंध आहे, म्हणून मी त्या गोष्टीचा येथे निर्देश करणार आहे. मी मागे माझ्या एका पत्रात उत्तर आयर्लंडच्या पार्लमेंटचा व मंत्रिमंडळाचा उल्लेख केला आहे. ज्याप्रमाणे उत्तर आयर्लंडसाठी वेगळे पार्लमेंट व मंत्रिमंडळ यासंबंधी ब्रिटिश घटना कायद्यामध्ये खास तरतुदी आहेत, त्याप्रमाणे स्कॉटलंडच्या राज्यकारभारासाठीही वेगळ्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तू विचारशील की, " उत्तर आयर्लंड व स्कॉटलंडसाठी राज्यघटनेत अशा वेगळ्या तरतुदी का करण्यात आल्या ? " त्याचे उत्तर आपणांस इंग्लंड, उत्तर आयर्लंड व स्कॉटलंड ह्या देशांच्या इतिहासात सापडेल. पूर्वी हे तिन्ही देश वेगळे व स्वतंत्र होते. पुढे ह्या तिन्ही देशांतील लोकांनी आपसात समेट करून ह्या तिन्ही देशांसाठी एक संयुक्त राज्य तयार केले. त्यालाच 'युनायटेड किंगडम' असे नाव आहे. 'युनायटेड किंगडम' ह्या इंग्रजी शब्दाचा अर्थही 'संयुक्त राज्य' असाच आहे. संयुक्त राज्य तयार झाले तरी या देशांतील लोकांचा स्वतंत्र इतिहास होता, त्यांच्या वेगवेगळ्या परंपरा होत्या. त्यांचे गुणधर्मही थोड्या फार प्रमाणात वेगवेगळे होते. त्यांच्या रितीरिवाजातही काही अंशाने फरक होते, तेव्हा ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन युनायटेड किंगडमच्या राज्यघटनेत त्या दृष्टीने राज्यकारभारासंबंधी पृथक् पृथक् काही सोयी करण्यात आल्या, त्यांची थोडक्यात माहिती मी मागच्या काही पत्रांत दिलेली आहे. आयरिश व स्कॉटिश लोकांप्रमाणे खुद्द इंग्लंडमध्ये वेल्स नावाचा प्रांत आहे. ह्या प्रांतातील वेल्स लोकही इंग्लिश लोकांहून भाषा, रीतिरिवाज, गुणधर्मादि बाबतींत वेगळे आहेत. इंग्लिश, वेल्स, आयरिश व स्कॉटिश ह्या जमाती जरी थोड्या बाबतींत वेगळ्या असल्या (अर्थात अनेक बाबतींत त्यांचे साधर्म्य आहे) तरी त्या एकाच राज्यात म्हणजे 'युनायटेड किंगडम' मध्ये मित्रत्वाच्या व बंधुभावाच्या नात्याने कित्येक शतके एकत्र नांदत आलेले आहेत. हेच ह्या लोकांचे वैशिष्टय आहे. ह्या सर्वांना एकत्र सांधणारा दुवा म्हणजे 'युनायटेड किंगडमची' राज्यघटना. काही थोड्या बाबी सोडल्या–ज्यांचा मी पूर्वी निर्देश केला आहे–

तर इतर सर्व बाबतींत या सर्व लोकांसाठी एकच राज्यघटना आहे, त्यांचे एकच सार्वभौम पार्लमेंट आहे, जे ' वेस्ट मिन्स्टर ' मध्ये लंडन शहरात भरते. इंग्लंड, आयर्लंड व स्कॉटलंड यांचा समुच्चयाने राज्यकारभार पाहणारे एकच मंत्रिमंडळ आहे, ज्याच्या मुख्य कचेऱ्या लंडन येथे आहेत व त्यांचा राजा किंवा राणी एकच आहे.

हे सर्व शक्य झाले, याचे दुसरे एक कारण म्हणजे ह्या निरनिराळ्या जमातींमध्ये अनेक बाबतींत साधर्म्यही आहे; पण मुख्य कारण ह्या लोकांमधील राजकीय परिपक्वता, समजदारपणा व आपल्या सर्वांचे हित एकत्र नांदण्यात आहे, हे ओळखण्याची पात्रता हेच आहे. ह्या सर्व गोष्टींवरून आपणांस—भारतीयांना—पुष्कळ शिकण्यासारखे आहे. हिंदुस्थानातही अनेक जमाती आहेत, अनेक भाषा आहेत, वेगवेगळ्या चालीरीती आहेत, पोशाखामध्ये व इतर अनेक बाबतींत भिन्नता आहे. हे जरी खरे असले तरी सर्व भारतीयांमध्ये अनेक समान गुणधर्म आहेत, समान परंपरा आहेत, समान संस्कृती आहे, सर्वांना जोडणारे अनेक तात्त्विक व ऐतिहासिक दुवे आहेत, तेव्हा सर्व भारतीयांनी एकत्र नांदणे का शक्य होऊ नये ? तू म्हणशील की, " सर्व हिंदुस्थानासाठी एकच राज्यघटना आहे, हिंदुस्थानात अनेक प्रदेश राज्ये असली तरी ती राज्ये भारताच्या एका संघराज्याचे घटक आहेत, सर्व भारताचे एक मध्यवर्ती पार्लमेंट आहे व एक मध्यवर्ती मंत्रिमंडळ आहे, मग ' युनायटेड किंगडम ' मधील लोकांपासून विशेष काय शिकण्यासारखे आहे ? " हा प्रश्न बरोबर आहे, पण युनायटेड किंगडममधील इंग्रज, आयरिशादि लोकांत जे हार्दिक साहचर्य—सहकार— व जे भावनात्मक ऐक्य दिसतात, ते गुण आम्हा भारतीयांत तितकेसे मुरलेले नाहीत. युनायटेड किंगडमचे ज्या सर्व भागांवर राज्य आहे, ते सर्व भाग आपलेच आहेत व म्हणून कोणत्या एका भागावर परकीयांचे आक्रमण आले तर ह्या राज्यातील सर्व लोक त्या भागाच्या मदतीला धावून जातात, कोणत्याही एका भागाचे सुखदु:ख हे आपलेच सुखदु:ख आहे, असे सर्वजण मानतात, ही जी जाज्वल्य देशभक्ती येथील लोकांत दिसते, ती अद्याप आपणांमध्ये खोल रुजलेली नाही. यामुळे माझ्या मनाला रूखरूख वाटते. एक दिवस, एक महिना किंवा एक वर्ष नव्हे तर कित्येक शतके इंग्रज, आयरिश, स्कॉटिश व

वेल्स लोक एका कुटुंबांतील मंडळीप्रमाणे वागत आलेले आहेत, एकमेकांच्या सहकार्याने त्यांनी आपला देश समृद्ध केला आहे, त्या देशाची प्रतिष्ठा व शान वाढविलेली आहे, त्याचप्रमाणे भारतीयांनी परस्पराशी एकजीव झाले पाहिजे, भारताचे नाव उज्ज्वल केले पाहिजे, त्याची कीर्ती सर्व दुनियेत दुमदुमेल असे कर्तृत्व करून दाखविले पाहिजे व सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे भारत ही आपली सर्वांची मातृभूमी आहे, ही जाणीव सदैव हृदयात बाळगून तिच्या संरक्षणासाठी प्राण अर्पण करण्यासही तयार असले पाहिजे, एवढेच ह्या अनुषंगाने मला सांगावयाचे होते.

रॉयल हॉटेलात मुक्काम होता त्यावेळी एकदा जेवताना मी विशेष काही घेत नाही हे पाहून तेथील एक वेट्रेस—वाढणारी बाई—माझ्याजवळ येऊन मोठ्या आपुलकीने तिने मला विचारले, "तुम्हांला कोणते पदार्थ आवडतात ? चिकन—कोंबडीचे मांस—आणू का ? " मी म्हणालो, " नको ! " मग तिने " मटन, रोस्ट डक वगैरे अनेक खाद्य पदार्थांची नावे घेतली, पण त्यांपैकी सर्व पदार्थांना मी नकार दिला. त्यावेळी तिला वाईट वाटले. शेवटी मी म्हणालो, " मला सूप, टोस्ट, बिस्किटे व चीज पाहिजे. " त्यावेळी तिला हायसे वाटले व ती हसून म्हणाली, " तरी बरे आमच्या येथील काही पदार्थ तरी तुम्हांला आवडतात ! नाही तर तुमच्यासारख्या पाहुण्याला उपाशी ठेवण्याचा प्रसंग आमच्यावर ओढवला असता. "

रॉयल हॉटेलातील प्रेमळ वेट्रेससारखी माझी काळजी वाहणारी माणसे ह्या आमच्या दौऱ्यात ठिकठिकाणी आहेत, ही माहिती वाचून तुम्हांला माझ्याबद्दल काळजी वाटणार नाही, अशी माझी खात्री आहे.

तुझा

**नाना**

● ● ●

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. १२१ स्थळप्रत
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों. दि. ....................

: २१ :

# निवडणूक प्रचाराची साधने

रॉयल हॉटेल
१०६ सॉची हॉल, स्ट्रीट,
ग्लासगो, स्कॉटलंड.
ता. २४-५-१९५५

चि. **विठ्ठलास** सप्रेम आशीर्वाद—

मी ह्या पत्रातून युनायटेड किंगडममधील निवडणुकीचा उल्लेख केला आहे. निरनिराळ्या राजकीय पक्षांचे उमेदवार फार सुशिक्षित आहेत, त्यांचा राजकारणाचा व इतर विषयांचा अभ्यास सखोल आहे, ते आपापल्या मतदारांच्या अडीअडचणी दूर करण्यात तत्पर असतात. त्यांची राजकीय क्षेत्रातील तपश्चर्या मोठी आहे, त्यांना जनतेबद्दल अतिशय आपुलकी आहे व आपल्या राष्ट्राच्या अभ्युदयासाठी त्यांना तळमळ आहे. त्यांचे पक्ष व मार्ग भिन्न असतील, पण त्या सर्वांना आपल्या राष्ट्राच्या उत्कर्षाविषयी व जनतेच्या सुखाविषयी कळकळ आहे. आपल्या देशात—भारतात—प्रत्येक राजकीय पक्षाने अशा प्रकारचे सुशिक्षित, जाणते, चारित्र्यवान, निर्भीड, प्रामाणिक, कर्तव्यदक्ष व राजकारणपटू लोकांनाच आपले उमेदवार म्हणून लोकसभेच्या व इतर कायदेमंडळाच्या निवडणुकीस उभे करणे आवश्यक आहे, असे केले तरच आपल्या देशातील लोकशाही दृढमूल होईल व लोकशाही कारभार जनतेच्या हिताचा व राष्ट्राच्या अभ्युदयाचा होईल, यात मला विलकुल शंका वाटत नाही.

ग्रेट ब्रिटनमध्ये सध्या जी निवडणूक चालू आहे, त्यामध्ये रेडिओ, टेलिव्हिजन इत्यादि साधनांचा उपयोग आपल्या प्रचारासाठी येथील राजकीय

पक्ष करतात. ह्याशिवाय ह्या पक्षांना पाठिंवा देणारी वेगवेगळी वर्तमानपत्रे आहेत. भारतात ज्याप्रमाणे राजकीय पक्षांतर्फे निवडणूक जाहीरनामे निघतात, तसे ग्रेटब्रिटनमधील पक्षही आपापले निवडणूक जाहीरनामे प्रसिद्ध करतात, प्रत्येक उमेदवारही भारतातील उमेदवाराप्रमाणे आपली व आपल्या पक्षाच्या ध्येयधोरणाची माहिती देणारी पत्रके व पुस्तिका प्रसिद्ध करतो. भिंतीपत्रकेही येथे मला पाहावयास मिळाली, पण ती थोडी व मोजक्या ठिकाणी लावलेली मला दिसली. आपल्या देशात भिंतीपत्रकांचा सुकाळ असतो, निवडणुकीच्या वेळी आपल्याकडे जेथे जागा दिसेल तेथे भिंतीपत्रके लावली जातात, हे तू पाहिले असशील. येथे पक्षातर्फे व उमेदवारांतर्फे जी पत्रके छापून वाटली जातात, ती मात्र गंमतीची व नाविन्यपूर्ण असतात. एकाच पत्रकात काळी, तांबडी वगैरे निरनिराळ्या रंगांच्या शाईमध्ये मजकूर छापलेला असतो. त्यामध्ये कार्टून्स—व्यंगचित्रे—ही असतात. वेगवेगळे आकडे व तक्तेही त्यात पाहावयास सापडतात.

मी मागे सांगितलेच आहे की येथे निवडणूक प्रचार घरोघरी जाऊन करण्यावर व मतदारांच्या भेटी घेण्यावर जास्त भर दिला जातो. सभा थोड्याच होतात. सभांना श्रोतेही फार नसतात. त्या त्या पक्षांच्या पुढाऱ्यांचे दौरेही कमीच असतात, मग कार्यकर्त्यांच्या दौऱ्याबद्दल येथे वानवाच आहे, असे म्हणावयास हरकत नाही. पक्षांच्या पुढाऱ्यांत देखील जे अगदी राष्ट्रीय दर्जाचे पुढारी आहेत, त्यांचेच बहुधा दौरे होतात व त्यांची त्या दौऱ्यांत भाषणेही मर्यादित होतात. मला वाटते की, ह्या देशातील मतदार सर्वच सुशिक्षित असल्यामुळे व लोकशाही त्यांच्या अगदी अंगवळणी पडल्यामुळे तसेच ते वर्तमानपत्रे वाचणारे व राजकारणाचे माहितगार असल्यामुळे येथे निवडणुकीच्या वेळेला खूप सभा घेणे येथील राजकीय पक्षांना अनावश्यक वाटत असावे. येथे वर्तमानपत्रांचा खपही फार मोठा आहे.

अगदी थोडे तर अपवाद सोडले सर्वच मतदार वर्तमानपत्रे वाचणारे आहेत. घरोघरी रेडिओ आहेत. चार पाच घरांआड टेलिव्हिजनसेट मग सभांची तिनकीशी गरज येथील लोकांना भासली नाही, तर नवल नाही.

आता पुरे ! पुढील हकिकत पुढच्या पत्रातून !

चि. उषा व सौ. पाटील यांनी लिहिलेले ता. १८–५–५५ चे पत्र मला काल मिळाले. बऱ्याच दिवसांनी तुमच्याकडून मला पत्र आले, त्यामुळे मला किती आनंद झाला म्हणून सांगू ! त्या आनंदाचे वर्णन करता येणे मला शक्य नाही, अति मौल्यवान वस्तू हरवावी व ती अचानक सापडावी किंवा रखरखीत उन्हात बराच वेळ चालल्यानंतर व तहानेने व्याकूळ झाल्यावर झाडाची सावली लाभावी व तेथेच पाण्याचा झराही असावा व त्यामुळे मनास जो आनंद लाभतो, तसा आनंद मला तुमचे पत्र मिळाल्यानंतर व तुमच्याच शब्दांत तुमची खुशाली कळल्यानंतर झाला !

तुझा

**नाना**

● ● ●

: २२ :

# ह्वेत तरंगणारा किल्ला

**रॉयल हॉटेल**
**१०६ सॉची हॉल, स्ट्रीट,**
**ग्लासगो, स्कॉटलंड,**
ता. २५–५–१९५५

चि. आशाला सप्रेम आशीर्वाद—

ग्लासगोहून ता. २५ मे रोजी सकाळी आम्ही आगगाडीने एडिनबर्गला गेलो. एडिनबर्गला पोहोचावयास आम्हांला सुमारे एक तास लागला. एडिनबर्गला गेल्यावर प्रथम आम्ही तेथील इतिहासप्रसिद्ध जुना किल्ला पाहिला. त्याला

एडिनबर्ग कॅसल म्हणतात. हा किल्ला एका डोंगरावर बांधलेला आहे. त्या डोंगराची पायथ्यापासून उंची २७० फूट आहे व समुद्रपातळीपासून सुमारे ४५० फूट आहे. ह्या किल्ल्याकडे रॉयल माईल ( Royal Mile ) नावाच्या रस्त्याने जावे लागते. एडिनबर्ग शहरातील हा रस्ता–ऐतिहासिक व जुना आहे. किल्ल्याकडे जाताना प्रथम एस्प्लनेड ( Esplande ) किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले सपाट मैदान–लागते. त्यानंतर खंदक लागतो. तो कोरडाच आहे. त्या खंदकाला लागून किल्ल्याचा बाहेरचा तट आहे. किल्ल्याच्या मुख्य दरवाजाकडे जाण्यासाठी खंदकावर पूल बांधला आहे. पूर्वी ह्या ठिकाणी जो पूल होता, तो खंदकावर टाकता येत होता व पुन्हा काढताही येत होता, तो आता येथे नाही. त्याच्या दोन्ही बाजूंचे दगडांचे पाये ( Pire ) मात्र अद्यापही शाबूत आहेत, ह्याच ठिकाणी हल्लीचा पक्का पूल बांधण्यात आला आहे. ह्या पुलावरून 'कॅसल दरवाजा' नावाच्या मुख्य दरवाजाकडे आम्ही गेलो. ह्या दरवाजाच्या दोन्ही बाजूस कोनाडे ( Niches ) आहेत व त्यांत एका बाजूस ब्रूस (Bruce) व दुसऱ्या बाजूस वॅलेस (Wallace) ह्या स्कॉटलंडच्या इतिहासातील प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे आहेत. कॅसल दरवाजाला लागून काही इमारती आहेत. ह्या दरवाजातून प्रवेश केल्यावर आम्हांला एक अवाढव्य गोल आकाराची भिंत दिसली. ती भिंत 'हाफ मून' नावाच्या ( Halfmoon ) तोफखान्याची आहे. ही भिंत सुमारे ३५० वर्षांपूर्वी बांधली गेली असे आम्हांला तेथे कळाले. ह्या भिंतीपलीकडे डेव्हिड नावाच्या बुरूजाचे अवशेष आहेत, हा बुरूज ६०० वर्षांचा जुना आहे. पुढे आम्ही ज्या रस्त्याने गेलो, तो रस्ता डोंगराच्या उत्तरेकडील बाजूला वळसा घालून जातो. रस्त्याने जाता जाता आम्हांला आणखी तीन दरवाजे लागले, त्यांतून आत गेल्यावर आम्हांला बालेकिल्ला ( Citadel ) लागला. ह्या बालेकिल्ल्याला एक तट आहे, त्याला इन्नर बॅरिअर–आतला तट असे नाव आहे.

बालेकिल्ल्यामध्ये सेंट मार्गारेट्स चॅपल नावाचे जुने प्रार्थना मंदीर आहे. ह्या प्रार्थना मंदिराच्या बाहेरच्या बाजूला ठेवलेली एक अगडबंब तोफ आम्ही पाहिली. तिला 'मॉन्स मेग' (Mons Meg) असे नाव आहे. क्रॉमवेलनी हा किल्ला सर केला त्यावेळी त्यांनी ही तोफ पाहिली व किल्ल्याच्या संरक्षणा-

साठी तिने जो प्रताप केला, तोही अनुभविला. त्यावरून " माणसांचा बळी घेणारी लोखंडी राक्षसीण " ( The iron murderer meg ) असे त्यांनी तिचे वर्णन केले. क्रॉमवेलने 'मेग' तोफ आपल्या कब्ज्यात घेतली व टॉवर ऑफ लंडनमध्ये नेऊन ठेवली. पुढे सर वाल्टर स्कॉटच्या प्रयत्नाने ती मेग तोफ पुन्हा एडिनबर्गच्या किल्ल्यामध्ये आणली गेली. ह्या तोफेने अनेक लढायांत आपला प्रताप गाजविला. ह्या तोफेची लांबी १३ फूट आहे. १४०८ यार्डांच्या अंतरावर ही तोफ दारूगोळे फेकीत असे. त्यावेळी हे बिकट कार्य करण्यासाठी तिला एकावेळी १०५ पौंडाच्या दारूचा खुराक लागत असे.

किल्ल्याच्या पायथ्याशी जे मैदान–एस्प्लनेड–आहे, तेथे सौंदर्याबद्दल नावाजलेली लेडी जेन डग्लस ( Jane Douglas ) हिला जिवंत जाळण्यात आले, त्यावेळी तिचा मुलगा व नवरा हे किल्ल्यातील डेव्हिड टॉवरमध्ये (बुरूज) बंदीवान होते. ज्या वर्षी जेन डग्लसला जाळण्यात आले, त्याच वर्षी ह्याच मैदानावर पाच चेटक्यांनी राक्षसाबरोबर नृत्य केले या आरोपावरून पाच व्यक्तींना जाळण्यात आले. त्यापूर्वी दोन शतके याच मैदानावर अनेक राजद्रोह्यांना, जादूटोणा करणाऱ्यांना व चेटक्यांना जाळून ठार करण्यात आले. अशा ज्या घटना या किल्ल्यासंबंधी सांगण्यात येतात, त्यांपैकी काही ऐतिहासिक आहेत, तर काही दंतकथा आहेत.

हा किल्ला पाहिल्यानंतर मला लंडन शहरातील टॉवर ऑफ लंडनची आठवण झाली. टॉवर ऑफ लंडनचे वर्णन मी मागच्या एका पत्रात केलेले आहे. ह्या दोन्ही वास्तूंमध्ये बरेच साम्य आहे. दोन्हीही ठिकाणे अनेक ऐतिहासिक घटनांबद्दल प्रसिद्ध आहेत. दोन्हीही फार पुरातन ठिकाणे आहेत. टॉवर ऑफ लंडनमध्ये इंग्रज लोकांचा इतिहास प्रामुख्याने पाहावयास मिळतो, तर एडिनबर्ग किल्ल्यात स्कॉटिश लोकांचा इतिहास पाहावयास सापडतो. इंग्रज लोकांना ज्याप्रमाणे टॉवर ऑफ लंडनबद्दल अभिमान वाटतो, त्याचप्रमाणे स्कॉटिश लोकांना एडिनबर्ग किल्ल्याविषयी अभिमान वाटतो. दोन्ही वास्तूंमध्ये किती तरी सुखदायक तसेच दुःखदायक प्रसंग घडलेले आहेत. ही दोन्ही ठिकाणे अनेक क्रूर कृत्यांच्या साक्षीही आहेत.

एडिनबर्ग किल्ल्यावरून एडिनबर्ग शहराचा सुंदर व आकर्षक देखावा दिसतो. किल्ल्याच्या माथ्यावरून शहरातील चर्चेस, स्मारके, इतर भव्य इमारतींच्या रांगा दिसतात. तसेच हिरव्या झाडांनी आच्छादिलेल्या दूरदूरच्या टेकड्या, माळरानापाठीमागे माळराने व उत्तरेकडच्या समुद्राचे ( North sea ) निळेभोर पाणी यांची दृश्ये डोळ्यांपुढे चलितचित्रांसारखी नाचू लागतात. दररोज सकाळी एका विवक्षित वेळी ह्या किल्ल्यावरून तोफ उडविली जाते व तिचा आवाज ऐकून एडिनबर्गचे नागरिक आपापली घड्याळे योग्य वेळ दाखवितात की नाही हे पाहतात व त्याप्रमाणे आपली घड्याळे लावतात. कधी कधी येथे धुके पडते त्यावेळी सूर्यप्रकाशात किल्ल्यावरील इमारती डोके वर काढण्याचा जणू प्रयत्न करतात व धुक्यातून कुठे कुठे दिसणाऱ्या त्या इमारती हवेत तरंगत आहेत, असे वाटते. केव्हा केव्हा धुक्यामुळे हवेत जणू किल्ल्यातील इमारती तरंगत आहेत, हे दृश्य जास्त उठावदार व नेत्रदीपक व्हावे म्हणून रात्रीच्या वेळी फ्लडलाईटिंगचाही येथे उपयोग करण्यात येतो. रात्री धुक्यात फ्लडलाईटिंगमुळे एडिनबर्ग शहरावर जणू हा किल्ला हवेत तरंगत आहे, असे दिसते, तेव्हा ते दृश्य कुठल्या तरी वेगळ्या सृष्टीतले आहे, असे भासते. मी अर्थात ते दृश्य पाहिले नाही. कारण मी तेथे होतो त्यावेळी धुके नव्हते व रात्रही नव्हती. परंतु एडिनबर्गच्या काही लोकांनी ह्या अकल्पनीय दृश्याची रसभरीत केलेली वर्णने मी ऐकली. त्या वर्णनाच्या आधारे मी ही माहिती येथे देत आहे. हे वर्णन वाचून ते अपूर्व दृश्य कसे असेल, याची कल्पना करण्यात तू खचित मग्न होशील.

तुझा

**नाना**

● ● ●

: २३ :

# केलव्हिन हॉल : ग्लॅसगो नगरपालिकेची दुभती गाय

रॉयल हॉटेल
१०६ सॉची हॉल स्ट्रीट
ग्लासगो, स्कॉटलंड,
ता. २६–५–१९५५

चि. **मंगलास** सप्रेम आशीर्वाद—

ता. २५ मे रोजी सकाळी एडिनबर्ग किल्ला पाहिल्यानंतर आम्ही ह्या किल्ल्याजवळ असलेल्या प्रिन्सेस स्ट्रीट गार्डन्स–बागा–पाहिल्या. ज्या ठिकाणी ह्या बागा आहेत. त्या ठिकाणी जमीन उंच–सखल आहे, तेथे लहान लहान टेकड्याही आहेत. त्यामुळे बागांची रचना मोठी आकर्षक झाली आहे. त्यानंतर आम्ही एडिनबर्ग शहरात हिंडून ते शहर पाहिले. येथे प्रिन्सेस स्ट्रीट नावाचा रस्ता आहे. त्या रस्त्यावर सर वॉल्टर स्कॉटचे स्मारक आहे. ह्या स्मारकाच्या वास्तूमध्ये एक मोठा मिनार आहे व तो खूप उंच आहे, त्याच्या चोहोबाजूला लहान मिनार आहेत, या सर्व मिनारांमध्ये जे नक्षीकाम केलेले आहे, ते सुंदर आहे. ह्या वास्तूच्या खालच्या बाजूला उंच कमानी आहेत. ह्या स्मारकाशिवाय प्रिन्सेस स्ट्रीटवर ज्या इमारती आहेत, त्या भव्य व भरीव आहेत. येथील पार्लमेंटची इमारत पाहिली. ह्या ठिकाणी पूर्वी स्कॉटलंड स्वतंत्र देश असताना त्या देशाच्या पार्लमेंटच्या–कायदेमंडळाच्या सभा भरत. हल्ली येथे कोर्टस्–न्यायालये आहेत.

ग्लासगो शहरात हिंडत असता एकदा मला एक नाविन्यपूर्ण इमारत पहावयास मिळाली. त्या इमारतीचे नाव आहे 'केलव्हिन हॉल.' घुमट असलेली ही एक अवाढव्य वास्तू आहे.बाहेरून ती इमारत पाहिल्यानंतर मला ती नवल-

पूर्ण वाटली व म्हणून ती इमारत आतून पाहण्याची माझी फार इच्छा झा ली. त्या इमारतीच्या दरवाजाजवळ असलेल्या कचेरीत मी चौकशी केली व ती इमारत पाहण्याची इच्छा दर्शविली. त्या कचेरीत श्री. बिलीग्रॅहॅम (Mr.Billy Graham) नावाचे एक अधिकारी होते. त्यांनी माझी इमारत पाहण्यासाठी उत्सुकता पाहून मला ती इमारत दाखविली. इतकेच नव्हे तर त्या इमारतीविषयी खूप माहिती दिली. हा केलव्हिन हॉल ग्लासगो म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मालकीचा आहे. नानाप्रकारांची प्रदर्शने, खेळांचे सामने, करमणुकीचे कार्यक्रम वगैरेंसाठी नेहमीच जागेची जरुरी असते. लोकांची ही गरज भागविण्यासाठी कायम स्वरूपाची इमारत आपण बांधावी, असा ग्लासगो नगरपालिकेने विचार केला व पुढे तिने हा ' केलव्हिन ' त्या कामासाठी बांधला. १९२७ साली तीन लक्ष पौंड खर्चून त्या नगरपालिकेने हा हॉल बांधला. आता त्या हॉलची किंमत १० लाख पौंड सहज होईल. त्या हॉलमध्ये गेल्यावर त्याचा विस्तार पाहून मी तर आश्चर्याने स्तंभित झालो. चार एकरांचे क्षेत्र असलेला हा हॉल आहे व त्याला चोहोबाजूने भिंती आहेत. हजारो लोक एका वेळी ह्या हॉलमध्ये बसू शकतात व प्रदर्शने, खेळ वगैरे पाहू शकतात. श्री. बिलीग्रॅहम म्हणाले की, " मागे एक प्रदर्शन झाले होते. त्यावेळी ते प्रदर्शन पाहण्यासाठी रोज सुमारे ६० ते ६५ हजार लोक येत असत. प्रत्येक प्रेक्षकास एक शिलिंगाची फी म्युनिसिपल कॉर्पोरेशनने आकारली. गेल्या दुसऱ्या महायुद्धापासून ह्या हॉलमध्ये जी प्रदर्शने व इतर कार्यक्रम झाले, त्या कार्यक्रमांच्या प्रवेश फीचे सुमारे पाच लाख पौंडांचे उत्पन्न ग्लासगो नगरपालिकेस मिळाले." ग्लासगो नगरपालिकेने केलव्हिन हॉल बांधून एक कायम स्वरूपाचे उत्पन्नाचे साधन प्राप्त करून घेतले आहे. आपल्या देशात नगरपालिकांनी ग्लासगो नगरपालिकेने याबाबतीत घालून दिलेला धडा गिरविला पाहिजे. आपल्या इकडच्या नगरपालिकांनीही केलव्हिन हॉलसारख्या इमारती बांधल्या तर त्यांनाही एक चांगले उत्पन्नाचे साधन मिळण्यासारखे आहे.

या केलव्हिन हॉलमध्ये बॅडमिंटन, बॉक्सिंग, बिलियर्डस् इत्यादि खेळांचे सामने होतात. नाटके, नृत्य, सर्कस, नकला, कार्निव्हल्स, लष्करी व इतर कसरतीचे खेळ इत्यादि कार्यक्रम ह्या हॉलमध्ये केले जातात; कुस्त्यांच्या

व गुरांच्या प्रदर्शनापासून ते जहाजाचा धंदा, इंजिनियरिंग, अन्न ( Food ), फुले, शेतकी, निरनिराळे उद्योगधंदे, शास्त्रे व चित्रकला, स्थापत्य, इत्यादि विषयांसंबंधी नानाप्रकारांची प्रदर्शने येथे भरविली जातात. मोठमोठ्या धार्मिक, सामाजिक इत्यादि सभा ह्या ठिकाणी होतात. अशा रीतीने नानाप्रकारांनी ह्या हॉलचा उपयोग केला जातो. कधी कधी एकाच वेळी ह्या हॉलमध्ये वेगवेगळी एनक्लोझर्स–तात्पुरत्या भिंती–अगर पार्टिशन्स घालून आवारे तयार करून वर सांगितलेल्या कार्यक्रमांपैकी काही कार्यक्रम केले जातात, इतका हा हॉल मोठा आहे. कधी कधी नृत्य नाटच इत्यादि कार्यक्रमांसाठी ग्लासगो नगरपालिका कलावंतांना वेतन देऊन ते कार्यक्रम पार पाडते व ह्या कार्यक्रमांतूनही त्या नगरपालिकेला फार मोठे उत्पन्न मिळते.

सहज बोलता बोलता श्री. ग्रॅहॅम यांनी ग्लासगो नगरपालिकेच्या दुसऱ्या एका उत्पन्नाच्या बाबीसंबंधी माहिती दिली. केलव्हिन हॉलमध्ये जेव्हा वर वर्णन केलेले कार्यक्रम होतात, तेव्हा केटरिंगची म्हणजे प्रेक्षकांना खाद्यपेये पुरविण्याची व्यवस्थाही नगरपालिका स्वत: करते, ह्यातूनही तिला चांगले उत्पन्न मिळते.

श्री. ग्रॅहॅमनी आणखी पुढे सांगितले की, "ग्लासगो नगरपालिका आईस्क्रीम तयार करते व हजारो गॅलन आईस्क्रीम विकते, हॉस्पिटलसारख्या संस्थांनाही नगरपालिका आईस्क्रीम पुरविते. ह्याहीपासून नगरपालिकेला उत्पन्न मिळते." ह्या ज्या उत्पन्नाच्या निरनिराळ्या साधनांचा ग्लासगो नगरपालिकेने अवलंब केला आहे, त्यापासूनही भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांना पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे.

ग्लासगो शहरात ट्राम्समध्ये ड्रायव्हरचे काम करणाऱ्या बऱ्याच स्त्रिया मी पाहिल्या. केवळ कंडक्टरचेच नव्हे, तर ट्राम्स चालविण्याचेही काम येथील स्त्रिया करतात हे पाहून मला मोठा अचंबा वाटला.

ग्लासगो शहरातील इमारती लंडन, बेलफास्ट इत्यादी शहरांप्रमाणे बहुधा दगडी आहेत. लंडन वगैरे शहरात जशा इमारती भक्कम, भरीव व भव्य वाटल्या तशाच इमारती मला ग्लासगो शहरात पाहावयास मिळाल्या. ह्या शहरातील रस्ते, दगड व चुना यांचे बनलेले आहेत. दगडांना चौकोनी आकार देऊन त्यापासून हे रस्ते तयार झालेले आहेत. हे रस्ते फार पक्के आहेत,

हे सांगण्याची जरुरीच नाही. त्यांची मोडतोड किंवा झीजही फारच कमी आहे, हेही स्पष्टच दिसते. खडी, टार किंवा सिमेंट यांचे रस्ते फारच कमी दिसले.

दुसऱ्या एका गोष्टीचा निर्देश करून मी हे पत्र संपविणार आहे. इंग्लंड व उत्तर आयर्लंड ह्या देशांत मी फिरलो व आता स्कॉटलंड देशात फिरत आहे, पण ह्या तिन्ही देशांत मला एकही भिकारी पाहावयास मिळाला नाही. तसेच फाटकेतुटके अगर गलिच्छ वा मळकट कपडे घातलेला माणूस मला दिसला नाही. आज मात्र मी ग्लासगो येथे एक लंगडा भिकारी पाहिला. त्याच्या-बरोबर एक माणूस व एक स्त्री होती. तो माणूस पेटी वाजवीत होता व ती स्त्री गात होती. अशी दृश्ये आपणांकडे तर सर्रास पाहावयास सापडतात. येथे अशी दृश्ये दुर्मिळ व अपवाद म्हणूनच मी त्या पाहिलेल्या भिकाऱ्याचा येथे निर्देश केला.

तुझा

**नाना**

● ● ●

: २४ :

# चिरयौवना पॅरिस नगरी

**हॉटेल रॉन्सेरे**

**१० बोलेव्हर्ड, मॉंटमार्ट्र**

( Boulevard Montmartre ) **पॅरिस,**

ता. २९-५-१९५५

चि. **उषाला** सप्रेम आशीर्वाद—

ता. २६ मे हा ग्रेट ब्रिटनमधील पार्लमेंटच्या मतदानाचा दिवस. ह्या दिवशी आम्ही ग्लासगोतील मतदान पाहावयास गेलो.

येथील सरकारातर्फे प्रत्येक मतदाराला पोस्टाने एक 'ऑफिशिअल पोल कार्ड' पाठविले जाते. त्या कार्डावर त्या मतदाराच्या मतदान केंद्राचा संपूर्ण पत्ता दिलेला असतो; तसेच त्याचा मतदारांच्या यादीतील नंबर व पत्ताही त्या कार्डात दिलेला असतो. त्याचप्रमाणे मतदान कसे करावे वगैरेसंबंधी सूचनाही त्या कार्डात नमूद केलेल्या असतात.

येथील प्रत्येक मतदाराला लिहिता वाचता येत असल्यामुळे त्याला वरील प्रकारचे कार्ड आले म्हणजे तो ते वाचतो व त्यात दिलेल्या सूचनांप्रमाणे मतदान केंद्रावर जाऊन मतदान नोंदवितो, असे माहितगार मतदार मतदान केंद्रावर आल्यावर त्या केंद्रावरील सरकारी नोकरांना कुठलाही त्रास होत नाही, त्यांना मतदारांना ' मते कशी द्यावीत, खूण कोठे व कशी करावी वगैरे गोष्टी समजावून सांगण्याची गरज पडत नाही. त्यांचा त्यामुळे वेळ वाचतो व मतदानही भराभर होते. ह्या सर्व पद्धतींमुळे मला मतदान केंद्रावर कोठेही गोंधळ दिसला नाही, गडबड दिसली नाही. प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान शांतपणे व सुरळीतपणे चाललेले होते.

ता. २६ मे ला रात्री आम्ही आगगाडीने ग्लासगोहून निघालो. दुसऱ्या दिवशी ता. २७ मे रोजी सकाळी ७–१० ला आम्ही लंडनला पोहोचलो. लंडनमध्ये ता. २६ मेला रात्री ट्राफल्गार स्क्वेअरवर ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकीचे निकाल जसे येत तसे जाहीर केले जात होते. रात्रभर हजारो लोक त्या ट्राफल्गार स्क्वेअरवर निकाल ऐकत होते. लंडनला गेल्यावर मी ही हकिकत ऐकली. ता. २७ मे रोजी अनेक ठिकाणी लोक टेलिव्हिजन सेट्स लावून निवडणुकीच्या निकालाची माहिती मिळवीत होते, नुसती माहितीच त्या टेलिव्हिजन सेटवर त्यांना मिळत होती असे नव्हे तर टेलिव्हिजनवर निवडून आलेल्या उमेदवारांना त्यांचे चहाते कोठे हार घालीत आहेत, तर कोठे त्यांचे अभिनंदन होत आहे, इत्यादि घटनांची चित्रे त्यांना पाहावयास मिळत होती, तसेच त्या उमेदवारांची भाषणे, त्यांच्या चहात्यांची भाषणे व इतर माहितीही त्यांना ऐकावयास मिळत होती, काही ठिकाणी रस्त्यावरील दुकानांत व हॉटेलांत टेलिव्हिजन सेटस् चालू होते. मीही एका हॉटेलात टेलिव्हिजनवर निवडणुकीच्या निकालासंबंधी हकिकत ऐकली व पाहिली.

ता. २८ मे रोजी सकाळी ११ वाजून १० मिनिटांनी लंडनहून डोव्हरला जाण्यासाठी मी आगगाडीत बसलो. काही वेळात खडूसारख्या पांढऱ्या रंगाच्या मातीचे डोंगर दिसू लागले, ते डोंगर डोव्हर बंदर आलें, याचा इशारा देत होते. सुमारे १२–४५ वाजता दुपारी मी डोव्हरला पोहोचलो व डोव्हरहून बोटीने दीड वाजता निघून अडीच वाजता म्हणजे सुमारे एक तासाने कॅलेला पोहोचलो. तेथे गेल्यावर कळाले की अर्ध्या तासाने पॅरिसला जाणारी आगगाडी निघणार आहे, त्या आगगाडीत माझ्या रिझर्व्ह केलेल्या जागी जाऊन बसलो.

कॅले ते पॅरिस हा प्रवास सव्वातीन तासांचा होता. ह्या प्रवासात आगगाडीतून फ्रान्समधील अनेक खेडी, खेड्यांतील शेती, नद्या वगैरे पाहावयास मिळाली. इंग्लंड, आयर्लंड, व स्कॉटलंड ह्या देशांत माझ्या ह्या दौऱ्यात मला डोंगराळ भाग जास्त दिसला, त्यामुळे त्या देशांतील जमीन ठिकठिकाणी उंच सखल आहे. शेतीचे लहान लहान तुकडे असलेले दिसले. फ्रान्समध्ये मात्र महाराष्ट्राच्या घाटप्रदेशात जशी लांबच लांब सपाट जमीन असते, तशा प्रकारची जमीन दिसली, मधून मधून डोंगर होते. पण थोडे होते. जमीनही कसदार वाटली; शेते मोठाली होती; त्या शेतांवर अनेक ठिकाणी उभी पिके होती, भाजीपाला व गव्हासारख्या धान्याची पिके त्या शेतांत दिसली. काही ठिकाणी घराभोवती भाजीपाला लावलेला दिसला. घरे कौलारू होती. एकंदर खेड्यांची व शेतीची दृश्ये हिंदुस्थानातल्यासारखी वाटली. ही दृश्ये पहात पहात मी हा प्रवास संपविला. सायंकाळी सव्वा सहा वाजता पॅरिसला पोहोचलो.

पॅरिस शहरात फिरत असता मी येथील अनेक कॉफी हाऊसेस–कॉफीची हॉटेल्स पाहिली. ह्या हॉटेल्सपुढे रस्त्यांच्या बाजूला ऐसपैस व्हरांडे असतात. त्यामध्ये ठिकठिकाणी खुर्च्या व मेजेस असतात. मेजांवर मोठाल्या रंगीत छत्र्या असतात, त्या छत्र्यांना झालरी असतात. त्या छत्र्यांखाली खुर्च्यांवर बसून लोक मजेने कॉफीपान करताना पाहिले. ही कॉफी हाऊसेस गिऱ्हाईकांनी चिक्कार भरलेली होती. हॉटेलांच्या आतल्या बाजूला ऑर्केस्ट्राज होते. आर्के-स्ट्राजबरोबर गाणाऱ्या स्त्रिया व पुरुषही अनेक कॉफी हाऊसेसमध्ये पाहावयास मिळाले. काही वेळ शहरात फिरल्यानंतर मी रॉन्सेरे हॉटेलात आलो व भोज-नाच्या दिवाणखान्यात जेवणासाठी गेलो. त्या दिवाणखान्यातील डामडौलही आल्हाददायक होता; तेथील टेबलांवर जी काचेची व चिनी मातीची भांडी होती, ती कलाकुसरीचे नमुने होते. पिण्याचे पाणी ज्या सुरयांमध्ये ठेवलेले होते, त्या नाना आकाराच्या व सुंदर होत्या. जे लोक दारू पिणारे होते, त्यांना जे प्याले दिले होते, ते वेगवेगळ्या आकारांचे होते, ज्या बुधल्यांमधून दारू ठेव-लेली होती, तेही कलात्मक होते. प्लेट्सवर रंगीत नक्षीकाम केलेले होते. त्या डायनिंग हॉलच्या छतांवर निरनिराळ्या रंगात वेलबुट्टी काढलेली होती; सोनेरी रंग मधूनमधून त्यात झळकत होता. छतांमध्ये काचेची विविध प्रकारची झुंबरे होती व त्यांमध्ये मेणबत्तीसारखे विजेचे दिवे प्रकाशत होते.

जेवताना वेटर्स मला विचारीत की, "तुम्हांला काय हवे" त्यांना थोडे फार इंग्रजी येत होते, पण माझी थट्टा करावी म्हणून मला मुद्दामच फ्रेंच भाषेमध्ये प्रश्न विचारीत. मला फ्रेंच येत नाही, हे सांगितल्यावर ते मला फ्रेंच शब्द शिकविण्याचा प्रयत्न करीत व निरनिराळ्या खाद्यपदार्थांची फ्रेंच नावे सांगत. ते वेटर्सही मोठे विनोदी व मोकळ्या स्वभावाचे होते. जेवण झाल्यावर विश्रांतीसाठी व धूम्रपान करण्यासाठी दिवाणखाने आहेत, तेथे आरामशीर कोचेस आहेत. कोचेसवरील मखमली कापडावर फुले वगैरे निरनिराळ्या रंगात काढलेली आहेत. ह्याही दिवाणखान्यात जेवणाच्या दिवाणखान्याप्रमाणे झुंबरांचा, नक्षीकाम केलेल्या छतांचा वगैरे थाटमाट आहे, शिवाय येथे भितीवर सुंदर चित्रे चौकटीत बसवून टांगलेली आहेत. ह्या हॉटेलातील हा सर्व दिमाख डोळे दिपविणाराच म्हटला पाहिजे. फ्रेंच लोक छानछोकीचे भोक्ते आहेत. डामडौल व ऐषआराम यांचे चाहते आहेत. कलांची त्यांना भारी आवड आहे, असे मी ऐकलेले होते, त्याचे प्रत्यंतर मला हळहळू येत होते. इंग्लंडमधील लोक प्रेमळ खरे, पण कमी बोलणारे व संकोची स्वभावाचे वाटले. फ्रेंच लोक मोकळ्या स्वभावाचे व बोलके आहेत, त्यामुळे इंग्लंडमधील हॉटेलपेक्षा मला रॉन्सेरे हॉटेलात जास्त घरच्यासारखे वाटले. ता.२८रोजी 'रॉन्सेरे'त मुक्काम केला. ता.२९मे रोजी नास्ता करून मी हॉटेलच्याबाहेर पडण्याअगोदर हॉटेलच्या मॅनेजरची भेट घेतली. त्यांच्याकडून पॅरिस शहराची जितकी माहिती मिळविता येईल, तेवढी मिळविली. त्यांनीही ती मला मोठ्या आपुलकीने दिली. त्यांना इंग्रजी चांगले बोलता येत असल्यामुळे भाषेची अडचण नव्हतीच. 'रॉन्सेरे' हॉटेलचे एक कार्डही त्यांनी मला दिले. त्यावर पॅरिसच्या काही भागाचा नकाशा होता व त्या नकाशात ते हॉटेल 'रॉन्सेरे' कोठे आहे, हे लाल शाईचे वर्तुळ करून दाखविलेले होते. त्यांच्याकडून ही माहिती घेऊन मी हॉटेलच्या बाहेर पडलो. पॅरिस शहराची माहिती देणारी एक पुस्तिका खरेदिली. तीत पॅरिस शहराचा मोठा नकाशा होता. त्यावर भूगर्भातील आगगाडीचे मार्ग–रूटस् दाखविलेले होते व इतरही स्थळांची व स्टेशनांची नावे दिलेली होती. पुस्तिकेत इतरही बरीच माहिती होती. ही पुस्तिका, रॉन्सेरे हॉटेलच्या मॅनेजरने दिलेली माहिती व माझे तोंड, हेच येथील वाटाडे–गाईडस् होते. त्यांच्या साहाय्याने दोन दिवस पॅरिसमध्ये मी खूप फिरलो व अनेक गोष्टी

व स्थळे पाहिली. भाषेसंबंधी म्हणशील तर येथे मोठे मोठे हॉटेल्स, रेस्टॉरंटस्, बँका व फर्म्स ह्यांमध्ये इंग्रजी बोलणारा एखादा दुसरा किंवा काही काही ठिकाणी जास्त लोक नोकर म्हणून कामाला आहेत. फ्रेंच पार्लमेंटची–लोकसभेची–दोन गृहे आहेत, एक सेनेट व दुसरे हाऊस ऑफ डेप्युटीज. ' हाऊस ऑफ डेप्युटीज ' हे पार्लमेंटचे गृह पाहावयास गेलो. कर्मधर्मसंयोगाने तेथे परवान्याची भानगड नव्हती. ह्या गृहाच्या इमारतीभोवती मोठे पटांगण आहे. इमारत जुनी व खूप ऐसपैस आहे. ती एखाद्या किल्ल्यासारखी आहे. कारण आवारास तटासारख्या भिंती आहेत. ही इमारत फारशी आकर्षक नाही. इमारतीच्या आत गेल्यावर तेथील एका कर्मचाऱ्याने मला ती इमारत दाखविली. तो मला हाऊस ऑफ डेप्युटीजच्या हॉलमध्ये–सभागृहात–घेऊन गेला. तो हॉल अर्धवर्तुळाकार आहे. मेजे व कोचेसच्या रांगा गॅलरीतल्या सारख्या म्हणजे उंच उंच होत गेलेल्या आहेत.तेथला कर्मचारी मोठा हौशी दिसला.तो मला त्या हाऊसच्या सभापतीच्या बसण्याच्या उंच आसनाकडे घेऊन गेला. ते आसन म्हणजे एक मोठी खुर्ची होती. त्यावर मखमलीचे आसन होते. खुर्ची रुबाबदार होती, त्यावर त्या कर्मचाऱ्याने मला नेऊन बसविले. मीही ऐटीत त्या खुर्चीवर सभापतीच्या थाटात बसलो, पण समोर कोचेसवर त्या गृहाचे सभासद नव्हते. कारण त्यावेळी त्या गृहाचे अधिवेशन चालू नव्हते. तो हॉलही मला पुरातन वाटला व विशेष मनात भरण्यासारखा नव्हता. त्या हॉलच्या भिंतीवरील चित्रे मात्र चांगली आहेत.

नंतर मी 'मॅडेलीन' (Madeleine) पाहिले. फ्रेंच सैन्याचा प्रताप, तिचे यश व प्रतिष्ठा ( Glories ) यांचे स्मारक म्हणून नेपोलियनने जे मंदीर बांधले, त्याचेच नाव मॅडेलीन आहे. ते 'पॅलेस' (राजवाडा) बॉर्बान ( Palais Bourbon ) च्या समोर आहे. ' लॅटीन क्वार्टर ' ही पाहिले. ह्या भागाचे वातावरण काही आगळेच ( Unique ) आहे; जुन्या पॅरिस शहराचा हा भाग अद्याप टिकून आहे, हा भाग ' मॉंटने सेंट जेनेव्हीव्ह ' (Montaqne Sainte Genevieve) ह्या नावाच्या टेकडीवर आहे. ह्या टेकडीवरून जो रस्ता जातो, त्याच्या दोन्ही बाजूंना झाडी आहेत व ज्या रस्त्यांच्या बाजूंनी अशी झाडी असतात, त्या रस्त्यांना येथे बूलवहर (Boule-yard ) असे म्हणतात. ह्या बूलवहर्सना पॅरिसमध्ये वेगवेगळी नावे देण्यात आली आहेत. लॅटिन क्वार्टरला जाणाऱ्या ह्या बूलवहरला ' बूलवहर

सेंट मिचेल' (Boule-yard Saint Michel ) असे नाव आहे. अशी काही बूलवहर्स मी पाहिली. त्यांपैकी 'चॅम्प्स एलिझीस' (Champs Elysees ) व गँडस् बूलवहर्स ही फार प्रसिद्ध आहेत. झाडांच्या कमानींनी झाकलेले हे रस्ते फारच आकर्षक आहेत, मी तर म्हणेन की हे झाडांच्या कमानीचे रस्ते पॅरिस शहराची फार मोठी शोभा आहे. हे बूलवहर्स मला फार फार आवडले. मी पायाने तासन् तास ह्या रस्त्यांनी हिंडलो. कंटाळा कधी तो आला नाही, थकव्याचे नाव नाही. पॅरिस शहरातील रहदारीच्या बऱ्याच रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना झाडी आहेत. एवढेच नव्हे तर त्या रस्त्यांच्या बाजूंना ज्या पायवाटा ( Foot-paths ) आहेत, त्यांच्याही बाजूंना झाडी आहेत. ह्यामुळे या शहराला अप्रतिम सौंदर्य प्राप्त झाले आहे, असे म्हटल्याशिवाय मला राहवत नाही.

ही बुलवहर्स पाहून माझ्या मनात वारंवार विचार येई की, "हिंदुस्थाना-' तील शहरांत असे झाडांच्या कमानी असलेले रस्ते झाले तर काय बहार होईल. ' रस्त्यांच्या बाजूंना अशी झाडी असली तर आपल्या शहरांची व नगरांची शोभा तर खचित वाढेलच, पण ह्याशिवाय हिंदुस्थानसारख्या उष्णप्रदेशात रस्त्यांच्या बाजूच्या झाडांच्या गार सावलीतून चालताना माणसांच्या श्रमाचे परिहरण होण्यास मदत होईल. हवेत थंडावा आणण्यासही अशा बुलवहर्सचा उपयोग होईल तो निराळाच. मुंबई शहरातील 'लव्हर्स ऑफ स्ट्रीज' झाडांचे शोकीन सारखे-लोक हे काम मनावर घेतील काय ? ते ह्याबाबतीत म्युनिसिपल व सरकारी अधिकाऱ्यांवर वजन आणतील, त्यांचे मन वळवतील तर आपल्याही शहरांतून पॅरिसमध्ये आहेत, तशी बुलवहर्स दिसू लागतील. तो सुदिन लवक़र उजाडो, हीच माझी मनीषा !

पॅरिस शहरात पार्कस्-उपवने व बागाही बऱ्याच आहेत. त्यांपैकी लुकझनबर्ग (Luxembourg) पार्क व आणखी काही पार्क्स मी पाहिले. लुकझनबर्ग पार्कमध्ये अनेक मोठी कारंजी आहेत; त्या कारंज्यावर सुंदर पुतळे आहेत. फ्रेंच इतिहासातील प्रसिद्ध स्त्री-पुरुषांचे व फ्रेंच राजांचे पुतळे आहेत. सिंह, हरिणे वगैरे प्राण्यांचेही पुतळे आहेत. शिल्पकलेची ती दृश्ये मनास मोहून टाकतात. ह्या पार्कमध्ये फुलांचे ताटवे आहेत, पण येथील एका गोष्टीने मला आकर्षिले, ती म्हणजे येथील उंच उंच झाडांची छाटछूट करून त्यांना दिलेले

आकार. ही झाडी खाली छाटून टाकली आहेत व वरती त्यांचे आकार मोठे ठेवलेले आहेत. एका हारीत ती लावलेली आहेत. त्यांच्या त्या रांगा पाहून मला मोठी नवलाई वाटली. दुसऱ्या एका पार्कमध्ये फिरत असता मला आणखी काही नवलाईची दृश्ये दिसली. हा पार्क एफेल टॉवरच्या बाजूला आहे. ह्या पार्कमध्ये काही मुले खेचरे व गाढवे यांच्यावर स्वार होऊन ती दामटीत होती; काही मुले बकऱ्यांच्या छोटचा बग्ग्यांतून बसून त्या बग्ग्या हाकीत होती, ह्या बागेजवळ असलेला जगप्रसिद्ध एफेल टॉवर पाहिला. ह्या टॉवरचा आराखडा (Design) एका गणितशास्त्रज्ञाने तयार केला. सन १८८७ ते १८८९ या दरम्यान हा टॉवर बांधण्यात आला. युरोपमधील सर्व वास्तूंमध्ये एफेल टॉवर सर्वांत उंच आहे. हे टॉवर पॅरिसचे नाक समजले जाते. हा टॉवर एक विस्मय-कारक रचना आहे. ह्या टॉवरच्या माथ्यावर जाण्यासाठी यंत्रांनी चालणाऱ्या लिफ्टची सोय करण्यात आलेली आहे.

तुझा

**नाना**

● ● ●

**: २५ :**

# कलानगरी–लुव्हरे

हॉटेल रॉन्सेरे,
मॉन्टमार्ट्रे, पॅरिस,
ता. ३०–५–१९५५

चि. **विठ्ठलास** सप्रेम आशीर्वाद—

कोणीही वाटाडया न घेता मी स्वतःच पॅरिसचे सौंदर्य हुडकायला निघालो. बाकी येथे सौंदर्य हुडकण्याची जरुरी नाही. जिकडे जावे तिकडे सौंदर्याच्या

राशी जणू माझ्यापुढे येऊन उभ्या राहत होत्या. इतके हे शहर सुंदर आहे. ह्या शहराची मी लंडनबरोबर तुलना करू लागलो. लंडन शहर हे एखाद्या वयस्कर बाईसारखे पोक्त वाटले, मर्यादेने बोलते व चालते, पॅरिस शहर हे यौवनाने मुसमुसलेल्या तरुण स्त्रीसारखे आहे, ते अवखळ आहे, चैतन्ययुक्त आहे, 'माझे हे सौंदर्य पहा,' असे आव्हान देणारे आहे. लंडन शहरातले सौंदर्य हे मुलायम व मृदू आहे, तर पॅरिस शहरातील सौंदर्य उत्तान आहे.

पॅरिसमध्ये अनेक वस्तुसंग्रहालये आहेत, कला, शिक्षण, युद्धाची कला, शास्त्रे, कलावंतांची घरे व त्यांतील सामान, सरंजाम व सामुग्री, इतिहास इत्यादि विषयांसंबंधी ती वस्तुसंग्रहालये आहेत. त्यांपैकी ता. २९ मे रोजी मी 'इन्व्हॅलिडिस' ( Invalides ) नावाचे म्युझियम पाहिले. फ्रान्सचा राजा लुई १४ वा याने 'इन्व्हॅलिडिस' ही इमारत युद्धात जखमी झालेल्या सैनिकांसाठी बांधली. ह्या इमारतीतच सन १८४० मध्ये फ्रान्सचा इंपेरिअल आर्मीच्या ( सेनेच्या ) अनुभवी व कसलेल्या सेनापतींनी 'नेपोलिअन' च्या मृतदेहाच्या राखेला डोळ्यांत अश्रू आणून सलामी दिली. हल्ली ह्या इमारतीत युद्धात वापरली जाणारी आयुधे व हत्यारे यांचे संग्रहालय आहे. निरनिराळ्या काळी जी हत्यारे व साधने युद्धात वापरली गेली, त्यांची मांडणी ह्या इमारतीतील दालनांत केलेली आहे. विविध प्रकारच्या तोफा, बंदुका, तलवारी, चिलखते वगैरे युद्धसाहित्य येथे मला पाहावयास मिळाले. नेपोलियनच्या राखेचे येथेच दफन झाले. नेपोलियनची (टूम) कबर येथेच आहे. ह्या इमारतीला फ्रेंचांच्या जीवनात मोठे स्थान आहे. नेपोलियन नाहीसा झाला, कित्येक शतके निघून गेली, पण फ्रेंचांच्या मनात त्याच्याविषयी आजही मोठा भक्तीभाव आहे; त्याचेही प्रत्यंतर मला पॅरिसमध्ये वेळोवेळी आले.

'इन्व्हॅलिडिस' पाहिल्यानंतर मी सीन नदीच्या तीरावर गेलो. सीन ( Siene ) नदीच्या दोन्ही तीरांवर पॅरिस शहर वसलेले आहे. ह्या नदीने पॅरिस शहराच्या सौंदर्यात तर भर घातलीच आहे, पण ह्याशिवाय ह्या नदीला पॅरिसच्या जीवनात मोठे स्थान आहे. ह्या नदीच्या काठी पॅरिसमधील महत्त्वाची व ऐतिहासिक स्मारके आहेत, विविध राजकीय व सांस्कृतिक संस्थांची ठिकाणे या नदीच्या तीरांवर आहेत. ह्या नदीच्या पात्राला दोन्ही बाजूंना दगडी भिंती बांधलेल्या आहेत, नदीच्या दोन्ही तीरांवर फिरण्यासाठी रस्ते आहेत,

सकाळ–संध्याकाळ फ्रेंच स्त्री–पुरुष व बाहेरच्या देशांतील प्रवासी ह्या रस्त्यावरून सहल करताना दिसतात, नदीत ठिकठिकाणी नाना रंगांनी चित्रित केलेल्या बोटी आहेत, प्रवासी लोक व फ्रेंच लोक ह्या बोटींतून नदीच्या पाण्यात विहार करतात. ह्या नदीवर अनेक पूल आहेत. त्यांपैकी काही पूल फार भव्य, उंच व प्रेक्षणीय आहेत. प्रेक्षणीय म्हणण्याचे कारण असे की, ह्या पुलांवरही रंगीत नक्षीकाम आहे. काही पुलांच्या दोन्ही बाजूंला मोठाले, भव्य स्तंभ आहेत व त्यावर पुतळे आहेत, तेही सोनेरी आदि रंगात रंगविलेले आहेत. ह्या पुलांमध्ये सर्वांत जुना जो पूल आहे, त्याचे नाव पाँटन्यूफ ( Pont–Neuf ) आहे व सर्वांत सुंदर जो पूल आहे–मला जो तसा वाटला–त्याचे नाव पाँट डेस आर्टस् ( Pont des Arts ) असे आहे. नदीचे पात्र, त्या नदीत विहार करणाऱ्या बोटी, नदीच्या तीरांवरील पायवाटा, तिच्या वरील ते पूल व काठावरील भव्य इमारती पहात पहात मी फिरत होतो. एके ठिकाणी आलो तर तेथे मला खूप गर्दी दिसली. चौकशी करता मला कळले की, तेथे यात्रा ( fair ) आहे. त्या यात्रेत हिंडताना मला फ्रेंच स्त्री–पुरुष व त्यांची मुले दिसली. स्त्री-पुरुष धष्टपुष्ट होते, त्यांची मुलेही आरोग्यसंपन्न, टवटवीत व गुबगुबीत होती. त्या यात्रेत मुलांचेच प्राबल्य होते. मुलांसाठी रेल्वे होती, लहान पण खऱ्याखुऱ्या आगगाड्या होत्या, त्यांत बसून मुले प्रवास करीत होती. निरनिराळी चक्रे, गोल गोल फिरणारे लाकडी घोडे इत्यादि मौज करण्याची किती तरी साधने तेथे होती, पण खरोखरच्या लहान आगगाडीत बसून प्रवास करण्याची व्यवस्था लहान मुलांसाठी अद्याप आपल्या देशात नाही म्हणून मी त्याचा उल्लेख येथे केला आहे.

ता. ३० मे रोजी सकाळीच मी ' रॉन्सेरे ' हॉटेलातून बाहेर पडलो व ' आर्क-डी-ट्रायंफ ' (Arcde Triompe) हा पॅरिसचा पूर्व दिशेकडचा दरवाजा पाहावयास गेलो. ज्या रस्त्याने मी त्या दरवाजाकडे जात होतो, तो अगदी सरळ आहे, त्यामुळे बऱ्याच अंतरावरून मला तो दरवाजा दिसत होता. हा रस्ता फारच रुंद आहे, त्या दरवाजावर पोहोचल्यावर मला त्याची ती कमानीच्या आकृतीची खूप उंच व भव्य इमारत पाहावयास मिळाली. ही इमारत नेपोलियनने फ्रेंच फौजेच्या मर्दुमकीचे व बहादुरीचे स्मारक म्हणून बांधली व तिला आर्क ऑफ ट्रायंफ म्हणजे ' यशाची कमान ' असे नाव दिले. ह्या कमानीखाली

जमिनीत एक कुंडासारखे मोठे छिद्र आहे, त्यात अग्निज्योत सारखी तेवत असते. ह्या ज्योतीखाली युद्धात कामास आलेल्या अपरिचित (Unknown) सैनिकाची कबर आहे.

पॅरिस शहरातील घरे साधारणत: ७ ते ९ मजल्यापर्यंतची आहेत, घरांना गॅलरीज ( सज्जे ) आहेत, पण त्या फार लहान आहेत. घरे बहुधा दगडांनी बांधलेली आहेत. अजून येथे अमेरिकासारखे सिमेंटयुग सुरू झालेले दिसत नाही. सिमेंटच्या इमारती फारच कमी आहेत.

रस्ते खूप रुंद आहेत व त्यांच्या बाजूच्या पायवाटा फूटपाथस्–ही रुंद आहेत. दगडांनी जशा भिंती बांधाव्यात, तसे दगडांनी रस्ते बांधलेले आहेत. दगड फार बळकट आहेत, त्यामुळे त्यांची झीजही फारच कमी असली पाहिजे, वर्षानुवर्षे रस्ते टिकत असले पाहिजेत. त्यांची दुरुस्ती करण्याचा प्रसंग क्वचित येत असेल व त्यांच्या मेंटेनन्स–डागडुजी व दुरुस्तीसाठी खर्च फारच कमी येत असावा, असे मला वाटते.

नंतर मी पॅरिसमधील एक मोठा चौक (Sqware) पाहिला तो गोल होता, त्याच्या सर्व बाजूला अनेक पुतळे होते, ह्या स्क्वेअरमध्ये मला एक गृहस्थ भेटला. तो होऊन माझ्याकडे आला व त्याने आपली ओळख करून दिली. त्याचे नाव श्री. रेचद बे सौद (Rechod Bey Saud) तो मूळचा तुर्कस्थान देशातला आहे. त्याची मला पॅरिस शहर पाहण्यामध्ये काही वेळ फार मदत झाली. त्याच्याबरोबरच मी येथील अतिशय प्रसिद्ध असे 'लुव्हरे' (Louvre) हे वस्तुसंग्रहालय पाहावयास गेलो. जगातील सर्वांत मोठ्या राजवाड्यामध्ये हे संग्रहालय सामावलेले आहे. हा राजवाडा फ्रेंच राजांचा होता. तो पुढे ह्या संग्रहालयाकरिता देण्यात आला. याची सुरुवात १७९३ साली झाली. फ्रेंच राजा फ्रॅन्सिस पहिला याने चित्रे वगैरे वस्तू संग्रहीत करण्यास प्रारंभ केला व इतर फ्रेंच राजांनी त्या संग्रहात भर टाकली. ह्या राजांनी संग्रहीत केलेल्या वस्तू ह्या संग्रहालयाचा गाभा आहे. रिनेसंस ( युरोपचे पुनरुज्जीवन करणारे जे युग समजले जाते ते ) युगापासून ते नेपोलियन तिसरा याच्या राज्यापर्यंत फ्रान्समध्ये ज्या राजवटी झाल्या, जी राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतरे झाली, त्याचा इतिहास ह्या संग्रहालयात पाहावयास मिळतो. जगातील अत्युत्तम असे हे संग्रहालय मानण्यात येते. तेथे अनेक देशांतील नाना युगांतील

कपडे, आयुधे, भांडी, शिल्पकलेचे नमुने इत्यादि संग्रहीत केलेले आहेत. ह्या संग्रहालयाचे सहा विभाग पाडण्यात आलेले आहेत. येथील चित्रकला मला फारच आवडली. छतांवर व भिंतीवर मोठाली चित्रे रेखाटलेली आहेत. एका चित्रात एका प्रसंगाचा भव्य देखावा पाहावयास मिळतो, मग तो देखावा कधी युद्धाचा, तर कधी राज्यरोहणाचा, तर कधी क्रांतीचा, तर कधी जीझस ख्राईस्टच्या जीवनातील अगर बायबलमधील गोष्टींवर आधारलेला असा असतो. ह्या चित्रांना सोनेरी अगर इतर रंगांच्या मोठाल्या चौकटी असतात. छतांवर एवढी मोठी चित्रे काढणाऱ्या चित्रकारांचे कौतुक वाटते. त्यांनी ती चित्रे छतावर कशी काढली असतील, या कल्पनेने अचंबा वाटल्याशिवाय राहत नाही. ह्या चित्रांतील रंग टिकाऊ व गडद आहेत. लाल व निळचा ह्या रंगांचे प्रावल्य दिसले. रंग इतके चांगले वापरले आहेत की आजही ते ताजे दिसतात. चित्रात जो जिवंतपणा दिसतो, तो मुख्यत्वेकरून त्या रंगांमुळे असे माझे मत झाले. चित्रातील कलाही सुंदर व बोलकी आहे. पण सगळचांत माझे मन आकर्षिले गेले त्या चित्रांच्या प्रचंड व भव्य आकृतींनी 'मोनोलिसा'चे जगप्रसिद्ध चित्रही मी पाहिले.

'मोना लिसा' चे ( Mona Lisa ) चित्र लिओनार्डो डाव्हिन्सी (Leonardo Davinci) ह्या प्रख्यात चित्रकाराचे आहे. हा चित्रकार सन १४५२–१५५९ ह्या काळात होऊन गेला. मोना लिसाचा चेहरा काढण्यासाठी लिओनार्डोला चार वर्षे (१५०३–१५०६) लागली. प्रथम लिओनार्डो ह्याचा विचार नेपोलियनची वायको मॅडोन्ना ( Madonna, Mona) लिमा किंवा फ्रँसेस्को डेल गिओकॉन्डो (Francesco del Giocondo) हिचे चित्र काढण्याचा होता, मॅडोन्ना लिसा हिला चित्र काढण्यासाठी पुढे बसवून लिओनार्डोनी हे चित्र चित्रित केले हे खरे आहे, पण ते सर्वस्वी मॅडोन्ना लिसाचेच चित्र आहे, असे म्हणता येणार नाही. ते तिच्या चेहऱ्याची हुबेहूब प्रतिमा किंवा फोटोग्राफिक ( Photographic ) चित्र नाही, त्यात त्यापेक्षा विशेष आणखी काही आहे. ह्या चित्रात त्या चित्रकाराने आपली कल्पनाशक्तीही ( Genius ) ओतलेली आहे. त्या लिओनार्डोच्या चित्रणातून ह्या वस्तुसंग्रहालयात असलेले 'मोना लिसा' चे चित्र तयार झाले. हे चित्र पाहून १९ व्या शतकातील एका प्रख्यात कला-तज्ज्ञ व तत्त्ववेत्त्याने असे म्हटले

आहे की, 'जगातील स्त्रीत्वाच्या प्रतिमेचे हे चित्र आहे. अनंत (Perpetual) जीवनातील दहा हजार अनुभव ह्या चित्रात सामावलेले आहेत." हे चित्र फ्रान्सचा राजा फ्रॅन्सिस पहिला याने लिओनार्डो याच्याकडून चार हजार सोनेरी फ्लॉरिन्सला ( Gold florins ) विकत घेतले. हे चित्र तयार झाले तेव्हाच चित्रकला–तज्ज्ञांनी आपले मत जाहीर केले की 'मोना लिसाचे चित्र उत्कृष्ट कलेचा नमुना ( Masterpiece ) आहे.' ह्या चित्रातील रेखीव-पणा, सफाईदार चित्रण, पराकाष्ठेचे कौशल्य व ह्या चित्रातील पार्श्वभूमी ह्यामुळे ह्या चित्राची जगभर वाखाणणी होते, पण त्याहीपेक्षा ह्या चित्रातील मोना-लिसाच्या मुखावरील सूक्ष्म भाव व हास्य यामुळे ह्या चित्राला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. मोना लिसाच्या मुखावरील रहस्यमय हास्याला वेगवेगळ्या लोकांनी हे चित्र पाहिल्यानंतर वेगवेगळी विशेषणे दिलेली आहेत. कोणी म्हणतात की, 'हे हास्य उदात्त आहे, तर कोणी म्हणतात, 'मिश्किल' आहे.' 'हे हास्य परीचे आहे, ह्या हास्यात मार्दव ओतप्रोत भरलेले आहे, त्यात करुणा आहे, गूढता आहे, हे हास्य हे एक कोडे आहे, ह्यात न कळणारा संकेत आहे, हे हास्य जगाबद्दल बेफिकिरी दाखविते, ह्या हास्यात वेडसरपणा दिसतो, त्यात स्त्रीच्या कोमल भावांचा विलास आहे, विचार स्वातंत्र्याची लकेर आहे, हे हास्य मानवी धर्माचे प्रतीक आहे, हे हास्य आसुरी आहे, त्यात दिमाख व गर्विष्ट-पणा आहे, हे हास्य माणसाला भुलविते, त्यात मोहिनी आहे.' वगैरे वगैरे ह्या हास्याची वर्णने करण्यात आलेली आहेत व पुढेही आणखी काही वेगळ्या विशेषणांनी या हास्याची वर्णने होतील, अशी माझी खात्री आहे, कारण हे हास्य व त्याच्या जोडीला मोना लिसाच्या चेहऱ्यावरील भाव यांची अशी काही संगती झालेली आहे की ह्या हास्याचे शब्दांत वर्णन करणे माणसाच्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरचे आहे, असे माझे तरी मत हे चित्र पाहून झाले आहे. 'मोना-लिसाचे' हास्य गहन आहे व ते माणसाला भुरळ पाडणारे आहे. हेच वर्णन सर्व वर्णनामध्ये ह्या हास्याला योग्य आहे, असे मला वाटते.

ह्या चित्रात प्रकाश व छाया ( Light and Shadow ) यांची संगती ( Interplay ) मोठी परिणामकारक आहे. ह्या चित्रातील पार्श्वभूमी गूढता–( Mystery )–सूचक आहे.

हे चित्र ह्या संग्रहालयातील 'ग्रँड गॅलरी'—मोठा सज्जा—नावाच्या सज्जात आहे. ह्या गॅलरीची लांबी ९०० फूट आहे आणि ही गॅलरी ह्या संग्रहालयातील कलेच्या दृष्टीने अत्यंत संपन्न व समृद्ध भाग आहे. गॅलरीत रिनेसंस युगापासून ते १७ व्या शतकापर्यंतच्या काळातील १६२ चित्रे ( Paintings ) आहेत. प्रसिद्ध चित्रकार लिओनार्डो (Leonardo), मॅन्टेग्न (Montegna), बोट्टीसेल्ली ( Bothiselli ), टिटिअन ( Titian ), व ए. ग्रेकॉस यांनी काढलेली चित्रेही येथे आहेत. फ्राफिलिप्पो लिप्पी ( Frafilippo Lippi ) यांचे 'व्हर्जिन अँड चाईल्ड वुईथ सेंटस्' हे चित्र व बोट्टीसेल्लीचे 'व्हर्जिन अँड चाईल्ड वुईथ सेंट जॉन दि बॅप्टिस' ही चित्रेही त्याच गॅलरीत आहेत. शिल्पकलेमध्ये 'व्हिनस डी मिलो' (Venus De Milo) हा पुतळा असाधारण आहे. ह्या पुतळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक कमानी आहेत. ह्या कमानींपैकी पहिल्या कमानीत शिरताच या पुतळ्याचे दर्शन होते, ते प्रेक्षकांच्या मनाची पकड घेते. माझी खात्री आहे की हे दृश्य एकदा पाहिल्यावर माणूस ते कधीच विसरणार नाही.

'लुव्हरे' संग्रहालय पाहण्यासाठी भक्कम पाय हवेत. ह्या संग्रहालयाचे क्षेत्रफळ ४९ एकर आहे. निरनिराळ्या मजल्यांवर जाण्यासाठी प्रेक्षकाला अनेक जिने चढावे उतरावे लागतात. अनेक दालने पायाखाली घालावी लागतात, बरे इतकेही करून एकाच खेपेस विविध कलांचे सर्व नमुने पहाल तर अशक्य आहे. निरनिराळ्या कलांचे २,७५,००० इतके नमुने ह्या ठिकाणी आहेत, त्यांपैकी ५००० चित्रे ( Paintings ) आहेत. पौर्वात्य देशातील अनेक कलांची अप्रतीम कामेही येथे पाहावयास मिळतात. अगदी जुन्या काळातील कलांची कामे (Works of Arts) येथे आहेत. १३७ कॅरॅट रिजेंट (Regent) हिऱ्यासारखे जगात नावाजलेले हिरे येथे आहेत, नेपोलियनचा राजमुकुट, नेपोलियन तिसरा याची टॉप हॅट ( उंची टोपी ), चार्लेमॅग्ने (Charlemagne) यांचे घोड्यावर बसताना बुटाच्या टाचेला लावलेले काटचाचे चक्र ( Spurs ) अशा किती तरी ऐतिहासिक वस्तूंचे येथे भांडार आहे.

येथील गॅलरीज प्रचंड आहेत, पण येथे कलांच्या इतक्या असंख्य वस्तू आहेत की, ह्या गॅलऱ्या पुऱ्या पडत नाही म्हणून काही वस्तू तळघरात ठेवलेल्या आहेत.

हे संग्रहालय पाहण्यास दररोज सुमारे ७–८ हजार लोक येतात, असे तेथे मला कळाले.

हे संग्रहालय पाहिल्यानंतर आपण काही तरी भव्य, उदात्त व अप्रतिम पाहिले, असे मला वाटले.

लुव्हरचे हे वर्णन तुला मनोरंजक वाटेल, अशी मला आशा आहे.

तुझा

**नाना**

● ● ●

## : २६ :

# सिल्बेर्स्टिन : माझा फ्रेंच मित्र

हॉटेल रॉन्सेरे,
**बोलेव्हर्ट मॉन्टमार्ट्रे, पॅरिस,**
ता. ३१–५–१९५५

चि. **आशाला** सप्रेम आशीर्वाद—

'लुव्हरे' वस्तुसंग्रहालयाचे मी मागच्या पत्रात दिलेले वर्णन तुम्हांला आवडले का ? 'लुव्हरे' संग्रहालय दाखविण्याच्या कामी माझ्या त्या तुर्कस्थानच्या मित्राने श्री. सौद यांनी मला बहुमोल मदत केली. ते गृहस्थ मूळचे तुर्कस्थानचे, पण पॅरिसमध्ये बराच काळ त्यांनी काढला आहे, त्यामुळे येथील खूप माहिती त्यांना आहे. त्यांना घेऊन मी एका कॉफी हाऊसमध्ये गेलो. मागे मी कॉफी हाऊस समोरील उघड्या व्हरांड्याचे व तेथील रंगीत छत्र्यांचे वर्णन केलेले आहे. ज्या कॉफी हाऊसमध्ये आम्ही गेलो, त्या हॉटेलच्या व्हरांड्यात

शोभिवंत छत्रीखालील खुर्च्यांवर जाऊन आम्ही बसलो. सौद माझे पाहुणे होते. मी कॉफी व काही खाद्यपदार्थ मागविले. आमचे कॉफीपान संपल्यावर सौद म्हणाले की, "मला आता आपला निरोप घेतला पाहिजे. मला दुसरीकडे जावयाचे आहे." त्यांचे मी आभार मानले व हस्तांदोलन झाल्यावर आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. थोड्या वेळात आमची मैत्री जडली होती, निरोप घेताना आम्हा दोघांना वाईट वाटले.

आता मी बराच थकलो होतो, तेव्हा 'रॉन्सेरे' हॉटेलचा रस्ता धरला. तेथे जेवण करून माझ्या आलेशान खोलीत जाऊन काही काळ विश्रांती घेतली. त्यानंतर मी व्हिन्सेनीस ( Vincennes ) किल्ला पाहावयास निघालो. पॅरिस येथील भूगर्भ रेल्वेचीही मला खूप माहिती झालेली होती. त्यामुळे त्या रेल्वेने मी विनघोक प्रवास करीत असे. लंडनमधील भूगर्भ रेल्वेचा अगोदरचा अनुभवही येथे उपयोगी पडला. व्हिन्सेनीस नावाचा पॅरिसचा एक विभाग आहे. तेथे एक किल्ला, एक उपवन–पार्क व झूलॉजिकल गार्डन–प्राणी संग्रहालय असलेला बाग–आहेत. प्रथम मी किल्ल्याकडे गेलो. फ्रेंच लोक किल्ल्याला शॅटू (Chateau) म्हणतात. व्हिन्सेनीस किल्ला–ह्या किल्ल्याचे नाव व्हिन्सेनीस ह्या स्थानावरून पडलेले असावे–हा किल्ला १४ व्या शतकात बांधण्यात आला. ह्या किल्ल्यात एका मोठ्या दरवाजातून मी प्रवेश केला. माझ्यावरोबर इतर परदेशी प्रवासी व काही फ्रेंच लोकही होते. तेही माझ्यासारखे किल्लला पाहावयास आले होते. त्यांमध्ये श्री. एम. सिल्वेस्टिन नावाचे एक फ्रेंच गृहस्थ होते. किल्ला पाहताना त्यांची माझी ओळख झाली. किल्ला पाहताना श्री. सिल्वेस्टिन माझ्यावरोबर राहून मला त्या किल्ल्याची माहिती देत होते. दुसऱ्या महायुद्धात बॉंबहल्ल्यामुळे ह्या किल्ल्याची फारच पडझड झाली आहे. ह्या किल्ल्याचा घेर फार मोठी आहे. ह्याचे तट उंच व भव्य आहेत, ह्या किल्ल्यात सेंट चॅपेल (Saint Chapelle ) नावाचे प्रार्थना मंदीर आहे. त्याचीही पडझड झालेली आहे, तरी पण हल्ली असलेल्या परिस्थितीतही हे मंदीर मोठे प्रेक्षणीय दिसते, त्याची सध्या डागडुजी चालू आहे. ह्या किल्ल्यात अनेक जुन्या इमारती आहेत. त्यांत काही अनेक मजले असलेल्याही इमारती आहेत. येथे फ्रेंच राजे काही वेळेला निवास करीत असत. त्या राजांच्या व इतर ऐतिहासिक व्यक्तींच्या आठवणी करून देणाऱ्या अनेक वस्तू ह्या ठिकाणी आहेत. पुरातन काळाची छाया ह्या

किल्ल्यावर चहूकडे पडलेली दिसली. ह्या किल्ला पाहिल्यानंतर मी व्हिन्सेनीस पार्क पाहण्यास गेलो. तेथे माझ्याबरोबर सिल्बेर्स्टिन आले. माझी व श्री. सिल्बे-र्स्टिन यांची ह्यावेळेपर्यंत बरीच गट्टी जमली होती. पार्क पाहताना फ्रेंच लोकांच्या धार्मिक व सामाजिक आचार-विचारांविषयी त्यांना मी प्रश्न विचारले. त्यांनी मला मोठी गंमतीदार माहिती व तीही विनोदप्रचूर भाषेत सांगितली. सिल्बेर्स्टिन म्हणाले, " फ्रेंच लोक स्वातंत्र्याचे फार मोठे भक्त आहेत. धार्मिक बाबतीतही त्यांना स्वातंत्र्य हवे असते. पूर्वीच्या धार्मिक आचारविचाररूपी दारूत फ्रेंच लोकांनी बरेच पाणी मिसळले आहे. ह्याचा अर्थ असा की, आम्ही धार्मिक रूढी व अनेक अनिष्ट चालीरीती यांचे पाश झुकारून दिले आहेत, धार्मिक कर्म-कांडांचे दोर आम्ही कापून काढले आहेत. सध्या फ्रान्समध्ये तर अशी स्थिती आहे की, जन्म, लग्न व मृत्यू या प्रसंगीच फ्रेंच लोकांचा बहुधा धर्माशी संबंध येतो, एरवी धर्माशी फ्रेंच लोकांचा विशेष संबंध येत नाही. " अर्थात सिल्बेर्स्टिन हे धार्मिक विधिकर्म व संस्कार ह्या संबंधी बोलत होते व त्याला अनुलक्षूनच त्यांनी वर दिलेले उद्गार काढले आहेत.

पार्क पाहिल्यानंतर सिल्बेर्स्टिन म्हणाले, " मी तुम्हांला पॅरिसचे काही रमणीय भाग दाखवितो, माझ्याबरोबर चला. " त्याप्रमाणे मी त्यांच्या-बरोबर चालू लागलो. थोड्याच वेळात रस्त्याने एका इमारतीवर " फ्रेंच कॉम्युनिस्ट पार्टी " च्या कचेरीचा फलक दिसला. तो पाहून सिल्बेर्स्टिन उद्-गारले, " येथील कॉम्युनिस्ट पार्टी स्वतःस फ्रेंच कॉम्युनिस्ट पार्टी म्हणविते, पण या पार्टीचे सभासद कसले फ्रेंच लोक, ते फ्रेंच नाहीत ते रशियन्स आहेत. ते वंशाने फ्रेंच असतील, पण विचाराने ते रशियाचे गुलाम झालेले आहेत. " ह्या उद्गारावरून सिल्बेर्स्टिनला फ्रेंच कॉम्युनिस्ट लोकांबद्दल किती तिटकारा वाटत होता, हे स्पष्ट दिसते. पुढे जाता जाता एका रेल्वे स्टेशनला स्टॅलिनचे नाव दिलेले मी पाहिले व सिल्बेर्स्टिनचे लक्ष त्या नावाकडे वेधविले माझ्या या कृतीमागे काय हेतू आहे, तो त्यांनी ओळखला व ते म्हणाले, " सम-जलो, तुम्ही ह्या स्टेशनचे नाव 'स्टॅलिनग्राड' का हे मला विचारू इच्छिता होय ! गेले महायुद्ध थोड्याच काळापूर्वी संपले, त्या युद्धात आम्ही रशियन लोकांचे दोस्त होतो. रशियनांनी गेल्या युद्धात जी बहादुरी गाजविली व स्वतंत्र

राष्ट्रांना जी मदत केली, त्याचे पडसाद युद्ध संपल्यावर आमच्या देशात उमटले गेले तर नवल नाही; त्यांचे आम्ही उतराई व्हावे म्हणून येथे ह्या स्टेशनला स्टॅलिनचे नाव देण्यात आले, परंतु त्याला काही वर्षे होऊन गेली. काळ झपाट्याने बदलत आहे, त्यावेळी आम्ही व रशियन्स दोस्त होतो, पण आता ती दोस्ती राहिलेली नाही. एवढेच मी सांगू इच्छितो ! " आपल्याविषयी बोलताना सिल्बेर्स्टिन म्हणाले की, " मी काही दिवसांपूर्वी कॅनडात होतो, तेथे मी चांगले पैसे कमावीत होतो, पण मी माझ्या देशात–फ्रान्समध्ये–परत आलो; येथे मला तितका पैसा मिळत नाही तरी मी सुखी आहे, कारण पॅरिसमध्ये महागाई कमी आहे आणि ह्याशिवाय माझ्या ह्या स्वतंत्र देशात मी एक छोटा राजा आहे. आमची राज्यघटना लोकशाहीवर (Republic) आधारलेली आहे, तेव्हा फ्रान्समधला प्रत्येक नागरिक स्वतःला राजाच मानतो ! "

येथील सरकारी व इतर कचेऱ्यांच्या सुट्टया वगैरे संबंधी माहिती देताना त्यांनी सांगितले की, " ख्रिश्चिअन सणांच्या आम्हांला सुट्टया असतात; इतरही बँक हॉलिडेज् असतात. शनिवार, रविवार व सोमवार ह्या दिवशी आठवडयातून संपूर्ण सुट्टया असतात. आठवडयातील इतर दिवशी कामाचे तास सकाळी ८ वाजेपासून सायंकाळी ५–४५ वाजेपर्यंत असतात व मध्ये ४५ मिनिटांची रिसेस–सुट्टी असते. हे कामाचे तास इतर दिवशी बरेच असतात, त्यामुळे शनिवार, रविवार व सोमवार असे आठवडयात तीन दिवस सुट्टीचे ठेवलेले आहेत. "

सिल्बेर्स्टिन हे गृहस्थ तरुण आहेत, त्यांचे वय ३० वर्षांच्या आतबाहेर असावे. ते उंच आहेत व शरीराने सडपातळ आहेत. त्यांनी अद्याप लग्न केलेले नाही. " अद्याप लग्न का केले नाही ?"' असे मी विचारले, तेव्हा ते हसून म्हणाले, " माझ्या पसंतीचा जोडीदार अद्याप मला मिळाला नाही. "

सिल्बेर्स्टिन यांनी मला 'मॉंटमार्टे' (Montmartre) टेकडीकडे नेले. ही टेकडी खूप उंच आहे. ह्या टेकडीवर एक चर्च आहे, त्याची इमारत फारच चांगली आहे. ह्या इमारतीला भव्य घुमट आहेत, घुमटांसाठी पांढरा दगड वापरला आहे. पौर्वात्य देशात जसे इमारतींना घुमट असतात, त्या प्रकारचे

ह्या चर्चचे घुमट आहेत. थोडया अंतरावरून हे घुमट पहात असताना ताजमहालच्या घुमटासारखे थोडे फार वाटले.

ही सर्व ठिकाणे दाखविल्यानंतर सिल्बेर्स्टिन मला एका कॉफी हाऊसमध्ये घेऊन गेले. आज मी त्यांचा पाहुणा होतो. तेथे त्यांनी माझे आतिथ्य केले. आपल्या देशापासून हजारो मैल दूर अशा ह्या पॅरिस शहरात सिल्बेर्स्टिनसारखा मला मित्र मिळाला व तोही काही तासांच्या अवधीत ह्या गोष्टीचे मला राहून राहून आश्चर्य वाटते व त्यामुळे आनंद होतो.

आता अंधार पडत चालला होता. जिकडे तिकडे पॅरिसमध्ये दिव्यांचा लखलखाट दिसू लागला. हॉटेलातून मी व सिल्बेर्स्टिन बाहेर पडलो. दिव्यांच्या त्या लखलखाटात पॅरिस नगरीचे अलौकिक सौंदर्य मी पाहत चाललो होतो; मी ते सौंदर्य पाहण्यात तल्लीन झालो होतो. मला त्या तल्लीनतेतून जागे करीत सिल्बेर्स्टिन म्हणाले, "आता मला आपली रजा घेतली पाहिजे, रात्र होत आली आहे, आपणासही विश्रांतीची जरुरी आहे. पुन्हा उद्या तुमचा प्रवास चालू होणार आहे." इतके बोलून त्यांनी मोठ्या प्रेमाने माझ्याशी हस्तांदोलन केले. आम्ही आमचे पत्ते एकमेकांना दिले. "पुढेही पत्रांनी तरी एकमेकांना जरूर भेटत जाऊ," असे परस्परांना आम्ही आश्वासन दिले. सिल्बेर्स्टिन आपल्या निवासस्थानाकडे गेले व मी माझ्या हॉटेलात परत आलो.

पूर्वी फ्रान्स देश हा चित्रकार व कवी यांचा देश म्हणून ओळखला जाई. ह्या देशात काचेच्या, चिनी मातीच्या व धातूंच्या भांडी, कपडे, फर्निचर वगैरे सुबक वस्तू बनविणारे कारागीर आहेत. पॅरिस शहर तर फॅशनचे, सभ्य संप्रदाय व शिष्टमान्य चालीरीती यांचे माहेरघर आहे. चैनीच्या विविध प्रकारच्या वस्तू फ्रान्समध्ये तयार होतात, पण अलीकडे केवळ ह्या गोष्टीसाठीच फ्रान्स देश प्रसिद्ध नाही, तर ह्याशिवाय अनेक वस्तू येथे तयार केल्या जातात. अनेक कारखाने सुरू झालेले आहेत, नाना तऱ्हेची यंत्रे येथे कामे करतात विविध-प्रकारचा माल मोठ्या प्रमाणात येथे तयार केला जातो. येथील उत्पादन सारखे वाढत आहे. आर्थिक विकासाचा मजबूत पाया घालण्यात फ्रेंच लोक यशस्वी झाले आहेत. लोक जास्त सुखी दिसतात. कुठल्याही गोष्टीची कमतरता नाही. अशा ह्या सुखी देशाचे चित्र पाहून व त्याचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवून भारता-

नेही आर्थिक भरभराटीसाठी आगेकूच केली पाहिजे, असा वरचेवर विचार माझ्या डोक्यात घोळू लागला. ह्या देशाचे मी जे थोडक्यात वर्णन केले आहे, ते वाचून तुझ्याही मनात असेच विचार येतील, याची मला खात्री आहे.

तुझा

नाना

● ● ●

: २७ :

# लिम्मत नदीवरील रंगीत रांगोळ्या

हॉटेल स्क्वेईझेर हॉफ,
झ्युरिच, स्वित्झलंड
ता. १-६-१९५५

चि. **मंगलास** सप्रेम आशीर्वाद—

ता. ३१ मे रोजी सकाळी ७-४५ वाजता आगगाडीने मी पॅरिसहून निघालो. प्रवासात मी गाडीतून आजूबाजूचा प्रदेश पाहात होतो, फ्रान्समधील शेती अवलोकीत होतो, अनेक, खेडी व शहरे येत होती व माझ्या नजरेआड होत होती. एका शेतात नांगर अगर काही तरी शेतीचे उपकरण होते, त्याला गाय जुंपलेली दिसली. तिच्याकडून ते उपकरण चालविले जात होते, ते दृश्य पाहून मला कसेसे वाटले. आपल्याकडे शेतीच्या कामासाठी गाईचा उपयोग करीत नाही. तसे करणे बरोबर नाही, असे आपण मानतो. तो संस्कार माझ्या मनावर झालेला असल्यामुळे वर सांगितलेल्या दृश्यामुळे माझ्या मनाला बरे वाटले नाही. शेतामध्ये पुरुषांबरोबर स्त्रियाही कामे करीत होत्या. शेतीच्या निरनिराळ्या कामासाठी जसा आपल्याकडे बैलांचा उपयोग करण्यात येतो,

तसा युरोपमध्ये घोड्यांचा उपयोग करण्यात येतो. शेतात घोडे ती कामे करताना दिसले. ह्या देशात शेतीसाठी यंत्रेही वापरली जातात. ट्रॅक्टर्स, बुलडोझर्स व शेतीच्या कामास उपयुक्त अशा यंत्रांचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे.

झ्युरिचला मी त्याच दिवशी म्हणजे ता. ३१ मे रोजी तिसऱ्या प्रहरी ३–४५ वाजता पोहोचलो. येथे स्क्वेईझेरहॉफ (Schweizerhof) नावाच्या हॉटेलमध्ये सी. आय. टी. कंपनीने माझ्यासाठी जागा राखून ठेवली होती. मी त्या हॉटेलात माझे सामान ठेवले व झ्युरिच शहर पाहावयास गेलो. झ्युरिच हे स्वित्झर्लंड देशातील प्रसिद्ध शहर आहे, हे तुला माहीत आहेच. ह्या शहरातूनही एक नदी वाहते. तिचे नाव लिम्मत (Limmat). तिच्याही तीरांना पॅरिसमधील सीन नदीसारख्या दगडी भिंती बांधलेल्या आहेत व त्या भिंतींच्या बाजूंना प्रॉमिनाडस्–करमणुकीसाठी सहल करण्याकरिता रस्ते–बांधलेले आहेत. ह्या रस्त्यांनी फिरत फिरत मी अनेक बागा पाहिल्या. सायंकाळ झाली, सूर्य अस्तास जात होता, त्यावेळी मी लेक ऑफ झ्युरिच –झ्युरिच सरोवरावर आलो. हे सरोवर अतिशय मोठे आहे. ह्या सरोवराच्या काठी बागा आहेत. त्या बागांत कोठे दाट झाडी तर कोठे फुलांचे ताटवे आहेत, येथे ठिकठिकाणी बसण्यासाठी बाके ठेवलेली आहेत, सरोवरावर लहान मोठ्या होड्या इकडून तिकडे फिरत होत्या. इंजिने लावलेल्या बोटी भरकन जात होत्या, तर शिडाच्या बोटी आस्ते आस्ते जात होत्या, काही बोटी त्यांत बसलेल्या लोकांकडून वल्हविल्या जात होत्या. त्या तुरुतुरू चालत होत्या. काही बोटी नांगर टाकून त्या सरोवराच्या तीरावर उभ्या होत्या. त्यांपैकी काही बोटींना शिडाच्या दांड्या होत्या, त्या उंच उंच दांड्या हवेत डोलताना मजेशीर दिसत होत्या. ही दृश्ये पाहत मी सरोवराच्या काठी बराच वेळ उभा होतो. सूर्यप्रकाश केव्हा गडप झाला, अंधार केव्हा आला व चंद्रोदय होऊन शीतल चंद्रप्रकाशाने आपले चंदेरी जाळे केव्हा सरोवरावर व त्या जवळील बागांवर पसरविले, ते मला कळलेदेखील नाही. त्या चंद्रप्रकाशात तर त्या सरोवराची शोभा जास्तच खुलली, मी त्या चंद्रप्रकाशात बागांतून बराच वेळ फिरलो. गर्द झाडीतून चंद्राची शीतल किरणे माझ्या अंगाला सुखद स्पर्श करीत होती; पुढे फुलांच्या ताटव्यांतून मी हिंडलो, चंद्रप्रकाशाबरोबर फुले खेळत होती, हसत होती. नंतर सरोवराच्या काठी एका बाकावर बसून मी त्या सरोवराची व त्या

भोवतालच्या सृष्टिसौंदर्याची रमणीय शोभा पहात होतो, त्यावेळी तुम्हा सर्वांची वरचेवर आठवण होत होती. मनास वाटले की, तुम्ही सर्व ही शोभा पाहावयास येथे असता तर काय मजा आली असती ! मी नंतर सरोवरावरून परतलो व लिम्मत नदीच्या काठच्या रस्त्याने हॉटेलकडे जाऊ लागलो. ह्या नदीच्या काठी दोन्ही बाजूंना हॉटेल्स, रेस्टॉरंट्स व दुकानें आहेत. ही दुकाने फार चांगल्या रीतीने सजवलेली आहेत. त्या दुकानांचा थाटमाट व भपका पाहात मी नदीतीराने चाललो होतो, इतक्यात मला एक छानदार दृश्य दिसले. त्या दुकानांवर, हॉटेल्स व रेस्टॉरंट्सवर तांबड्या, हिरव्या, निळ्या, पिवळ्या इत्यादि रंगात रंगविलेल्या जाहिराती होत्या, विजेच्या प्रकाशाने प्रकाशित केलेल्या त्या जाहिरातींची प्रतिबिंबे नदीच्या पाण्यावर मला दिसली. नाना रंगांच्या प्रतिबिंबांच्या अनेक आकृती पाण्यावर दिसल्या, जणू कोणी कुशलतेने त्या पाण्यावर छानदार रांगोळ्या काढल्या आहेत, असे मला त्या आकृत्या पाहून वाटले. ह्या नदीच्या पाण्यावर शुभ्र हंस पक्षी इकडून तिकडे व तिकडून इकडे डौलाने हिंडत होते. त्यांच्यावरही वर वर्णन केलेल्या जाहिरातींचे वेगवेगळे प्रकाश पडत होते; मला वाटले की, ज्याप्रमाणे रंगमंचकावर नृत्य करणाऱ्या कलावंतावर निरनिराळ्या रंगांचे प्रकाशझोत टाकतात, त्याप्रमाणे लिम्मत नदीच्या पाण्यावर नाचणाऱ्या ह्या पक्ष्यांवर कोणी विविध रंगांचे प्रकाशझोत टाकीत आहेत. हे दृश्य मनास भुलवीत होते. मी अशा रीतीने शोभिवंत दृश्ये पाहत पाहत स्क्वेइझरहॉफ हॉटेलात परतलो. त्या दिवशी त्या हॉटेलात मुक्काम केला.

येथेही मला माझ्याजवळ असलेल्या इंग्लिश पौंडांपैकी काही पौंडांचे स्विस फ्रँकमध्ये रूपांतर करावे लागले. त्याशिवाय येथे व्यवहार करणे शक्य नव्हते. एका इंग्लिश पौंडाला ११॥ स्विस फ्रँक ह्या दराने मी काही इंग्लिश पौंड मोडले व स्विस फ्रँक मिळविले. मी ज्या हॉटेलात उतरलो, त्या हॉटेलात काही हिंदुस्थानाचे लोकही उतरलेले होते. ते व्यापारी होते व स्विस व इतर युरोपियन व्यापाऱ्यांबरोबर त्यांचे काही माल घेण्यादेण्याविषयी सौदे चालले होते, ते दृश्य पाहून मला अभिमान वाटला. माझ्या देशातील व्यापारी येथे येऊन युरोपियन लोकांच्या माडीला मांडी लावून व्यापारासंबंधी बोलणी करीत आहेत, खरेदी–विक्रीचे सौदे करीत आहेत, त्यामुळे मला आनंदही झाला.

झ्युरिच हे स्वित्झर्लंडच्या राजधानीचे एक शहर तर आहेच, पण हॉलिडे रिझार्ट–सुट्टी घालविण्याचे एक रम्य ठिकाण–म्हणूनही प्रख्यात आहे. सर्व स्वित्झर्लंड देशात जे दुसऱ्या देशांतून प्रवासी येतात, त्यांपैकी सुमारे शेकडा दहा टक्के प्रवासी झ्युरिचमध्ये येतात. हे शहर दळणवळणाच्या मार्गाचे केंद्र आहे, त्यामुळे येथून स्वित्झर्लंडमधील इतर रम्य ठिकाणांना सुलभतेने जाता येते. येथून मोटार कोचेसनी त्या शोभिवंत ठिकाणी जाण्याची उत्तम सोय आहे. येथील विमानतळाची गणना युरोपातील उत्तम विमानतळांमध्ये केली जाते. झ्युरिचमध्ये हॉटेलांची व्यवस्थाही चांगली आहे. सुमारे ११९ हॉटेले येथे आहेत. नाटक आदि कलांसाठी गृहे; वस्तुसंग्रहालये, प्रदर्शने व संगीत जलसांची गृहे यांची रेलचेल आहे. मला झ्युरिच शहराचा एक भाग मोठा गंमतीचा वाटला. हा भाग लिम्मत नदीकाठी आहे. ह्या भागात बऱ्याच जुन्या इमारती आहेत व त्या इमारतीत गिल्ड हाऊसेस म्हणजे व्यापार व उद्योगधंदे करणाऱ्या मंडळींची ठिकाणे आहेत. ती फार मजेची आहेत. त्या प्रत्येक गिल्ड हाऊसचे एक चिन्ह–निशाणी असते, कोणाचे कोंबडा तर कोणाचे कुत्रा, तर कोणाचे सिंह, तर कोणाचे पोपट, असे नाना पशुपक्ष्यांची चिन्हे ह्या मंडळींनी धारण केलेली आहेत, ही चिन्हे दाखविण्यासाठी ह्या इमारतीत दर्शनी भागात त्या त्या प्राण्याचा पुतळा किंवा प्रतिमा ठेवलेली असते, त्या प्रतिमेवरून ते ठिकाण कोणत्या गिल्डचे आहे, हे ओळखता येते. जुन्या जमान्यातील स्वप्नसृष्टीचे ( Dreamlike ) वातावरण येथे पसरलेले मला अनुभवयास मिळाले. येथील सेंट पीटर्स चर्च मी पाहिले; त्याच्या मनोऱ्यात एक मोठे घड्याळ आहे, त्याचा व्यास २८ फूट ५ इंच लांबीचा आहे. ह्या घड्याळाची तबकडी युरोपातील कोणत्याही घड्याळाच्या तबकडीपेक्षा मोठी आहे. नंतर मी स्विस नॅशनल म्युझियम–स्विस राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय पाहिले. ह्या संग्रहालयात स्विस कला व संस्कृती यांचा कसा विकास झाला, याचा इतिहास पाहावयास मिळाला, ह्या संग्रहालयात चित्रकला, शिल्पकला, स्टेन्ड ग्लासेस आर्ट म्हणजे काचेवर रंगविलेली चित्रकला, चिनी मातीची भांडी, युद्धात वापरली जाणारी हत्यारे, पेहराव (Costumes ) इत्यादि वस्तूंचा अमोल साठा आहे. अतिप्राचीन अशा दुर्मिळ वस्तूही येथे पाहावयास मिळाल्या.

दुसरे जे वस्तुसंग्रहालय मी पाहिले, त्याचे नाव ' रीट वर्ग ' (Rietberg) वस्तुसंग्रहालय. ह्यात हिंदुस्थान, चायना, जपान, भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरची आशिया व आफ्रिका ह्या खंडांतील देश, आफ्रिका खंड व साऊथ सीज ह्या देशांतील कलांच्या वस्तू मी पाहिल्या. अमेरिकेचा शोध लागण्यापूर्वी त्या खंडात ज्या कला होत्या, त्यांचे नमुनेही येथे संग्रहीत केलेले आहेत. मी हॉटेलात परतलो. मला जी खोली मिळाली, ती आधुनिक सुखसाधनांनी सज्ज आहे, ह्या हॉटेलातील भोजनाच्या दालनात जेवण केले. आता माझ्या खोलीत जाऊन मी झोपणार आहे. अच्छा गुडनाईट—सुरजनी !

तुझा

**नाना**

● ● ●

**: २८ :**

# युरोपचा नगाधिराज : आल्प्स

**हॉटेल स्क्वेइझर हॉफ**
**झ्युरिच, स्वित्झर्लंड**
ता. २–६–१९५५

चि. **उषास** सप्रेम आशीर्वाद—

ता. २ जून रोजी न्याहरी घेत असता माझ्याच टेबलावर बसलेला एक ऑस्ट्रियन गृहस्थ भेटला, तो व्यापारी आहे व धातू ओतण्याच्या कारखान्यांना लागणारी यंत्रे व उपकरणे यांचा तो व्यापार करतो. त्याच्याबरोबर बोलत असता त्याने मला सांगितले की, "We are liberated from

our liberators namely the Americans, Russians, the French and the English ". म्हणजे " गेल्या युद्धात ज्या अमेरिका, रशिया आदि देशांनी आस्ट्रियाला स्वतंत्र होण्यास मदत केली, त्या स्वातंत्र्यरक्षकापासून आम्ही आस्ट्रियन्स आता स्वतंत्र झालो आहोत. " गेल्या दुसऱ्या महायुद्धात प्रथम जर्मनांनी आस्ट्रिया देश काबीज केला, नंतर रशिया, इंग्लंड, अमेरिकादि दोस्त राष्ट्रांनी जर्मनीपासून आस्ट्रियाला मुक्त केले, पण त्या देशावर दुसरे महायुद्ध संपले तरी दोस्त राष्ट्रांचा ताबा होता, नंतर काही वर्षांनी दोस्त राष्ट्रांनी आस्ट्रियावरचा ताबा सोडला. ही घटना नुकतीच घडली होती. त्या घटनेस अनुलक्षून त्या आस्ट्रियन गृहस्थाने वरील उद्‌गार मोठ्या मार्मिक भाषेत काढले. तो गृहस्थ व्यापारी आहे व इंग्रजी ज्यांची मातृभाषा आहे, अशा इंग्रज, अमेरिकन्स वगैरे लोकांबरोबर त्याचा व्यवहार असल्यामुळे त्याला इंग्रजी शिकावे लागले. त्याला इंग्रजी येत असल्यामुळे त्याच्याबरोबर चर्चा करणे मला शक्य झाले. त्याने मला बरीच माहिती दिली. तो म्हणाला, " फ्रान्सचे जीवनमान ( Standard of living ) इंग्लंडच्या जीवनमानापेक्षा उच्च आहे, तर स्वित्झर्लंडचे जीवनमान फ्रान्स-पेक्षाही वरचढ आहे. याचे कारण स्वित्झर्लंड देश फार सुदैवी आहे. दोन्ही महा-युद्धांच्या खाईपासून तो बचावला गेला आहे. दोन्ही महायुद्धांत स्वित्झर्लंड तटस्थ राहू शकते, याचे कारण ह्या देशाची विशिष्ट भौगोलिक परिस्थिती व ऐतिहासिक परंपरा आहे. " पुढे तो म्हणाला, " युरोपातील इतर राष्ट्रांना त्यातल्या त्यात आस्ट्रियासारख्या लहान राष्ट्रांना इच्छा असूनही युरोपियन युद्धात अगर जागतिक युद्धात तटस्थ राहता येत नाही." आपल्या देशाविषयी तो गृहस्थ म्हणाला, "आस्ट्रियामध्ये कापड, पोलाद, कातड्यांपासून वस्तू बन-विणे इत्यादि उद्योगधंदे आहेत. " पुढे तो गंमतीदार भाषेत म्हणाला, " We produce doctors and engineers and supply them to other countries–आम्ही डॉक्टर्स व इंजिनियर्स तयार करतो व इतर देशांना त्यांचा पुरवठा करतो. " त्याने मला लेटेस्ट–अगदी ताजी बातमी दिली की, " तुमचे पुढारी श्री. जवाहरलाल नेहरू आमच्या देशाला एक दोन दिवसांत येत आहेत. " ती बातमी सांगताना त्याच्या बोलण्यात आपले पंत-प्रधान नेहरू यांच्याबद्दल आदरभाव व प्रेम दिसत होते.

मी सकाळी ता. २ ला झ्युरिचमधील ' वासरकर्च ' (Wasserkirche water Church) नावाचे चर्च पाहिले. ते १५ व्या शतकात बांधले गेले. ह्या चर्चमधील खिडक्यांच्या काचेच्या तावदानांवर जी विविध रंगीत चित्रे काढली आहेत, ती फार सुंदर आहेत. फ्राऊमुन्स्टर ( Fraumunster ) हेही चर्च मी पाहिले; त्यात झ्युरिच शहराच्या आख्यायिका भिंतीवर चित्रित केलेल्या आहेत. ही चित्रे मनोहर आहेत. ह्या चर्चच्या इमारतींची शिल्पकला प्रेक्षणीय आहे.

ही चर्चेस पाहिल्यानंतर मी आल्प्स पर्वत पाहण्यास गेलो.बर्फाच्छादित आल्प्स पर्वतांची ख्याती मी ऐकलेली होती. ते पर्वत पाहण्यास मी उत्सुक झालो होतो. झ्युरिचपासून ह्या पर्वतांकडे जाण्यासाठी टुरिस्ट बसेसची व्यवस्था आहे. त्यांपैकी एका बसने मी जावयास निघालो. बसमधील सीटस् ( बैठकी ) वर मऊ मऊ गाद्या होत्या, टेकण्यासाठी ज्या बॅकस् होत्या, त्यांनाही गाद्या होत्या. मोठ्या आरामशीर बैठकी होत्या. बसमध्ये लाऊड स्पीकर होता. त्यामधून बस सर्व्हिसेसचा एक नोकर बसचा प्रवास चालू असता रस्त्याने लागणाऱ्या स्थळांची माहिती देत होता. बसमध्ये रेडिओ होता. मधूनमधून रेडिओ संगीत चालू असे. रस्त्याने स्वित्झर्लंडमधील खेडी लागत, पण त्यांना खेडी म्हणणे चूक ठरेल. ती आकाराने लहान होती पण त्या खेड्यांत मजबूत व उंच उंच इमारती होत्या, त्या खेड्यांतील रस्ते स्वच्छ व रेखीव होते, चहूकडे स्वच्छता दिसत होती, काही ठिकाणी बागा होत्या, पाण्याची सोय, विजेचे दिवे, औषधपाण्याची सोय, शाळा, खेळण्यासाठी पटांगणे, करमणुकीची स्थाने इत्यादि आधुनिक जगातील सुखसोयींची साधने होती, ती खेडी नसून लहान शहरे होती. ज्या रस्त्याने आम्ही जात होतो,तो रस्ता सुरेख होता.जाता जाता लुसर्न नावाचे खूप मोठे सरोवर लागले, हे सरोवर पाहून मी आनंदाने फुलून गेलो. हे सरोवर वळसे घेत घेत आल्प्स पर्वतांच्या पायथ्याला स्पर्श करीत खूप दूरवर पसरलेले आहे. ह्या सरोवराच्या काठी असलेल्या डोंगरावर गर्द झाडी होती. त्यांची प्रतिबिंबे सरोवराच्या पाण्यात दिसत होती. सकाळची प्रशांत वेळ ! सरोवराचा व पर्वतराजींचा तो मनोरम देखावा पाहून कोणाला आनंद होणार नाही ? सरोवराच्या निळ्या पाण्यावर सूर्य किरणांचा खेळ चाललेला होता. काही वेळ आमची बस येथे थांबली होती. प्रवाशी बसमधून उतरून ह्या सरोवराची

शोभा पाहत होते. पुढे जाण्याची बसची वेळ झाली; मला वाटले, आणखी काही वेळ ती शोभा पाहत तसेच उभे राहावे. लुसर्न सरोवराच्या तीरावर लुसर्न नावाचे शहर आहे, ते शहर पाहिले. शहर मोठे मनोहर आहे. लुसर्नहून पुन्हा प्रवास सुरू झाला. रस्ता कधी सरोवरांच्या तीराने जात होता, कधी पर्वतांच्या चढणीवर वळसे घेत होता, कधी निबिड तरुराजीतून जात होता. हा प्रवास किती तरी सुखद व आल्हाददायक होता म्हणून सांगू! नंतर एंजलबर्ग शहर आले, हे शहर आल्प्स पर्वतांच्या एका खोऱ्यात वसलेले आहे, ह्या शहराच्या चोहोबाजूने वर्फाच्छित आल्प्स पर्वतांच्या रांगा आहेत, शहराभोवती हरित-तृणांनी आच्छादलेली माळराने आहेत, काही ठिकाणी निरनिराळ्या धान्य, भाज्या व फळे यांच्या पिकांनी समृद्ध अशी शेते आहेत. फुलांच्या बागाही ठिक-ठिकाणी फुललेल्या आहेत. एंजलबर्ग शहर समुद्रसपाटीपासून ३३६० फूट उंच आहे.

एंजलबर्ग–( Engelberg ) हून मी फ्युनिक्युलर ( Funicular ) किवा केवल रेल्वेने प्रवास केला. ह्या रेल्वेत इंजिन असते व केबल्स म्हणजे लोखंडी ताऱ्यांचे जाड दोरखंडे असतात. आल्प्स पर्वतांच्या काही टप्पा गाठण्या-साठी ह्या रेल्वेचा उपयोग होतो. एंजलबर्गपासून आल्प्स पर्वताची चढण सुरू होते. ह्या चढणीवरून आल्प्स पर्वतावरील दाट जंगलांची व त्या पर्वतांच्या खोऱ्यांची विविध दृश्ये पाहात मी केबल रेल्वेने प्रवास करीत होतो. मधून मधून हिमाच्छादित आल्प्स पर्वतांची शिखरे व हिमनद्या यांचे देखावे दिसत होते, ते अपूर्व होते. हा प्रवास मी गेर्स्कनील्प (Gerschnialp) ह्या ठिकाणा-पर्यंत केला. गेर्स्कनील्प हे ठिकाण समुद्र सपाटीपासून ६००० फुटांच्या उंचीवर आहे. ह्या रेल्वेचे सुरुवातीचे स्टेशन एंजलबर्ग येथे आहे. तेथून वर वर्णन केलेले दोरखंड व इंजिन यांच्या साहाय्याने आगगाडी आल्प्स पर्वतावरील चढण चढू शकते. गेर्स्कनील्पपासून मी एअर केबलने प्रवास केला. दोन उंच ठिकाणे स्टेशन्स–दोरखंडांनी जोडलेली आहेत, ह्या दोरखंडावरून आगगाडीच्या डब्या-सारखा डबा विजेच्या साहाय्याने चालविला जातो. ह्या डब्यात बसून मी ह्या एअर केबल रेल्वेने प्रवास केला. ह्या डब्यात प्रवास करीत असता हवेत अधांतरी विमानातून आपण प्रवास करीत आहोत, असे वाटते. हा प्रवास चालू असता खाली खोल दऱ्यांची, नद्या ओहळ यांची, दाट जंगलांची, पर्वतांची दृश्ये

दिसत होती. हा प्रवास तर फारच गमतीदार वाटला. ह्या एअर केबल रेल्वेने मी आल्प्स पर्वतांची ७५०० फुटांची उंची गाठली. येथे आल्यावर माझा एअर केबल रेल्वेचा प्रवास संपला. ज्या ठिकाणी आता मी आलो होतो, तेथे एक हॉटेल होते. ते एका मोक्याच्या उंच जागी होते, तेथे मी जेवण केले, त्या हॉटेल-मधून हिमाच्छादित आल्प्स पर्वतांची शिखरे दिसत होती. ह्या पर्वतांमध्ये कोठे बर्फाने आच्छादलेली सरोवरे तर कोठे पाणी व बर्फ यांनी भरलेली सरोवरे आहेत, त्यांची शोभिवंत दृश्ये पाहत पाहत मी त्या हॉटेलात जेवण संपविले. हॉटेलातून मी बाहेर पडलो. आल्प्स पर्वतांवर खूप लांबवर फिरलो. अनेक ठिकाणी बर्फ पडलेला होता. मधून मधून खडकाळ जमीनही होती. ह्या पर्वतावर माझ्याबरोबर आलेले इतर प्रवासीही मन मानेल त्या मार्गांनी जात होते व त्या पर्वतांवर फिरत होते. त्यांपैकी एका स्त्रीने मी कोठून आलो वगैरे विचारले. तिच्याबरोबर आणखी काही लोक होते. मी हिंदुस्थानातून आलो आहे, हे जेव्हा तिला कळले, तेव्हा मला तिने विचारले, " काय ह्या आल्प्स पर्वतांसारखे पर्वत तुमच्या देशात आहेत का?" ती सुशिक्षित व जाणकार होती, तरी देखील मला छेडण्याच्या हेतूने तिने मला तो प्रश्न केला. मी उत्तर दिले की, " हिंदुस्थानात हिमालय पर्वत आहे, हिमालय ह्या नावावरून तुमच्या लक्षात येईल की हा पर्वतही हिमाच्छादित आहे, एवढेच नव्हे तर हिमालय पर्वताचे एव्हरेस्ट शिखर जगातील सर्व पर्वत शिखरांमध्ये उंच आहे ! ' त्या भगिनीने पुन्हा मला दुसरा प्रश्न खवचटपणे केला की, " मग काय हो ! तुम्ही एव्हरेस्टवर गेला असाल, तुमच्याच देशात ते शिखर आहे, तेव्हा ते तुम्ही पाहिलेच असेल ! " तिला ते शिखर कोण व कधी चढून गेले, हे सर्व माहीत होते, तरी तिने हा प्रश्न केला. तिचा हेतू हा की मी गर्वाने व दुसऱ्याला यातले काहीच माहीत नाही, अशा थाटाने उत्तर द्यावे की, " हो हो ! ते एव्हरेस्ट शिखर ना, मी चढलो आहे. " वगैरे. नंतर तिने व तिच्या मित्राने माझ्याबद्दल मनातल्या मनात किंमत करावी व माझी चेष्टा करावी. पण मी शांतपणे उत्तर दिले की, " भगिनी ! तुम्हांला माहीत नसेल तर मी सांगू इच्छितो की एव्हरेस्ट शिखर फार उंच आहे व तेथे जाणे अत्यंत कठीण आहे. अनेक देशातील अनेक लोकांनी एव्हरेस्ट गाठण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना ते साध्य झाले नाही, काही वर्षांपूर्वी जगातल्या दोन व्यक्ती, एक ऑस्ट्रेलियाचे श्री.

हिलेरी व दुसरे नेपाळचे श्री. तेनसिंग फक्त एव्हरेस्टवर गेले. आतापर्यंत त्यांच्याशिवाय कोणीही व्यक्ती एव्हरेस्टवर गेली नाही, तर मी कोठून जाणार ?" माझी वरील उत्तरे ऐकून ती भगिनी खजिल झाली व तिच्या डावपेची बोलण्यास मी बळी पडलो नाही, ह्याबद्दल ती माझ्याकडे कौतुकाने पाहू लागली व हसत म्हणाली की, "तुमच्या सरळ स्वभावामुळे व प्रामाणिक विधानामुळे मला फार आनंद होत आहे." पुढे त्या स्त्रीने आपल्या दोस्तांची ओळख करून दिली. आम्ही आता सर्व मित्र बनलो. काही वेळ चालत चालत बोलणी केली. नमस्कार वगैरे होऊन ते लोक आपल्या मार्गाने आल्प्स पर्वत पाहावयास गेले व मी माझ्या मार्गाने तो पर्वत पाहण्यासाठी चालू लागलो.

येथे मात्र एका गोष्टीला जपले पाहिजे. मधून मधून हिमाच्छादित लहान मोठी सरोवरे लागतात, त्यावरून प्रवास करताना त्या सरोवरांवरील वर्फ घट्ट आहे का, याची खात्री करून घ्यावी लागते. वर वर्फाचा पातळ थर व खाली खोल पाणी अशी परिस्थिती असेल तर सरोवरांत जाणे धोक्याचे असते. आल्प्स पर्वतावर आम्हा थोड्या प्रवाशांशिवाय तेथे कोणी नव्हते. चोहोकडे परमशांतीचे साम्राज्य पसरलेले होते. ह्या ठिकाणी झाडी झुडपे नाहीत, ह्या अशा वातावरणात माणसास वाटते की, आपण राजे आहोत, आपण म्हणू ती पूर्व दिशा, करू ते प्रमाण. मी लहान मुलासारखे बर्फाचे चेंडू करीत होतो व त्यांना हवेत उडवीत होतो. स्वैरपणे विहरत होतो. माझा मीच सवंगडी होतो. माझ्या आनंदातच मी मग्न होतो. कोणाकोणाची जरुरी नव्हती, अशा ह्या अपूर्व भावनेने मला पछाडले होते. एका सरोवरामध्ये एका तीरावरून दुसऱ्या तीराकडे जाण्यासाठी पायवाट बांधलेली होती. त्या पायवाटेने मी त्या सरोवरामधून जात होतो. त्या वाटेच्या मध्यभागी गेल्यावर मी थांबलो, त्या ठिकाणी त्या सरोवराचा व आजूबाजूंना जी आल्प्स पर्वतांची हिमाच्छादित शिखरे होती, त्यांचा देखावा पाहून मी मोहित झालो. ह्या ठिकाणी एका अनन्वित सुखाची व आल्हादाची अनुभूती मला झाली. ह्या पर्वतावरील आरोग्यदायक व ताजी हवा शरीरास व मनास सुखवीत होती. ह्या हवेत मी किती तरी वेळ फिरलो, पण थकवा वाटला नाही. मी फिरत असताना काही वेळेला ढग येथे जमा होत, दाट धुकेही पसरे, पण शिखरावर नव्हते; ते ढग व धुके शिख-

राच्या खालच्या बाजूला होते, त्यामुळे शिखरांची खालची बाजू पूर्णपणे झाकली जाई व शिखरे अधांतरी तरंगत असल्यासारखी दिसत. ते दृश्य विस्मयजनक व अकल्पित भासले. दुसरे ह्या शिखरांवर कधी कधी काही ठिकाणी काळे ढग तर काही ठिकाणी बर्फ दिसे, त्यामुळे ढगांनी आविष्टलेले बर्फमय शिखरांचे भाग सरोवरासारखे भासत. आल्प्स पर्वताच्या अगदी शिखरांवर जाऊन ते पर्वत पाहण्याचा हा अपूर्व योग मला मिळाला. माझी आल्प्स पर्वत पाहण्याची इच्छा पूर्ण झाली.

माणसांनी तरी काय कमाल केली आहे ? थोड्या तासांत ह्या उंच बर्फाच्छादित आल्प्स पर्वतावर मी सहज जाऊ शकलो. फ्युनिक्युलर व एअर केबल ह्यासारख्या रेलच्या शोधाने आल्प्स पर्वतही माणसाने ठेंगणे केलेले आहेत.

त्याच रेल्वे मार्गाने मी परत एंजलबर्ग शहरास आलो. त्या शहराच्या आवतीभोवती असलेल्या रानातून हिंडलो. ह्या रानात शेकडो गाई व बैल चरत होते. काय ती मस्त जनावरे ! त्यांची उंची आपल्याकडे ज्या गाई व बैल आहेत, त्यापेक्षा कमी आहे, पण लांबीत ही जनावरे आपल्याकडच्या जनावरांपेक्षा जास्त लांब आहेत. धष्टपुष्टता, ताजेतवानेपणा, रग व मस्ती ह्या गुणांमध्ये आपली जनावरे येथील जनावरांच्या पासंगालाही पुरणार नाहीत. येथील जनावरे उग्र दिसत होती; जणू वाघाची उग्रता त्यांनी परिधान केली होती. त्यांच्याजवळ जाण्याची भीती वाटत होती. त्यांची शक्ती, जोर व तेज त्यांच्या अंगावरून ओसंडत होते. ही अशी जनावरे पाहून माझ्या मनात चटकन विचार आला की, "अशी बलवान, सतेज व रगदार जनावरे आपल्या देशात— भारतात—असती तर काय बहार झाली असती." येथील ही जनावरे इतकी धष्टपुष्ट व बलयुक्त करण्यासाठी स्विस लोकांनी त्यांची निगा चांगली राखली असली पाहिजे व त्यांची जोपासना काळजीपूर्वक केली असली पाहिजे, हा निष्कर्षही सहज निघतो. भारतातील शेतकरी ह्यापासून जरूर तो बोध घेतील तर आपल्याही देशात अशाच नमुनेदार जनावरांची पैदास होईल यात काय शंका.

ह्या जनावरांच्या कानांवर लहान नाण्यासारखे गोल धातूचे पत्रे ठोकलेले होते, त्यावर काही खुणा होत्या, त्या बहुधा त्या जनावरांच्या मालकीसंबंधी व

त्यांच्या संख्येसंबंधी ( Number ) असाव्यात. ज्या रानात ही जनावरे चरत होती, तेथे उंच, दाट व पुष्टता देणारे ( Luscious ) गवत होते, त्यावर ती मनसोक्त चरत होती. ही राने पाहिल्यानंतर ह्या ठिकाणी झाडांनी सावली केलेल्या पायवाटा आहेत, त्या पायवाटांनी हिंडलो, कोठे मला खळ-खळणारे निर्झर दिसले, तर कोठे मी धबधब्याची दृश्ये पाहिली. नंतर मी एंजेलवर्ग गावातील व त्याच्या परिसरातील बागा पाहिल्या– चित्रविचित्र रंगांची झुडपे व झाडे, फुलांनी वहरलेल्या वेली व फुलझाडी यांनी त्या बागा नटलेल्या होत्या, काही ठिकाणी कारंजी थुईथुई नाचत होती, फुलांचा सुगंध माणसाला धुंद करीत होता, आजूबाजूच्या आल्प्स पर्वतांची उंच उंच शिखरे यांच्या पार्श्वभूमीने तर ह्या बागा व मी पाहिलेली हिरवी हिरवी राने यांची शोभा अधिकच आकर्षणीय दिसत होती.

मी ज्या बसने आलो होतो, त्या बसची झ्युरिचकडे जाण्याची वेळ झाली, मी इतर प्रवाशांबरोबर त्या बसमध्ये बसलो. बसचा प्रवास सुरू झाला. एके ठिकाणी दाट झाडीतून डोंगरांच्या उतारावरून वस जात होती, एक कसला तरी किडा चुकून माझ्या तोंडात गेला, तो खाकरून बाहेर टाकण्यासाठी माझ्या सीटजवळचा दरवाजा उघडून मी खाली वाकून थुंकलो, इतकी काळजी घेतली तरी माझ्या शेजारी बसलेल्या एका स्विस स्त्रीने नाक मुरडले, तिला माझे थुंकणे आवडले नाही. बाकी ह्याबद्दल मला तिचा राग आला नाही. उलट थुंकणे आदि घाणेरड्या प्रकाराबद्दल युरोपियन लोकांना वाटणाऱ्या घृणेचेच प्रतीक त्या स्त्रीच्या मुरडण्यात मला दिसले. जणू घाणीबद्दल अशा प्रकारची ॲलेर्जी (Allergy)–अत्यंत घृणा–त्यांच्यामध्ये आहे. हाच गुण भारतीय नागरिकांना आला तर आपली गावे व शहरे किती स्वच्छ व निर्मळ होतील नाही ? बसने सायंकाळी झ्युरिचला पोहोचलो. ' स्क्वेइझर हॉफ " हॉटेलात मुक्काम केला.

झ्युरिच या शहराची हवा मला पुणे शहरासारखी उत्साहवर्धक वाटली. ह्या शहरात व पॅरिसमध्ये ट्रॅफिकचा नियम ' कीप टू दी राईट '–म्हणजे उजवीकडे वाहने हाका " असा आहे. आपल्या देशात ' कीप टू दी लेफ्ट म्हणजे डावीकडून वाहने चालवा ' असा नियम आहे.

स्वित्झर्लंडमध्ये चार भाषा रूढ आहेत. स्वित्झर्लंडचा जर्मन देशाच्या बाजूचा जो भाग आहे, तेथे जर्मन भाषा चालते व ह्या देशाचे फ्रान्सला व इटलीला जे भाग लागून आहेत, तेथे अनुक्रमे फ्रेंच व इटालियन ह्या भाषा बोलल्या जातात, ह्याशिवाय स्विस भाषा या देशात बोलली जाते, व फ्रेंच भाषा अनेकांना अवगत आहे.

इतक्या भाषा बोलणारे लोक स्वित्झर्लंड ह्या देशात राहतात, पण भाषा-भेदामुळे तेथे तंटेबखेडे नाहीत व त्यामुळे ह्या राष्ट्राच्या एकीचा कधी भंग झाला नाही. गुण्यागोविंदाने हे सर्व लोक एकत्र नांदतात. ह्या देशाच्या वसाहती नाहीत. वसाहतींशिवाय नॉर्वे व स्वीडन हे युरोपातील देश जसे संपन्न, सधन व पुढार-लेले आहेत, त्याचप्रमाणे हा देशही संपन्न, सधन व सुधारलेला आहे.

आज ता. २ जून ! आज चि. मंगलाचा जन्मदिन. त्या कारणाने तिची फार आठवण होत आहे. तेथे असतो तर तिच्या वाढदिवसानिमित्त खेळणी, कपडे किंवा दुसऱ्या तिच्या आवडीच्या वस्तू घेऊन तिला मी दिल्या असत्या. प्रवासात असल्यामुळे मला ते करता येत नसले तरी आशीर्वाद पाठविणे मला केव्हाही शक्य आहे. तिला मी दीर्घायू व आरोग्य चिंतितो व तिच्या हातून मानवांची थोर सेवा घडो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो आणि तिला म्हणावे की मी तिच्यासाठी येथे सुंदर सुंदर बाहुल्या व इतर तिच्या आवडीच्या वस्तू खरेदिल्या आहेत. आज जरी मला त्या तिला देता आल्या नाहीत तरी मी ता. ११ जूनला जेव्हा घरी परत येईन तेव्हा त्या बाहुल्या व वस्तू तिला देईन. त्या पाहून ती खचित खूष होईल !

तुझा

नाना

• • •

## : २९ :

# इटलीची मुंबई

हॉटेल अँबॅसिएटोरी,
मिलान, इटली,
ता. ३-६-१९५५

चि. विठ्ठलास सप्रेम आशीर्वाद—

ता. ३ जून रोजी सकाळी ८॥ वाजण्याच्या सुमारास मी आगगाडीने झुरिचहून मिलानला जावयास निघालो. मी ज्या रेल्वेमार्गाने प्रवास केला, तो मार्ग रम्य, आकर्षक व मोहक निसर्गसृष्टीच्या दृश्यांनी नटलेला होता. ह्या प्रवासातील सुरुवातीचे सुमारे चार तास मला ही चित्तथरारक दृश्ये पाहवयास मिळाली. हा रस्ता आल्प्स पर्वतांच्या रांगांतून जातो, ह्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आल्प्स पर्वतांची हिमाच्छादित शिखरे होती. ह्या उंच उंच पहाडांचे व त्यांच्या शिखरांचे विलक्षण व विचित्र आकार पाहात पाहात मी आगगाडीतून प्रवास करीत होतो. हा रेलमार्ग अनेक दऱ्याखोऱ्यांतून जात आहे. पहाडांना वळसे घालीत आहे. कितीतरी बोगदे आगगाडीने ओलांडले. ह्या रस्त्याने पहाडांवरून उडचा घेणारे निर्झर दिसले, खोऱ्यांतून शांतपणे वाहणाऱ्या नद्या मी पाहिल्या, सरोवरांची अपूर्व शोभा अवलोकिली, अनेक शहरे व खेडी ह्या रस्त्याने लागली, कोठे ही गावे नदीकाठी होती, तर कोठे सरोवरांच्या तीरावर होती, कोठे गर्द झाडीतून दिसत होती, तर कोठे खोऱ्यांत वसलेली होती. हा चार तासांचा प्रवास स्वित्झर्लंडमधून झाला. नंतर इटली देशाची हद्द लागली. ह्या रेलमार्गाने इटलीतील काही सरोवरे मी पाहिली. त्यांत इटलीतील सर्वांत मोठे सरोवर 'डेसेंझानो' हेही पाहिले. ( अर्थात ही माहिती डब्यातील एका गृहस्थाने मला दिली. ) त्या सरोवराकाठी शहरे होती. इटलीतील पहाडही ह्या प्रवासात

पाहिले. कमो ( Como ) नावाचे शहर सरोवराच्या काठापासून उंच पहाडाच्या उतरणीवर वसलेले मी पाहिले. ते फारच सुंदर होते. माझा सुमारे सहा तासांचा प्रवास मोठा मजेचा व सुखाचा झाला. अनेक अद्भुत व अपूर्व देखावे ह्या प्रवासात मी पाहिले. दुपारी २–३० वाजता मी मिलान स्टेशनवर येऊन पोहोचलो. त्या आधी मात्र आगगाडीत प्रवास करताना मला एक विचित्र अनुभव आला, जो आतापर्यंत माझ्या प्रवासात मला मिळाला नाही. मिलान स्टेशन येण्याला अजून एकदोन स्टेशने बाकी होती. ह्यांपैकी एका स्टेशनवर दोनचार इटालियन पोलीस माझ्या डब्यात आले. माझी चौकशी केली. इतरही प्रवाशांची चौकशी केली. इतके करूनच ते थांबले नाहीत. डब्यातील सीटस्च्या रेलण्यासाठी ज्या बॅक्स होत्या, त्यांच्यावरचे कापड व आजूबाजूचे खिळे काढून त्यांनी त्या बॅक्स तपासल्या. त्या बॅक्समध्ये चोरून काही प्रवाशांनी वस्तू–त्यातल्या त्यात घड्याळे, दारूच्या बाटल्या, सिगारेटस्, मौल्यवान दागिने–इत्यादि तर ठेवलेल्या नाहीत ना, हे त्या पोलिसांना पाहावयाचे होते. त्याच हेतूने माझ्या बॅगा उघडून त्यांनी पाहिल्या, जेव्हा त्यांच्या दृष्टीने माझ्याजवळ काहीच आक्षेपार्ह दिसले नाही, तेव्हा ते माझ्याजवळ येऊन बसले. मी त्यांना सिगारेटस् ओढावयास दिल्या. त्या त्यांनी घेतल्या. आम्ही सर्वांनी धूम्रपान सुरू केले. ते नंतर माझ्याबरोबर प्रेमाने बोलले. माझ्या मनात विचार आला की, गेल्या महायुद्धानंतर मुसोलिनीची हुकूमशाही संपली तरी तिची पडछाया अजून येथे–इटलीत–पडलेली दिसते. इटालियन्सना पोलिसस्टेटची लागलेली सवय अद्याप संपूर्णपणे गेलेली दिसत नाही. असो ! त्या पोलिसांबरोबर गप्पा मारीत असता मिलान स्टेशन आले. त्या स्टेशनवर मी उतरलो. मिलान स्टेशनची इमारत फार भव्य आहे, ह्या इमारतीला उंच व पसरट आकाराचे डोम्स–घुमट आहेत. लुसर्न शहराच्या–स्वित्झर्लंडमधील–स्टेशनची इमारतही भव्य होती. पण मिलान स्टेशनची इमारत त्याहीपेक्षा फार भव्य आहे. मुसोलिनीने ज्या काही चांगल्या गोष्टी केल्या, त्यांपैकी एक म्हणजे त्याने इटलीतील काही मोठ्या शहरांत ही भव्य व अवाढव्य रेल्वे स्टेशने बांधली. मिलानचे स्टेशनही त्याच्याच अमदानीत बांधले गेले. त्या स्टेशनातून मी बाहेर पडलो व सी. आय. टी. कंपनीने माझ्यासाठी ज्या हॉटेलात रिझर्व्हेशन केले होते, त्या ॲम्बॅसिएटोरी ( Ambasciatori ) म्हणजे अँबॅसिडर

हॉटेलात मी गेलो. मी माझ्या खोलीस जोडून असलेल्या स्नानगृहात ( Bath room ) स्नानास गेलो. येथेही टॉवेल्स, नॅकपिन्स वगैरे वस्तू ठेवलेल्या होत्या. येथील टॉवेल्स मात्र फारच मोठे होते, गादीवरील चादरीइतके लांब रुंद म्हणा ना ! पण टॉवेल टर्किश होते व चांगले होते. स्नान झाल्यावर मी मिलान शहर पाहण्यास निघालो. आता मी इटली देशात पर्यटन करीत आहे, तेव्हा येथील नाणे घेणे जरुरीचे होते. माझ्याजवळच्या काही इंग्लिश पौंडांचे मी येथील नाणे 'लिरा' ( Lira ) यामध्ये रूपांतर करून घेतले. एका इंग्लिश पौंडाला १६६० लिरा हा मोडीचा दर आहे. तेव्हा मोडलेल्या पौंडाच्या लिरांमधील नोटांचे मोठे पुडके आता मला इटलीत प्रवास करताना काही दिवस बाळगावे लागणार आहे, कठीण आहे काम !

मिलान हे शहर ओलोना नदीच्या तीरावर वसलेले आहे. मिलानमधील 'डुओमो' (Duomo) चर्च मी प्रथम पाहिले. ही एक प्रचंड इमारत आहे. ह्या इमारतीचे मुख्य वैशिष्टय म्हणजे ह्या इमारतीवर चोहोबाजूने अनेक निमुळती होत गेलेली शिखरे किंवा मिनार होत. हे मिनार वरच्या टोकाकडे अगदी बारीक होत गेलेले आहेत. ही शिखरे इमारतीच्या बाहेरच्या बाजूच्या ज्या भागांवर आहेत, ते भाग पुढे आलेले आहेत; ह्या भागांमध्ये ठिकठिकाणी थोडे आतल्या बाजूला कमानी आहेत. मध्यभागी जो घुमट आहे, तो अवाढव्य असून, त्रिकोणी आकाराचा आहे, हा त्रिकोण वरच्या बाजूला निमुळता होत गेलेला आहे. ह्या इमारतीच्या भिंतींवर ज्या मूर्ती कोरलेल्या आहेत, त्या असंख्य आहेत. ह्या इमारतीचे जे सर्वांत मोठे व उंच शिखर आहे, त्याची उंची ३५५ फूट आहे, त्यावर शुद्ध सोन्यामध्ये बनविलेला एका देवतेचा पुतळा आहे, ही तेवता मिलान शहराची अधिष्ठात्री देवता आहे. ह्या देवतेचे नाव मॅडोन्निना ( Modonnina ) असे आहे.

मिलानमध्ये कॅसलो फॉरझेस्को ( Castello Sforzesco ) नावाचा किल्ला आहे. हा किल्ला चौकोनी आकाराचा व भरीव बांधणीचा आहे, तटबंदीच्या भिंतीमध्ये ठिकठिकाणी बुरूज व माऱ्याच्या–जंग्याच्या–जागा आहेत, ह्या किल्ल्याला खंदक आहे. या किल्ल्याची दुरुस्ती करून तो जवळ-जवळ पुन्हा १४५० साली बांधून काढण्यात आला, फ्रॅन्सेस्को फोर्झा ( Fra-

ncesco sforza ) ह्याने ही पुर्नबांधणी केली. ह्या किल्ल्यात म्युझिअम ऑफ एन्शंट आर्ट व कॉम्युनल आर्ट गॅलरी ही कलासंग्रहालये आहेत. मिलान-मध्ये मला जास्त वेळ नव्हता. त्यामुळे मी हा किल्ला बाहेरून पाहिला, आत जाऊन ती संग्रहालये व किल्ल्याची आतली बाजू पाहता आली नाही.

मिलान हे शहर इटलीची व्यापारी राजधानी (Economi Capital) असून, आर्थिक व्यवहाराचे व आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र आहे, असे असूनही ह्या शहराने आपले पुरातन काळातील विशिष्ट स्वरूप कायम ठेवलेले आहे, असे मला वाटते. नव्या जुन्या गोष्टींचा येथे संगम झालेला दिसतो. जुन्या अनेक इमारती आहेत. त्या दगडी असून, मजबूत व भव्य आहेत. नव्या इमारतीही अलिकडे बांधण्यात आलेल्या आहेत, व काही इमारती बांधल्या जात आहेत. ह्या इमारती मात्र सीमेंट काँक्रीटच्या असून त्यांना आठ ते बारापर्यंत मजले आहेत. येथील काही बाजारपेठांतून मी रात्री नानाविध वस्तूंनी थाटलेली दुकाने ( Show-rooms ) पाहिली. दुकानांत विजेच्या दिव्यांचा लख-लखाट होता. रात्रीच्या वेळी माझ्या देशापासून दूरच्या एका शहरातील ती दुकाने पाहात पाहात हिंडण्यात मोठी गंमत वाटली,पण पुढे माझीच गंमत झाली. फिरता फिरता मी ज्या हॉटेलात उतरलो होतो, तेथून बराच दूर गेलो होतो. हॉटेलची दिशाही विसरलो. आता परत हॉटेलात जावयाचे कसे, हा विचार पडला, इतक्यात एक बाई भेटली. ती मूळची जर्मन देशातील, पण गेली दहा वर्षे ती मिलानमध्ये राहात आहे. त्या भगिनीला मी हॉटेलचा पत्ता सांगितला व त्या हॉटेलकडे कोणत्या रस्त्याने जावे, हे तिला विचारले. तिने रस्त्याची संपूर्ण माहिती दिली. तरी मी बुचकळ्यात पडल्यासारखा पाहून तेथेच एक इटालियन गृहस्थ उभा होता, त्याने माझी अडचण जाणली, तो इतका वेळ माझे व त्या भगिनीचे झालेले बोलणे ऐकत होता. तो मला म्हणाला, " मी त्या हॉटेलच्या बाजूलाच जात आहे, चला माझ्याबरोबर, मी तुम्हांला त्या हॉटेलात घेऊन जातो. " मी त्या जर्मन बाईचे आभार मानून त्या इटालियन गृहस्था-बरोबर जावयास निघालो. रस्त्याने बोलत जात असता त्याने मला सांगितले की, " मी हिंदुस्थानात काही वर्षे राहिलो आहे. " मला त्याच्या बोलण्याचे आश्चर्य वाटले. मी त्याला म्हणालो की, " मी हिंदुस्थानातून आलो आहे. " तो म्हणाला, " मी तुम्हांला हिंदी माणूस म्हणून ओळखले आहे. गेल्या महा-

युद्धात मी युद्धकैदी म्हणून पकडलो गेलो व मला भारतात पाठविण्यात आले होते. मी तेथे भारताचा पाहुणचार घेतलेला आहे, व मला तुमच्या देशाबद्दल फार प्रेम आहे. म. गांधी व पंडित जवाहरलाल ह्या तुमच्या नेत्यांबद्दल मला फार आदर आहे." त्या गृहस्थाने मला माझ्या हॉटेलात आणून सोडले. त्याचे मी आभार मानले.

परदेशात हिंडताना देखील मला कशी अचानकपणे मदत होत गेली, त्याचे एक उदाहरण म्हणून मी ही हकिकत येथे दिली आहे.

अँबॅसिएटोरी हॉटेलात रात्रीचे जेवण केले. जेवणानंतर ह्या हॉटेलच्या आराम करण्यासाठी असलेल्या दालनात जाऊन बसलो. इतर लोकही–ते सर्व युरोपियन्स होते–त्या दालनात होते. त्या दालनात टेलिव्हिजन सेट होता व त्यावर कार्यक्रम चाललेला होता. तो कार्यक्रम काही वेळ पाहून झोपण्यासाठी मी माझ्या खोलीत गेलो. ता. ३ जूनला ह्या हॉटेलात मुक्काम केला. अच्छा.

तुझा
नाना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
क्रमांक ........................ नों वि: ....................

: ३० :

## गोंडोलातील मधूर संगीत

हॉटेल सॅटुर्निया, इंटर-
नॅशनल व्हेनिझिया,
व्हेनिस, इटली,
ता. ४–६–१९५५

चि. आशाला सप्रेम आशीर्वाद—

ता. ४ जूनला मी मिलानहून सकाळी ८–२० वाजता आगगाडीने व्हेनिसला जावयास निघालो. माझ्या डब्यात माझ्याशेजारी एक इटालियन गृहस्थ बसला

होता. त्याची ओळख झाली. तो मिलानचा व्यापारी आहे. व्यापारी असल्या-मुळे त्याला इंग्रजी येते. इटली, फ्रान्स व स्वित्झर्लंड ह्या देशांतील मुख्य मुख्य शहरांतून इंग्रजी बोलणारे लोक अनेक दिसले.

तो व्यापारी गृहस्थ चांगला सुशिक्षित व माहितगार होता. त्याच्यावरोवर चर्चा करताना युरोपखंडातील देशांच्या निरनिराळ्या भाषांविषयी त्यांनी मला मजेदार माहिती सांगितली. तो म्हणाला की, " युरोपातील राष्ट्रांमध्ये प्रचलित असलेल्या भाषांचे तीन वर्ग पाडता येतील. ग्रेट ब्रिटन, हॉलंड, डेन्मार्क, बेल्जियम, नॉर्वे व स्वीडन ह्या देशातील भाषांचा एक वर्ग ( Stock ) मानला जातो. ह्या भाषा मूळ जर्मन भाषेपासून निघाल्या आहेत. जर्मन भाषा ही जर्मनीतील मूळच्या लोकांची आहे. इंग्रजी भाषेवर ह्याशिवाय लॅटिन भाषे-चाही परिणाम झालेला आहे. उदाहरणार्थ ' रिप्लाय ' (Reply) हा इंग्रजी भाषेत रूढ झालेला शब्द मूळचा लॅटिन भाषेतील आहे, तर ' अॅन्सर ' (Answer) ह्या इंग्रजीतील शब्दाची उत्पत्ती जर्मन भाषेपासून झालेली आहे.

युरोपातील भाषांचा दुसरा वर्ग म्हणजे फ्रेंच, पोर्तुगीज, स्पॅनिश व इटालियन ह्या भाषांचा आहे. ह्या भाषा लॅटिन भाषेपासून निघाल्या आहेत. तिसरा वर्ग आहे, ' स्लाव्ह ' भाषांचा. रशिया, एस्तोनिया, लॅटेव्हिया, लिथुआनियादि बाल्टिक राष्ट्रे व युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, रूमानियादि बाल्कन राष्ट्रे ह्या देशात बोलल्या जाणाऱ्या भाषा ' स्लाव्ह ' आहेत. पोलंड हा देश स्लाव्ह आहे, पण तेथील भाषा लॅटिनवर आधारलेली आहे, याचे मुख्य कारण असे आहे की, तेथे रोमन लोकांचे साम्राज्य बराच काळ होते.

ग्रीस देशात मात्र जी भाषा बोलली जाते, ती ह्या तीन वर्गांपैकी कुठल्याच वर्गात पडत नाही. तेथे ग्रीक भाषा काही फरकाने बोलली जाते.

स्वित्झर्लंडमध्ये स्विस, जर्मन, फ्रेंच, इटालियन व काही बदल होऊन लॅटिन ह्या भाषा बोलल्या जातात. अशा रीतीने त्या इटालियन गृहस्थाने युरोपातील भाषांसंबंधी माझ्या ज्ञानात भर घातली.

मी व्हेनिसला दुपारी १२–४० वाजता पोहोचलो. सॅटुर्निया हॉटेलात उतरलो. ह्या हॉटेलात स्नान, जेवण आटोपून मी थोडी विश्रांती घेतली व नंतर व्हेनिस शहर पाहावयास निघालो.

जून महिना ! उन्हाळ्याचे दिवस. येथे आज लख्ख ऊन पडलेले आहे. जणू मी भारतात आहे, असे वाटले. हवेत मात्र उकाडा नव्हता. जसजशी सायंकाळ होऊ लागली, तसतसा हवेत थंडावा येत होता, पण गारठा नव्हता; त्यामळे तिसऱ्या प्रहरापासून रात्री ८–९ वाजेपर्यंत ह्या सुखद हवेत मी व्हेनिसमध्ये फिरत होतो, तरी मला थकवा वाटला नाही. उलट त्या हवेत उत्साह वाटत होता.

सान मार्कोचा "कँपनाईल" (Campanile) ही वास्तू अप्रतिम आहे, हिची उंची ३०० फूट आहे. व्हेनिसमधील हे ठिकाण अतिशय प्रसिद्ध आहे. तेथे गेल्यावर निरनिराळ्या देशांमधून आलेले प्रवासी चिंताविरहित व मोकळ्या मनाने हिंडत असलेले दिसले. सुट्टीचे निष्काळजी वातावरण त्या चौकात पसरलेले होते. काही प्रवासी आपापसांत बोलत होते, काही ह्या चौकाच्या चोहोबाजूने असलेल्या हॉटेलसमध्ये खातपीत होते, गप्पा मारीत होते, काही हॉटेलसमध्ये चाललेल्या ऑर्केस्ट्रांचे मधूर संगीत ऐकत होते, व काही वेगवेगळ्या देशांतून आलेल्या प्रवाशांचे निरीक्षण करीत होते. त्या आनंदी व उत्साही मेळाव्यात मी सामील झालेलो होतो. माझाही आनंद व उत्साह द्विगुणीत होत होता. ह्या चौकाच्या बाजूला असलेल्या इमारती भव्य, उंच व शिल्पकला-प्रचूर आहेत. त्या जुन्या आहेत. त्या चौकातील वातावरणात प्राचीनत्वाचा मोहक भाव तरळत होता. मी त्या रम्य वातावरणाचा आस्वाद घेत व खुषी, संतोष व उत्साह ह्यांनी ओतप्रत भारलेल्या प्रवाशांच्या सान्निध्याचा सुखद स्पर्श अनुभवीत त्या चौकात बराच वेळ फिरलो. नेपोलियनने जेव्हा पिआसा सान मार्को पाहिला तेव्हा तो उद्गारला की, "जगात सान मार्कोसारखे शोभायमान सरकारसभास्थान कोठेही पाहावयास मिळणार नाही." पेट्रार्क (Petrarch) म्हणाला की, "सान मार्को म्हणजे सान मार्को, ह्याला जगात तोड नाही."

व्हेनिसमधील अपूर्व गोंडोला ( Gondola ) वाहनात बसून ह्या शहरातील अनेक निवांत व मनोहर स्थाने मी पाहिली. गोंडोला हे आपल्याकडच्या होडीसारखे वाहन आहे. ह्याच्या पुढच्या बाजूचा भाग (Bow) बोसारखा म्हणजे उंच व भाल्यासारखा टोक असलेला असतो. काही गोंडोलांत मध्यभागी नक्षीकाम केलेल्या सुंदरशा कपड्यांनी आच्छादलेली बसण्याची जागा असते. गोंडोला वाहन हलके व चपळ आहे. त्याचा आकार गोजिरवाणा व समतोल

राखणारा आहे. हे गोंडोला वाहून वल्हविले जाते. येथे गोंडोला तयार करणारा विशिष्ट कारागिरांचा वर्ग आहे. ह्या वर्गाकडे ही कला वंशपरंपरेने आली आहे. गोंडोला म्हणजे व्हेनिशियन बोट किंवा होडी. मात्र ही होडी इतर देशांतील होड्यांपेक्षा लांब असते. हिची लांबी सुमारे ३० फूट व रुंदी ४ फूट असते. ही बनविण्यासाठी आठ जातींचे लाकूड वापरण्यात येते. गोंडोलाच्या दोन्ही बाजू सारख्या असत नाहीत. उजवी बाजू डाव्या बाजूपेक्षा १०इंचांनी जास्त उंच असते. ह्या कमी जास्त उंचीच्या बाजूंमुळे ह्या होडीला पाण्यात सोडल्यानंतर जो किंचित तिरकसपणा येतो, तो विशिष्ट प्रकारचा असतो व त्यामुळे ह्या बोटीत बसण्यामध्ये जास्त आराम प्राप्त होतो, असे म्हणतात. गोंडोलाचे वजन सुमारे ११०० पौंड असते व गोंडोला चालविण्यासाठी जे साहित्य लागते त्यासह ह्या होडीचे वजन सुमारे १५४० पौंडांचे असते. एक गोंडोला बांधण्यास सुमारे दहा लाख लायर ( Lire ) खर्च येतो. अशा प्रकारच्या गोंडोला व्हेनिस शहरात ४६० आहेत.

कालव्यांच्या बाजूंच्या घरांच्या भिंती पाण्यात पाये घेऊन वर बांधीत आणलेल्या आहेत, त्यामुळे कालव्यांचे पाणी ह्या भिंतीबरोबर नेहमी खेळत असते. मी गोंडोलातून प्रवास करीत असता इतरही गोंडोला कालव्यातून जात होते, त्यातून जाणारे काही लोक व्हेनिसचे होते, ते जाता जाता किंवा आपले गोंडोला थांबवून कालव्याच्या बाजूंना असलेल्या घरांतील परिचित लोकांबरोबर बोलत असत, ह्या घरांतील लोक घरांच्या दारांतून व खिडक्यांतून डोकावून गोंडोलातून जाणाऱ्या ओळखीच्या माणसांना पुकारीत, त्यांना काही निरोप देत, घरातील लोक व गोंडोलातून जाणारे लोक यांच्यांत होणारी ही बोलणी ऐकून मला फार गंमत वाटली.

व्हेनिसमधील राजवाड्यांचे दरवाजे रस्त्यांच्या बाजूला नाहीत, तर ते बहुधा कालव्यांच्या बाजूला आहेत, याचे कारण असे आहे की, पूर्वीच्या काळी अमीर उमराव व श्रीमंत घराण्यातील लोक रस्त्याने पायांनी चालण्याचे श्रम घेत नसत, ते फक्त गोंडोलातून प्रवास करीत व गोंडोलात पाय ठेवण्यासाठी त्यांना कालव्याच्या बाजूंना घरांचे दरवाजे ठेवणे प्राप्त झाले. मजा आहे की

नाही ? घराच्या दरवाजाचा कठडा हाच कालव्याचा धक्का ! त्या धक्क्यावरून गोंडोल्यात चढावयाचे व प्रवास करावयाचा, पायांना रस्त्याची धूळ लागावयाची नाही की कालव्याच्या पाण्याने पाय भिजावयाची भीती नाही.

कालव्याच्या दोन्ही तीरांवर संगमरवरी दगडांच्या मनात ठसण्याजोग्या विविध शिल्पकला प्रकारांनी बांधलेल्या इमारती होत्या. त्या इमारती जणू पाण्यावर तरंगत होत्या, असे भासत होते. कारण त्यांचा पाया कालव्यांच्या पाण्यात घातलेला आहे. ह्या इमारतींना येथे राजवाडे म्हणतात व त्या इमारती राजवाडे ह्या नावाला शोभणाऱ्या आहेत, एवढेच नव्हे तर त्या इमारती पूर्वी राजवाडे म्हणून वापरल्याही जात होत्या. रात्रीची वेळ झालेली होती. ह्या इमारतींतून दिव्यांचा प्रकाश झळाळत होता.प्रकाशकिरणे कालव्याच्या पाण्याशी खेळत होती. अशा त्या जादूमय कालव्यातून माझा गोंडोल्यातून प्रवास चाललेला होता. मी धुंद झालो होतो, गोंडोल्यातील आरामशीर बैठकीवर बसून मी आजूबाजूची मनास मोहनी घालणारी दृश्ये पाहात होतो, जणू मी कोणी राजा आहे, असे मला त्यावेळी वाटले. मला तुमच्या सर्वांची व सौ. माई हिची आठवण होत होती. तुम्ही ह्यावेळी माझ्यावरोबर असता तर काय मजा आली असती, असा विचार माझ्या मनात येणे स्वाभाविक होते.

हा गोंडोलाचा प्रवास संपल्यावर मी व्हेनिस शहरात हिंडलो. अनेक इमारती, रस्ते, पूल पाहात पाहात जात असता एका पुलाजवळ एक गोंडोला एका कालव्याच्या पाण्यावर उभा असलेला मी पाहिला. त्या गोंडोलावर विजेच्या रंगीबेरंगी लहान दिव्यांची रोषणाई केली होती. दिव्यांतील विविध रंगांची प्रकाश किरणे पाण्यावर प्रतिबिंबित झालेली होती. खाली हा दिव्यांचा प्रकाश व वरती आकाशात चंद्राचा प्रकाश, चंद्रप्रकाशाची किरणेही पाण्यावर पडलेली होती. अनेक देशांतील प्रवासी त्या गोंडोलातील दिव्यांची आरास पाहात त्या पुलावर उभे होते. इतक्यात मधूर सूर कानावर पडू लागले ! हे सूर त्या गोंडोलावर जो आर्केस्ट्रा होता, त्याबरोबर गाणाऱ्या एका इटालियन गायकाचे होते. तो खणखणीत, स्पष्ट पण मंजुळ आवाजात गात होता, चांदण्या रात्री कालव्याच्या पाण्यावर उभ्या असलेल्या व अनेक दिव्यांनी प्रकाशित केलेल्या त्या गोंडोलातील ते गोड गीत ऐकत मीही पुलावर उभा होतो. काही

वेळाने तो गोंडोला पाण्यावरून चालू लागला व दूर दूर जाऊ लागला. गाणे चालूच होते. त्या गाण्याचे सूर दश दिशांत निनादत होते.

गोड संगीताच्या ह्या वर्णनाच्या धुंदीने तुला खचित मोहिनी पडेल, अशी आशा बाळगून मी हे पत्र संपवितो.

तुझा

नाना

• • •

: ३१ :

# चित्र, शिल्प, संगीत व लोकशाही यांचे भोक्ते व्हेनिशिअन्स

हॉटेल सॅटुर्निया, इंटर नॅशनल, व्हेनिझिया

व्हेनिस, इटली,

ता. ५-६-१९५५.

चि. **मंगलास** सप्रेम आशीर्वाद—

ता. ५ जून रोजी सकाळी मी व्हेनिस शहरात फिरून बरीच स्थळे पाहिली. व्हेनिस शहराची रचना मोठी अपूर्व व आश्चर्यकारक आहे. शंभराच्या वरती असलेल्या लहान लहान बेटांवर हे शहर वसलेले आहे. ही बेटे व्हेनिशियन लागून ( Lagoon ) म्हणजे व्हेनिसच्या खाडीमधून वर आलेली आहेत. ही बेटे सुमारे ४०० पुलांनी एकमेकांशी जोडली गेली आहेत. ह्या बेटांमधून वाहणाऱ्या कालव्यांची संख्या १७७ आहे. ह्या १७७ कालव्यांवर ते पूल बांधलेले आहेत. पुलांप्रमाणे हे कालवेही त्या शंभर बेटांना एकमेकांशी जोडणारे

दुवे आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. ह्या कालव्यांना येथे ' री ' ( Rii ) असे म्हणतात. या शहरातील रस्त्यांना ' कल्ली ' (Calli) हे नाव आहे, कल्ली ह्यां नावावरून मराठी भाषेतील गल्ली ह्या शब्दाची आठवण झाली. त्या रस्त्यांची संख्या सुमारे ३००० आहे. काही रस्ते कालव्यांच्या तीरांनी जातात, त्यांना ' फोंडामेंटा ' ( Fondamenta ) असे म्हणतात. व ह्या ' फोंडामेंटां ' पैकी जे मोठे रस्ते आहेत, त्यांचे नाव आहे ' झॅट्टेरे ' ( Zattere ) कॅल्ली, फोंडामेंटा व झॅट्टेरे ही झाली रस्त्यांची सर्वसाधारण नावे, पण प्रत्येक रस्त्यालाही विशेषनाम आहे. ही नावे जुनी आहेत व येथील लोकांनी ती नावे अद्याप जतन करून ठेवली आहेत. त्या नावांमागे इतिहास आहे. त्या नावांवरून तुम्हांला काही शतकांपूर्वीच्या घडलेल्या घटनांची माहिती मिळते व जुन्या काळी ह्या शहराचे सामाजिक जीवन कसे होते, याची ओळख तो इतिहास करून देतो. त्या नावांवरून पूर्वीचे व्हेनिशियन कसे विनोदी, चतुर व रसिक होते, याची कल्पनाही येते. उदाहरणार्थ काही नावे मी येथे देत आहे. "पॉन्टेडेल्ला डोन्ना ऑनेस्टा" (Pontedella Donna Onesta) ह्याचा अर्थ ' प्रामाणिक स्त्रीचा पूल ', " पाँटेडेइस्क्वार्टाई " ( Ponte dei Squartai ) म्हणजे कत्तलीचा पूल, कॅल्ले ॲमोर डेग्ली ॲमिसी ' ( Calle Amor degli Amici ) म्हणजे " मित्रांच्या प्रेमाची गल्ली, " " कल्ले डेल लुस्ट्राफिरी " ( Calle del Lustraferi ) म्हणजे " गोंडोलांचे नाळ ( पुढचा भाग ) पॉलिश करणाऱ्यांची गल्ली, " " रिओ तेर्रा डेग्ली ॲसॅसिनी " ( Rio Terra degli Assassimi ) म्हणजे " खुन्यांचा रस्ता, " " कॅल्लेडेल बॅलोनर " ( Calle del Baloner ) म्हणजे " कागदी दिवे करणारांचा बोळ " मोठी मजेदार व विनोदप्रचूर नावे आहेत नाही ?

ही नावे ऐकली तेव्हा मला पुणे शहरातील ' खुन्या मुरलीधर ', ' भिकारदास मारुती ' वगैरे स्थानांच्या नावांची आठवण झाली.

व्हेनिस शहरातील काही रस्त्यांची नावे वेगवेगळ्या भावना व कल्पनाही व्यक्त करतात. उदाहरणार्थ " पाँटे डेल उमिल्टा " ( Ponte del Umilta ) म्हणजे ' मानवतेचा पूल " " कँपिएलो डेला पॅझिएन्झा " ( Campiello della Pazienza ) म्हणजे " सहनशक्तीचा

लहान पूल" "पाँटे डेला कॉर्टेसिआ" ( Ponte della Cortesia ) म्हणजे "सभ्यतेचा पूल."

काही रस्त्यांची नावे उद्योगधंद्यावरूनही पडलेली आहेत व अलीकडे रस्त्यांना काही थोर व्यक्तींचीही नावे दिलेली आहेत. "व्हिआ ( Via ) गॅरिबाल्डी ( Garibaldi ) "व्हिआ २२ मार्झो" ( Via 22 Marzo ) वगैरे. हे रस्ते दगडांच्या पेव्हमेंटसचे आहेत. त्यामुळे धुळीचे नाव नाही.

ह्या शहराचे ११७१ साली जे सहा भाग ( वार्डस् ) पाडण्यात आले होते, तेच आजही तसेच आहेत. शहराची लोकसंख्या सुमारे ३।। ते ४ लक्षापर्यंत आहे. ह्या शहरातील दळणवळणाचे लोकप्रिय साधन आहे गोंडोला. दुसरे साधन म्हणजे स्वत:चे पाय. कारण येथील रस्ते अनेक पुलांवरून गेलेले आहेत व पुलही बहुतेक ठिकाणी लहान आहेत. त्यामुळे मोटारी वगैरे वाहने ह्या रस्त्यांवरून जाणे शक्य नाही. अर्थात काही मोठ्या रस्त्यांवरून मोटारी, ट्रॉली बसेस, ट्राम्स व रेल ही वाहने चालतात, पण असे रस्ते फार थोडे मला दिसले. गोंडोलाशिवाय मोटार लाँचेसही कालव्यातून चालतात, शिडांच्या बोटीतूनही लोक प्रवास करतात.

ह्या शहरातील इमारतींमध्ये अनेक प्रकारच्या व अनेक युगांच्या शिल्पकलेचे दर्शन होते. व्हेनेशियन–बिझॅन्टाईन (Venetian Byzantine) गॉथिक ( Gothic ), रोमानस्क ( Romanesque ), रेनिसुंस (Renaissance) व बॅरोक् (Baroque) ह्या शिल्पकला पद्धतींनी बांधलेले राजवाडे व इमारती ह्या शहराची शोभा आहे. काही अलीकडच्या इमारतींमध्ये आधुनिक शिल्पकलाही डोकावते. पुरातन काळी व्हेनिसचे लोक ओक व लार्च ( एक प्रकारचे झाड ) ह्या झाडांच्या लाकडांचे खांब एकत्र करून जमीन मजबूत करीत व इमारतींचा पाया बळकट करण्यासाठीही ह्या खांबांचा उपयोग करीत व त्या पायावर इमारती बांधीत. ह्याचमुळे व्हेनिसमधील चर्चेस, राजवाडे, घरे व पुलांच्या दोन्ही बाजूंचे टोके यांच्या खाली आज ओक व लार्च लाकडांचे जणू अरण्यच तुम्हांला पाहावयास मिळते.

ह्या शहरात संगीत, नृत्य व नाट्य ह्या कलांच्या अभिवृद्धीसाठी बरेच संघ आहेत व ह्या कलांच्या कार्यक्रमासाठी अनेक थिएटर्स, हॉल्स व गृहे आहेत, ह्याशिवाय सिनेमा हाऊसेस आहेत ती वेगळी.

व्हेनिसमध्ये बरेच उद्योगधंदे चालतात, शोभिवंत काचेची भांडी व मणी, लेसेस (फिती), चामड्यापासून बनविलेल्या छानदार वस्तू, मातीची सुबक भांडी, जडावाचे रत्नखचित दागिने, नानातऱ्हेचे फर्निचर, ( लाकडी सामान ), लॅक्र वर्क (Lacquer Work) म्हणजे लाखेचा रंग देऊन तयार केलेल्या लाकडी अगर धातूच्या व मातीच्या वस्तू, इत्यादि वस्तू ह्या शहरात तयार केल्या जातात, ह्याशिवाय मोझाईक वर्क ( Mosaik Work ) म्हणजे काच, दगड, लाकूड वगैरे पदार्थांचे बारीक बारीक तुकडे नाना रंगांनी रंगवून ते तुकडे एकत्र करून त्यांपासून तयार केलेली मनोहर चित्रे व तसेच वेगवेगळ्या धातूच्या पत्र्यापासून बनविलेल्या सुबक वस्तू निर्माण करणारे धंदे येथे चालतात.

व्हेनिसचा अनेक देशांशी व्यापार चालतो.

व्हेनिसचा इतिहासही मोठा रम्य व चित्तधरारक आहे.

हे शहर ४५२ सालात वसविले गेले. थोड्याच काळात ह्या शहराची भरभराट सुरू झाली, पौर्वात्य देशांबरोबर व्यापार सुरू झाला, ह्या शहराचे व्यापारीही दूरदूरच्या देशांना व्यापारासाठी जाऊ लागले. शहर समृद्ध झाले, शहरातील लोक पहिल्यापासून चित्र, शिल्प व संगीत ह्या कलांचे शोकीन होते, राजकारणात निष्णात होते, लोकशाहीचे भोक्ते होते. ज्या पुढाऱ्यांवर लोकांनी आपला विश्वास व्यक्त केला, त्या पुढाऱ्यांतर्फे ह्या शहराचा कारभार हाकला जात असे. लोकप्रतिनिधींच्या सभा ड्यूसल राजवाड्याच्या सभागृहात भरत. मोठमोठे वादविवाद तेथे होत. सांगोपांग चर्चेनंतर लोकसभा निर्णय घेई. पुढे नेपोलियनने हे शहर जिंकले. त्याचा अंमल काही काळ ह्या शहरावर चालला. काही काळ ह्या शहराचा ताबा ऑस्ट्रियाकडे होता. १८६६ साली हे शहर इटलीकडे आले.

ह्या शहरातील 'ॲकेडमी आर्ट गॅलरी' पाहिली. ह्या गॅलरीतील चित्रे फारच चांगली आहेत; छतांवरील व भिंतींवरील चित्रे खूप मोठी आहेत; ही चित्रे लाकडी किंवा कलतानच्या कॅनव्हासवर ऑईलपेंट केलेली आहेत,

थोडी चित्रे वॉटर कलरमध्येही काढलेली आहेत. प्रख्यात व्हेनिशिअन चित्रकार टिंटोरेट्टो ( Tintoretto ), मॅन्टेग्ना ( Mantegna ), व टिटिअन ( Titian ) यांनी काढलेली चित्रे ह्या अॅकॅडमीत मी पाहिली. ती तर दृष्ट लागण्यासारखी होती. ही अॅकॅडमी ज्या राजवाड्यात स्थापित आहे, तो–राज–वाडा 'गॉथिक्' शिल्पपद्धतीचा आहे व तो १५५२ साली ए. पॅल्लॅडिओ ( A. Palladio ) यांनी बांधला.

मी येथील एक भव्य राजप्रासाद ड्युकल पॅलेस पाहिला. ह्या इमारतीच्या एका कोपऱ्याजवळ एक मोठा दगड आहे. तो एका कालमचा ( Columm ) गोल उंच खाचाच्या पायथ्याकडील भाग (Stump) आहे. हा दगड १२५६ साली सीरियामधून आणला गेला. तो पॉर्फेरी ( Porphyry ) नावाच्या अति उत्तम दगडाचा बनलेला आहे. ह्या दगडावर उभा राहून राज्याचा प्रतिनिधी कायदे, सरकारी जाहीरनामे व हुकूम पूर्वी लोकांना वाचून दाखवीत असे, म्हणून त्याला ' प्रोक्लमेशन स्टोन ' म्हणजे ' घोषणेचा दगड ' असे नाव मिळालेले आहे.

ता. ७ जून रोजी दिवसा ' गोंडोलातून ' फिरलो. त्या गोंडोल्यात तीन चार इतरही प्रवासी होते. त्यात एक अमेरिकन बाई होती. तिची ओळख झाली. बोलता बोलता व्हेनिसच्या राजवाडे, चर्चेस इत्यादि इमारतींचे वर्णन आम्ही करीत होतो. एक प्रवासी सांगू लागला की, " अमुक एक इमारत फार पुरातन आहे. " ती अमेरिकन बाई माझ्याकडे पाहात म्हणाली, " त्यात काय आश्चर्य आहे, पाटलांच्या देशात–हिंदुस्थानात–तर त्याहूनही कितीतरी पुरातन वास्तू आहेत. " हे तिचे उद्‌गार ऐकून माझे देशप्रेम उचंबळून आले व मी म्हणालो की, "हिंदुस्थानात केवळ ए. डी. (A.D.) म्हणजे आफ्टर ख्राईस्टच्या काळातल्याच इमारती आहेत, असे नाही. माझ्या देशात तर बी.सी. (B.C.) म्हणजे ख्राईस्टच्या पूर्वी काही हजार वर्षांच्या जुन्या इमारती व ऐतिहासिक वास्तू आहेत व त्याही अतिशय भव्य व सुंदर आहेत. आजही त्या इमारतींतील शिल्पकला पाहून आमचे तर डोळे दिपतातच, पण परराष्ट्रांतील लोक त्या इमारती पाहून आश्चर्याने दिङ्मूढ होतात. "

गोंडोलातून फिरल्यानंतर मी परत पायांनी व्हेनिस शहराच्या नाना वाटांनी हिंडलो, पुलांवरून गेलो, हे शहर कितीही पाहिले तरी तृप्ती होत नसे, अजूनही पहावे, असे वाटे, अशी काही और जादू आहे ह्या शहरात. फिरत फिरत मी एका पार्कमध्ये (बागेत) आलो. त्या बागेत एक व्हेनिसची बाई होती. तिने मला हाक मारली. मला आश्चर्य वाटले. माझ्या चेहऱ्यावरील आश्चर्य तिच्या लक्षात आले. ती मला म्हणाली की, "तुम्ही हिंदुस्थानाचे दिसता" मी म्हणालो, "होय ! तुम्हांला कसे कळाले ?" तिने उत्तर दिले की, "माझा नवरा एका मर्कन्टाईल स्टीम नॅव्हिगेशनमध्ये नोकरीला आहे. तो हिंदुस्थानात अनेक वेळा जाऊन आला आहे, मीही कधी कधी त्याच्या बरोबर हिंदुस्थानाला गेलेली आहे, तेव्हा मला त्या देशातील लोक माहीत आहेत, त्यावरून मी कयास केला की, तुम्ही हिंदुस्थानाचे असावेत तेव्हा तुम्हांला पुकारले म्हणून आश्चर्य वाटण्याचे कारण नको." पुढेही आणखी आमची बोलणी झाली, ती म्हणाली, "तुम्ही नेपल्स शहरास जाणार असला तर तेथे गेल्यावर जपून वागा. तेथील लोक प्रवाशांना बनवतात. बाकी तुम्ही फसले जाणार नाहीत, याची मला खात्री आहे. हिंदुस्थानातले लोक हुशार आहेत, बौद्धिक लढाईत त्यांनी इंग्रजांनाही हरविले आहे. हिंदी लोकांनी स्वातंत्र्यासाठी जे 'असहकारिता' 'सत्याग्रह' व 'कायदेभंग' ह्या स्वरूपात लढे दिले, त्याशिवाय आपली बाजू नीतीने व न्यायाने कशी बळकट आहे, हे जगाला पटविण्यासाठी जे युक्तवाद केले त्यांवरून व इंग्रजांबरोबर भारतीय नेत्यांच्या हिंदी स्वातंत्र्यापूर्वी वाटाघाटी झाल्या त्यांत भारतीय नेते इंग्रजांना वरचढ ठरले, ह्याही गोष्टीवरून हिंदुस्थानातले लोक चलाख, चतुर व बुद्धिमान आहेत, असे माझे ठाम मत झाले आहे." हे तिचे बोलणे ऐकून मला हसू येत होते व आनंदही वाटत होता. माझ्या देशातील लोकांबद्दल तिने जे प्रशंसोद्‌गार काढले, त्यामुळे माझी छाती फुगून गेली होती.

मी एक 'स्ट्रॉ' (Straw Bridge) नावाचा पूल पाहिला, ह्या पुलाचे महत्त्व असे आहे की ह्या पुलाजवळ प्राचीन काळी पूर्वेकडच्या देशातील व्यापारी येऊन उतरत. व्हेनिसबरोबर पूर्वीच्या काळी पौर्वात्य देशांचा मोठा व्यापार चालत असे हे मी मागे सांगितलेच आहे.

व्हेनिसचे हे वर्णन वाचून तुलाही वाटेल की, "आपण नानांबरोबर व्हेनिसला गेलो असतो तर काय बहार आली असती!"

तुझा

नाना

● ● ●

: ३२ :

# मला भेटलेल्या दोन भगिनी : सोफिया व माईसानो

हॉटेल बॉन्सिअॅनी,
फ्लॉरेन्स, इटली,
ता. ६–५–१९५५

चि. **उषास** सप्रेम आशीर्वाद—

ता. ६ जून रोजी सकाळी ९–३५ वाजता व्हेनिसचा मी निरोप घेतला. हे शहर सोडताना मला खरोखरच वाईट वाटत होते, ह्या शहरात आणखी काही दिवस राहावे, असे मनास फार वाटत होते, पण ते शक्य नव्हते. दुःखद अंतःकरणाने मी त्या शहराचा निरोप घेतला.

आज मी व्हेनिसहून रेल्वेने फ्लॉरेन्सकडे निघालो. आगगाडीतील माझ्या डब्यात दोन भगिनी होत्या. एक होती अमेरिकन बाई, तिचे नाव सोफिया व दुसरी होती लिडोची, ( व्हेनिसजवळील बेट ) तिचे नाव माईसानो. आम्ही तिघांनी एकमेकांची ओळख करून घेतली. डब्याच्या ज्या कंपार्टमेंटमध्ये आम्ही बसलो होतो, तेथे आम्हा तिघांशिवाय दुसरा प्रवासी नव्हता, त्यामुळे आमची एकमेकांशी ओळख झाल्यानंतर आम्ही मनमोकळेपणे गप्पा मारीत होतो.

माईसानो ही इटालियनबाई पण तिला थोडे इंग्रजी येत होते; त्यामुळे अडखळत का होईना आमच्याबरोबर ती बोलत होती. सोफिया अमेरिकन त्या कारणाने तिला इंग्रजी चांगले येत होते, हे सांगण्याची जरुरी नाही. सोफिया म्हणाली की, "इटलीतील ह्या लिरांच्या नोटा वापरता वापरता मी हैराण झाले आहे. एखाद्या हमालाला मजुरी द्यावयाची म्हटली की मला १०० लिरांच्या नोटा मोजाव्या लागतात." असे म्हणून तिने आपल्या हॅंडबॅगमधून पुष्कळशा नोटा काढल्या व त्या मला दाखवीत म्हणाली, "ह्या डर्टी (घाणेरड्या) नोटस्!" मला तिचे बोलणे ऐकून हसू आले, पण माईसानो ह्या इटालियन बाईला वाईट वाटेल म्हणून मी माझे हसू लगेच आवरले. 'लिरा' हे इटालियन नाणे आहे, हे मी मागच्या पत्रात लिहिलेच आहे. सोफिया ही अमेरिकेसारख्या श्रीमंत देशातील स्त्री, त्या कारणाने तिच्या बोलण्यात आढ्यताही दिसली. अमेरिकेच्या मानाने इटली किती तरी गरीब. गरीब इटलीतील माईसानो त्या गर्विष्ट अमेरिकन बाईचे लिरासंबंधीचे बोलणे ऐकून थोडी शरमिंदी झाली. मला तिची कींव आली. मी मग विषय बदलावा म्हणून सोफियाला विचारले की, "तुम्ही आता कोठे चालला आहात?" ती म्हणाली की, "मी फ्लॉरेन्सकडे जात आहे व तेथून रोमला जाणार आहे. फ्लॉरेन्समध्ये हॉटेलचे रिझर्व्हेशन झाले आहे; पण अद्याप माझ्या ट्रॅव्हलर्स एजेंट्सनी रोममधील हॉटेल रिझर्व्हेशनसंबंधी मला अद्याप काही खबर दिली नाही." माझ्याकडे पाहून तिने मला विचारले, "तुमचे रिझर्व्हेशन झाले का?" मी म्हणालो की, "होय, फ्लॉरेन्स व रोम ह्या दोन्ही शहरांतील हॉटेल रिझर्व्हेशन्स माझ्या ट्रॅव्हलर्स एजेंट्सनी केली आहेत." तिने विचारले की, "हॉटेल रिझर्व्हेशन्स-शिवाय तुमच्या एजेंट्सनी आणखी काय काय व्यवस्था केली आहे? ह्या दोन शहरांतील म्हणजे फ्लॉरेन्स व रोममधील स्थळे पाहण्याचा कार्यक्रम ठरविला का?" मी म्हणालो, "नाही." ती आश्चर्य व्यक्त करीत व अमेरिकनच्या श्रीमंती थाटात म्हणाली, "माझ्या एजेंट्सनी माझा सर्व कार्यक्रम ठरविला आहे. फ्लॉरेन्स व रोम स्टेशनवर उतरल्यावर हमालांपासून, मोटारीतून हॉटेलमध्ये जाण्याची, नंतर मोटारीतून फ्लॉरेन्स व रोम ह्या शहरांत कोठे जावयाचे, मोटारीने कसा प्रवास करावयाचा वगैरे सर्व गोष्टींची व्यवस्था माझ्या एजेंट्सनी

केलेली आहे. " इटलीपेक्षाही गरीब अशा हिंदुस्थानाचा मी रहिवासी, तेव्हा मलाही थोडे हिणवावे किंवा आपली श्रीमंती दाखवावी म्हणून सोफियाने तिचा प्रवास आरामशीर व थाटाचा व्हावा म्हणून तिच्या एजेंट्सनी कशी कशी उत्तम व्यवस्था केली आहे, याचे रसभरीत वर्णन माझ्यापुढे ती करीत होती. तिचे ते वर्णन ऐकून मला मुळीच वाईट वाटले नाही, उलट तिची कींव मात्र आली. माझ्या ह्या युरोपच्या काही देशांतील प्रवासासाठी बोटीतील, रेल्वेतील व विमानातील रिझर्व्हेशन्स–जागा राखून ठेवणे व ज्या ज्या शहरात मी गेलो, त्या त्या शहरातील हॉटेलसमध्येही जागा राखून ठेवणे ही व्यवस्था फक्त मी सी. आय. टी. नावाच्या ट्रॅव्हलर्स एजेंट्स–प्रवाशांची व्यवस्था पाहणाऱ्या कंपनीकडून करवून घेतली होती आणि मी एवढीच व्यवस्था करवून घेतली व जास्त व्यवस्था करवून घेतली नाही, हीच गोष्ट चांगली झाली, असे ह्या प्रवासातील माझ्या अनुभवावरून मला वाटते. आजकाल बरेच प्रवासी प्रवासीकंपन्यांकडून घरातून बाहेर पाऊल टाकल्यापासून ते परत घरी येईपर्यंत फक्त प्रवासाची व राहण्याजेवण्याचीच व्यवस्था करवून घेत नाहीत तर प्रवासात काय पाहावे, कसे पाहावे वगैरे सर्व व्यवस्था करवून घेतात, यामुळे काय होते तर प्रवासी हा त्या कंपनीचा जणू गुलाम बनतो. प्रवासी कंपनी सांगेल तीच स्थळे पाहण्याची व ती दिवसभरचा जो कार्यक्रम आखील तो तंतोतंत पार पाडण्याची सक्ती प्रवासी आपण होऊन आपल्यावर लादून घेतो. त्याला स्वतःची आवड-निवड राहात नाही. स्वतःचे स्वातंत्र्य उरत नाही. प्रवासी कंपनीच्या शिस्तीत तो जखडून जातो. मला ही पद्धत मुळीच आवडली नाही. प्रवासीकंपन्यांकडून प्रवाशांनी ज्या देशात व ज्या शहरात जावयाचे त्या देशांची व त्या शहरांची माहिती जरूर घ्यावी. त्या कंपन्यांकडे अशी माहिती देणाऱ्या पुस्तिका, नकाशे वगैरे वाङमय असते, ते त्या कंपन्यांकडून जरूर मिळवावे; परंतु ह्यापेक्षा जास्त व्यवस्था त्या कंपन्यांकडून करवून घेऊ नये. त्या कंपन्यांकडून मिळविलेले वाङमय कमी असेल तर जरूर ते वाङमय बाजारात खरेदी करावे. युरोपातील शहरांत तरी अशा वाङमयाची कमतरता मला आढळून आली नाही. मी जेव्हा युरोपातील एखाद्या शहरी जाई, तेव्हा प्रथम त्या शहराची माहिती देणारे नकाशे–ज्यात स्थळांची, रेल्वे स्टेशन्स व रेल्वे रूट्स, बस स्टॉप्स वगैरेची माहिती दिलेली असे–लहान लहान पुस्तिका वगैरे साहित्य खरेदी करीत असे. सी. आय.

टी. ह्या प्रवासी कंपनीकडून जे साहित्य मी हस्तगत केले व बाजारात आणखी जे साहित्य मिळविले, त्याच्या आधारे मला युरोपातील शहरांची यात्रा सहजपणे करता आली. त्या शहरांतील मुख्य व महत्त्वाची स्थळे, संस्था, ऐतिहासिक इमारती वगैरे सुलभतेने पाहता आल्या. जर एखादी अडचण भासली तर आपले तोंड आहे; ज्या शहरात मी जाई त्या शहरात हिंडताना मला एखादे स्थळ सापडण्याची दिक्कत आली किंवा दुसरी काही अडचण भासली म्हणजे जाणाऱ्या–येणाऱ्या तेथील रहिवाशांकडून मला हवी असलेली माहिती मी मिळवी. ह्याबाबतीत माझा अनुभव गोड आहे. युरोपातील शहरांचे नागरिक जरूर ती माहिती देण्यास तत्पर असतात व एखाद्या नागरिकास जरूर ती माहिती नसेल तर दुसऱ्या नागरिकास ती माहिती तुम्ही विचारू शकता. ह्या पद्धतीने मी युरोपातील काही शहरे पाहिली, माझ्यावर कोणाचे–प्रवासी कंपन्या वगैरेंचे–बंधन नव्हते. माझ्या वेळेचा उपयोग कसा करावा, याचे पूर्ण स्वातंत्र्य मला होते, माझ्या आवडीचे जे विषय होते, त्यांशी संबंध राखणाऱ्या संस्था, इमारती व स्थळे मी पाहिली. प्रवासीकंपन्यांकडून कंडक्टेड टूर्समध्ये–त्यांनी ठरविलेल्या पर्यटन कार्यक्रमामध्ये–प्रवाशांना वाटाडे ( Guidess ) ही पुरविले जातात; पण माझा अनुभव असा आहे की, मी ज्या साहित्याचा वर उल्लेख केला आहे, त्या साहित्यात स्थळांची वगैरे जी माहिती देण्यात आलेली असते, त्यापेक्षा जास्त माहिती हे वाटाडे देऊ शकत नाही, उलट बऱ्याच वेळा त्यांची माहिती त्या साहित्यात दिलेल्या माहितीपेक्षा कमीच असते. माझ्या ह्या प्रवासात फक्त व्हेनिसमध्ये थोडा वेळ एका कंडक्टेड टूरमध्ये (प्रवासी एजेंट्सकडून ठरविलेल्या पर्यटन कार्यक्रमात ) मी सामील झालो होतो. मला तो कार्यक्रम फार कंटाळवाणा व निर्जीव वाटला. एक तर त्या कार्यक्रमात एकच वाटाड्या होता, बरेच प्रवासी होते, ज्या स्थळी आम्ही जात होतो, त्या स्थळी प्रवासी त्या वाटाड्याच्या भोवती घोळका करीत. एवढ्या प्रवाशांना त्या वाटाड्याचे बोलणे ऐकू जाणे शक्य नव्हते, मग तो जो बोलेल, त्यातील काही शब्द कानावर पडावयाचे, त्या त्रोटक व अपुऱ्या ऐकलेल्या माहितीमुळे घोटाळे निर्माण व्हावयाचे. त्यांनी एखादे चित्र दाखवावे, चित्राचे नाव सांगावे पण चित्रकाराचे नाव सांगताना प्रवाशांची गडबड सुरू व्हावी, तेव्हा चित्रकाराचे नाव अर्धवट कानावर पडल्यामुळे आपण ते बरोबरच ऐकले, अशी आपली सम-

जूत व्हावयाची व त्याप्रमाणे ते नाव आपण दुसऱ्या कोणास सांगितले व तो जर जाणकार असेल तर तो आपली परीक्षा करावयाचा; कारण आपण अर्धवट ऐकलेले चित्रकाराचे नाव चुकीचे निघावयाचे. कंडक्टेड टूर्सशिवाय माझा मीच कार्यक्रम ठरवून स्वैरपणे व पूर्ण स्वातंत्र्याने व माझ्या आवडीप्रमाणे मी तोपर्यंत–व्हेनिसच्या त्या कंडक्टेड टूरपर्यंत–बरीच स्थळे पाहिली व आनंद लुटला, तो आनंद मला व्हेनिसच्या त्या प्रवासी एजेंट्सनी ठरविलेल्या कार्यक्रमात उपभोगता आला नाही. त्यानंतर मात्र मी अशा ठरविलेल्या कार्यक्रमात पुन्हा सामील झालो नाही. ह्या सर्व अनुभवांमुळे सोफियाने ऐटीने आपल्या कंडक्टेड टूरचे वर्णन केले त्यामुळे मला माझ्याबद्दल वाईट वाटण्याऐवजी तिच्याबद्दलच वाईट वाटले.

वर दिलेल्या अनुभवावरून मला भारतातील चारदोन गोष्टींच्या उणीवा दिसल्या, त्याबद्दल दोन शब्द लिहावेसे वाटते. आपल्या देशातही पाहण्यासारखी स्थळे, इमारती, वस्तुसंग्रहालये, हवा खाण्याची ठिकाणे, निसर्गरम्य प्रदेश वगैरे आकर्षक गोष्टी आहेत; पण त्यासंबंधी माहिती देणारे नकाशे, पुस्तके वगैरे वाङ्मय फार अपुरे आहे. आजकाल भारत सरकारतर्फे काही वाङ्मय प्रसिद्ध होत आहे, पण तेही तितकेसे पूर्ण माहिती देणारे नसते, अपुरे वाटते. सरकारनेच नव्हे तर पुस्तके प्रसिद्ध करणाऱ्या संघांकडून प्रवासी वाङ्मय मोठ्या प्रमाणात व आकर्षक स्वरूपात प्रसिद्ध होणे आवश्यक आहे, असे मला फार वाटते. दुसरी एक उणीव मला आपल्या देशात दिसते, ती ही की आपल्या देशात चांगली व स्वच्छ हॉटेल्स व रेस्टॉरंट्स नाहीत. भारतातील निदान मुख्य व महत्त्वाच्या शहरांमध्ये ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने अगर निसर्गरम्यता व आरोग्यदायक हवा ह्या दृष्टीने जी महत्त्वाची ठिकाणे आहेत तेथे, ज्या हॉटेलात टापटीप व स्वच्छता आहे, खाण्यापिण्याचे आरोग्यदायक पदार्थ मिळू शकतील व राहण्याची व्यवस्था ठाकठीक होईल अशी हॉटेल्स भरपूर प्रमाणात असणे फारच जरुरीचे आहे. तिसरी गोष्ट म्हणजे आपल्याकडील लोकांनी बाहेरून आलेल्या प्रवाशांशी मोठ्या आदबीने व सौजन्याने वागावयास हवे. आपण त्यांच्याबरोबर जे वर्तन ठेवू त्यावरून ते केवळ आपलीच नव्हे तर आपल्या देशाची किंमत ठरवितात; तेव्हा जेणेकरून आपल्या देशाचा दर्जा, इभ्रत व

प्रतिष्ठा वाढेल व आपल्या देशाबद्दल व लोकांबद्दल प्रीती निर्माण होईल, असेच आपले बोलणे, चालणे व वागणे बाहेरच्या देशातून आलेल्या प्रवासी पाहुण्या-बरोबर असले पाहिजे. ही खबरदारी युरोपातील लोक काटेकोरपणे घेतात, हे मी पाहिले आहे.

ह्या दृष्टीने विचार करीत असता आपल्या देशातील चौथी एक गोष्ट मला खटकली ती ही की आपल्या देशात जी मंदिरे, धार्मिक स्थाने, ऐतिहासिक व पुरातन वास्तू, वगैरे स्थळे आहेत त्या ठिकाणी जितकी स्वच्छता व टापटीप असावयास पाहिजे तेवढी ठेवली जात नाही. तसे पाहिले तर आपल्या देशात युरोपातील देशांच्या मानाने प्राचीन वास्तू, किल्ले, वगैरेंसारख्या ऐतिहासिक इमारती, वेरूळची लेणी, अजंठाची चित्रे, वगैरेसारखी कलाकेंद्रे यांचे अमोल भांडार आहे; पण ज्याप्रमाणे युरोपातील लोक आपल्या वास्तूंची व इमारतींची एखाद्या लहान मुलाप्रमाणे काळजी वाहतात, डागडुजी करतात, त्या स्थानात स्वच्छतेचे व टापटीपीचे माहेरघर उभे करतात, त्याप्रमाणे आपल्या देशात घडलेले दिसत नाही. अलीकडे सरकारतर्फे थोडी फार व्यवस्था त्या दृष्टीने केली जाते; पण तितकीशी समाधानकारक नाही. सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर सार्वजनिक संस्था व लोक ह्या सर्वांनी मिळून ह्याबाबतीत जरूर ते प्रयत्न केले, तर युरोपातल्या वास्तू, इमारती, वाचनालये, वस्तुसंग्रहालये व कलाकेंद्रे जशी सुस्थितीत व नीटनेटकी आहेत, तशी आपल्या देशातील वास्तू, पुरातन इमारती, वगैरे चांगल्या स्थितीत राहतील ह्याबद्दल मला शंका नाही. ह्या सर्व गोष्टी करण्यासाठी पैशाची जरुरी आहे, हे मी जाणतो; पण हा प्रश्न युरोपातील लोकांनी काही प्रमाणात ज्या पद्धतीने सोडविला, त्या पद्धतीबद्दल मला लिहावेसे वाटते; कारण त्या पद्धतीने आपल्या देशातील लोकांना खचित मार्गदर्शन होईल. युरोपातील शहरामध्ये जी चर्चेस, किल्ले, चित्रसंग्रहालये, पुरातन व ऐतिहासिक वास्तू इत्यादि प्रमुख व महत्त्वाची स्थाने आहेत, ती पाहण्यासाठी प्रेक्षकांना फी आकारली जाते. अशी फी आपल्या देशातील सुंदर व महत्त्वाची स्थळे व इमारती पाहण्यासाठी आकारली जावी असे मला वाटते. ह्या फीमधून जे उत्पन्न येईल त्यातून आपल्या देशातील पुरातन वास्तू, किल्ले, मंदिरे इत्यादि इमारती व इतर स्थाने स्वच्छ ठेवण्यास, त्यांची डागडुजी करण्यास, त्यांची इतरही व्यवस्था चांगल्या रीतीने करण्यास खास मदत होईल. असो.

सोफिया व माईसानो यांच्याबरोबर गप्पा मारता मारता वेळ कसा गेला, ते कळालेदेखील नाही. प्रवास मोठ्या सुखाने झाला. फ्लॉरेन्स स्टेशन जवळ-जवळ येत होते. त्यावेळी माईसानो मला म्हणाली, "फ्लॉरेन्समध्ये बऱ्याच गोष्टी पाहण्यासारख्या आहेत; पण त्यांपैकी तुम्ही पॅलॅझो पिट्टी ( Palazzo Pitti ) आणि पिॲझॅले मिचेलँजेलो ( Piozzale Michelangelo ) जरूर पहा." ती अवघड नावे माझ्या लक्षात राहणार नाहीत म्हणून ती नावे तिने एका कागदावर लिहून मला तो कागद दिला; त्यावद्दल तिचे मी आभार मानले. तिसऱ्या प्रहरी २–२० वाजता फ्लॉरेन्स स्टेशन आले. सोफिया व माईसानो यांचा निरोप घेऊन मी स्टेशनवर उतरलो. फ्लॉरेन्सच्या स्टेशनची वास्तू अवाढव्य व भव्य आहे; काही ठिकाणी छत खूपच उंच असून त्याला घुमटाचा आकार दिलेला आहे.

स्टेशनवरून मी बॉन्सिॲनी ( Bonciani ) हॉटेलात उतरावयास गेलो.

तुझा
नाना

● ● ●

: ३३ :

# युरोपियन नृत्य व संगीत

हॉटेल बॉन्सिॲनी,
फ्लॉरेन्स, इटली,
ता. ६–६–१९५५

चि. **विठ्ठलास** सप्रेम आशीर्वाद—

मी ज्या बॉन्सिॲनी हॉटेलात उतरलो आहे, त्या हॉटेलची इमारत मोठी व जुनी आहे.

ह्या हॉटेलात स्नान वगैरे आटोपून मी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास फ्लॉरेन्स शहर पाहण्यास ह्या हॉटेलच्या बाहेर पडलो. फ्लॉरेन्स शहर आर्नो-

नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेले आहे. पॅरिस, बँगोर व झ्युरिच ह्या शहरांप्रमाणे फ्लॉरेन्स शहराचा काही भाग टेकड्यांवर व टेकड्यांच्या उतरणीवर वसलेला आहे. नदीमुळे व टेकड्यांमुळे ह्या शहराची शोभा वाढलेली आहे. हे शहर छानदार व भपकेबाज आहे; शहरातील रस्ते रुंद व चांगले आहेत. पॅरिस शहराप्रमाणे येथेही रस्ते दगडी आहेत. टेकड्यांवर शहराचा काही भाग वसलेला असल्यामुळे चढणीचे रस्ते बरेच आहेत. व्हिक्टोरिया वाहने रस्त्यांवरून जाताना बरीच दिसली. एका 'व्हिक्टोरिया' वर तर मोठी व रंगीत छत्री होती; स्कूटर्स वाहने रस्त्यांवर धावत होती; त्यांची संख्याही मोठी होती. शहरात स्वच्छता चांगली दिसली. इमारती उंच व भरीव आहेत; त्या बहुतेक दगडी आहेत.

फ्लॉरेन्समध्ये मोठाल्या अनेक बागा आहेत; त्यांपैकी एका उंच टेकडीवर एक बाग आहे, ती बाग मी पाहिली, त्या ठिकाणी १५–१६ वर्षे वय असलेल्या एका तरुणाची कोरीव मूर्ती मी पाहिली, ती फारच सुंदर होती. ह्या बागेच्या कडेच्या बाजूला उभे राहून मी फ्लॉरेन्स शहर व त्यातून वाहणारी आर्नो नदी पाहिली. तेथून दिसणारा तो देखावा फार रमणीय वाटला. ह्या बागेत मला दोन इटालियन पाद्री भेटले. मला पाहून त्यांच्यापैकी एकजणाने हिंदी भाषेत प्रश्न केला, "काय, तुम्ही हिंदुस्थानातून आला काय ?" त्या ठिकाणी हिंदी भाषेत बोलणारा माणूस पाहून मला आश्चर्य वाटले. मी त्या गृहस्थास सांगितले की, "होय, मी हिंदी आहे." नंतर दुसरा पाद्री म्हणाला, "तुम्हांला हिंदुस्थानाची अलिकडची काही बातमी माहीत आहे काय ?" मी म्हणालो, "नाही, गेले काही आठवडे मी युरोपात हिंडत असल्यामुळे मला तिकडची माहिती मिळत नाही. इकडच्या वर्तमानपत्रात हिंदुस्थानची जी माहिती येते, ती फारच त्रोटक असते." त्यावर तो पाद्री म्हणाला की, "मी तुम्हांला अगदी अलिकडची हिंदुस्थानातील बातमी सांगतो. थोड्याच दिवसांपूर्वी उत्तर हिंदुस्थानात काही ठिकाणी खूपच उष्मा झाला व उष्माघाताने काही लोकही दगावले." हे सांगताना त्याला दुःख होत होते व ती बातमी ऐकून मलाही वाईट वाटले. मी विचारले की, "तुम्हांला ही माहिती कशी कळाली?" तो म्हणाला की, "मी व माझ्याबरोबरचे हे माझे मित्र हिंदुस्थानातून दोन दिवसांपूर्वीच विमानाने आलो आहोत. त्यामुळे आम्हांला तेथील नुकत्याच घडलेल्या घटना

माहीत आहेत. आम्ही दोघे हिंदुस्थानात बरेच वर्षे राहिलो आहोत व परत काही दिवसांनी हिंदुस्थानात जाणार आहोत." त्या दोन पाद्र्यांच्या भेटीने आनंद झाला व जणू हिंदुस्थानातील कोणी माझे देशबांधव मला भेटले, असे मला वाटले. त्या बागेपासून बॉन्सिअॅनी हॉटेलकडे जाण्याच्या रस्त्यांची मला फारशी कल्पना नव्हती, मिलान येथे जशी रस्त्यासंबंधी एकदा दिक्कत आली, तशीच अडचण येथे निर्माण झाली. मला थोडे अस्वस्थ पाहून त्या दोन पाद्र्यांनी मला विचारले, की, "तुम्हांला काही हवे काय ?" काही अडचण असल्यास सांगा ! संकोच करू नका. आम्ही तुमची अडचण दूर करू." मी त्यांना रस्त्यांची माहिती विचारली. रस्त्यांची माहिती देण्याच्या भानगडीत न पडता ते दोघेजण तात्काळ माझ्याबरोबर बसने यावयास निघाले व बस कंडक्टरला कोठेली तिकिटे हवीत हे सांगितले. अशा रीतीने 'बॉन्सिअॅनी' हॉटेलजवळ त्यांनी मला आणून सोडले. मिलान व फ्लॉरेन्स येथे परत हॉटेलकडे जाण्याविषयी मला जी अडचण आली, त्याचे कारण ह्या दोन्ही ठिकाणी माझा मुक्काम इतर ठिकाणांच्या मानाने कमी वेळेचा होता व ह्या दोन्ही शहरांत पाहावयाचे बरेच होते. त्यामुळे घाईघाईत दोनही ठिकाणी हॉटेलचा संपूर्ण पत्ता घेण्याचे विसरलो व तसाच बाहेर पडलो. त्यामुळे परत येताना हॉटेल हुडकून काढणे मला जड गेले. बरे झाले मला दोन्ही शहरांतील मी ज्या हॉटेलांत उतरलो, त्यांची नावे माहीत होती व दोन्ही हॉटेले महत्त्वाची व प्रसिद्ध होती, त्यामुळे त्यांची नावे सांगितल्यावर दोन्ही शहरांत ती हॉटेले दाखविणारी माणसे मला मिळाली.

ऐतिहासिक दृष्टीने फ्लॉरेन्स शहर अतिशय प्रख्यात आहे. ऐतिहासिक घटनांची आठवण ज्या स्थळांशी व वास्तूंशी निगडित झाली आहे, अशी स्थळे व वास्तू अगणित आहेत; वाईट एवढेच वाटते की, फ्लॉरेन्समध्ये मला वेळ अगदीच कमी असल्यामुळे दोन चार स्थळे व इमारती ह्या पलीकडे मी इतर गोष्टी पाहू शकलो नाही.

रात्री जेवण झाल्यानंतर मी फिरत फिरत एका पिआझोत आलो. तेथे लोकांची खूप गर्दी होती. एका बाजूला ऑर्केस्ट्रावर–वाद्यांच्या साथीसह–एक इटालियन गायिका गात होती. तिच्या आवाजात माधुर्य होते. ती उभी राहून हावभाव करीत खणखणीत आवाजात गात होती. ते गाणे ऐकण्यात मी तल्लीन

झालो. श्रोत्यांची मने त्या गाण्याने आकर्षित झाली होती. फ्लॉरेन्समधील मुंबईत ज्याला आपण फॅशनेबल क्लास म्हणजे शिष्टजनांचा वर्ग म्हणतो, त्या वर्गातील लोक तेथे दिसत होते. ठाकठीक, छानछोक व भरदार पोषाख केलेले स्त्री–पुरुष त्यांत होते. बहुतेक सर्व उभे राहून गाणे ऐकत होते. रात्रीची निवांत वेळ ! रसिक श्रोते ! त्यामुळे गाण्याला रंग चढत होता. मी बराच वेळ ते गाणे ऐकले. भारतात गाणे म्हटले की, बहुधा गायक गादीवर किंवा कुठल्या तरी आसनावर बसून गातात. ताना घेताना गायकांचे जे काही हावभाव होतील तेवढेच, बहुधा आपल्याकडे गायनाच्या मैफलीत गायकांचे इतर हावभाव पाहावयास मिळत नाहीत, गायक सर्वसाधारण खालच्या स्वरात व हलक्या आवाजात गातात, साथीला वाद्येही माफक व थोडी असतात; युरोपात गायनाच्या मैफलीत गाणारे कलावंत उभे राहून हावभाव करीत गातात, ते उंच स्वरात व मोठ्या आवाजात गातात. साथीला आर्केस्ट्रा म्हणजे वाद्यांचा मोठा ताफा असतो. हिंदी व युरोपियन संगीतांमधील हे काही भेद मला दिसले. ह्या व इतर भेदांमुळे हिंदी व युरोपियन संगीतांनी श्रोत्यांच्या मनात व मैफलीच्या वातावरणात वेगवेगळे परिणाम घडतात; हिंदी संगीताने वातावरणात गांभीर्य व शांतता निर्माण होते व श्रोत्यांच्या मनात भक्ती, प्रेम इत्यादि सात्विक भावांचा प्रादुर्भाव होतो, तर युरोपियन संगीताने उल्हास व उन्मेदाचे वातावरण तयार होते व श्रोत्यांची अंतःकरणे विलास, शृंगार, इत्यादि राजस भावनांनी उचंबळू लागतात, असे हिंदी व युरोपियन संगीताचे सर्वसाधारण स्वरूप आहे असे माझे मत बनले आहे. अर्थात दोन्हीही संगीतपद्धतींविषयी मी जे सर्वसाधारण नियम सांगितले त्यांना अपवाद नाहीतच, असे माझे म्हणणे नाही. युरोपियन संगीताबद्दल माझे जे मत बनले जवळजवळ तसेच माझे मत युरोपियन नृत्याबद्दलही झाले आहे. युरोपियन नृत्यात नाचणाऱ्या पुरुषांचा व स्त्रियांचा मोठा समुदाय असतो; याचा अर्थ असा नव्हे की एकदोन किंवा थोडे कलाकार नृत्ये करीतच नाहीत. युरोपियन नृत्यात ज्याला फुट वर्क–पायांच्या बोटांवर, तळव्यांवर नृत्य करण्याचे प्रकार व कमरेपासून खाली पायांच्या निरनिराळ्या हालचाली–म्हणतात, त्याला फार महत्त्व असते; रंगभूमीवर कलाकारांचा मोठा समूह एकाच वेळी येतो व त्या कलाकारांच्या हालचालींमध्ये कवायतीतल्या हालचालींप्रमाणे ठाकठीकपणा, सारखेपणा व प्रमाण-

वद्धता ह्या गुणांवर भर दिलेला दिसतो; सर्कशीमध्ये दोरावर वगैरे उड्या मारणाऱ्या कलाकारांमध्ये जे नैपुण्य दिसते, तेच नेत्रदीपक नैपुण्य मात्र आपणांस युरोपियन नृत्यात जरूर पाहावयास सापडते. युरोपियन नृत्य करणाऱ्यांचा पोषाख, सजावट ( Get-up ) व थाटमाट हे उत्तान व शृंगाररसाला पोषक असतात. युरोपियन नृत्यामुळे श्रोत्यांच्या मनात विषयभोगलालसा वळावते; इंद्रियसुखांकडे मनें झुकतात.

हिंदी नृत्यामध्ये कलाकारांचा ताफा बहुधा नसतो, एक–दोन फार झाले तर चार–सहा कलाकार रंगभूमीवर येऊन नृत्ये करतात; त्यांच्या हालचाली-वाद्यांच्या तालसुरावर होतात, युरोपियन नृत्यात फुटवर्कला म्हणजे पायांच्या हालचालींना जे महत्त्व आहे, तेच महत्त्व हिंदी नृत्यातील कलाकारांच्या हात व हातांची बोटे यांच्या हळुवार व नाजुकपणे होणाऱ्या हालचालींना असते. हिंदी कलाकारांच्या पोषाखातही थाटमाट, वैभव, श्रीमंती व शोभा जरूर असते. मी तर म्हणेन की डामडौल, विविधरंग, विविध प्रकार (Designs), कलाबुती, जरतारी, कशीदाकाम, ह्याबाबतींत तर युरोपियन कलाकारांचे पोषाख हिंदी कलाकारांच्या पोषाखाच्या पासंगालाही पुरणार नाहीत; तरी पण हिंदी व युरोपियन कलाकारांच्या पोषाख परिधान करण्याच्या पद्धतीत खूप फरक असतो. हिंदी कलाकारांचे हात व हातांची बोटे यांच्या हालचाली खालोखाल नेत्र व भ्रुकुटी यांच्या हालचालींना महत्त्व दिले गेलेले आहे; चेहऱ्यां-वर राग, लोभ, शृंगार, क्रोध, वीरता वगैरे भाव उमटविणे हेही हिंदी कला-कारांचे वैशिष्टय आहे; हिंदी कलाकारांच्या पायातील घुंगरांतून नाचताना जो झंकार निघतो, त्याचा तर युरोपियन नृत्यात अभावच असतो.

सर्वसाधारणपणे असे म्हणावयास हरकत नाही की हिंदी नृत्य पाहून प्रेक्ष-कांच्या मनात भक्ती, वीरता, प्रेम इत्यादि सात्विक भाव निर्माण होतात; शृंगाररस जरी निर्माण झाला, तरी तो सात्विकतेच्या शर्करेने वेष्टित असतो. युरोपियन नृत्यांमुळे उच्छृंखलपणा, प्रफुल्लता, उत्साह वगैरे भावनांचा पगडा प्रेक्षकांच्या मनावर बसतो. वर जे मी हिंदी व युरोपियन संगीत व नृत्य या कलांसंबंधी विचार प्रगट केलेले आहेत, ते ज्याला क्लासिकल शास्त्रीय संगीत व नृत्य म्हणतात त्या संगीत व नृत्य प्रकारांविषयी आहेत. शास्त्रीय संगीत व नृत्य ह्यांखेरीज हिंदी संगीताचे व नृत्याचे इतर जे प्रकार आहेत, त्यांना वर

दिलेले माझे मत लागू पडेल असे म्हणता येणार नाही. एवढी सावधानतेची सूचना देऊन मी ह्या विषयाचे विवरण आवरते घेतो.

ता. ६ जून रोजी मी फ्लॉरेन्स येथील वॉन्सिअॅनी हॉटेलात मुक्काम केला.

तुझा

**नाना**

• •

## : ३४ :

# चिरंतन व पवित्र नगरी : रोम

**हॉटेल स्प्लेंडर,**

**रोम, इटली,**

ता. ७–६–१९५५.

चि. **आशास** सप्रेम आशीर्वाद—

ता. ७ जून रोजी सकाळी ८–५० वाजता आगगाडीने मी फ्लॉरेन्सहून रोमला जावयास निघालो. लंडनपासून–इंग्लिश चॅनलखेरीज–पुढे फ्रान्स, स्वित्झर्लंड व इटली देशांत मी आगगाडीनेच प्रवास केला आहे. ह्या प्रवासात मला जी स्टेशने पाहावयास मिळाली, ती स्वच्छ व निर्मळ होती; आगगाड्यातील डबेही स्वच्छ होते; ह्या देशांतील ट्रेन्समध्ये बहुधा चार वर्ग असतात. मी दुसऱ्या वर्गाने प्रवास केला; पण मी आगगाड्यातील तिसऱ्या व चवथ्या वर्गांतील डबेही पाहिले, त्या वर्गांतही बसण्याची जी बाके होती, ती रुंद व ऐसपैस होती; बसण्यास आरामशीर वाटली; कारण त्या वर्गांत थोडा वेळ जाऊन मी त्या बाकांवर बसलो. ह्या वर्गांतील बाथ्स–म्हणजे ज्या ठिकाणी शौच-

मुखमार्जनाची व्यवस्था केलेली होती–हे फारच व्यवस्थित व स्वच्छ होते; पहिल्या तीन वर्गातील डब्यांमध्ये गालिचे टाकलेले होते. जसा जसा वरचा वर्ग असे, तसे तसे त्या वर्गातील गालिचेही भारी किंमतीचे व जास्त जास्त सुंदर व मऊ मऊ होते. पहिल्या व दुसऱ्या वर्गात तर बसण्याच्या जागांवर व टेकण्याच्या ठिकाणी मऊ व उबदार गाद्या व गिरद्या होत्या. ह्या सर्व सुखसोयी आगगाडीत उपलब्ध होत्या, त्यामुळे माझा प्रवास आरामात व सुखाने झाला. सगळ्यांत मला जी गोष्ट प्रवासात आवडली, ती म्हणजे आगगाड्यांत गर्दीचा अभाव. जितक्या जागा डब्यात असत, तेवढेच व बऱ्याच वेळा त्याहूनही कमी संख्येने प्रवासी त्या डब्यात असत. आपल्या देशात आगगाड्यातून कशी भरमसाट गर्दी असते, हे तुला माहीत आहे. गर्दी तर असतेच; पण आगगाड्यांतील प्रवासी डब्यामध्ये केळ्याची सालटे, भुईमुगाच्या शेंगांची टरफले, फळांची टरफले इतस्तत: टाकतात, थुंकतात व सर्व डब्याची जणू म्युनिसिपालिटीची टोपली बनवितात, ह्याचाही अनुभव तुला आहे. ह्या सर्व अनिष्ट प्रकारांमुळे हिंदुस्थानात आगगाडीने प्रवास करावयाचे म्हटले की जिवावर येते; प्रवास जिकिरीचा व त्रासदायक वाटतो, उलट युरोपात आगगाडीने प्रवास करण्यात मला आनंद व उल्हास वाटत असे; मजेने माझा प्रवास होत असे. एका गोष्टीची मात्र कमतरता मला ह्या प्रवासात दिसली. रेल्वे स्टेशनांवर हमाल नसत अगर असले तर फारच थोडे असत, ही गोष्ट युरोपातील लोकांना माहीत आहे, त्यामुळे ते प्रवासात फारच थोडे सामान बाळगतात. लहान लहान बॅगा घेऊन ते प्रवास करतात. प्रत्येकाकडे बहुधा एकच छोटी बॅग असते. काहीजणांकडे अशा बॅग्सही नसतात; त्यामुळे ह्या प्रवाशांना हमालांची गरज भासत नाही; शिवाय या देशांत–इंग्लंड, फ्रान्स आदि–हमालीचे दरही जबरदस्त आहेत; त्यामुळेही प्रवासी हमालांकडे सामान देण्याच्या भरीला पडत नाहीत. बऱ्याच ठिकाणी मला मोठ्या मुष्किलीने हमाल मिळत असे. रोम स्टेशनवर मी ता. ७ जून रोजी दुपारी १–३० वाजता पोहोचलो. स्टेशनवर हमाल मिळाला नाही; मी मोठ्या मिनतवारीने दोन हप्त्यांनी माझे सामान स्टेशनबाहेर आणले. स्टेशनजवळच 'स्प्लेंडर' (Splendor) हॉटेल होते, तेथे मी उतरणार होतो, तेव्हा तेथे सामान कसे घेऊन जावयाचे ह्या विचारात मी होतो, तोच एका सद्‌गृहस्थाने आपल्या ओळखीच्या एका मुलास माझे सामान हॉटेलात

अनुक्रम ... ठाणे. स्थलप्रत
वि: ... नों. दि.


नेण्यास सांगितले, त्या मुलाने माझे सामान हॉटेलात आणले, मी त्याला काही पैसे देऊ लागलो तर तो घेईना. मग जवळच्या एका गृहस्थाने पैसे घेण्यास त्याला सांगितले, तेव्हा त्याने माझ्यापासून पैसे घेतले. ही एवढी हकिकत सांगण्यात माझा हेतू हा आहे की इटालियन लोक इतर युरोपियन लोकांपेक्षा कमी सॉफि-स्टिकेटेड ( Sophisticated ) म्हणजे दिखाऊ शिष्टाचारांना व शहरी कृत्रिमतेला कमी महत्त्व देणारे आहेत, हे मला दाखवावयाचे आहे. युरोपातील इंग्लंड, फ्रान्सादि इतर देशांत 'हमाल' नाही म्हणून माझी अडचण ओळखून सामान नेण्यासाठी मदत करण्यात तेथील लोकांना कमीपणा वाटला असता अगर त्यांनी त्या गोष्टीची पर्वाही केली नसती. पण इटलीत मला वरील गोष्टी-वरून व इतरही प्रसंगी जो अनुभव आला, त्यावरून माझे इटालियन लोकां-बद्दल जे मत बनले, ते येथे प्रकट केले आहे. इटालियन लोकांविषयी आणखीही काही माहिती येथे मी सांगणार आहे.

इटालियन लोक साधे व प्रेमळ आहेत. इतर लोकांशी लवकर व सहज मिळ-णारे आहेत. सर्व युरोपियन लोकांत इटालियन लोक जास्त देखणे आहेत; त्यांची नाके सरळ व अणकुचीदार आहेत, त्यांचे केस व डोळे काळेभोर अस-तात; इटालियन स्त्रियांच्या केसांची ढब आकर्षक वाटली. फ्लॉरेन्समध्ये स्त्रियांच्या केसांची एक विशिष्ट पद्धतीने कटिंग केलेली मला दिसली. ह्या स्त्रियांचे केस मानेवर सरळ रेषेत साधारणतः असतात, तसेच कपाळावर. ह्या विशिष्ट पद्धतीने केस कातरण्यामुळे त्या स्त्रिया सुंदर दिसतात.

'स्प्लेंडर' हॉटेलात आल्यावर मी स्नान केले. प्रवास केल्यानंतर स्नान करण्यात मोठी मौज आहे. स्नान केल्यानंतर प्रवासाचा शीण नाहीसा झाला व मला ताजेतवाने वाटले. शिवाय हा जून महिना. मे व जून ह्या महिन्यांत इटली-तील व्हेनिस, मिलान, फ्लॉरेन्स व रोम ही शहरे ज्या भागात आहेत, तेथे थंडी नसते, उन्हे चांगली पडतात व काही वेळेला तर उष्मा भासतो. त्यामुळे स्नान करण्यात आयर्लंडमध्ये थंडीमुळे जे दिव्य वाटावयाचे, तसे संकट इटलीत मला वाटले नाही.

ता. ७ ते ता. ९ जूनपर्यंत मी रोम शहरात होतो व अनेक भाग मी पाहिले. 'रोम' शहरास इटालियन लोक 'रोमा' म्हणतात. 'रोमा' हे नावही फार

गोड आहे. ' रोमा ' हे नाव जेव्हा इटालियन लोक प्रेमाने व अभिमानाने उच्चारतात तेव्हा त्या उच्चारात मला काव्य दिसले. ' रोमा ' हे नाव नुसते उच्चारताना त्यांची अंतःकरणे प्रेमभराने उचंबळून येतात, इतकी त्यांची रोम शहराबद्दल भक्ती आहे. रोमला ते ' इटर्नल सिटी ' (The Eternal City ) म्हणजे ' चिरंतन शहर ' मानतात. रोम शहराबद्दल केवळ इटालियन लोकांनाच प्रेम आहे असे नाही तर सर्व युरोपियन लोकांना ह्या शहराबद्दल आपुलकी व अभिमान वाटतो. प्रख्यात जर्मन कवी गटे (Goethe) ह्यांनी 'रोमन एलिजीज' (Roman Elegies) नावाचे काव्य रचले आहे. त्यात तो रोम शहराबद्दल लिहितो, "Thou art a world, oh Rome, but without love Rome is not Rome, just as the world is not the world." याचा अर्थ असा की, " हे रोमनगरी, तू जणू सर्व जग आहेस ! पण प्रेमाशिवाय रोम हे रोम नाही, जसे जग हे जग नाही. " म्हणजे रोम शहर पाहताना मनुष्याने अंतःकरणातील जिव्हाळ्याने हे शहर पाहावयास हवे. अशा प्रेमभावनेने त्यांनी रोम पाहिले, तर त्यांना त्या शहराचे खरे स्वरूप व सौंदर्य याची प्रचीती येईल. मग त्यांना समजेल की, ' रोम हे जग ' आहे, पुढे गटे म्हणतो की, जगाची ओळख पटायलादेखील प्रीतीची आवश्यकता आहे. मनुष्याच्या अंतःकरणात प्रेमाची फुलवेल फुटेल तेव्हाच त्याला जग काय आहे, हे कळेल. नाही तर नाही. गटेची वर दिलेली काव्यपंक्ती वाचली म्हणजे ' महाभारत ' ह्या महाकाव्याबद्दल जे वर्णन करण्यात येते, त्याची मला आठवण होते. " महाभारतात जी माहिती दिलेली आहे, त्याशिवाय आणखी काही माहिती ह्या जगात असली तर ती जाणून घेण्याच्या योग्यतेची नाही असे खास समजावे. महाभारतात जे ज्ञान आहे, त्याखेरीज आणखी जगात ज्ञान आहे असे कोणी म्हणेल तर ते ज्ञान महाभारतकार व्यासमुनींने सांगितलेल्या ज्ञान पक्वान्नाची उष्टावळ आहे असे मानावे. " हेच ते महाभारताचे वर्णन होय. हिंदुस्थानात दिल्ली शहरास जे महत्त्व आहे, तेच रोम शहरास युरोपमध्ये आहे. दिल्लीचे पूर्वीचे नाव हस्तिनापूर, येथे कौरव–पांडवांनी राज्य केले. म्हणजे दिल्ली शहर हजारो वर्षांपूर्वी अस्तित्वात होते, हे सिद्ध होते. रोम शहरही जुने आहे; पण दिल्ली इतके पुरातन नाही. रोम शहराची स्थापना ख्रिस्तपूर्व ८००–७०० सालांमध्ये झाली. इतिहास

कला, संस्कृती, विद्या इत्यादि दृष्टीने हिंदुस्थानात जसे दिल्ली महत्त्वाचे शहर मानले जाते, तसेच युरोपात रोमविषयी मानले जाते.

रोम शहर टायबर नदीच्या काठी वसलेले आहे. ह्या शहराचा जवळजवळ तीन चतुर्थांश भाग प्राचीन आहे, इतक्या प्रमाणात पुरातन भाग असलेले दुसरे शहर जगात नसावे. रोम्यूलस नावाच्या राजाने हे शहर सात टेकड्यांवर वसविले होते. ह्या शहराचा जो आधुनिक भाग आहे, त्याला ' कॉलीना ' म्हणजे ' नवीन वसाहत केलेला भाग ' असे म्हणतात.

रोम ख्रिश्चन धर्मातील रोमन कॅथॉलिक पंथाचे मुख्य ठिकाण आहे. ह्या पंथाचे लोक रोम शहरास ' होली सिटी ' (Holy City) ' पवित्र नगरी ' समजतात. हिंदु धर्मात ' काशी ' क्षेत्र जसे पवित्र मानले जाते, तसेच कॅथॉलिक पंथात ' रोम ' शहर पवित्र मानले जाते.

ह्या शहरात अतिशय पुरातन वास्तू आहेत. त्या वास्तूंमध्ये अनेक युगांचा इतिहास पाहावयास सापडतो. रोम हे शहर जणू अनेक युगांतील ऐतिहासिक गोष्टींची माहिती देणारे पदार्थसंग्रहालय आहे.

रोम शहरातील वास्तू, पुतळे, कमानी वगैरे केवळ प्राचीन म्हणूनच महत्त्वाचे नाहीत तर कलेच्या दृष्टीनेही त्या वास्तू प्रेक्षणीय व शोभिवंत आहेत. अर्थात ह्या इमारतींत दिसणारे बहुतेक कलाकौशल्य, शिल्प, रोमन लोकांनी ग्रीक लोकांकडून घेतलेले आहे. ग्रीक हे खरे कला, कौशल्य, शिल्प, स्थापत्य-शास्त्र, नाना विद्या, तत्त्वज्ञान, नाट्यादि वाङमय प्रकार इत्यादि गोष्टींतील युरोपियन राष्ट्रांचे पितामह, किंवा मूळ पुरुष; युरोपातील सर्व राष्ट्रांनी ग्रीक लोकांकडून वर निर्देशिलेल्या विषयांमध्ये प्राथमिक धडे घेतले. अर्थात ह्या विद्या व कला शिकण्यामध्ये ग्रीक लोकांचे अगदी सुरुवातीचे जे शिष्य होते, त्यांत रोमन लोकांची गणना होते. त्यांनी स्थापत्य, शिल्प, चित्र इत्यादि कलांचे ग्रीकांकडून जे ज्ञान संपादन केले व त्या ज्ञानाची जी मूर्तिमंत स्मारके रोम शहरात व इतरत्र उभारली त्यांतूनच पुढे ह्या कलांची सरिता युरोपियन राष्ट्रांत चहूकडे वाहू लागली.

कायदा व राज्यकारभाराची सुव्यवस्था कशी ठेवावी ह्या विषयात मात्र रोमन लोक सर्व युरोपियन लोकांचे व काही अंशाने जगाचे गुरू आहेत. रोम

शहर पाहिल्यानंतर ह्या शहराचा उत्कर्ष ज्या रोमन लोकांनी केला, त्यांच्या इतिहासाची आठवण मला झाली व म्हणून त्या लोकांसंबंधी थोडक्यात माहिती मी वर दिली आहे.

तुझा

नाना

• • •

: ३५ :

# जगातील सर्वांत मोठे चर्च : सेंट पीटर्स चर्च

हॉटेल स्प्लेंडर,
रोम, इटली,
ता. ८–६–१९५५

चि. **मंगलास** सप्रेम आशीर्वाद—

रोम शहराची सर्वसाधारण माहिती मी माझ्या मागच्या पत्रात दिली आहे. आज ह्या पत्रात मी त्या शहरातील ज्या इमारती, मंदिरे व इतर ठिकाणे पाहिली, त्यांची माहिती देणार आहे.

सेंट पीटर्स चर्च–प्रार्थना–मंदीर–मी पाहिले. मागे माझ्या एका पत्रात मी ह्या चर्चचा उल्लेख केला आहे. ख्रिश्चन लोकांची जगामध्ये जी चर्चेस आहेत, त्या सर्वांत सेंट पीटर्सचे चर्च मोठे आहे. ह्या चर्चच्या इमारतीची भव्यता डौलदारपणा, थाटमाट व शोभा पाहून मी आश्चर्याने स्तंभित झालो. ह्या इमारतीचा सर्वांत आकर्षक भाग म्हणजे तिचा डोम (Dome) घुमट होय. ह्या घुमटाचा भव्यपणा, विशालता व सौंदर्य याची कल्पना तो घुमट प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय येणे कठीण आहे. एकतर हे चर्च उंचवट्यावर आहे. त्यानंतर

चर्चची भव्य व उंच इमारत व त्या इमारतीवर हा उंचच उंच घुमट. हा मानव निर्मित घुमट जणू ईश्वर निर्मित घुमटाला–आकाशाला–जाऊन भिडलेला आहे. आकाशाशी एकरूप झाला आहे, असे ह्या इमारतीच्या पुढच्या बाजूच्या चौकात उभे राहून त्या घुमटाकडे पाहिल्यानंतर वाटते. ह्या घुमटाचा रंग रुपेरी, निळसर आहे. मिचेलँजेलो (Michelangelo) ह्या जगप्रसिद्ध शिल्पशास्त्रज्ञाने ह्या घुमटाला जन्म दिला, म्हणून ह्या घुमटाला 'मिचेलॅन्जेलो' घुमट असे नाव पडलेले आहे. ह्या घुमटाची उंची ३९० फूट आहे व ह्या घुमटाच्या माथ्यावर जो लँटर्न–इमारतीत प्रकाश येण्यासाठी घुमटावर झरोक्यासह बांधलेला भाग–आहे, त्याची उंची ५५ फूट आहे. हा लँटर्न गोल आहे व ह्यामध्ये दोन खांब एकत्र जोडून केलेला एक खांब अशा दुहेरी खांबांची चोहोबाजूने गोल रांग आहे. ह्या खांबांच्या माथ्यावर कोरीव शिल्पकाम आहे व त्यावर निमुळता होत गेलेला भाग आहे, ह्या भागावर नक्षीकाम केलेले आहे व ह्या निमुळत्या भागावर गोल आकार दिलेला चेंडूसारखा भाग आहे व त्यावर क्रॉस आहे. लँटर्नखालचा घुमटाचा जो भाग आहे, त्यात ठिकठिकाणी इमारतीत प्रकाश व हवा जावी म्हणून झरोके आहेत, ह्या घुमटावर थोडचा थोडचा अंतराने उंचवटचाची व कमानीच्या आकाराची बांधणी चहूबाजूने आहे. ह्या बांधणीच्या खालच्या बाजूला घुमटाला वेढा दिलेल्या तीन कंगोऱ्यांची रांग आहे, व त्या कंगोऱ्यांखाली वर सांगितलेल्या कमानीच्या बांधणीचे पायथे आहेत, ह्या पायथ्यांमध्ये केलेल्या ज्या नक्षीकामाने हा घुमट सजविला आहे. ते नक्षीकाम मनोहर आहे; ह्या पायथ्याच्या खाली दुहेरी गोल खांबांची घुमटाच्या चोहोबाजूला रांग आहे. ह्या खांबांच्या तुळया व पायथे यांचे शिल्प शोभिवंत आहे.

घुमटाच्या खालच्या चर्चचा जो दर्शनी भाग आहे, तो प्रेक्षणीय आहे, ह्या भागात पुन्हा उंच व गोल खांबांची ओळ आहे.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे सेंट पीटर्स चर्च हे एक प्रचंड व भपकेबाज प्रार्थना मंदीर आहे. ज्याच्या नावाने हे चर्च बांधलेले आहे, तो सेंट पीटर हा

ख्रिश्चन धर्माचा एक थोर प्रचारक होता. आपल्याकडे जसा हिंदुधर्माचा प्रचारक श्रीशंकराचार्य तसाच हा ख्रिश्चन धर्माचा शंकराचार्य होय.

सेंट पीटर्स चर्च हा व्हॅटिकन सिटीचा ( Vatican city ) एक भाग आहे. व्हॅटिकन सिटी ( शहर ) मध्ये दुसऱ्या अनेक इमारती आहेत. रोम-मधील ह्या व्हॅटिकन भागाला शहराचा दर्जा आहे, एवढेच नव्हे तर व्हॅटिकन शहर हे एक स्वतंत्र राज्य ( Independent state ) आहे. ता. ११ फेब्रुवारी १९२९ मध्ये चर्च व इटालियन राष्ट्र यांच्यांमध्ये जो समेट झाला, त्याला अनुसरून व्हॅटिकन शहराला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळालेला आहे. ज्या तहान्वये ह्या शहराला स्वतंत्र राज्याचा दर्जा प्राप्त झाला, त्याला लॅटेरनचा ( Lateran Treaty ) तह म्हणतात. १९४७ पासून ह्या तहाच्या अटी इटालियन घटना कायद्यात गोवलेल्या आहेत. ख्रिश्चन धर्माचा सर्वश्रेष्ठ अधिकारी किंवा धर्मगुरू पोप ह्या राज्याचा मुख्य आहे व ह्या व्हॅटिकन शहरात पोपचे निवासस्थान गेल्या सहा शतकांपासून आहे. सेंट पीटर हे धर्म-पीठ निर्माण करण्यात आले व त्या पीठावर आतापर्यंत सुमारे २६० पोप अधिष्ठित झाले; त्यांपैकी बरेच हुतात्मे व संत होते. अनेक वादळांना व संकटांना पोप्सना तोंड द्यावे लागले; पण ख्रिश्चन जनतेवरील धार्मिक क्षेत्रातील पोपची सत्ता कित्येक शतके टिकून राहिली व आजही ती अबाधित आहे. पोपला जी सत्ता आहे, ती कुठल्याही राजाला क्वचितच मिळाली असेल.

तुझा

**नाना**

: ३६ :

# निर्दय व निष्ठूर कृत्यांनी लांछित झालेली प्रचंड वास्तू : कॉलोझियम.

हॉटेल, स्प्लेंडर,
रोम, इटली,
ता. ८-६-१९५५

चि. उषाला सप्रेम आशीर्वाद--

रोम शहरात जिकडे जावे तिकडे अगणित पुरातन वास्तूंचा समुदाय पसरलेला आहे. हे पाहावे की ते पाहावे, असे माझे होऊन जाते; पण सारा तीन दिवसांचा माझा येथील मुक्काम ! त्या अवधीत जितके पाहता येईल, तितके पाहून घेत आहे, दुसरा काही उद्योग नाही; सकाळी नास्ता केल्यानंतर स्प्लेंडर हॉटेलातून जो बाहेर पडतो, तो लंचच्या ( दुपारचे जेवण ) वेळेपर्यंत हिंडत असतो. जेवणानंतर थोडा वेळ विश्रांती घेतो की लगेच स्वारी रोम शहर पाहण्यास बाहेर पडते, जणू रोम शहरातील युगायुगामध्ये बांधले गेलेले पुराण वास्तू, प्रसिद्ध पुरुषांचे पुतळे, ती सुंदर सुंदर कारंजी व मनोहर कमानी मला आपल्याकडे येण्यासाठी बोलावीत आहेत, असे मला वाटते. सायंकाळपर्यंत मी ह्या शहरात फिरत असतो; रात्रीचे जेवण हॉटेलात उरकले की परत रोम शहरात हिंडतो व अगदी थकलो म्हणजे हॉटेलात विश्रांतीस येतो, असा माझा येथील कार्यक्रम आहे. जवळ जवळ हाच कार्यक्रम ज्या ज्या देशात मी आतापर्यंत गेलो त्या त्या ठिकाणी अनुसरिला आहे. म्हणून तर मला इतक्या गोष्टी अवलोकिता आल्या व त्यांचा वृत्तांत ह्या पत्रमालिकेत मला गुंफता आला. असो !

सेंट पीटर्स चर्च व व्हॅटिकन शहर पाहिल्यानंतर मी पिअॅझा व्हेनेझिया ( Piazza Venezia ) ह्या भागात गेलो. पिअॅझा व्हेनेझिया हे रोमचे केंद्रस्थान आहे. रोममधीलच नव्हे तर इटली देशातील हे अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. येथे किती तरी पुरातन वास्तू आहेत, प्रत्येक वास्तूमध्ये जुना

इतिहास भरलेला आहे. ह्या भागातील व्हिक्टर एमॅन्युएल दुसरा यांच्या स्मरणार्थ बांधलेली वास्तू (The Monument to Victor Emmanuel II) पाहिला. ह्या वास्तूला "व्हिट्टोरिॲनो" (Vittoriano) असेही नाव आहे. ही वास्तू इटलीच्या स्वातंत्र्य देवतेच्या प्रीत्यर्थही बांधलेली आहे.

पिॲझ्झा व्हेनेझियामध्ये अनेक फोरम्स (Forums) म्हणजे चवाठे आहेत- ट्रॉजन, (Trajan) फोरम, ज्युलिअस सीझरचा फोरम, ऑगस्टसचा फोरम इत्यादि चवाठे आहेत. प्रत्येक फोरममध्ये पुतळे, विजय स्तंभ, प्रार्थना मंदिरे, विजयाप्रीत्यर्थ बांधलेल्या कमानी (Arches) व इतर भव्य इमारती आहेत, त्यांची गणना करणेही मला शक्य नाही. १९ शतकापूर्वी बांधलेला एक उंच व प्रचंड स्तंभ मी पाहिला. डेसिअन युद्धात रोमन लोकांनी विजय मिळविला, त्याच्या प्रीत्यर्थ हा स्तंभ त्यांनी बांधला. ह्या फोरममधील अनेक इमारतीची पडझड झालेली आहे. ही पडझड पाहून मला वाईट वाटले. कारण ह्या वास्तूंची संपूर्ण शोभा आज पाहावयास मिळत नाही; पण वास्तूंचे जे भाग शिल्लक आहेत, तेही मोठ्या प्रमाणात आहेत; त्यामुळे मूळ वास्तूंच्या सौंदर्याची व प्रचंडत्वाची कल्पना ते भाग पाहिल्यानंतर चांगल्या प्रकारे येते.

ट्राजन फोरममधील ट्राजन मार्केट्स–बाजार–ही एक पुरातन व अगडबंब इमारत मी पाहिली. हिला अनेक मजले आहेत. ट्राजन मार्केट्समध्ये म्हणजे ट्राजन बाजारपेठेत पूर्वी रोमन साम्राज्याच्या काळात रोम शहराचा बाजार भरत असे. आता मी ज्या वास्तूचे वर्णन करणार आहे, ती वास्तू पाहून तर मी आश्चर्याने दिङमूढ झालो. त्या वास्तूचे नाव आहे, 'कॉलॉझिअम' (Colosseum). 'कॉलॉझिअम' हे एक रोमन काळातील प्रचंड थिएटर अथवा ॲम्फी थिएटर आहे. हे थिएटर–रंगशाळा–सन ७२ साली व्हेस्पॅसिअन (Vespasian) ह्या शिल्पकाराने बांधावयास सुरुवात केली व तिची पूर्तता व्हेस्पॅसिअनचा मुलगा टिटस (Titus) याने ८० सालात केली. हिब्रू कैद्यांकडून प्रामुख्याने ह्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले. ह्या इमारतीचे खरे नाव 'ॲनफिटेॲट्रो फ्लॅव्हिओ,' (Anfiteatro Flavio) पण प्रचारात असलेले नाव आहे 'कॉलॉझिअम'!

रोमन लोकांना खेळांचा व करमणुकींचा फार शौक होता, ह्यात गैर काहीच नाही; 'लुडी सिर्सेन्सेस' ( Ludi Circenses ) नावाचे खेळ रोमन लोकांनी सुरू केले. ह्या खेळांचा व त्या खेळांतील सामन्यांचा हेतू हा होता की, रोमन लोकांत लढवय्यी वृत्ती, शौर्य, धैर्य इत्यादि गुणांची वाढ व्हावी, हा हेतू सुरुवाती सुरुवातीला सफलही झाला; व रोमन लोकांत मोठे योद्धे निर्माण झाले व त्यांनी जगातील एक मोठे साम्राज्य निर्माण केले. परंतु ह्या खेळाचे रूपांतर पुढे एका दुष्ट, निर्दय व अनिष्ट प्रथेत झाले. खेळांचे जे सामने रोम शहरात पूर्वीच्या काळी होत, त्यांना "ॲक्टियन गेम्स" असे म्हणत. ह्या सामन्यांत सुरुवातीला मुष्टियुद्धे ( Boxing ), घोड्यावर बसून शर्यती लावणे व इतर शारीरिक बल अजमावण्याचे खेळ होत असत, हे खेळ पाहून रोमन लोकांचे प्रथम समाधान होई. परंतु पुढे त्यांना ह्या शर्यती अपुऱ्या व मिळमिळीत वाटू लागल्या. त्यांत त्यांना गोडी वाटेना. त्यांनी नंतर 'ग्लॅडिएटर्स'ची ( Gladiators ) म्हणजे तलवारीने किंवा प्राणघातक हत्यारांनी द्वंद्वे खेळणाऱ्यांची प्रथा सुरू केली. हे ग्लॅडिएटर्स बहुधा युद्धात जिंकलेले कैदी किंवा ज्यांच्यावर गुन्हा शाबीत झाला, असे कैदी असत. ह्या ग्लॅडिएटर्संना तलवारी, कट्यारी, भाले इत्यादि हत्यारांनी द्वंद्वयुद्धे कशी खेळावीत, याचे शिक्षण देण्यात येई. एकेका वेळी दहा दहा हजार ग्लॅडिएटर्स अशारीतीने द्वंद्वासाठी तयार करण्यात येत. हजारो रोमन्स ही द्वंद्वयुद्धे पाहण्यासाठी आसुसलेले असत. ही द्वंद्वयुद्धे प्रेक्षकांना योग्यरीतीने पाहता यावीत म्हणून रोमन लोकांनी मोठमोठी ॲम्फी थिएटर्स बांधली. त्या थिएटर्समध्ये कॉलॉझियम हे सर्वांत मोठे थिएटर आहे. अशा रीतीने कॉलॉझियमचा जन्म झाला. ह्या ॲम्फी थिएटर्समध्ये ग्लॅडिएटर्स द्वंद्वे खेळत, ती द्वंद्वे चालली असताना त्यांच्या अंगांतून रक्ताच्या चिळकांड्या उडत, त्यांचे हातपाय तोडले जात, पण ही क्रूर कृत्ये पाहण्यातच रोमन लोकांना मोठी मौज वाटे. रोमन लोकांच्या ह्या आसुरी व निष्ठुर मनोवृत्तीचा इतिहास येथेच संपला नाही, पुढे जेव्हा नुसत्या ग्लॅडिएटर्सच्या रक्ताच्या धारा व त्यांच्या शरीराची छिन्नविछिन्नता पाहून रोमन लोकांचे समाधान होईना, तेव्हा त्यांनी ग्लॅडिएटर्सनी एकमेकांना फक्त जबर जखमा करून द्वंद्वे न थांबविता एकमेकांचे बळी घेतले पाहिजेत, अशी अति निर्दय रूढी सुरू केली. हा अति अमानुष इतिहास येथे संपला नाही, नंतर ॲंफी

थिएटर्समध्ये हिंस्त्र पशू पाळण्याची चाल सुरू करण्यात आली. ह्या हिंस्त्र पशूं-बरोबर ग्लॅडिएटर्संना युद्धे करण्यास भाग पाडण्यात येऊ लागले. अँफी थिएटर्स-मध्ये ही युद्धे करण्यासाठी मध्यभागी अॅरीना ( Arena ) म्हणजे मल्लभूमी किंवा समरांगण तयार करण्यात येई. त्या समरांगणास भिंती असत. वरची बाजू अर्थात उघडी असे. ह्या मल्लभूमीच्या चोहोबाजूंनी वर्तुळाकृती प्रेक्षकांना बसण्यासाठी सज्जे बांधण्यात येत होते. ह्या सज्ज्यांत बसून ग्लॅडिएटर्सची आपसांतील व हिंस्त्र पशूंबरोबर होणारी द्वंद्वयुद्धे रोमन लोक मोठ्या आवडीने पाहत. ग्लॅडिएटर्सचा जेव्हा हिंस्त्र पशू पाठलाग करीत, त्यांच्या मांसाचे लचके तोडीत, त्यांना घायाळ करीत, तेव्हा प्रेक्षकांमध्ये टाळयांचा कडकडाट होई. आरोळ्या ठोकल्या जात, आनंदाने प्रेक्षक बेहोष होत. निर्घृणतेची ती परि-सीमाच होती. ह्या गोष्टीवरून रोमन लोकांचा नैतिक अध:पात किती झाला होता, हे कळते. अर्थात ही रोमन लोकांची निर्घृण व भ्रष्ट ( Perverted ) मनोवृत्तीही रोमन साम्राज्याच्या नाशास एक कारण झाली असल्यास नवल नाही. गंमत अशी की, केवळ खालच्या दर्जाचेच लोक ही द्वंद्वे पाहात होते असे नव्हे तर श्रीमंत लोक, उमराव व कधी कधी राजेही ही द्वंद्वे पाहण्यात भारी रस घेत होते. एकावेळी अनेक द्वंद्वे होत असत, जर मल्लभूमी रक्ताने माखली गेली, नव्हे रक्ताने ओलीचिंब झाली तर मल्लभूमीवर दुसरी माती टाकण्यात येई व अशा रीतीने बराच वेळ ही द्वंद्वे एकामागून एक होत असत.

सम्राट कॉन्स्टन्टाईन व त्यानंतरचा सम्राट यांनी हे अमानुष व आसुरी खेळ बंद करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना यश आले नाही. शेवटी पाचव्या शतकामध्ये टेलेमॅच्युस ( Telemachus ) नावाचा मंक म्हणजे जोगी किंवा मठवासी एके दिवशी एका मल्लभूमीत गेला व ग्लॅडिएटर्सच्यामध्ये उभा राहिला. तो प्रेक्षकांकडे वळून म्हणाला, " ही दुष्ट द्वंद्वे कृपा करून बंद करा ! " त्याने अनेक विनवण्या केल्या, पण रोमन प्रेक्षकांवर त्यांचा काहीही परिणाम झाला नाही. उलट त्या मठवाशाची कुचेष्टा करण्यात आली, छद्मी टोमणे मारण्यात आले व त्याला प्रेक्षकांनी दगडांनी ठार मारले. मानवतेच्या ह्या उपासकाने आपला बळी दिला; पण असे सांगण्यात येते की, त्यानंतर ह्या दुष्टप्रथेचा शेवट झाला.

कॉलॉझिअमची वास्तू पहात असताना मला त्या वास्तूच्या जन्मकथेची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही म्हणून मी त्यासंबंधीचा इतिहास थोडक्यात वरती दिला आहे. कॉलॉझिअममध्ये एका वेळी ६५००० प्रेक्षकांची बसण्याची सोय करण्यात आलेली होती.

या ठिकाणी पूर्वीच्या काळी अनन्वीत कृत्ये घडली, हजारो ग्लॅडिएटर्सचे मुर्दे पडले, त्यांच्या रक्ताने येथील भूमी न्हाली. ह्या गोष्टींची आठवण होऊन माझे मन विषण्ण झाले. निर्दय व निष्ठुर कृत्यांनी ही वास्तू लांच्छित झालेली आहे, ग्लॅडिएटर्सच्या दुःखपूर्ण आरोळ्या व अनुकंपनीय विव्हळणे अजून ऐकू येते, असे मला कॉलॉझिअम पाहून वाटले, तर माझा त्याला इलाज नाही.

तुझा
नाना

• • •

: ३७ :

# भपकेबाज कॅरॅकला स्नानगृहे व भूयारातील नवलनगरी

हॉटेल स्प्लेंडर,
रोम, इटली,
ता. ९–६–१९५५

चि. विठ्ठल यास सप्रेम आशीर्वाद––

ह्या पत्रात मी रोम शहरातील आणखी जी स्थळे पाहिली आहेत, त्यासंबंधी हकिकत सांगणार आहे.

रोम शहरात 'व्हाया ॲपिया' (Via Appia) नावाचा रस्ता फार प्रसिद्ध व जुना आहे. ख्रिस्तपूर्व ३१२ सालात ॲप्पिअस क्लॉडिअस ( Appius Claudius ) याने हा रस्ता बांधावयास प्रारंभ केला. हा रस्ता फारच रुंद आहे. ह्या रस्त्याने मी कॅरॅकला स्नानगृहे (Baths of Caracalla) पाहावयास गेलो. ह्या स्नानगृहांच्या बांधकामाची सुरुवात २०६ सालात

सेप्टिमिअस सेव्हेरस ( Septimius Severus ) याने केली व त्यांचे-उद्घाटन २१७ सालात कॅरॅकला ( Caracalla ) याच्या हस्ते झाले. ही स्नानगृहे फार विशाल, भव्य व सुंदर आहेत. रोम शहरातील रोमन काळातील सर्वच वास्तू अतिशय अवाढव्य, प्रचंड व भपकेबाज आहेत, ह्यावरून रोमन लोकांना भव्यता व प्रचंडत्वाची जशी आवड होती तशी दिमाख, भपकेबाजपणा व वैभव यांविषयीही प्रेम होते, हे सिद्ध होते. ज्या रोमन लोकांना विशालत्वाची आवड होती, त्यांच्या हातून विशाल कृत्ये झाली व त्यांनी जगातील एक मोठे साम्राज्य स्थापन केले तर नवल नाही. त्यांना वैभवाची व सामर्थ्याची आवड होती म्हणूनच त्यांचे साम्राज्यही वैभवशाली व सामर्थ्यवान बनले.

कॅरॅकला स्नानगृहाच्या इमारतीमध्ये थंड, उष्ण व कोमट पाण्याच्या स्नानाची वेगवेगळी व्यवस्था होती. ह्या इमारतींची छते खूपच रमणीय होती. स्नानासाठी जी तळी होती, त्यांची बांधणी उत्तमोत्तम संगमरवरी दगडांनी केलेली होती. त्या तलावांच्या तळाचे भाग विविध शोभिवंत दगडांनी कशीदा-सारखे बनविलेले होते. ह्या इमारतींना तटासारख्या उंच व टोलेजंग भिंती होत्या, तीत मोठे व उंच खांबांच्या रांगा होत्या, अतिशय सुंदर पुतळे होते, खेळण्यासाठी आखाडे होते, आराम करण्यासाठी दालने होती. या स्नानगृहात एका वेळी १६०० लोक स्नान करीत असत इतकी ती विशाल व विस्तृत होती. ॲमीॲनस मार्सेलिनस ( Amianus Marcellinus ) तर ही स्नान-गृहे पाहून त्यांची सुभे किंवा प्रांत ह्यांच्याबरोबर तुलना करी. ह्या स्नानगृहांची किती तरी पडझड झालेली आहे; तरी पण जे भाग आता पाहावयास मिळतात त्यावरूनही ह्या स्नानगृहांच्या पूर्वीच्या वैभवाची व सौंदर्याची सुस्पष्ट कल्पना आल्याशिवाय राहात नाही. रोमन लोकांना स्नानाचा फार नाद होता. गरम पाण्याचे स्नान, बाष्प स्नान इत्यादि स्नानाचे अनेक प्रकार असत. त्यांना शरीराच्या मालिशचीही अतिशय आवड होती. गुलामाकडून ते आपल्या अंगांना मालिश करवून घेत असत.

कॅरॅकला इमारतींना लागून एक ओपन एअर थिएटर बांधलेले आहे, ते युरोपमधील सर्वात मोठे ओपन एअर थिएटर आहे. मी कॅरॅकला स्नानगृहांच्या इमारतींतून बाहेर पडलो. व परत माझ्या हॉटेलकडे जाऊ लागलो, तोच त्या

स्नानगृहाबाहेर थोड्या अंतरावर उभ्या असलेल्या एका इटालियन पोलीस अधिकाऱ्याने मला बोलाविले, मला तो का बोलावीत आहे, हे कळेना. मला वाटले की, मी कॅरॅकला पाहताना काही कायद्याचे उल्लंघन केले की काय व म्हणून तो अधिकारी मला बोलावीत आहे. मी त्याच्याजवळ गेलो व त्याने मला इंग्रजीत–अर्थात मोडक्या तोडक्या इंग्रजीत विचारले, " तुम्हांला अजून काही विशेष असे पाहावयाचे आहे का ? " मी म्हणालो की, " मी तर इतक्या दूर विशेष काही पाहण्यासाठी तर आलो आहे. " बोलताना ' विशेष काही ' ह्या शब्दावर मी मुद्दामच जोर दिला, त्यामुळे त्या अधिकाऱ्यास हसू आले व तो मला आपल्याबरोबर घेऊन गेला. थोडे चालून गेल्यावर त्याने मला भुयाराचे भले मोठे द्वार दाखविले. ते द्वार म्हणजे मजबूत दरवाजाच होता. मला त्या दरवाजाचा व त्याच्या आतील भुयाराचा जो थोडा भाग दिसत होता, त्याचा बोध होईना. तो अधिकारी म्हणाला, " तुम्ही आत चला, तेथे एक नवी सृष्टी तुम्हांला पाहावयास मिळेल. " मी त्या दरवाजातून त्या अधिकाऱ्याबरोबर भुयारात गेलो आणि खरोखरच एक आश्चर्याने भरलेले जग मी त्या भुयारात पाहिले. भुयारात एका मागून एक मोठमोठाली दालने लागली, त्या दालनांचे वर्णन तो अधिकारी करीत होता, " ह्या दालनांत पूर्वीच्या काळी रोमन राजे व उमराव आराम करीत होते, त्या दालनात झोपत होते, " असे म्हणून तो अधिकारी काही दालने दाखवीत होता. मला वाटले की संपले, उन्हाळ्यात थंड हवेचे ठिकाण म्हणून पूर्वीचे रोम लोक ह्या दालनांचा उपयोग करीत असतील, पण नव्हे, ह्या दालनांना जोडून दुसरी दालने होती व त्यांना जोडून आणखी दालने होती. जमिनीखाली खूपच विस्तृत भाग खणून ती दालने तयार केलेली आहेत. ह्या दालनांपैकी काही दालनांत रोमन लोक आपल्या अंगांचे मालिश करवून घेत, मालिश करताना त्यांना आरामशीर झोपता यावे, म्हणून तेथे ओटे केलेले आहेत. काही दालनांत स्नानगृहे आहेत, तर काही दालनांत–प्रार्थना–मंदिरे आहेत. प्रार्थना–मंदिरात देवघरे आहेत. काही दालनांत पाकगृहे आहेत. पूर्वीच्या काळची चुल्हाणे तेथे मी पाहिली. स्वयंपाकासाठी जे साहित्य उपयोगात आणले जाई, त्यापैकी काही तेथे आजही ठेवलेले आहे. काही दालने स्त्रियांच्या प्रसाधनासाठी आहेत, तर काही त्यांच्या आरामासाठी ! काही दालनांत रोम लोक यज्ञ–Sacrifice–करीत. तर

काही दालनांत बैठे खेळ खेळत, काही दालनांत कैद्यांच्या कोठड्या आहेत. ह्या दालनांत प्रकाश व हवा येण्यासाठी ठिकठिकाणी झरोके आहेत. अशी ही नाना प्रकारांची दालने मला तो अधिकारी दाखवीत होता व त्यांचे वर्णन करीत होता, ती दालने एका पाठीमागून एक पाहात असता व त्यांचे वर्णन ऐकत असता माझे आश्चर्यही वाढत होते. भुयारातील ती एक नवलसृष्टी होती ! जुना रोमन जमाना पुन्हा तेथे अवतरला की काय असे मला वाटू लागले. मात्र कोणी रोमन माणूस तेथे दिसला नाही. उन्हाळ्यात उष्मा झाला म्हणजे ह्या भुयारातील घरात रोमन लोक राहत असत किंवा रोम शहरावर परचक्र आले म्हणजेही ह्या भुयारातील घरांचा उपयोग ते रोमन करीत असावेत.

रोमन लोकांचे भुयारातील ते वैभव दाखविल्यानंतर तो रोमन अधिकारी मला भुयारातून वरती घेऊन आला. मला त्याचे आभार कसे मानावे हेच कळेना. माझी त्याची ओळख नाही. मी एका परदेशातून आलेला माणूस ! त्या अधिकाऱ्याने आपण होऊन मला बोलवावे, मोठ्या आपुलकीने त्या भुयारासंबंधी माहिती द्यावी, एवढेच नव्हे तर ती भुयारे व त्यांतील दालने प्रेमाने दाखवावीत, ह्या सर्व गोष्टी मला गौडबंगाला सारख्या वाटल्या व त्याहून गौडबंगाल वाटली ती भुयारे व तेथील दालने ! काहीही असो, त्या अधिकाऱ्याने मला ज्या वास्तूंचा पत्ताही नव्हता व ज्यांची मला मुळीच माहिती नव्हती, त्या वास्तू दाखविल्या, ह्याबद्दल मी त्याच्याशी हस्तांदोलन केले व त्याचे मनापासून आभार मानून मी माझा रस्ता धरला व तो आपल्या कामास निघून गेला.

तुझा

**नाना**

● ● ●

: ३८ :

# समृद्ध पश्चिम आणि निर्धन पूर्व

हॉटेल स्प्लेंडर

रोम, इटली,

ता. ९–६–१९५५.

चि. आशाला सप्रेम आशीर्वाद—

ह्या पत्रात मी ज्या एका वास्तूचे वर्णन करणार आहे, ती वास्तू मला फारच पसंत पडली; तिने माझे मन मोहून टाकले, असे मी म्हटले तर अतिशयोक्ती मुळीच होणार नाही. ती वास्तू म्हणजे पॅन्थीऑन (Pantheon) "ही वास्तू रोम शहराचा अलंकार आहे. त्याचे वैभव आहे." क्लासिकल ( सर्वमान्य सरस व उत्तम कलाकृती ) वास्तूंमध्ये ही वास्तू पहिल्या दर्जाची वास्तू आहे" असे 'पँथिऑन' चे वर्णन करण्यात येते ते खरोखरच सार्थ आहे. ह्या वास्तूची घडण गुंतागुंतीची नाही, साधी आहे; पण ती पाहिल्यानंतर मनास शांती लाभते; उदात्त व निर्मळ भावना जागृत होतात. ह्या इमारतीची भव्यता तर मनास चटका लावते. ही इमारत एका चर्चची आहे. 'पँथिऑन' वास्तूच्या द्वारमंडपाला १६ खांब आहेत. एक एक खांब म्हणजे एका एका सलग ग्रॅनाईट दगडातून तयार केलेला आहे, म्हणजे त्याला जोड दिलेला नाही. ह्या वास्तूचे दरवाजे ब्राँझ धातूचे आहेत; तिची उंची व तिचा व्यास प्रत्येकी १४२ फुटांचा आहे. ह्या वास्तूचा जो घुमट आहे, तो तर अतिशयच चित्ताकर्षक आहे, असा सुंदर घुमट माझ्या तरी पाहण्यात आला नाही. वास्तूच्या आत प्रकाश व हवा घेण्यासाठी घुमटाला मध्यभागी ३० फूट रुंदीचे धारे आहे. घुमटाच्या धाऱ्यातून आकाश दिसते, ते दृश्य अत्यंत मनोवेधक आहे. घुमटाच्या मध्यभागी एकही खांब नाही, पण त्या घुमटाचा परिघ मात्र पिवळसर संगमरवरी दगडांच्या खांबांवर उभा आहे. हे खांब किती तरी शोभिवंत व मोहक आहेत! ह्या

खांबांवर गोलाकृती सुंदर तुळई आहे व तुळईवर कमानीची मालिका आहे व ह्या कमानीवर चौकोनी आकाराच्या व खोल होत गेलेल्या रचना एकावर एक आहेत, घुमटाचा भाग जसा शिखराकडे निमुळता होत जातो, तसा तसा ह्या चौकोनी आकृतीचा परिघही निमुळता होत जातो. ह्या इमारतींच्या आत चहू-बाजूंना सात मोठे कोनाडे (Niches) आहेत. ही वास्तू सम्राट हॅड्रिअन (Hadrian) याने बांधली व सात गृहांच्या सात देवतांना अर्पण केली. ही वास्तू १८०० वर्षांची जुनी आहे. पँथिऑन ही गांभीर्याची जणू मूर्ती आहे. ह्या इमारतीत प्रवेश करताच तेथील गंभीर, उदात्त व सोज्वळ वातावरणाचा मला अनुभव आला व त्याचा ठसा कायमचा माझ्या चित्तावर उमटला!

रोम शहरात ठिकठिकाणी मोठमोठाली कारंजी आहेत, ह्या कारंज्यांवर मासे, कासव वगैरे प्राण्यांच्या व मानवांच्या प्रतिमा आहेत. ह्या कारंजांपैकी फाउन्टन ऑफ मोझेस (Fountain of Moses)–'मोझेसचे कारंजे' नायअडसचे कारंजे (Fountain of the Naiads), कासवाचे कारंजे (Fountain of the Tortoeses) व फॉउन्डा डी ट्रेव्ही (The Fontana Di Trevi) ही कारंजी प्रसिद्ध आहेत.

ह्या निरनिराळ्या कारंज्यांतून सतत पाण्याच्या धारा वाहत असतात व फवारे उडत असतात. ह्या कारंजांनी रोमची शोभा खचित वाढविलेली आहे. रात्रीच्या वेळी विजेच्या प्रकाशात ही कारंजी व त्यांतून स्रवणारे पाण्याचे प्रवाह व फवारे फारच मजेदार व मनोरम दिसतात. सारखे ह्या कारंजांची शोभा पाहात राहावे, असे मला वाटले.

रोममधील माझा मुक्काम संपत आलेला आहे. येथे असताना मी रोम शह-राचे जे भाग पाहिले व ह्या शहरातील ज्या वास्तू अवलोकिल्या त्यांची वर्णनें मी ह्या व मागच्या काही पत्रांतून दिलेली आहेत. माझा येथील मुक्काम इनमीन तीन दिवसांचा! तीन दिवस काय तीन महिनेदेखील हे शहर व त्या-तील आकर्षक स्थळे पाहण्यास पुरणार नाहीत. एवढे मात्र खरे की ह्या शहरातील मुख्य मुख्य ज्या वास्तू आहेत, त्यांपैकी मी बऱ्याच पाहिल्या आहेत. वास्तविक ह्या शहराची मला येथे येण्यापूर्वी काहीही माहिती नव्हती, म्हणजे येथे काय, पाहण्यासारखे आहे व थोड्या वेळात किती व कोणते पाहावे, याची मला

काहीच कल्पना नव्हती. मी ज्या महत्त्वाच्या व अतिशय प्रमुख इमारती तीन दिवसांत पाहू शकलो, याचे मुख्य कारण म्हणजे रोममधील इटालियन लोकांची मदत हेच आहे. रस्त्याने मी हिंडत असताना मला पाहून काही लोक स्वत: होऊन " तुम्ही ही इमारत जरूर पहा, ते चर्च फारच सुंदर आहे, जरूर पहा, तो फोरम पाहिल्याशिवाय राहू नका. " असे सांगत, एवढेच नव्हे तर ती ती स्थळे कोठे आहेत, याची माहिती देत. मागच्या पत्रात मी ' कॅरॅकला ' स्नानगृहे पाहिल्यानंतर एका इटालियन पोलीस अधिकाऱ्याने मला स्वत: होऊन भुयारातील रोमन लोकांची राहण्याची ठिकाणे कशी दाखविली, याची माहिती दिलीच आहे. इटालिक फोरममध्ये देखील मी बरेच स्टेडियम्स व इमारती पाहू शकलो, याचे कारण इटालियन लोकांची सहानुभूती हेच आहे. तेथील बऱ्याच इमारतींमध्ये शर्यती, सामने वगैरे कार्यक्रम असले म्हणजेच प्रवेश मिळतो व तोही तिकीट खरेदी केल्यावर, एरवी नाही, पण मी विनंती केल्यावर मला त्या फोरममधील ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांनी ते ते स्टेडियम्स व इमारती मोठ्या प्रेमाने दाखविल्या. व्हिक्टर एमॅन्युएल दुसरा याच्या स्मारकाची इमारत पाहत असता मला एक इटालियन गृहस्थ भेटला. त्याचे नाव डॉट अँड्री ओंगॅरो. त्याने मला त्या वास्तूची हकिकत सांगितली. माझ्याविषयी व भारताविषयी मोठ्या प्रेमाने विचारपूस केली. पुढे तो म्हणाला, " तुम्ही कोठे उतरलात ? " मी म्हणालो, " स्प्लेंडर हॉटेलमध्ये. " " तुम्ही तर काय थोडेच खात असाल, स्प्लेंडर हॉटेल मात्र तुमच्याकडून भरपूर बिल वसूल करीत असेल ? " कोणी आपल्या घरचे माणूस आपल्याबरोबर बोलत आहे, असे मला त्याचे ते बोलणे ऐकून वाटले. त्याने महात्मा गांधींबद्दल व पंडित जवाहरलालजींबद्दल गौरवाचे उद्गार काढले. माझ्या ह्या युरोपमधील दौऱ्यामध्ये ह्या गृहस्थाशिवाय दुसरेही बरेच लोक महात्मा गांधी व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी आदर व पूज्यभाव व्यक्त करणारे भेटले. काही लोकांनी श्री. विनोबा भावे व त्यांची भूदानाविषयीची चळवळ याबद्दलही चौकशी केली. ती चळवळ कितपत यशस्वी झाली, अशीही काहींनी विचारणा केली. आपल्या देशातील थोर नेत्यांबद्दल अशा रीतीने आपुलकी व आदर व्यक्त केलेला पाहून मलाही धन्यता वाटली.

माझा युरोपातील प्रवास जसा काही काटेकोररीतीने आखला जावा व तो तितक्याच काटेकोरपणे पार पडावा, ह्याप्रमाणे पार पडला. मी मुंबई राज्याचा मंत्री असताना माझ्या दौऱ्यांचे कार्यक्रम आखण्यात येत. ते कार्यक्रम-देखील कधी कधी इतक्या काटेकोरपणे पार पडत नसत, जितक्या काटेकोरपणे व व्यवस्थितपणे माझा युरोपच्या प्रवासाचा कार्यक्रम पार पडला. माझे मलाच आश्चर्य वाटते ! परकीय देश व त्या देशांतील हा प्रवास, मला प्रथम वाटायचे की कोणाही अधिकाऱ्याची किंवा अधिकृत संस्थेची मदत न घेता मला एक-टचाला हा प्रवासाचा कार्यक्रम कसा पार पाडता येईल; पण जसे काही सर्व जुळून यावे, त्याप्रमाणे प्रवास सुरळीत झाला व प्रवासात मला जे पाहावयाचे होते ते मी यथेच्छ व भरपूर पाहिले. आशा, मला वाटते काही काही गोष्टी घडावयाच्या असल्या म्हणजे अशा घडतात हेच खरे !

इंग्लंड, आयर्लंड, फ्रान्सादि देशांत प्रवास करीत असताना ज्या गोष्टींनी माझे मन विशेष आकर्षून घेतले, त्यासंबंधी थोडे लिहिणार आहे. आपण व इतर देशांतील लोकही मानतात की, " हिंदुस्थानात धर्माला फार मोठे स्थान आहे, तो देवाधर्माचा देश आहे, (God-intoxicated Country), जिकडे तिकडे देऊळे व प्रार्थना–मंदिरे विखुरलेली आहेत. " हे खरेही आहे; पण वर सांगितलेल्या देशांतही मला शहरांत व खेडयांत जिकडे तिकडे असंख्य चर्चेस व प्रार्थनागृहे पाहावयास मिळाली; एवढे कशाला ह्या देशांतील ज्या वास्तू मी पाहिल्या त्यांत चर्चेस व प्रार्थना–मंदिरे यांच्या इमारतीच स्थापत्य व शिल्प या कलांच्या दृष्टीने जास्त उठावदार, टोलेजंग व शोभिवंत आहेत. चित्रकलेच्या व शिल्पकलेच्या बाबतींतही मला हेच वैशिष्टच आढळून आले. मी ह्या देशांतील जी चित्रे व शिल्पाकृती पाहिल्या त्यांत जीझस ख्राईस्ट व त्यांचे जीवन, ख्रिस्ती लोकांच्या बायबल धर्मग्रंथातील गोष्टी ह्यांवर आधार-लेली चित्रे व शिल्पाकृती ह्यांनाच प्राधान्य दिलेले मला आढळून आले. याचा अर्थ मात्र असा नव्हे की इतर विषयांसंबंधी चित्रे व शिल्पाकृती ह्या देशांत पाहावयास मिळत नाहीत. उदाहरणार्थ व्हेनिस शहरात मला जी चित्रे पाहावयास मिळाली, त्यांत जीवनातील अनेक प्रसंग रंगविलेली चित्रे मला दिसली. पॅरिसच्या लुव्हरे वस्तूसंग्रहालयात जी चित्रे मी पाहिली, त्यांत लढाया, तह,

राजे, राण्या, उमराव, योद्धे यांच्या जीवनातील घटना इत्यादि विषय रंगविलेले मला दिसले.

इंग्लंड, आयर्लंड आणि स्कॉटलंड देशांप्रमाणे ह्याही देशात पडकी घरे, मळकट व फाटके कपडे घातलेले लोक मला दिसले नाहीत. भिकारी व तेही रोगांनी ग्रस्त झालेले भिकारी शहरातून हिंडताना सापडले नाहीत. आपल्या देशात ह्याहून वेगळेच दृश्य दिसते. भिकाऱ्यांच्या व कुष्ठ रोगांसारख्या रोगांनी पछाडलेल्या भिकाऱ्यांच्या रांगा आपल्या देशातील शहरांत व त्यातल्या त्यात क्षेत्रांच्या ठिकाणी आपणांस पाहावयास मिळतात. आपल्या देशातील व ह्या देशातील वरील बाबतीतील तफावत पाहून मला वाईट वाटले. युरोपमधील देशातील सुस्थिती पाहून वाईट वाटले नाही, उलट आनंद झाला; पण माझ्या देशातील दु:स्थिती जाणवून मन खिन्न झाले. असो. भारतच काय, पूर्वेकडील जपान सोडला तर सर्व देश दारिद्र्याने व अज्ञानाने ग्रासलेले आहेत.

मी आतापर्यंत तुम्हांला माझ्या प्रवास वर्णनाची जी पत्रे पाठविली, त्यांत इंग्लिश, आयरिश, फ्रेंचादि लोकांची मी खूपच स्तुती केली आहे, असे तुम्हांला वाटेल व ते खरेही आहे. मग तुम्ही मला विचाराल की, "युरोपियन लोकांत व त्यांच्या समाजात दोष नाहीत का ? ते सर्व काय सद्‌गुणांचे पुतळे आहेत ?" माझे असे मुळीच म्हणणे नाही. युरोपियन लोकांतही दोष आहेत; पण एवढे खरे की आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक व इतरही अनेक क्षेत्रांत आणि त्यातल्या त्यात आधुनिक शास्त्रात ह्या देशांनी फारच प्रगती केलेली आहे. ह्या सर्व बाबतींत हे देश आपल्या देशापेक्षा कितीतरी पटीने सुधारलेले आहेत. त्यांच्यापासून आपणांस पुष्कळच शिकण्यासारखे आहे. तेव्हा त्यांनी केलेल्या प्रगतीचे सुस्पष्ट चित्र तुमच्यापुढे मांडावे व त्यापासून आपण सर्वांनी बोध घ्यावा, हाच माझा हेतू ! युरोपियनांच्या गुणांवर मी भर दिला आहे; कारण त्या गुणांचे अनुकरण आपण करावे, त्यांचे दोष मी दाखविले नाहीत. कारण त्यांचे दोष घेऊन आपणांस काय करावयाचे आहे ? त्यांचे का आपणांस अनु-

करण करावयाचे आहे? शिवाय माणसाने चांगले सुंदर, व उदात्त असेल त्यावर लक्ष केंद्रित करावे. त्या गोष्टी आत्मसात कराव्यात, वाईट गोष्टी सोडून द्याव्यात, अशी आपल्या देशातील सूज्ञ व विचारी लोकांची शिकवणूक आहे, हेही आपणांस विसरून चालता येणार नाही.

तुझा

**नाना**

• • •

: ३९ :

# कैरो वस्तुसंग्रहालयातील अजब खजिना

**कैरो,**

ता. १०–६–१९५५

चि. **मंगलास** सप्रेम आशीर्वाद—

रोमहून मी विमानाने कैरोस जाण्यास निघालो.

आता विमानाचा प्रवास मेडिटरेनिअन–भूमध्यसागर–समुद्रावरून चालू झाला. विमानातून खाली खिडकीतून वाकून पाहिले तो जमिनीऐवजी समुद्र दिसत होता. सागराच्या लाटांचे थैमान चाललेले होते.

सुमारे अडीच वाजता टी. डब्ल्यू. ए. चे विमान कैरोच्या विमानतळावर उतरले. विमानातून उतरून मी अद्‌भुतरम्य व अति प्राचीन इजिप्तच्या भूमीवर पाय ठेवला. नाईल नदीच्या खोऱ्यात सुमारे ७००० वर्षांपूर्वी उदयास आलेल्या व पुढे विकसित झालेल्या इजिप्शियन संस्कृतीच्या भूमीवर आता मी चालू लागलो. सूर्याला मुख्य आराध्य दैवत मानून त्याची पूजा करणाऱ्या फारो ( Pharoah ) व त्यांचे प्रजाजन यांच्या देशात वावरताना मला कोण आनंद होत होता !

ग्रंथालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम........ वि:
क्रमांक ........ नों. दि.

विमान कंपनीने मला कैरो शहरात नेण्यासाठी मोटारीची व्यवस्था केली होती. या मोटारीने मी विमानतळावरून कैरो शहराकडे जावयास निघालो. पहाटेचे थंड वारे वाहत होते; जणू ते इजिप्तच्या वैचित्र्यपूर्ण व नवलांनी भरलेल्या प्राचीन इतिहासाच्या कथा माझ्या कानात सांगत होते ! त्या वाऱ्यांबरोबर आलेला इजिप्तच्या नाना रंगांनी नटलेल्या अति पुरातन संस्कृती–पुष्पांचा सुगंध मला तोषवीत होता ! विमानतळापासून कैरो शहर बरेच दूर आहे, शहरात येता येता झुंजूमुंजू झाले होते. अंधार नाही व प्रकाशही नाही अशा रम्य व प्रशांत वातावरणात मी कैरो शहरात प्रवेश केला. अजून शहरात रहदारी सुरू झाली नव्हती. जिकडे तिकडे सामसूम होती. कैरो शहरातील रस्ते चांगले आहेत. ह्या रस्त्यांनी मी मोटारीतून माझे मित्र श्री. राजवाडे यांच्या निवासस्थानाकडे चाललो होतो. कैरो शहरातील सुंदर इमारती एका मागून एक येत होत्या; बहुतेक घरांच्या आवारात उंच उंच मनोरे दिसत होते. हे मनोरे घरांच्या इमारतीपासून अलग होते. मनोऱ्यांची घडण कलापूर्ण आहे. हे मनोरे घरांची शोभा तशीच शहराची शोभा वाढवीत आहेत. कैरोच्या रस्त्यावरून जाताना कोण्या परींच्या प्रदेशातून आपण प्रवास करीत आहोत, असे मला वाटले.

मी जेव्हा श्री. राजवाडे यांच्या घरी पोहोचलो, तेव्हा हासरी उषा पिवळसर, लाल व गुलाबी रंगांच्या नाजूक व तलम धाग्यांनी विणलेले मोहक वस्त्र परिधान करून आकाशात विहरत होती. नाईल नदीच्या किनाऱ्यापासून थोड्याच अंतरावर एक इमारत आहे. त्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर जाऊन राजवाड्यांच्या घराचे दार ठोठावले. राजवाडे डोळे चोळीत बाहेर आले; नुकतेच ते झोपेतून उठलेले होते. मागच्या एका पत्रात मी लिहिले आहे की,श्री.राजवाडे यांनी मला कैरो येथे आपल्या घरी येण्याचे आमंत्रण दिले होते, पण निश्चित येईनच, असे त्यांना सांगितलेले नव्हते. तसेच अमुक दिवशी मी येईन, हेही त्यांना माहीत नव्हते. त्यामुळे मी जेव्हा त्यांना ता. १० जून रोजी दिसलो, तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले व आनंदही झाला. त्यांनी माझे हार्दिक स्वागत केले व मला त्यांच्या फ्लॅटच्या आत नेले. ह्या वेळेपर्यंत श्रीमती राजवाडे व त्यांचा मुलगा श्री. राजाभाऊ हेही जागे झालेले होते. त्यांनी दिवाणखान्यात

येऊन मी आल्याबद्दल आनंद व्यक्त केला. मोठी प्रेमळ माणसे आहेत ही! राजवाड्यांच्या घरी स्नान, न्याहारी वगैरे उरकल्यानंतर मी कैरो शहर पाहण्यास निघालो. निघण्यापूर्वी मी माझी बॅग उघडून बेलफास्ट येथून लिननचे ब्लाऊज पिसेस आणले होते. त्यांपैकी एक ब्लाऊज पीस मी श्रीमती राजवाडे यांना दिला. त्याचा त्यांनी मोठ्या मोकळेपणाने व स्मित करीत स्वीकार केला, दिवाळीमध्ये ओवाळणी म्हणून भाऊ जेव्हा वहिणीला ओवाळणी देतो व ती स्वीकारताना वहिणीच्या मुखावर प्रेमळ भाव व्यक्त होतो, तसा भाव श्रीमती राजवाडे यांच्या मुखावर मला दिसला. वास्तविक त्या एका संस्थानिकाच्या कन्या, नवराही एक मोठा अधिकारी, तेव्हा त्यांना काय कमी आहे, पण माझ्या भेटीमागचा प्रेमळ भाव ओळखून त्यांनी त्या भेटीचा तितक्याच प्रेमाने स्वीकार केला व त्यामुळे मलाही समाधान वाटले.

कैरो शहर पाहण्यासाठी राजवाडे यांनी मोटारीची व्यवस्था केली होती, राजाभाऊही माझ्याबरोबर येण्यास निघाले, ह्याशिवाय कैरो शहराची माहिती असलेला एक नोकरही श्री. राजवाडे यांनी आमच्याबरोबर दिला. आम्ही कैरो शहर पाहावयास निघालो. त्यावेळी आकाशात सूर्य तळपू लागला होता. अगदी मुंबईतल्यासारखी कडक उन्हे पडली होती. प्रथम आम्ही नॅशनल म्युझियम ( राष्ट्रीय पदार्थ संग्रहालय ) पाहावयास गेलो. ह्या संग्रहालयाची इमारत टोलेजंग व नवी आहे. तिच्या आवारात बाग आहे. इतर संग्रहालयांत बहुधा पाहावयास मिळत नाहीत अशा ममीज् ( Mummies ) मी त्या संग्रहालयात पाहिल्या. ममी म्हणजे मृत माणसाचे शरीर किंवा शव. ही ममीज फार पुरातन आहेत. अद्यापही ही शवे जशीच्या तशी आहेत. इजिप्शियन लोकांनी ही शवे सांभाळून ठेवण्यासाठी जी पद्धत अवलंबिली तीच ही शवे शाबूत राहण्यास कारणीभूत झाली आहे. इजिप्तचे लोक विशिष्ट प्रकारांच्या रासायनिक पदार्थांनी शवे माखीत व त्या पदार्थांच्या मसाल्यात ही शवे ठेवीत. हा मसाला शवांना लावून झाल्यानंतर त्या शवांभोवती लिननचा कपडा घट्ट गुंडाळीत. शवावर लिननच्या कपड्याच्या घड्यांवर घड्या गुंडाळल्या जात. शवे शाबूत ठेविली जाण्यास मदत करतील अशा पदार्थांनी हा कपडा प्रथम भिजवला जाई. नंतर शवाच्या आकाराची पेटी—कॉफिन बनविण्यात येई व त्या कॉफिनमध्ये ( Coffin )—पेटीमध्ये—ते शव

ठेविले जाई. ही पेटीही पुन्हा दुसऱ्या लाकडाच्या अगर दगडाच्या पेटीत ठेवण्यात येई. काही थोर व पूज्य मानल्या गेलेल्या व्यक्तींच्या शवासाठी सोन्या-चांदीच्या पेट्याही तयार करण्यात येत. माणसाचे अस्तित्व कायम राखण्यासाठी खाण्यापिण्याची, वस्त्रे लेण्याची व इतर व्यवहारांची आवश्यकता असते, म्हणून शवांबरोबर कबरीत धनधान्य, दारू, अलंकार वगैरे वस्तूही ठेवण्यात येत. कैरोच्या राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात अनेक शवे तर मी पाहिलीच परंतु त्या शवांबरोबर कबरीत ठेवण्यात आलेल्या अनेक वस्तूही मी पाहिल्या. काही पिरामिड्स–त्रिकोणाकृती वास्तूं–व कबरी खणून ही शवे व वस्तू मिळविण्यात आल्या व त्या ह्या वस्तुसंग्रहालयांत ठेवलेल्या आहेत. इसवी सनापूर्वी १३५० शतकात इजिप्तमध्ये एक राजा झाला. त्याचे नाव तुतेनखामेन ( King Tutankhamen ). तो लोकांचा फार लाडका होता, १६ वर्षांचा असताना तो निधन पावला. ह्या राजाचे प्रेत वर वर्णिलेल्या पद्धतीने लिननच्या कपड्याने गुंडाळलेले तर होतेच; पण त्यावर सोन्याच्या पत्र्यांची तीन आवरणे घालण्यात आली होती व ह्या तीन आच्छादनांवर तीन सोन्याच्या पेट्या एकावर एक घालण्यात आल्या होत्या. ही सोन्याची आच्छादने व सोन्याच्या पेट्या राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात मी पाहिल्या. ह्याशिवाय ह्या तरुण राजाच्या कबरीत सोन्याचे व हिऱ्यामोत्यांचे अलंकार, राजमुकुट, अनेक प्रकारांची नाणी, दारू व सुगंधी अत्तरे ठेवण्यासाठी कौशल्यपूर्ण रीतीने तयार केलेली शोभिवंत पात्रे, किती तरी तऱ्हेची धान्ये, सिंहासनादि वस्तूही ठेवण्यात आल्या होत्या. ह्या वस्तू मी वस्तुसंग्रहालयात पाहिल्या. ह्या सर्व वस्तूंची किंमत काही कोटी रुपयांपर्यंत जाईल इतकी आहे, असे मला येथे सांगण्यात आले. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयातील ममीज व त्यांच्याबरोबर त्यांच्या कबरीत ठेवण्यात आलेल्या बहुविध वस्तू पाहून मला मोठा अचंबा वाटला.

ह्या वस्तुसंग्रहालयांत जुन्या काळी युद्धात वापरण्यात येत असलेली आयुधे, इजिप्त व इतर देशांची वस्त्रे, भांडी, गालिचे वगैरे वस्तूही मी पाहिल्या. त्याविषयी जास्त माहिती मी पुढे देणार आहे. कैरो शहरात अनेक मशिदी आहेत. ह्या मशिदींच्या वास्तू टोलेजंग व भव्य तर आहेतच; पण मोठ्या भपकेबाज व ऐटबाज आहेत. इजिप्शियन स्थापत्यकला व शिल्पकला यांच्या कारागिरीने त्या संपन्न आहेत. ह्या वास्तूंचे वैशिष्ट्य म्हणजे प्रचंड घुमट व कलापूर्ण मनोरे

हे आहे. घुमटांमुळे व विशेषतः मनोऱ्यांमुळे ह्या इमारती फार सुंदर व मनोहर दिसतात. ह्या मशिदींपैकी एका मशिदीत आम्ही गेलो. तिचे नाव महंमदची मशीद. कारण ती महंमद नावाच्या राजाने बांधली, असे मला सांगण्यात आले. तेथे मोठे आवार होते. आवार ओलांडल्यानंतर मशिदीच्या मुख्य इमारतीत प्रवेश केला. त्या इमारतीला एक अवाढव्य घुमट आहे. हा घुमट एका प्रचंड दालनावर उभा आहे. ह्या दालनाची जमीन संगमरवरी दगडांनी फरसबंद केलेली आहे. ह्या मशिदीचा मनोरा खूप उंच आहे, त्यावरील कोरीव काम मनोवेधक आहे. मशिदीच्या दालनात काही मुसलमान नमाज पढत होते.

कैरो शहरात हिंडत असता तेथील स्त्री–पुरुष व त्यांची राहणी पाहून ह्या शहराच्या व इजिप्त देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीची थोडी फार कल्पना मला आली. दीड महिना मी युरोपियन लोकांच्या देशात फिरलो. त्या लोकांच्या परिस्थितीशी इजिप्शियन लोकांच्या परिस्थितीची तुलना करताना मला दोन्हीमध्ये मोठी तफावत दिसली व ती तफावत पुढारलेली युरोपियन राष्ट्रे व आफ्रिका, आशिया खंडांतील मागासलेली राष्ट्रे यांच्यामधील तफावतीची निदर्शक आहे. इजिप्त हे राष्ट्र आफ्रिका खंडाच्या उत्तरेकडील राष्ट्र आहे. पण ते आशिया खंडातील लेबॅनॉन, जॉर्डन, सीरिया, इराक, सौदी अरेबिया इत्यादि राष्ट्रांच्या शेजारी आहे व ह्या आशियातील राष्ट्रांशी इजिप्तचा सांस्कृतिक, धार्मिक, वांशिक, सामाजिक वगैरे बाबतींत कित्येक शतकांचा घनिष्ट संबंध आलेला आहे, ह्यामुळे इजिप्त हे आफ्रिका व आशिया ह्या दोन खंडांतील दुवा आहे, असे म्हणावयास हरकत नाही. आफ्रिका व आशिया खंडांतील देश–जपान सोडला तर–शिक्षण, उद्योगधंदे, व्यापार व आधुनिक शास्त्रे यांमध्ये मागासलेले आहेत. ह्या खंडांतील लोक दारिद्र्याने व अज्ञानाने पछाडलेले आहेत, त्या करुण स्थितीचे चित्र कैरोतही मला दिसले. येथील लोकांच्या पोषाखावरून, खाण्यापिण्यावरून व इतर व्यवहारांवरून हे लोक हिंदुस्थानातील लोकांप्रमाणे आर्थिक व सामाजिक बाबतीत मागासलेले आहेत, याची कल्पना मला आली व येथे फिरत असताना आपण आपल्या देशातील एखाद्या शहरात फिरत आहोत,असे मला वाटले.अर्थात हिंदुस्थानाप्रमाणे इजिप्त राष्ट्रही हल्लीची हलाखीची परिस्थिती बदलण्याचा आटोकाट प्रयत्न करीत

आहे, त्याचेही प्रत्यंतर मला कैरो शहरात आले. ह्या शहराचे जुने कैरो व नवे कैरो असे दोन भाग आहेत. नव्या कैरो शहरात सिमेंट कॉंक्रीटच्या अनेक मजली इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. इजिप्तमध्ये काही बांधल्या जात आहेत. आधुनिक शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणावर भर दिला जात आहे. नवे नवे रस्ते तयार होत आहेत, नवे नवे कारखाने सुरू करण्यात येत आहेत. व्यापार वाढविण्यासाठी उपाययोजना केली जात आहे. थोडक्यात भावी सुधारणामंदिराची मुहूर्तमेढ घालण्यात येत आहे. कैरो शहरात जुन्या वास्तू व पुरातन संस्कृतीच्या स्मृती जागृत करणाऱ्या अनेक गोष्टी आहेत, तसेच आताच वर्णन केल्याप्रमाणे अनेक नवीन सुधारणांचा प्रवेशही कैरोमध्ये झालेला आहे. त्यामुळे नव्या–जुन्यांचा मनोरम संगम ह्या शहरात पाहावयास मिळतो. फ्रेंच, इंग्रज यांच्या अंमलाखाली हा देश बरेच वर्षे होता. त्यामुळे पाश्चात्य देशांतील किती तरी रीतिरिवाज, भाषा इत्यादि गोष्टींचा प्रादुर्भाव कैरो शहरावर झालेला आहे. पौर्वात्य जुनी संस्कृती व पाश्चात्य आधुनिक संस्कृती यांचा सुंदर मिलापही ह्या शहरात दिसून येतो.

नाईल नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेले हे शहर अरब राष्ट्रवादाचे केंद्र आहे. सुमारे १००० वर्षांपूर्वी फातिमिद ( Fatimid ) सेनापती जोहर (Jauhar) याने कैरो शहर वसविले. अरबी भाषेत 'काहिरा' (Qahera) ह्या नावाने कैरो शहर ओळखले जाते. 'मार्स' (Mars) म्हणजे 'मंगळ' याला अरबी भाषेत 'एलकाहिर' ( Al-Qahir ) असे म्हणतात. एल-काहिराच्या उदयाच्या शुभमुहूर्तावर कैरो शहराची स्थापना करण्यात आली म्हणून ह्या शहरास जोहरने 'काहिरा' असे नाव दिले व पुढे 'काहिराचा' अपभ्रंश 'कैरो' असा झाला. सेनापती जोहर याने इस्लामी संस्कृतीचे एक केंद्र येथे सुरू केले. त्याचे नाव 'अल-अझार' (Al-Azhar) असे आहे. ते केंद्र किंवा विश्वविद्यालय अद्यापही चालू आहे. एवढेच नव्हे तर इस्लामी विद्येचे प्रमुख पीठ म्हणून जगात प्रसिद्ध आहे. दूरदूरच्या देशांतील मुसलमान विद्यार्थी ह्या विद्यापीठात अभ्यास करण्यासाठी दरवर्षी येत असतात. ह्या विद्यापीठाशिवाय अनेक कॉलेजेस कैरो येथे आहेत व त्यांमध्ये आधुनिक शास्त्रे व इतर विषय शिकविले जातात. अरबी भाषेतील ग्रंथांचे मोठे वाचनालयही येथे आहे.

दुपारची वेळ होत आली आहे. 'भोजनाची तयारी झाली आहे,' अशी वर्दी श्रीमती राजवाडे यांच्याकडून आली आहे, तेव्हा आतां हे पत्र पुरे करतो !

तुझा

नाना

● ● ●

: ४० :

# अव्दितीय, अमर व आश्चर्यकारक वास्तू : पिरॅमिड्स

कैरो,

ता. १०–६–१९५५.

चि. **उषास** सप्रेम आशीर्वाद—

ता. १० जून रोजी दुपारी श्री. राजवाडे यांच्या घरी भोजन केले; थोडा वेळ विश्रांती घेतली. श्री. राजवाडे, श्रीमती राजवाडे व चि. राजाभाऊ राजवाडे यांच्याबरोबर गप्पागोष्टी केल्या. त्यानंतर श्री. राजवाडे, राजाभाऊ व मी मोटारीने पिरॅमिड्स पाहावयास निघालो. रस्त्याने नाईल नदीच्या विस्तृत पात्रावर बांधलेला पूल लागला. तो पूल ओलांडून आम्ही पुढे गेलो. काही अंतरावर गेल्यानंतर एक टुमदार बंगला लागला. ह्या बंगल्यात येऊन इजिप्तचा शेवटचा राजा फरूक काही वेळा राहत असे. तो राजा चैनी व विलासी होता; आपल्या प्रेयसींना घेऊन तो ह्या बंगल्यात येऊन नाचरंग इत्यादि विलासांत दंग होत असे. अर्थात आता तो त्या बंगल्यातच काय पण इजिप्तमध्येही दिसत नाही. तो स्वत: चैनी तर होताच, पण त्याची राजवटही लाचलुचपतीने बरबट-लेली होती, तो आपल्या चैनीसाठी खूप खर्च करीत असे. त्याचे अधिकारी व

नोकरवर्ग नालायक व अकार्यक्षम होते. ह्या सर्व गोष्टींनी इजिप्तमधली जनता हैराण झाली होती व राजा फरूकच्या राजवटीला संपूर्णपणे कंटाळली होती. १९५२ सालात इजिप्तमध्ये राज्यक्रांती झाली, राजा फरूकला लोकांनी पदच्युत केले, तो इजिप्तमधून पळून गेला. प्रथम जनरल नगीब ह्या लष्करी अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली इजिप्तचा नवीन राज्यकारभार सुरू झाला; पण सुएझ कालव्याच्या राष्ट्रीयकरण प्रश्नावरून त्याचे व इतर लष्करी अधिकाऱ्यांचे मतभेद झाले. जनरल नगीबनी अधिकार सूत्रे खाली ठेवली व त्याच्या जागी गॅमेल अबदेल नासेर हा इजिप्तचा अध्यक्ष म्हणून राज्यारूढ झाला. हा सर्व इतिहास तू जाणतेसच; पण रस्त्यात लागलेल्या त्या बंगल्यावरून व त्यात राजा फरूकच्या अनिर्बंध वागणुकीवरून इजिप्तमधील अलिकडच्या ऐतिहासिक घटनांची आठवण झाली म्हणून त्यांचा थोडक्यात निर्देश मी केला आहे. राजा फरूकचा बंगला सोडल्यानंतर आम्ही ज्या ठिकाणी पिरॅमिड्स आहेत, तेथे येऊन पोहोचलो. इजिप्तमध्ये ठिकठिकाणी किती तरी पिरॅमिड्स आहेत, परंतु कैरोजवळ असलेले जे पिरॅमिड्स मी पाहिले, ते सर्वांत मोठे आहेत. हे पिरॅमिड्स 'गिझा' ( Gizeh ) ह्या स्थळी आहेत. 'गिझा' येथे मोटारीने येण्यास आम्हांस सुमारे पाऊण तास लागला. गिझा हे ठिकाण एका उंचवटयावर आहे व भोवताली वाळवंट आहे.

पिरॅमिड म्हणजे जिच्या बाजू त्रिकोणाकृती आहेत व जी वरवर निमुळती होत जाते, अशी वास्तू. मागच्या पत्रात मी लिहिलेच आहे की, प्राचीन काळी इजिप्तमधील लोकांत अशी कल्पना होती की, मरणानंतर माणसाचे अस्तित्व कायम राहते व म्हणून त्याचे शव जपून ठेवले पाहिजे व ह्यासाठी इजिप्शियन लोक कोणत्या पद्धतीने शवे जपून ठेवीत त्याचेही वर्णन मी मागे केले आहे. ह्या कल्पनेतच पिरॅमिड ह्या वास्तूचा उगम झाला. साध्या कबरीत शवे नीट व फार काळ राहणार नाहीत म्हणून ती शवे पिरॅमिड्ससारख्या वास्तूंमध्ये पुरण्यात येत. त्यातल्या त्यात इजिप्तच्या प्राचीन राजांची—ज्यांना फारो (Pharaohs) म्हणत—शवे व्यवस्थित राहावीत, म्हणून त्यांच्या कबरीवर पिरॅमिड्स बांधण्यात येत. पिरॅमिड्स ह्या वास्तू फार भव्य व टिकाऊ आहेत. हजारो वर्षे लोटली तरी ह्या वास्तू टिकून आहेत. एवढेच नव्हे तर त्यांवर काळाचा काहीच

परिणाम झालेला दिसत नाही. ह्या वास्तू बांधण्यापाठीमागे इजिप्तच्या लोकांचा दुसरा एक हेतू होता. हे लोक व त्यांचे राजे आपल्या देशाच्या राज्यावर ( State ) फार प्रेम करीत असत. आपले राज्य चिरंतन आहे, असे ते मानत. फारो किंवा सम्राट हा इजिप्त राज्याचा प्रतिनिधी समजला जाई. ह्या प्रतिनिधीचे शवही कायम राहिले पाहिजे व त्याची कबर कधीही विनाश पावता कामा नये, ह्या उद्देशाने ह्या कबरीसाठी पिरॅमिडसारखी भक्कम व सदैव टिकणारी, काळालाही दाद न देणारी अशी वास्तू बांधण्यात येई. जगातील नऊ आश्चर्यापैकी ' पिरॅमिड ' हे एक आश्चर्य आहे.

कैरो शहराजवळ गिझा येथे तीन पिरॅमिड्स आहेत. त्यांतील राजा चिआप्स किंवा खुफू याचे (King Khufu) पिरॅमिड सर्वांत मोठे आहे. ते खि. पू. सुमारे २७०० सालात बांधण्यात आले. ह्या पिरॅमिडची उंची ४८० फूट आहे. ह्या पिरॅमिडच्या पायथ्याची लांबी ७५० फूट आहे व रुंदीही तितकीच म्हणजे ७५० फूट आहे. पिरॅमिडच्या पायथ्याची लांबी व रुंदी सारखीच असते. ह्या पिरॅमिडचे क्षेत्र १३ एकर आहे. ह्या पिरॅमिडला २० लाख लाईम नावाच्या दगडांचे गाळे ( Blocks ) वापरण्यात आलेले आहेत. हे दगड इतक्या चतुराईने व काटेकोरपणाने बसविण्यात आलेले आहेत की, त्याची नक्कल फारच थोड्या आधुनिक गवंड्यांना किंवा स्थापत्य शास्त्रज्ञांना करता येईल. ह्या पिरॅमिड्सच्या आत गुंतागुंतीच्या अनेक वाटा व तळघरे आहेत, त्यांची बांधणी पाहिल्यानंतर त्या काळच्या वास्तुशास्त्रज्ञांना गणित व स्थापत्य ह्या शास्त्रांचे. किती सखोल ज्ञान होते, याची कल्पना येते. ग्रीक इतिहास लेखक हेरोडोटस (Herodotus) म्हणतो की, " खुफूचे पिरॅमिड बांधण्यासाठी एक लाख लोकांना वीस वर्षे तरी खपावे लागले असेल. " हे एवढे अवाढव्य पिरॅमिड पायांनी चालून पाहणे माणसास शक्य नसते, म्हणून येथे भाड्याने उंट किंवा गाढवे स्वारीसाठी मिळतात. गाढवावर बसणे मला कसेसेच वाटले म्हणून मी एका उंटावर बसून हे व इतर दोन पिरॅमिड्स पाहिले. इतर जे दोन पिरॅमिड्स आहेत, त्यांपैकी एकाची उंची ४४७ फूट व दुसऱ्याची २०३ फूट आहे. हे उंच, अवाढव्य व टोलेजंग पिरॅमिड्स पहात असताना आपण ह्या मर्त्य जगातील वास्तू पाहात नाही तर दुसऱ्या कुठल्या तरी निराळ्याच जगातील अद्वितीय, अमर व आश्चर्यकारक वास्तू पाहात आहोत, असे मला वाटले.

पिरॅमिड्स पाहिल्यानंतर तेथून थोड्याच अंतरावर असलेली दुसरी नवल-पूर्ण 'स्फिंक्स' नावाची वास्तू मी पाहिली. स्फिंक्सची आकृती सिंहासारखी असून तिला पंख आहेत, ह्या आकृतीचे तोंड मात्र माणसासारखे आहे. उंच अशा चवुतऱ्यावर ही आकृती बसविलेली आहे. ही आकृतीही अतिशय प्रचंड आहे. तिची लांबी १८९ फूट आहे. इजिप्तमध्ये अनेक ठिकाणी स्फिंक्सचे पुतळे आहेत; पण कैरोजवळ असलेला हा स्फिंक्स सर्वांत जुना व प्रसिद्ध आहे. ह्या स्फिंक्सच्या आकृतीतील नाक, डोळे, इत्यादि अवयवांची मात्र थोडी फार मोडतोड झालेली आहे.

'स्फिंक्स' पाहिल्यानंतर जवळच असलेल्या स्फिंक्सच्या मंदिराचे व इतर वास्तूंचे अवशेष आम्ही पाहिले. कारण ह्या वास्तूंची बरीच पडझड झालेली आहे. तसेच एका ठिकाणी एक भुयार होते. त्या भुयारात जाऊन तेथे असलेल्या ममीजही—शवे आम्ही पाहिली. हे सर्व पाहता पाहता सायंकाळ होण्याची वेळ झाली. सूर्य अस्तास जात होता. त्याची सोनेरी व तांबूस कोमल किरणे पिरॅमिड्सच्या शिखरांवर पडलेली होती. सूर्योदय होत असतानाही सूर्याची किरणे ह्या पिरॅमिड्सवर पडतात. माझ्या मनात विचार आला की, "सूर्य उदयास येत असता त्याची किरणे प्रथम ह्या पिरॅमिड्सच्या शिखरांवर पडावीत व तो मावळत असताना त्याच्या मावळतीची शेवटची किरणेही ह्या पिरॅमिड्सच्या गगनचुंबी शिखरांवर पडावीत ह्या हेतूने तर प्राचीन सूर्योपासक इजिप्शियन लोकांनी ही उंच उंच पिरॅमिड्स बांधली तर नाहीत ना ?

पिरॅमिड्स पाहिल्यानंतर आम्ही कैरो शहरास परतलो. राजवाडे यांच्या राहत्या घरी गेलो. श्रीमती राजवाडे यांनी भोजन तयार ठेवलेले होते. त्या मला म्हणाल्या, "तुम्ही दीड- दोन महिने पाश्चात्य पद्धतीचे जेवण घेऊन कंटाळला असाल, म्हणून मी आज खास महाराष्ट्रीय पद्धतीचे झुणकाभाकरीचे भोजन तयार करवून घेतलेले आहे, माझ्या स्वयंपाक्यास माझ्या देखरेखीखाली हे भोजन करावयास सांगितले" आणि खरोखरच मला त्यांचे झुणकाभाकरी, भात, आमटी, चटणी, कोशिंबीरयुक्त भोजन फारच आवडले. दोन महिन्यां-नंतर मी माझ्या घरी जेवलो असे मला वाटले.

जेवण झाल्यानंतर काही वेळ राजवाड्यांच्या फ्लॅटच्या पश्चिमेकडच्या बाजूच्या गॅलरीत आम्ही काही वेळ बोलत बसलो, ह्या गॅलरीतून नाईल नदीचे

पात्र दिसत होते, आजूबाजूच्या विजेच्या दिव्यांचा प्रकाश त्या पात्रातील पाण्यावर झळाळत होता, नदीच्या विशाल पात्राचा तो देखावा मोठा रम्य दिसत होता. काही वेळ राजवाडे मंडळींबरोबर निवांतपणे गप्पागोष्टी केल्या-नंतर मी मोटारीने कैरो शहरात फेरफटका मारला.

ह्या शहरातील रस्ते बरेच रुंद आहेत. स्त्रिया काळया रंगाच्या कापडाच्या झग्यांनी आपली सर्व अंगे झाकून रस्त्यांनी फिरताना मी पाहिल्या. तोंडावर मात्र ह्या झग्यांना जाळीदार कपडा असतो. ह्या जाळीतून त्या स्त्रियांना दिसू शकते. रस्ते विजेच्या दिव्यांच्या झगझगाटाने उजळले होते; विलासांनी व ऐषारामांनी संपन्न अशा हॉटेल्समध्ये गिऱ्हाईकांची गर्दी दिसत होती. बाग-बगीच्यांची व कारंजांची शोभा पाहात मी ह्या शहरातून बराच वेळ हिंडलो. जुन्या मशिदींच्या व इतरही इमारतींच्या घुमटामधील व मनोऱ्यांमधील जादु-मय आकर्षण मनास मोहून टाकीत होते.

तुझा

**नाना**

• • •

: ४१ :

# सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर झोके घेणारे जीवन

**कैरो,**

ता. १०-६-१९५५.

चि. **विठ्ठल** यास सप्रेम आशीर्वाद—

माझा कैरो शहरातील व इजिप्त देशातील मुक्काम संपत आला आहे. कैरो हे सुंदर शहर व इजिप्तसारखा प्राचीन व इतिहास प्रसिद्ध देश सोडताना

मला वाईट वाटणे साहजिकच आहे. कैरो शहरातील माझे वास्तव्य सुखाचे व्हावे व मला कैरो शहरातील व त्या शहराच्या जवळपासची स्थळे पाहता यावीत म्हणून ज्यांनी माझी उत्तम व्यवस्था ठेवली व ज्यांनी माझे मोठ्या प्रेमाने आदरातिथ्य केले, त्या राजवाडे मंडळींचा निरोप घेतानाही मला खेद झाला. त्यांचा जड अंतःकरणाने निरोप घेऊन मी कैरोच्या विमानतळावर प्रयाण केले. कैरो शहरास मी भेट दिली त्यावेळी माझे जुने मित्र श्री. राजवाडे व त्यांची मंडळी तेथे असावीत, हा दैवी योगायोगच म्हणावयाचा !

कैरो शहर, इजिप्त देश व माझे परम स्नेही श्री. राजवाडे व त्यांची मंडळी यांना सोडून जाताना मला खेद होत होता; परंतु गोड स्मृतींनी भरलेला व अनुभवाचा व ज्ञानाचा अमोल ठेवा मला बहाल करणारा माझ्या आयुष्यातील हा सुखमय प्रवास संपवून मी लवकरच माझ्या प्रिय देशास परतणार आहे व तुमची व माझी गाठ इतक्या दिवसांनी परत होणार आहे, ह्या विचाराने मला आनंदही होत होता.

सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर झोके घेणारे हे जीवन किती विचित्र आहे पहा !

तुझा

**नाना**

● ● ●

# पुनर्भेट

मी कैरोहून मुंबईचा प्रवास एअर इंडियाच्या विमानाने केला. ता. १० जूनला शुक्रवारी रात्री सुमारे १२।। वाजता ह्या विमानाने कैरो विमानतळावरून उड्डाण केले. सर्व रात्रभर व दुसऱ्या दिवशी म्हणजे ता. ११ जून शनिवारी दुपारी २।। वाजेपर्यंत विमानाचा अव्याहतपणे प्रवास चालू होता. २।। वाजण्याच्या सुमारास हे विमान मुंबईच्या विमानतळावर उतरले. ता. ११ एप्रिल

१९५५ रोजी तिसऱ्या प्रहरी पाच वाजता मी ' हिमालया ' बोटीत मुंबईहून इंग्लंडकडे जाण्यासाठी बसलो व अनेक देशांचा प्रवास करून बरोवर दोन महि-न्यांनी–दोन-अडीच तासांचा फरक सोडला तर–म्हणजे ता. ११ जून १९५५ रोजी मी विमानाने परत मुंबईस येऊन पोहोचलो. माझ्या मायभूमीची पुन्हा भेट होत असल्यामुळे मला कोण आनंद होत होता ! ता. ११ जून १९५५ रोजी दुपारी मी विमानाने मुंबईस येत आहे, असे अगोदरच माझ्या घरच्या मंडळींना मी कळविले होते. विमानतळावर उतरल्यावर माझ्या पत्नीस व मुलांना केव्हा मी भेटेन असे मला झाले होते. विमानतळावर इतर प्रवाशांच्या बरोबर माझ्याही सामानाची तपासणी कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी केली. ती तपासणी चालू असताना मुंबई सरकारचा एक पोलीस अधिकारी माझ्याकडे आला, त्याने माझे स्वागत केले व जणू माझ्या मनातील भाव जाणून तो मला म्हणाला की, " तुमची पत्नी व मुले तुम्हांला घेण्यासाठी मोटार घेऊन आलेले आहेत. " सामानाची कस्टम्सची तपासणी झाल्यानंतर तो पोलीस अधिकारी जेथे माझी पत्नी व मुले होती तेथे मला घेऊन गेला. पत्नीची व मुलांची भेट झाल्यावर मला फार आनंद झाला. दीर्घ व दूरदूरच्या प्रवासानंतर जवळच्या नातलगांना व मित्रांना भेटण्यात अवर्णनीय आनंद असतो, त्या आनंदाचा स्वाद मी घेत होतो. एका मुलाचे चुंबन घे, दुसऱ्याला पोटाशी धर, तिसऱ्याला आलिंगन दे, असे माझे चालले होते. तो पोलीस अधिकारी आमच्याकडे पाहात होता, दुसऱ्या लोकांच्याही नजरा आमच्याकडे वळल्या; पण मी त्याची पर्वा केली नाही. माझे मुलांचे कोडकौतुक करणे चालूच होते. चुंबन, आलिंगन वगैरे प्रेमाचे सुरुवातीचे मूक भाषेतील संवाद झाल्यावर मी माझ्या एका मुलास विचारले, " काय तुझी प्रकृती बरी आहे ना ? " दुसऱ्यास विचारले, " तुझी परीक्षा संपली का ? " तिसऱ्यास विचारले, " तुझे आता काय वाचन चालले आहे ? " चवथ्यास विचारले, " तुझी नृत्यातील प्रगती कशी काय आहे ? " ( कारण माझी एक मुलगी त्यावेळी नृत्य शिकत होती. ) माझ्या पत्नीला तर प्रश्न विचारल्याशिवायच तिचे भाव मला समजत होते व माझेही विचार ती काही एक न बोलता जाणत होती.

थंड हवेच्या देशात राहिल्यामुळे व इंग्रजी भाषा बोलणाऱ्या लोकांवरोबर बरेच दिवस काढल्यामुळे माझ्या रंगारूपात व बोलण्यात काही फरक झाला की काय हे जाणण्यासाठी माझी मुले माझ्याकडे निरखून पाहत होती व माझ्या बोलण्याकडे बारकाईने लक्ष देत होती, हे मी जाणले व त्यामुळे मला फार गंमत वाटली. मंडळींसह मी घरी आलो. स्नान, भोजन, वगैरे उरकल्यानंतर मी व माझी पत्नी व मुले दिवाणखान्यात गप्पागोष्टी करीत बसलो. बऱ्याच दिवसांनी आम्ही पुन्हा एकत्र आलो होतो. दरम्यान मी किती तरी नवीन पाहिले होते, अनुभविले होते.

प्रवासातील बहुतेक सर्व हकिकत त्यांना मी पत्रांनी कळविली होती; पण कैरोहून मुंबईचा जो मी विमानाने प्रवास केला, त्याची माहिती त्यांना हवी होती. मी म्हणालो, " काल मी दिवसभर व रात्रीदेखील बराच वेळ कैरो शहर पाहण्यासाठी खूप भटकलो. त्यामुळे मला थकवा आला होता. साहजिकच विमानात चढून माझ्या जागेवर बसल्यानंतर मी लगेच झोपी गेलो. आज मात्र सकाळपासून मला विमानातून अनेक मनोवेधक दृश्ये पाहावयास मिळाली. काही वेळेला आकाशात ढगांचे दाट पुंजके—नव्हे ढगांचे डोंगर म्हणणेच जास्त रास्त होईल—दिसत होते. ज्याप्रमाणे आळंदी, देहू, पंढरपूर येथे यात्रेच्या वेळी भक्तजनांची गर्दी उसळते, त्याप्रमाणे आकाशात ढगांची झुम्मड उसळलेली मला दिसत होती. आमचे विमान ह्या ढगावरून धावत होते. विमानातील माझ्या जागेजवळ असलेल्या खिडकीतून मी ढगांकडे टक लावून पाहात होतो. ढगांचा अजब खेळ चाललेला होता. तो पाहून मला अचंबा व आनंद वाटत होता. ढगांचे ते बेफाट धावणे व एकमेकांच्या अंगांवर आदळणे पाहून मला वाटले की, जणू ते एकमेकांबरोबर धावण्याच्या शर्यती लावत आहेत व कुस्त्या खेळत आहेत. सूर्य किरणांचे झोत त्या ढगांवर पडत होते. आकाशाच्या रंग-भूमीवर ढगांचे नृत्यासह नाटक चाललेले होते; ढगरूपी पात्रांवर विविध रंगांचे सूर्य प्रकाशाचे झोत कोणी तरी जादूगार टाकीत होता. किती मोहक होते ते रंग ! बहुरुप्याप्रमाणे ढग क्षणोक्षणी आपले आकार व रंग बदलीत होते. ह्या ढगांचे कधी उंच उंच पर्वत व्हावयाचे, त्या पर्वतांमध्ये खोल खोल दऱ्या दिसावयाच्या. कधी त्या ढगांच्या पर्वतांवर सरोवरांचे आकार दिसत व त्यामध्ये निळ्या पाण्याच्या लाटा उसळत आहेत, असा भास होई. अशी नाना प्रकारांची

ढगांची दृश्ये पाहून मी आनंदात डुंबून जात असे. कधी विमानातून खाली समुद्राच्या पाण्याची जी चित्ताकर्षक दृश्ये दिसत, ती मनाला भारून टाकीत होती. कधी समुद्र किनाऱ्यावर झाडांची खूप दाटी पाहावयास मिळे, तर कधी जमिनीवर डोंगरांच्या रांगा पाहावयास सापडत. असे मनोहर देखावे पाहात पाहात मी मुंबईपर्यंतचा प्रवास सुखाने पुरा केला. खरोखर तुम्ही सर्वांनी विमानातून प्रवास करून अशा तऱ्हेची जादूमय दृश्ये पाहावयास हवीत." माझे हे वर्णन ऐकून माझी पत्नी म्हणाली, "आमचा प्रवास होऊन जादुमय दृश्यांचे दर्शन आम्हांला घडेल तेव्हा घडो. परंतु तुम्ही तुमच्या प्रवासातील अनुभवाचे आतापर्यंत पत्रांतून जे वर्णन केलेत व प्रत्यक्षही आता जी हकिकत सांगितली, ते वर्णन वाचून व आताची हकिकत ऐकून आम्हा सर्वांना स्वर्गसुखाचा आनंद मिळाला एवढे खरे!"

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम........................ दि: ३.५.९.८५
क्रमांक ...369......... नों दि ..........
—: ० :—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
9.8.2023

REFBK-0014273

REFBK-0014273